ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

मराठी समाजशास्त्र परिषद

(नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र/२७–८३ औरंगाबाद)

—: कार्यालय पत्ता :—

समाजशास्त्र विभाग,

महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

—: कार्यकारी मंडळ :—

अध्यक्ष : डॉ. सरोज आगलावे रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सचिव : डॉ. दिपक पवार रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

खजिनदार : डॉ. राहुल भगत रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सदस्य : प्रा. साहेबराव भालेराव स्वा. रा. ति. म. विद्यापीठ, नांदेड.

सदस्य : डॉ. ज्योती पोटे मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सदस्य : डॉ. भरतसिंग पटले एस.एन.डी. टी. विद्यापीठ,मुंबई.

सदस्य : डॉ. चुडामन पगारे क. ब. चौ. उ. म. विद्यापीठ, जळगांव.

सदस्य : डॉ. सतीश देसाई शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य : प्रा. नंदकिशोर राऊत सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती

सदस्य : डॉ. विकास शेवाळे क्रा. सा. फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदस्य : डॉ. अशोक सालोडकर गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सदस्य : प्रा. प्रवीण घोडेस्वार य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक

सदस्य : डॉ. हनुमंत मिसाळ डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

सदस्य : डॉ. रामेश्वर मोरे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ३६ वे अंक २३ वा डिसेंबर, २०१८

मुख्य संपादक :—
डॉ. सरोज आगलावे

कार्यकारी संपादक :—
डॉ. राहुल भगत

संपादक समिती सदस्य :—
डॉ. दिपक पवार, डॉ. प्रदीप गजभिये,
प्रा. जयेन्द्र पेंडसे डॉ. प्रमोद पाटील,
प्रा. राजकुमार भगत, प्रा. विनोद शेंडे,

संपादकीय सल्लागार मंडळ :—
डॉ. प्रकाश बोबडे, डॉ. प्रदीप आगलावे,
डॉ. रमेश पांडे, डॉ. बी. के. स्वाई,
डॉ. मनोहर बुटे, डॉ. भा. की. खडसे.

संपर्क पत्ता :—
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा : समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूर
website :www.mspmonline.com E-mail : marathisocio@gmail.com

टंकण व मांडणी : श्री. मनीष पडोळे, दर्शन कम्प्यूटर्स, तुमसर जि. भंडारा.
मुद्रीत शोधक : डॉ. नलिनी बोरकर

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.

सुचना : या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ३६ वे अंक २३ वा डिसेंबर, २०१८

समकक्ष समिक्षा समिती (Peer Review Committee)

डॉ. श्रृती तांबे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

डॉ. जगन कराडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डॉ. बालाजी केंद्रे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. धनराज पाटील, समाजशास्त्र विभाग प्रमुख, सोलापूर विद्यापीठ

डॉ. अ. रहीम अ. मुजीब, सोशल महाविद्यालय, सिध्देश्वर पेठ, सोलापूर.

डॉ. जयश्री महाजन, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव.

डॉ. एन. टी. कांबळे, अध्यक्ष, समाजशास्त्र अभ्यास मंडळ, स्वा. रा. तिर्थ विद्यापीठ, नांदेड.

डॉ. स्मृती भोसले, एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई.

डॉ. संपत काळे, टाटा समाजविज्ञान संस्था, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

डॉ. संदीप चौधरी, स. भु. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद.

डॉ. संजय सावळे, के. टी. एच. एम. महाविद्यालय, गंगारपूर रोड, नाशिक.

प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना. औरंगाबाद

डॉ. प्रदीप मेश्राम, समाजशास्त्र विभाग प्रमुख, जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा.

डॉ. रंजना लाड, समाजशास्त्र विभाग प्रमुख, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर.

डॉ. रविंद्र वाघ, समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालय, धुळे.

डॉ. कल्याण साखरकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, फु. ना. महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ.

डॉ. धनंयज सोनटक्के, प्रियदर्शनी महाविद्यालय, वर्धा (रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर)

डॉ. दिनकर उंबरकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, सिताबाई कला महाविद्यालय, अकोला.

डॉ. मिलिंद जांभूळकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, जनता महाविद्यालय, चंद्रपूर.

डॉ. राजेन्द्र कांबळे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, इंदीरा गांधी महाविद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर.

संपादकीय.....

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र असलेल्या समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा २३ वा अंक आपल्या हाती देतांना आम्हाला अतीव आनंद होतो आहे. समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा हा अंक आपल्यासाठी सर्वार्थाने नवा आहे. कारण या अंकापासूनच आपण समाजशास्त्र संशोधन पत्रिकेला समकक्ष समिती स्थापन करून ईतर रेप्युटेड जर्नल च्या रांगेत आणन्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या या प्रयत्नाला आपल्याकडून भरपूर प्रतिसाद प्राप्त झाला. या बदद्ल आपले सर्वप्रथम हार्दिक अभिनंदन आणि धन्यवाद!

समाजशास्त्र संशोधन पत्रिकेसाठी प्राध्यापक, संशोधक तसेच विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. समाजशास्त्र संशोधन पत्रिकेसाठी यावर्षी प्राप्त झालेल्या लेख व शोध निबंधाची संख्या भरपूर आहे. परंतू खेदाने म्हणावे लागते की, हा प्रतिसाद फक्त संख्यात्मक स्वरूपाचा आहे. गुणात्मक स्वरूपाचा नाही. कारण संशोधन पत्रिकेकडे आलेले बहुतांश लेख/निबंध पत्रिकेत प्रकाशित करण्याच्या गुणवत्तेचे नव्हते असे बऱ्याच समिक्षकांचे मत होते. त्याचबरोबर काही समिक्षकांनी मात्र हे लेख सुध्दा प्रकाशित करून लेखकांना पुढील लेखनासाठी प्रोत्साहित करावे, असे मत व्यक्त केले. त्यामूळेच या अंकासाठी आलेले सर्वच लेख आपण या अंकात समाविष्ट केले आहेत.

समाजशास्त्राचे अभ्यासक व प्राध्यापक म्हणून आम्हाला सुध्दा असे मनोमन वाटते की, समाजशास्त्राच्या प्राध्यापकांचे, संशोधकांचे लेख, शोधनिबंध अभ्यासपूर्ण, संशोधनात्मक व गुणात्मक असावे. परंतू तसे होतांना दिसत नाही. लेख किंवा निबंध लिहायचा म्हणून लिहणे अशी वृत्ती बऱ्याच संशोधकांमध्ये दिसून आली. अगदी २०—२२ वर्ष अध्यापनाचे व संशोधनाचे कार्य करूनही आमच्या प्राध्यापकांना एक चांगला गुणात्मक शोधनिबंध लिहता येवू नये, ही आश्चर्याची बाब आहे. यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनात एक चर्चासत्र किंवा परिसंवाद 'शोध निबंध कसा लिहावा'? यावर होणे अत्यावश्यक आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. आणि तसा प्रयत्न आम्ही पुढच्या अधिवेशनात निश्चितपणे करू.

यावर्षी पासून समाजशास्त्र संशोधन पत्रिकेसाठी स्थापन केलेल्या समकक्ष समितीमधील अनेक समिक्षकांच्या या संदर्भात अत्यंत मौल्यवान सुचना आल्यात. ज्या सदस्यांकडे लेख व निबंध समिक्षेसाठी पाठविले होते त्या समिक्षकांनी आपली जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडली. आपल्या व्यस्ततेतून वेळ काढून त्यांनी समिक्षणाचे कार्य वेळेच्या आत केले त्याबदद्ल आम्ही त्यांचे आभारी आहोत. प्रस्तुत अंकातील काही लेख व निबंधाविषयी अनेक समिक्षकांनी नाराजी व्यक्त केली. तसेच काही लेख व निबंध या पत्रिकेत छापू नये, अशाही सुचना केल्यात. समिक्षकांच्या टिपणीसह आम्ही त्या त्या लेखकांना त्यांचे लेख, निबंध पाठविणार आहोत. जेणेकरून पुढच्यावेळेस त्यांच्याकडून अशा चुका होणार नाहीत. परंतू समिक्षकांनी मना केल्यानंतरही संपादकीय अधिकाराखातर समिक्षकांची माफी मागून आम्ही काही लेख ईथे प्रकाशीत करीत आहोत. तसेच या अंकासाठी ज्या लेखकांनी आपले शोध निबंध व लेख पाठविले त्यांचेही आभारी आहोत.

जळगांव येथील अधिवेशनात आमसभेत पारित झालेल्या ठरावाप्रमाणे परिषदेचा संशोधन पत्रिकेच्या छपाईवरील खर्च कमी करण्यासाठी यावर्षीपासून आपण समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा अंक परिषदेच्या वेबसाईटवर ऑनलाईन प्रकाशित करीत आहोत. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांना हा अंक वेबसाईटवर तसेच आपल्या वॉट्सॲपवर सुध्दा वाचता येईल.

या अंकाच्या संदर्भात आपल्या प्रतिक्रियांचे स्वागत आहे. या संदर्भात आपल्या प्रतिक्रिया परिषदेच्या ईमेल वर किंवा मुख्य संपादक/कार्यकारी संपादक यांच्या ईमेल वर पाठवाव्यात.

धन्यवाद!

मुख्य संपादक
डॉ. सरोज आगलावे

कार्यकारी संपादक
डॉ. राहुल भगत

अनुक्रमणिका

अ. क्र.	लेखाचे शिर्षक	लेखक	पृ. क्र.
१.	अल्पसंख्याकांची अस्मिता: तात्वीक भ्रम आणि व्यावहारिक संदर्भ	जगन कराडे	...१
२.	नैसर्गिक संसाधन आणि सामाजिक न्याय...	संपत काळे	...६
३.	उत्तर जागतिकीकरणातील उपेक्षीतांचे संघटनीकरण	धनराज पाटील	...११
४.	सायबर स्त्रीवाद	प्रविण घोडेस्वार	...१६
५.	आदिवासी समाज व कुमारीमातांची समस्या	श्रीराम खाडे	...१९
६.	शासनाचे विनाअनुदान धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षण	हनुमंत मिसाळ	...२४
७.	महिला सक्षमीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान	ज्योती पोटे	...२८
८.	देवदासी प्रथा: एक समाजशास्त्रीय चिंतन	जया लाडे	...३१
९.	भारतीय महिलांचा राजकीय सहभाग	प्रविण मुधोळकर	...३६
१०.	भटक्या विमुक्त समाजातील वर्तमान समस्या व परिवर्तन	दिपक पवार	...४१
११.	जागतिक तापमान वाढीचे संभाव्य धोके व उपाययोजना	बाळकृष्ण रामटेके	...४४
१२.	बचत गटाच्या संकल्पनेतील महिला सशक्तीकरण	गणेश बहादे	...४७
१३.	समाजशास्त्र : समस्या व आव्हाने	कमलकिशोर इंगोले	...४९
१४.	जागतिकीकरणाचा आदिवासी समाज जीवनावरील परिणाम	मनोहर येरकलवार	...५२
१५.	सेझ जमीन अधिग्रहण विरोधी शेतकऱ्यांचा संघर्ष	मंजुषा नळगीरकर	...५६
१६.	जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांची धार्मिक स्थिती	राजेंद्र बगाटे	...६१
१७.	भारतीय राज्यघटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान	के. एस. काळे	...६७
१८.	महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण : एक काळाची गरज	सुरेश धनवडे	...७१
१९.	सरोगसी माता	विलास पवार	...७४
२०.	महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची गती आणि स्थिती	नारायण कांबळे	...७७
२१.	आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाना भेडसावणाऱ्या समस्या	रामेश्वर मोरे	...८३
२२.	सुशिक्षित बेरोजगारी आणि गुन्हेगारी	किशोर राऊत	...८५
२३.	महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे बदलते विविध पैलू	सुधा खडके	...८८
२४.	प्रसार माध्यम आणि ग्रामीण युवकांचे वर्तन	एस. के. राठोड	...९१
२५.	महिला सबलीकरण	हर्षला सुर्यवंशी	...९६
२६.	लिंगभाव विषमता : माता, बाल कुपोषण	भगवान मनाळ	...९८
२७.	लोकसंख्या विस्फोट : एक सामाजिक समस्या	अशोक सालोटकर	...१०२
२८.	जेष्ठांच्या समस्या व जेष्ठ नागरिक चळवळीची भूमीका	रविंद्र विखार	...१०४
२९.	काव्यसृष्टीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचे योगदान	संतोष मेंडेंकर	...१०६
३०.	शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीवरील प्रभाव	श्रीनिवास पिलगुलवार	...१०८
३१.	जातीभेदाचे मूलगामी चिंतन (ग्रंथ समिक्षण)	प्रियदर्शन भवरे	...११४
३२.	२८ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल	अरूण पौडमल	...११८

अल्पसंख्यांकांची अस्मिता: तात्वीक भ्रम आणि व्यावहारिक संदर्भ

डॉ. जगन कराडे, प्राध्यापक आणि विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रस्तावना :—भारतीय समाजव्यवस्थेमध्ये कालानुरूप मोठ्या प्रमाणात बदल झाल्यामुळे तत्कालीन प्रश्नांचे स्वरूप बदलल्याने कांही जुन्या प्रश्नांचे स्वरूप बदलले आहे तर कांही नव्याने प्रश्न निर्माण होत आहेत. या प्रश्नांकडे आपण दुर्लक्ष केले तर, आपल्या देशाची अपरिमित हानी होवू शकते तसेच शत्रूराष्ट्रांना ईतर कारवाया न करताच त्यांचा हेतू साध्य होईल. म्हणून ते प्रश्न कोणते? त्यांचे स्वरूप काय? त्यांचा भविष्यात परिणाम काय होईल? याचा सखोल विचार करून त्या प्रश्नांची पूनर्मांडणी करून त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करावा लागेल अशा प्रश्नांपैकीच 'धर्म' आणि 'भाषा' या दोन घटकांवरून भारतीय समाज व्यवस्थेमध्ये कितीतरी सांप्रदायीक दंगली झालेल्या आहेत. अशा संप्रदायाचे स्वरूप पाहिले तर याची व्याप्ती अधिक प्रमाणात आहे हे दिसून येते कारण आपल्या देशात 'सहा मुख्य सांप्रदायीक (Ethnic) समूह आणि ५२ जमातीचे समूह आहेत. मुख्यत: ६ धर्म आणि ६४०० जाती, उपजाती तसेच प्रमुख १८ भाषा आणि १६०० अल्पभाषा'[१] आहेत. याच कराणाने आपल्या समाजात एकी भासत असली तरी, वास्तव मात्र तसे मुळीच नसून विविध संप्रदायामध्ये असंख्य स्वरूपाचे तणाव निर्माण झाले आहेत. यातीलच 'अल्पसंख्यांक व बहुसंख्यांकाचे तणावपूर्ण संबंध 'हाही एक प्रश्न मानावा लागेल आणि अलिकडेच मानवी संसाधन विकास मंत्रालय 'अल्पसंख्यांक' या शब्दावर नव्याने विचार करू पहाते आहे खरे पाहिले तर, 'अल्पसंख्यांक' आणि 'बहुसंख्यांक' यामधील सामाजिक संबंध हे राष्ट्रबांधणी आणि विकासाच्या दृष्टीने अत्यंत सलोख्याचे असायला हवेत. या समुदायामध्ये तणावाचे संबंध निर्माण होवू नयेत तसेच कोणताही एक समुदाय दुसऱ्या समुदायाच्या प्रभावाखाली असता कामा नये अथवा एखाद्या समुदायाने दुसऱ्या समुदायाशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जावू नये. अशी अपेक्षा असली तरी वास्तवात मात्र 'अल्पसंख्यांक' व 'बहुसंख्यांक' समुदायांमध्ये असंख्य प्रकारचे मतभेद, द्वेष आणि मत्सर मोठ्या प्रमाणात दिसून येतात. म्हणूनच जागतिकीकरणाच्या काळात सर्वच देशात चर्चिला जाणारा प्रश्न म्हणून बहुसंख्य आणि अल्पसंख्यांकांतील तणावाच्या संबंधाकडे पाहिले जाते. त्याचबरोबर 'बहुसंख्यांक समाज आपल्या सामर्थ्याच्या जोरावर अल्पसंख्याक समाजावर आपला प्रभावही दाखवित असतो'[२] तसेच 'अल्पसंख्यांक' समूहाबद्दल 'बहुसंख्यांक' समाजामध्ये नेहमी पूर्वग्रह असतो. असेही अनुभव आपण गेली जवळजवळ सत्तर वर्षे पहात आहोत म्हणून अल्पसंख्यांकाबाबत असणारी संकल्पना भ्रम आणि त्याचे वास्तव आपणास समजून घ्यावी लागेल.

संकल्पना :—'अल्पसंख्यांक' ही संकल्पना जरी संख्याशास्त्राशी संबंधित असली तरी, या संकल्पनेचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, संविधानिक, भौगोलीक, धार्मिक आणि भाषिक अशा कितीतरी बाबींशी संबंध येत असल्याने या संकल्पनेचे परिणामही चौफेर असे आहेत असे दिसून येते आणि संविधानिक दृष्टीने पाहिले तर, भारतीय राज्यघटनेतील कलम क्रं. २९(१) नुसार, 'भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्यांच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा अधिकार असेल.' असे आधिकार दिलेच, याचबरोबर राज्यघटनेतील ३०(१) या कलमानुसार 'धर्म' किंवा 'भाषा' या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल. तर कलम क्रं. ३०(२) नुसार शैक्षणिक संस्थांना सहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही 'धर्म' किंवा 'भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या एखाद्या समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे या कारणास्तव तिला प्रतिकुल होतील, अशा प्रकारे भेदभाव करणार नाही. इतकेच नव्हेतर कलम क्रं.३५० नुसार, 'राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरण भाषिक अल्पसंख्यांक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करील आणि अशा सोयी पुरविणे शक्य व्हावे यासाठी राष्ट्रपती स्वत:ला आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निर्देश कोणत्याही राज्याला करतील.'

या तरतुदीवरुन असे स्पष्ट दिसून येते की, 'धर्म' आणि 'भाषा' असे दोन्ही घटक अल्पसंख्यांक समुदाय म्हणून ओळखण्यासाठी ग्राह्य मानलेले आहेत. यावेळी केवळ आणि केवळ लोकसंख्या ही कमी म्हणजे ५० टक्क्यापेक्षा कमी असणारी लोकसंख्या हा एकमेव निकष ग्राह्य मानून ३८ व्या अल्पसंख्यांक आयोगाच्या मतानुसार मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द आणि

पारशी या पाच धर्माचे समुदाय लोकसंख्येने कमी असल्याने 'धार्मीक अल्पसंख्यांक' म्हणून गणले आहेत. तर १८ भाषीक समुदायांना 'बहुसंख्यांक भाषीक समुदाय' तर ३८ भाषीक समुदायांना 'भाषीक अल्पसंख्यांक समुदाय' म्हणून गणले जावून त्यांना त्यांची संस्कृती जोपसण्यासाठी संविधानाने विशेष हक्कही प्रदान केले आहेत.

असे असले तरी, हल्लीच्या काळात सर्वच समूह विविध कारणाने आपल्या हितासाठी 'अल्पसंख्यांक' या संकल्पनेचा आधार घेत असल्याने अल्पसंख्यांक समुदायाची व्याप्ती वाढत असलेली दिसून येते. या संदर्भातील उदाहरण म्हणून पहायचे झाले तर, २००५ सालच्या पी. ए. ईनामदार विरूध्द महाराष्ट्र शासन व ईतर हे प्रकरण सांगता येते. परंतु व्यावहारिक पातळीवर वास्तव मात्र वेगळेच असल्याने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येईल. प्रकरणाच्या निकालापूर्वी देशपातळीवर केवळ ३८० अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था म्हणून कार्यरत होत्या परंतु या प्रकरणाच्या निकालानंतर मात्र अल्पसंख्यांक आयोगाकडे जवळजवळ ३०० अर्ज आलेत. या सर्व शैक्षणिक संस्थामधून अल्पसंख्यांक समुदायाचे हित पाहिले जाते असे मानणे स्वाभाविक आहे परंतु व्यावहारीक पातळीवर वास्तव मात्र वेगळेच असल्याने या प्रकरणाचे गांभार्य लक्षात येईल.

आज अखेरच्या न्यायालयीन प्रकरणामध्ये अल्पसंख्यांकाची तात्वीक संकल्पना, बदललेले संदर्भ किंवा त्याचे व्यावहारिक निकष याविषयी चर्चा न होता त्यांच्या अधिकारावरच अधिक प्रमाणात चर्चा झालेली दिसून येते. उदाहरणार्थ —

1. State of Kerala Vs Rev. Mother Provincial(AIR 1970 SC 2079)
2. St. Zavir's College Society Vs State of Gujarat (AIR 1974 SC 1389)
3. St. Stephan's College Society Vs University of Delhi(AIR 1992 SC 1630)
4. Unnikrishnan Vs State of Andra Pradesh(1993,JT 474)
5. T.M.A. Pai foundation Vs Govt. of Karnatka((civil) 317 of1993)
6. P.A. Inamdar Vs Govt.of Maharashtra ((civil) 5041 of 2005)

या कारणास्तव अल्पसंख्यांक समुदाय कोणता? किंवा अल्पसंख्यांक समुदाय कोणास म्हणावे? हे पाहिल्याशिवाय त्यांच्या अधिकारांचा विचार करणे योग्य होणार नाही. या संदर्भाने 'अल्पसंख्यांक समूह म्हणजे जो समूह लोकसंख्येने लहान असून तो विकासापासून वंचीत आहे'[३] अशी नोंद केली आहे. या व्याख्येनुसार आपणास स्पष्ट होते की, केवळ लोकसंख्या अल्प किंवा कमी असून चालणार नाही तर, विकासापासून दूर असणारा सिमांतिक समूह हाही भाग लोकसंख्येइतकाच महत्वाचा मानला आहे. मात्र राष्ट्रीय पातळीवर दि. २८ जानेवारी १९८४ च्या अल्पसंख्यांक आयोगाकडून महाराष्ट्र सरकार यांना पाठविलेल्या प्रपत्रात स्पष्ट नमूद केले आहे की, 'राज्यघटनेमध्ये 'अल्पसंख्यांक' या शब्दाची व्याख्या कोठेही केलेली नाही तरीही, सदर आयोगाने देशपातळीवर मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द आणि पारशी या समुदायांना अल्पसंख्यांक म्हणून मान्यता दिलेली आहे आणि भाषेच्या संदर्भात राज्यातील बहुसंख्यांक भाषीक लोकसमूहाच्या संख्येपेक्षा एखाद्या भाषेच्या लोकसमुदायाची लोकसंख्या कमी असेल तर, तो अल्पसंख्यांक भाषीक समुदाय म्हणून ठरविण्याचे अधिकार राज्याला दिले आहेत.'[४] असे नमुद केले आहे. वरील व्याख्येवरुन अल्पसंख्यांकांना, केवळ लोकसंख्येने अल्प आहेत म्हणून त्यांना संरक्षण दिले आहे असे नव्हेतर, संख्येने जास्त असलेल्या समुहाच्या प्रभावाखाली रहावे लागू नये म्हणून संरक्षण दिले आहे. कारण 'अधिक लोकसंख्या ही राजकीय, आर्थिक आणि सामाजिक सत्तेंशी निगडीत असते.'[५] यास अपवाद म्हणून प्राचीन काळापासून ते १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत 'संस्कृत' अणि १८ व्या शतकानंतर 'इंग्रजी' या भाषेचे समुदाय जरी अल्प असले तरीही त्या लोकसमूहाची निर्विवाद सत्ता होती. हे आपणास विसरता येणार नाही.

या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'अल्पसंख्यांक स्फोटक शक्ती असते. जर तिचा स्फोट झाला तर त्यात संपूर्ण राज्यव्यवस्था उदध्वस्त होऊ शकते. युरोपचा इतिहास अशा प्रकारच्या भरपूर आणि भयानक वास्तववादी घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. दुसरी गोष्ट अशी की, भारतातील अल्पसंख्यांकांनी स्वत:चे अस्तित्व बहुसंख्यांकांच्या हाती सोपविण्याचे मान्य केले आहे.[६] पुढे ते इतिहासातील उदाहरण देताना ते म्हणतात, आयर्लंडची फाळणी टाळण्यासाठी झालेल्या वाटाघाटीच्या इतिहासात रेडमंड, कार्सनला म्हणाले होते की, 'प्रोस्टेस्टंट अल्पसंख्यांकांसाठी तुम्हाला हव्या असलेल्या कोणत्याही सवलतींची मागणी करा. परंतु आयर्लंड एकसंघ राहू द्या.' तेव्हा कार्सननी दिलेले उत्तर असे होते की, 'चुलीत टाका तुमच्या सवलती। तुम्ही आमच्यावर राज्य करावे हेच आम्हाला मान्य नाही.'

यावरुन आपणास असे म्हणता येईल की, केवळ लोकसंख्येने लहान समुदाय आहेत म्हणून त्यांच्यावर राज्य करणे हे योग्य नसून ते मानवताविरोधी म्हणूनही

मानता येईल. 'अल्पसंख्यांक' समुह हा आर्थिक, राजकीय, विधीविषयक आणि सामाजिक दृष्टीने बहुसंख्यांकांच्या प्रभावाखाली असतो.'[७] आणि तो तसा न राहता 'लोकशाहीचा प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून लोकशाहीच्या नावाखाली अल्पसंख्यांकांची गळचेपी बहुमतवाल्याकडून होता कामा नये. अल्पसंख्यांकांना सुरक्षितता वाटली पाहिजे, इतकेच नव्हे तर, अल्पसंख्यांकावर होणाऱ्या अन्यायाचा मुकाबला करण्यासाठी जर इतर लोक पुढे आले नाहीत तर मग पुन्हा क्रांतीचे वारे अल्पसंख्यांकांच्या डोक्यात खेळू लागते.'[८] असे ऐतिहासीक संदर्भ विचारात घेवूनच दि.४ नोव्हेबर १९४८ रोजी संविधानाचा मसुदा सभेला सादर केल्यानंतर अल्पसंख्यांकांच्या हक्कांच्या निर्णयाविषयी खुलासा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'अल्पसंख्यांकासाठी केलेल्या सवलतीच्या तरतुदीमुळे मसुदा समितीवर टिका करण्यात येत आहे. यासाठी मसुदा समिती जबाबदार नाही. संविधान सभेने घेतलेल्या निर्णयाची ती अंमलबजावणी करते. माझ्या दृष्टीने अल्पसंख्यांकांना सवलती देण्याचा संविधान सभेने घेतलेला निर्णय जो इथे कृतीत आणला आहे, तो शहाणपणाचा आहे याबदद्ल माझ्या मनात संदेह नाही. देशात अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक दोघांनीही चुकीचा मार्ग अनुसरला आहे. अल्पसंख्यांकांचे अस्तित्व नाकारणे ही बहुसंख्यांकांची चूक आहे. अल्पसंख्यांकांनी स्वत:चे अल्पसंख्यत्व गोंजारणे व त्याला चिरस्थायी स्वरुप देण्याचा प्रयत्न करणे हे सुध्दा तेवढेच चुकीचे आहे. यासाठी दुहेरी हेतू साध्य होईल असा उपाय शोधणे आवश्यक आहे. सुरुवात म्हणुन त्यात अल्पसंख्यांकांचे अस्तित्व मान्य करायला हवे. असाही प्रयत्न व्हावा की, ज्यामुळे बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक एक ना एक दिवस एकजीव होणे शक्य होईल. संविधान सभेने सुचविलेल्या उपायांचे स्वागत झाले पाहिजे कारण या उपायांमुळे दुहेरी हेतू साध्य होतो.[९]

वरील विधानातून अल्पसंख्यांक व बहुसंख्यांकांच्या अयोग्य मार्गांच्या भूमिकेचे त्यांनी खंडन केले आहे इतके नव्हे तर, अल्पसंख्यांकांचे अस्तित्व मान्य करुन बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक अशा दोन्ही समुदायाकडून काही अपेक्षाही व्यक्त केल्या होत्या परंतु आज राज्यघटना स्विकारून जवळजवळ सत्तर वर्षे झाली असली तरीही दोन्हीही समूहाच्या प्रवृत्तीमध्ये बदल झालेला दिसून येत नाही.

बदलते संदर्भ आणि कळीचे मुददे :— कालपरत्वे एखाद्या संकल्पनेचे स्वरुप इतके बदलून जाते की, नेमकी अवस्था मूळ स्वरुपातील कोणती आहे? असा प्रश्न उपस्थित होतो. याचप्रमाणे अल्पसंख्यांक समुदायाच्या संकल्पनेबाबत झालेली आहे. सामाजिक परिस्थिती बदललेली असल्याने 'अल्पसंख्यांक समुदाय' याचे स्वरुप जसे आहे तसे समजणे गैर होईल. म्हणून काही कळीचे मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ. लोकसंख्या : एखाद्या समुदायाची लोकसंख्या कमी आहे म्हणून घटनेने त्यांना संरक्षण दिले आहे का? याचा विचार केला तर, कोणत्याही राष्ट्राचे यास तात्वीक समर्थन असणार नाही परंतु अधिक लोकसंख्येच्या समुदायाकडून अल्प असणाऱ्या लोकसमुदायास मिळणारी पक्षपाती अथवा भेदभावाची वागणूक तसेच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक प्रभुत्वापासून मुक्तता मिळण्यासाठी अल्पसंख्यांकांना संरक्षणात्मक हक्क देणे गरजेचे आहे अशी तात्वीक भूमिका स्विकारुन त्यांना हक्क प्रदान केले आहेत, याठिकाणी पक्षपातीपणा अथवा भेदभाव हा मध्यवर्ती केंद्रबिंदू मानून त्यांना संरक्षणात्मक हक्क दिले आहेत. हे पून्हा समजून घेणे गरजेचे आहे. तसेच जर एखादा अल्पसंख्यांक समुदाय सामाजिक व आर्थिकदृष्ट्या इतर समुदायापेक्षा सक्षम असेल आणि तो विकासापासून वंचित नसेल अथवा त्या समुदायावर भेदभावाची वागणूक नसेल तर, अशा समुदायास केवळ लोकसंख्येने अल्प आहे म्हणून त्या समुदायास अल्पसंख्यांकाचे लाभ देणे योग्य होणार नाही.

ब. धर्म : भारतात हिंदू धर्मिय लोक हे बहुसंख्यांक मानल्याने इतर धर्मातील लोकसमुदायांना अल्पसंख्यांक मानले आहे. परंतु कोणत्या धर्मातील लोकांना पिळवणूक किंवा भेदभावाची वागणूक मिळते? या बाबत खुलासा झालेला नाही तर, केवळ लोकसंख्येने अल्प आहेत म्हणून त्यांना अल्पसंख्यांक म्हणून संबोधले आहे. उदा. पारशी समुदाय आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने इतर धर्मियांपेक्षा हा समुदाय सक्षम आहे तसेच या समुदयास कोणत्याही धर्मीय समुदायाकडून पक्षपातीपणाची वागणूक मिळत नाही. इतकेच नव्हे तर, बहुतांशी यांच्या शब्दावरच सरकारचे स्थैर्य—अस्थैर्य अवलंबून असते असाही अनुभव आहे. तरीही हा समुदाय अल्पसंख्यांक समुदायाचा हक्कदार आहे. यामुळे 'धर्म' हा अल्पसंख्यांक समुदाय ठरविण्याचा निकष अथवा कसोटी उचित होवू शकत नाही.

याचबरोबर एखाद्या समुदायाने नवीन धर्म स्थापन केला परंतु त्या समुदायास कोणत्याही पद्धतीच्या पिळवणूकीस व भेदभावास सामोरे जावे लागत नसेल तर, त्या समुदायास धर्माच्या आधारावर अल्पसंख्यांक समुदाय म्हणून मानावे का? यास अनुसरुन 'ब्राम्हो समाज' व 'आर्य समाज' हा हिंदू धर्मापेक्षा वेगळा

आहे असे मानून अल्पसंख्यांक समुदाय म्हणून गृहीत धरावे का? यासाठी कांही (AIR1962 PAT 101 b AIR 1976 Del 207) न्यायालय प्रकरणे गाजली आहेत. याच अनुषंगाने असंख्य 'आदिवासी जमाती' व 'भटक्या जमाती' यांची लोकसंख्या धार्मिक दृष्टीने आणि सांस्कृतीक दृष्टीने हिंदूपेक्षा वेगळी आणि लोकसंख्येने कमी असली तरी, त्यांची अल्पसंख्यांक समुदाय म्हणून गणना झालेली नाही.

धार्मिक अल्पसंख्यांकाच्या संदर्भात केंद्रीय पातळीवरील निकष राज्यपातळीवर तेच ठरविल्याने धार्मिक अल्पसंख्यांकांच्या संदर्भात असंख्य प्रश्न निर्माण होत आहेत. उदाहरणार्थ शीख, ख्रिश्चन धर्मिय समुदाय, पंजाबमध्ये शीख धर्मिय आणि जम्मू – काश्मीरमध्ये मुस्लिम धर्मिय समुदाय हे केंद्रीय पातळीवर जरी अल्पसंख्यांक म्हणून गणले गेले असले तरी, सदर समुदाय राज्यांमध्ये अल्पसंख्यांक समुदायामध्ये न येता बहुसंख्यांक समुदायामध्ये येतात.

क. भाषा : भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अखंड भारतासाठी एकच राज्यघटना असल्याने अल्पसंख्यांक ठरविण्यासाठी निकष सर्वत्र सारखेच होते. त्यामुळे त्यावेळी आजच्या सारखे प्रश्न निर्माण झालेले नव्हते. परंतु काळाच्या ओघात भाषीक राज्ये निर्माण झालीत आणि केंद्र सरकारने वेळोवेळी आपली जबाबदारी त्या–त्या राज्यावर सोपविली. त्यामुळे राज्यामध्ये बहूसंख्यांक समुदायाकडून बोलणारी भाषा ही राज्याची 'बहुसंख्यांक भाषा' ही राजभाषा म्हणून गणली जावू लागली. यामुळे कोणत्याही राज्यातील एखाद्या व्यक्तीने अथवा समुदायाने दुसऱ्या राज्यात प्रवेश अथवा वास्तव्य केले तर, ती व्यक्ती अथवा त्या समुदायाची भाषा अल्पसंख्यांक ठरू शकते. या कारणास्तव भाषेच्या आधारावर परराज्यात स्थलांतर केल्यानंतर भारतातील प्रत्येक व्यक्ति व समुदाय 'भाषीक अल्पसंख्यांक समुदाय' म्हणून अंर्तभूत होतात. यामुळेच केरळी/तामीळी/हिंदी यासारख्या इतर भाषीक समुदाय महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्यांक समुदायामध्ये अंर्तभूत होत आहेत.

भाषेस अनुसरून '१९७१ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये १००० बोली भाषा होत्या आणि १५ राज्यांच्या सरकारी कार्यालयातील वापरणाऱ्या भाषेची संख्या १५ होती. त्या पंधरा भाषा म्हणजे हिंदी (३८.०) कन्नड (४.०) काश्मीरी (०.५१) मल्याळम (४.०) मराठी (७.७) उडीसा (३.६) पंजाबी (३.०) गुजराती (४.७) आसामी (१.६) संस्कृत सिंधी, तामीळ (६.९) तेलगू आणि बंगाली (८.२) उर्दू (५.२) आणि या भाषा राजकीय आणि सांस्कृतिक कारणाने स्विकारलेल्या होत्या. यातील आश्चर्याची बाब अशी की, संस्कृत भाषा ही २२१२ व्यक्तींनाच बोलता येत होती तरीही संस्कृत ही अल्पसंख्यांक भाषा म्हणून नव्हती,[१०] याप्रमाणेच 'उत्तर प्रदेश, बिहार, मध्ये प्रदेश, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश या पाच राज्यात तसेच दिल्ली या केंद्रशासित प्रदेशामध्ये 'हिंदी' ही भाषा बहुसंख्यांकामध्ये होती.'[११] आजही केंद्रीय पातळीवर 'हिंदी' ही बहुसंख्यांक भाषा म्हणून घोषीत केली असली तरी, काही घटक राज्य वगळता, बहुतांश ठिकाणी ती अल्पसंख्यांक भाषा म्हणूनच घोषीत केलेली आहे.

अनेकदा असे पहावयास मिळते की, इतर राज्यातील अनेक व्यक्ती दुसऱ्या राज्यात जावून घटनात्मक संरक्षण घेवून आर्थिक, सामाजिक नव्हे, तर आपल्या आर्थिकतेच्या जोरावर राज्यकर्त्यांवर आपला दबाव आणतात तसेच बहुसंख्यांकांवर अंकुश ठेवतात. यातूनच 'कायद्याच्या अनुषंगाने भाषेवर आधारित अल्पसंख्यांक समूहाची निर्मिती आणि त्यातून होणारे सत्तेचे राजकारण हे राष्ट्रीय एकात्मतेस धोका निर्माण करणारे आहे'[१२] हे विचारात घेणे गरजेचे आहे.

'भाषीक अल्पसंख्यांक' याची भौगोलिक मर्यादा म्हणून राज्याची सीमा ठरविली असली तरी, त्याच राज्यातील भाषा अल्पसंख्य ठरविल्या नाहीत. उदाहरणार्थ महाराष्ट्रातील कोकणी, वऱ्हाडी आणि ठाकरी व इतर भाषीक समुदाय, लोक समुदाय संख्येने अल्प असले तरी, त्या भाषांना अल्पसंख्यांक समुदायामध्ये अंतर्भूत केले नाहीत. परंतु याचवेळी 'जर एखाद्या राज्यातील व्यक्ती अथवा समुदायाने आपली राजभाषा सोडून इतर भाषेस अनुसरून शैक्षणिक संस्था काढून त्या संस्थेस भाषीक अल्पसंख्यांकाचा दर्जा घेवू शकतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रात सामाजिक, आर्थिक प्रभूत्व असणाऱ्या लोक समुदायांनी 'हिंदी' भाषीक समुदायाच्या नावाखाली ११७ अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था निर्माण करून त्या संस्थेमार्फत व्यावसायीक अभ्यासक्रम सुरू केले आहेत'[१३] यामुळे घटनेतील कायद्याच्या मुळ उद्देशास बगल देवून या कायद्याचा गैरवापर होत असलेला दिसून येतो. आणि अशा शैक्षणिक संस्था लेखी म्हणतात की, आमची संस्था अल्पसंख्यांक असल्याने महितीचा अधिकार कायदा आमचेवर बंधनकारक नाही.

सारांश : जगातील अनेक देशामध्ये अल्पसंख्यांक समुदाय आहेत. परंतु त्यांनी अल्पसंख्यांक समुदाय ठरविण्याचा निकष केवळ लोकसंख्येचा आधार न मानता त्यांनी समाजशास्त्रास अनुसरून अल्प लोकसंख्येची सामाजिक आणि आर्थिक, शैक्षणिक सीमांतीकता या बाबीदेखील निकष म्हणून मानल्या आहेत. या निकषांकडे भारतीय समाजात दुर्लक्ष होत

असलेले दिसून येते. बदलत्या सामाजिक परिस्थितीत प्रस्थापित धार्मिक समुदायाशिवाय नवीन धर्मही उदयास येत आहेत अशा अल्प लोकसंख्या असणाऱ्या लोकसमुदायास अल्पसंख्यांकांचे हक्क मिळविण्यासाठी ते योग्य आहेत की अयोग्य आहेत? याचा खुलासा होत नाही. वर्तमानकाळात घटनेनुसार मिळणाऱ्या हक्कांचा व सोयीसवलतीसाठी भाषीक अल्पसंख्यांक समुदाय अधिक प्रमाणात उदयास येत आहेत. त्यावर सरकारचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. या कारणास्तव वर्तमानकाळात अल्पसंख्यांक समुदायाची ओळख होण्याकरिता संकल्पनेच्या तात्वीक व व्यावहारिक बाबीकडे गांभीर्यपूर्वक पहायला हवे.

सदर लेख 'Indian Institute of Advanced Study' राष्ट्रपती निवास, शिमला पुरस्कृत फेलोशिपवर आधारीत असल्याने लेखक IIAS, शिमला या संस्थेचा ऋणी आहे.

संदर्भ :—

1. *Judgment on the case of T.M.A. Pai Foundation Vs State of Karnataka, 2002 8SCC 481, 12th Aug, 2005, Para No. 158.*
2. *Pandy Rajendra, 1997, Minority in India -Protection and Welfare, APH, Publishing Corporation, New Delhi, Pp. 32.*
3. *Third Oxford English Dictionary, 1933,479.*
4. *No.6/13/80-R&R MC, Government of India, Minorities Commission, 5th Floor Lok Nayak Bhavan, Khan Market, New Delhi. Dated: 28th January, 1984.*
5. *Matras Judah, 1977, Introduction to Population, Englewood, Cliff, N.J Prentice hall.*
6. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे, खंड १८ वा भाग—३, महाराष्ट्र शासन, २००२, पृ. १२३.*
7. *Pandy Rajendra, 1997, Minority in India -Protection And Welfare, APH, Publishing Corporation, New Delhi, Pp. 33.*
8. *Dr.Babasaheb Ambedkar: Writings and Speeches, Vol. No. 20, Department of Education, Government of Maharashtra, Mumbai, 2005, Pp. 452-455-*
9. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे, खंड १८ वा भाग—३, महाराष्ट्र शासन, २००२, पृ. १२३.*
10. *Pandy Rajendra, 1997, Minority in India -Protection And Welfare, APH, Publishing Corporation, New Delhi, Pp.81-83.*
11. *Pandy Rajendra, 1997, Minority in India -Protection and Welfare, APH, Publishing Corporation, New Delhi, Pp. 84.*

नैसर्गिक संसाधने आणि सामाजिक न्याय: वंचितांच्या परिप्रेक्ष्यातून

डॉ. संपत काळे, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, पोस्ट बॅग नं. ९ अपसिंगा रोड, तुळजापूर ४१३६०१
जि. उस्मानाबाद, महाराष्ट्र Email: samkale@gmail.com Phone: 8999744448

प्रस्तावना:— विषमतेने व्यापलेल्या समाज व्यवस्थेत स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय यांचा शोध घेणे म्हणजे एक अवघड काम आहे. तरीही समतेचे तत्त्व अंगीकारल्याशिवाय आणि व्यवस्थेला आव्हान दिल्याशिवाय खऱ्या अर्थाने वंचित व दुर्बल घटकांना न्याय मिळणार नाही हेही तितकेच खरे आहे. आज आपले जीवन औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि व्यापारीकरण यामुळे अतिशय जटिल व कृत्रिम बनत चालले आहे. चंगळवादाकडे वळलेल्या संस्कृतीमुळे पाणी, जमीन, शेतीचा वारेमाप वापर, जंगलावर कुऱ्हाड, खनिज संपत्तीची लूट आणि नैसर्गिक परिस्थितीमध्ये हस्तक्षेप प्रचंड वाढत चालला आहे. आपण माणूस आणि निसर्गाचा विकास एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे विसरत चाललो आहोत. परिणामी हवामानात होणारे बदल, पर्यावरणाचा ऱ्हास, जंगल तोड, नद्या आणि सरोवरांचे प्रदूषण, शेती आणि जमिनीचे व्यापारीकरण व खाजगीकरण, समुद्र किनाऱ्यावरील कांदळवन, खारफुटी या ठिकाणी औद्योगिक क्षेत्रांची उभारणी या सर्वांमुळे स्थानिक नागरिकांची उपजीविका धोक्यात येत आहे.

विकास आणि निसर्गाचा विनाश यांचा लेखाजोखा घेणे हे आजच्या घडीला खूप महत्त्वाचे वाटते कारण आतापर्यंतच्या विकास प्रक्रियेतून गरीब आणि वंचितांना सामाजिक न्याय मिळाला आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. पर्यावरणाचा विनाश आणि माणसांचे विस्थापन याशिवाय पर्यायी विकास होणे अशक्य आहे असे एकीकडे भासवले जाते तर दुसरीकडे राष्ट्राच्या उभारणीसाठी कुणाला तरी त्याग करावा लागेल अशा पद्धतीने या प्रक्रियेचे समर्थन केले जाते. सार्वजनिक हिताच्या नावाखाली दलित, आदिवासी आणि गरिबांच्या जमिनी लाटणे आणि धनदांडग्यांना व्यापारासाठी खुल्या करणे याचेही समर्थन धोरणात्मक पद्धतीने केले जात आहे. त्यामध्ये मग जमीन संपादनाचा कायदा असेल, देशाचे किंवा राज्याचे जल धोरण असेल किंवा विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ), दिल्ली मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉर, पेट्रो केमिकल अँड पेट्रोलियम इंडस्ट्रीज, सीआरझेड किंवा नागपूर मुंबइ कृषी समृद्धी महामार्ग अशा कार्यक्रमांमधून विकासाच्या गोंडस नावाखाली वंचितांना परिघावर लोटण्याचे एक मोठे षड्यंत्र दिसून येत आहे.

नवीन आर्थिक धोरणांचा दुष्परिणाम आदिवासी, दलित, भटके विमुक्त आणि ग्रामीण गरिबांना आणि त्यातही स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर भोगावे लागत आहेत. त्यातूनच स्थलांतरात वाढ, बेकारी, भाववाढ आणि सतत वाढत जाणारी विषमता यातून सामाजिक न्याय कसा जोपासणार हेही एक मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. दलितांच्या सामाजिक, राजकीय आणि नागरी हक्कांच्या संरक्षणाचा मुद्दा हा निसर्गाच्या संरक्षणाच्या मुद्द्याइतकाच महत्त्वाचा आहे. आर्थिकदृष्ट्या मागास व भूमीहीन शेतकरी आणि शेतमजुरांचे प्रश्न आज दिवसेंदिवस अधिक किचकट बनत चालले आहेत. आज एकीकडे आदिवासींच्या गरिबी व दैन्याचे उदात्तीकरण करून त्यांना संस्कृती आणि पारंपरिक पद्धतीमध्ये जखडून ठेवणे हेही बरोबर आहे का? संस्कृतीच्या व जीवनपद्धतीच्या नावावर शोषण आणि अत्याचार होतात, पर्यायाने जीवनमान उंचावत नाही म्हणून त्यांच्या विकासाची परिभाषा आदिवासींच्या नजरेतूनच शोधून समजून घेणे क्रमप्राप्त आहे.

अजूनही आपल्या देशात ६० टक्के जनता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहे. मग शेती सोडायची की शेतीवरचा भार कमी करायचा? आणि त्यासाठी शेतीमध्ये नव परिवर्तन आणायचे व आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रक्रिया उद्योगावर भर द्यायचा, विशेष शेती क्षेत्र उभे करायचे यांचा विचार भविष्यात आपल्याला करावाच लागणार आहे. शाश्वत शेतीची कास धरून नव्या हरित क्रांतीची नांदी उभारण्याचा विचारही करावा लागेल. निसर्ग आणि सामाजिक न्यायाच्या संदर्भात तीन प्रकारच्या संपत्तीच्या नजरेतून पाहणे गरजेचे आहे, सरकारी, खाजगी आणि वैयक्तिक. याची जोड पाणी, जमीन, जंगल, खनिज, हवामान, पशुधन यांच्याशी करणे खूप गरजेचे आहे. नैसर्गिक संसाधने, लोकांचे अधिकार आणि धोरणे यामध्ये आपणाला वेळोवेळी विरोधाभास असल्याचे जाणवते त्यामध्ये योग्य तो बदल आणि नवीन लोकाभिमुख धोरणांची निर्मिती करणे गरजेचे आहे जेणेकरून पर्यावरणाचा विध्वंस आणि निसर्गाची लूट थांबेल व गरिबांना न्याय मिळेल.

पाणी आणि सामाजिक न्याय : पाण्याला आपण जीवन म्हणतो. संपूर्ण सजीव सृष्टीचा विकास जलकिनारीच झालेला आहे हे आपण जाणतो. पण

आज एकीकडे जलाढ्य आणि जलदरिद्री ही संस्कृती वाढत चालली आहे. एकीकडे कायमस्वरुपी दुष्काळ आणि दुसरीकडे पूर ही परिस्थिती आपल्या राज्यामध्येही आपण वर्षानुवर्षे अनुभवत आहोत. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार पाणी ही मूलभूत गरज आहे आणि म्हणून पाण्यावर सर्वांचा अधिकार आहे आणि पर्यायाने सर्वांना स्वच्छ व आरोग्यदायी पाणी मिळण्याचा अधिकार आहे. पण आज प्रत्यक्षात राज्यातले १८० तालुके दुष्काळाच्या छायेत आहेत. माणसं आणि जनावरांना पाण्याची प्रचंड टंचाई जाणवत आहे. पाणी नाही असे म्हणण्याचे धाडस मी करणार नाही कारण ज्यांना पाणी मिळत नाही ते समुदाय अतिशय दुर्बल घटकातले आहेत, भटकंती करणारे आहेत, नैसर्गिक संसाधनांवर कोणताही अधिकार नसणारे आहेत. मात्र त्याच वेळी उद्योगांना खात्रीचे पाणी, बाटलीबंद उद्योगांना बड्या शेतकऱ्यांना मुबलक पाणी उपलब्ध असल्याचे जाणवते. मग पाणी नाही ही ओरड कितपत खरी आहे? पर्यायाने सीमांत शेतकरी आणि भूमीहीन कष्टकरी जनता मात्र पिण्याच्या व शेतीच्या पाण्यासाठी आपली उपजीविका भागवण्यासाठी अहोरात्र धडपड करत आहे. म्हणजेच पाण्याचे समन्यायी वाटप होत नाही. विलासराव साळुंखे नेहमी म्हणत असत की गरीब आणि श्रीमंत यांना भेदणारी रेषा पाणी हीच असते.

शहरी आणि ग्रामीण भागातील पाणी वाटपातील विषमता आज मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे. एकीकडे शहरांना दरडोई १६५ ते २०० लिटर पाणी खात्रीशीररित्या पुरवणे व ग्रामीण भागातील जनतेस ४० लिटर पाण्याचाही हमी न देणे याला काय म्हणावे?

राज्यनिर्मितीपासून आतापर्यंत आपण पाण्याच्या संदर्भात अनेक धोरणे, कायदे, परिपत्रके काढली. अनेक समित्यांचे अहवालही सादर झाले आहेत. पण त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी न झाल्यामुळे जल व्यवस्थापनात आपण मागे पडलो आहोत आणि पर्यायाने आपल्याला दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.

एकंदरीत पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यामुळे सर्वसामान्यांचे जीवनाधार नाकारल्यासारखेच होत आहे. नव्याने सिंचनात भर टाकण्यासाठी दीर्घकालीन नियोजन आराखडा व अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. किमान जगण्यासाठी पिण्याच्या पाण्याचे रेशनिंग करावे लागणार व ते किफायतशीर असेल याची काळजी लोकप्रतिनिधींना व जनतेला घ्यावीच लागणार अन्यथा पुढील दोन दशकांत सत्तांतर होणे नाही. म्हणूनच पाण्याचे समन्यायी वाटप आणि पाणी व माणसाचे अतूट नाते निर्माण करणारी व्यवस्था उभी राहिली तरच जल क्षेत्रातली विषमता कमी होईल असे मला तरी वाटते.

आजही मोठ्या प्रमाणात समुद्र किनारी राहणाऱ्यांची उपजीविका मासे आणि मिठागरे यासारख्या संसाधनावर अवलंबून आहे. पण गेल्या काही दशकांत मोठ्या प्रमाणात व्यापारात वाढ झाल्यामुळे मोठे ट्रॉलर्स आणि बाहेरील लोकांकडून होणारी कंत्राटी मासेमारी याचा परिणाम स्थानिक मच्छिमार लोकांची उपजीविका हिरावून घेण्यात होत आहे. त्याचबरोबर आगरी आणि मच्छिमारांची शेती धोक्यात येत आहे. वाढत्या औद्योगीकरणाच्या, गृहनिर्माण उद्योगाच्या आणि पर्यटनाच्या रेट्यामुळे स्थानिक लोकांवर आपल्याच गावांमधून बाहेर पडण्याची वेळ येत आहे. ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यात हे प्रमाण वाढत आहे. गोराई, उत्तनसारख्या भागातील कांदळवन किंवा खारफुटीचे वन नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

आज सर्वत्र पाण्याच्या माध्यमातून अनेक संघर्ष उभे राहिले आहेत. शहरी आणि ग्रामीण, धरणांवरचे आणि धरणांखालचे, शहरी वस्त्या आणि झोपडपट्ट्या, सेवांचे खाजगीकरण, पाणी वापराचे अधिकार सर्वस्वी खाजगी कंपन्यांना दिले जाणे आणि जल क्षेत्रात एक प्रकारची एकाधिकारशाही निर्माण होणे ही भीती वाढत आहे. आपल्या देशात मोठी धरणं आणि खाणींच्या माध्यमातून आतापर्यंत नैसर्गिक संसाधनांवर उपजीविका करणाऱ्या ४ कोटींहून अधिक लोकांचे विस्थापन झाले आहे. देशाच्या एकूण धरणांपैकी जवळपास ४० टक्के धरणं महाराष्ट्रात आहेत. तरीही आपण सिंचनाच्या बाबतीत १८—२० टक्क्यांच्या पुढे जाऊ शकलेलो नाही. ज्यांना नव्याने जमिनी मिळाल्या आहेत त्या जमिनींना पाणी कसे मिळेल हा भविष्यामध्ये कळीचा मुद्दा असणार आहे.

सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन नव्याने करावे लागेल. खोरेनिहाय पाण्याचे नियोजनही करावे लागेल. राज्यात एकूण १५०५ पाणलोट क्षेत्रे आहेत. त्यांचा कृती आराखडा तयार करून पुढील दहा वर्षात अंमलबजावणी करून पाण्याचे एकत्रित, शास्त्रीय नियोजन होईल असे पहावे लागेल. पाणी वापर संस्था आणि शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादक सहकारी संस्थांमध्ये ताळमेळ साधून पाण्याचा अमाप वापर टाळण्यासाठी पाण्याचे व पीक पद्धतीचे सुयोग्य नियोजन करावे लागेल.

आदर्श गाव योजनेतून आपण शाश्वत, सुरक्षित उपजीविका निर्माण करणारा विकास काही गावांमध्ये अनुभवला आहे. त्यामध्ये राळेगण सिद्धी, हिवरे

बाजार, मेंढा लेखा, नायगाव, आडगाव, डोणगाव, दारेवाडी, चापके तळावली, खुदावाडी अशी असंख्य गावे आहेत जिथे किमान पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आपण सोडवू शकलो आहोत. मग या अनुभवांना धोरणात्मक स्वरूप देऊन त्यांचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी सूक्ष्मपाणलोट क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांची वैविध्यपूर्ण उपजीविका उभारता येईल. उपजीविका विकास आणि पर्यावरण विकास याही एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणाव्या लागतील. कारण जागतिक स्तरावर शाश्वत ग्रामीण विकासाच्या संकल्पना आणि प्रत्यक्ष कार्य उभे राहण्यासाठी १९८७ सालापासून ब्रंटलँड कमिशन अहवालात नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, पर्यावरण विकास, मानव विकास आणि शाश्वत विकासाचा मार्ग सांगितला आहे. वर्ल्ड कमिशन ऑन एनव्हायरमेंट अँड डेव्हलपमेंटच्या अहवालामध्ये गरिबी निर्मूलन आणि लोकांची निसर्गसमृद्ध उपजीविका करण्यासाठीच्या सूचना केलेल्या आहेत. त्याचाही आपल्याला बदलत्या संदर्भात विचार करणे गरजेचे आहे. केवळ गरिबी निर्मूलन नाही तर विषमता निर्मूलनावर मोठा भर द्यावा लागेल असे हा अहवाल म्हणतो.

जमीन, शेती आणि सामाजिक न्याय : जमीन, शेती आणि माणसाच्या नातेसंबंधाचा विचार सामाजिक न्यायाच्या संदर्भात करावाच लागेल आज शेती आणि जमिनीशी निगडीत अनेक समस्या आहेत आणि त्याची सर्वात जास्त झळ कुणाला पोचते हे जात—धर्म—लिंग—प्रांत या परिप्रेक्ष्यातून पहावे लागेल. आज सामाजिक न्यायाचा विषय केवळ आरक्षणाच्या कक्षेतून पाहून चालणार नाही तर संसाधनांवरची मालकी आणि वापराचे अधिकार या दृष्टीकोनातूनही विचार करावा लागेल.

राज्यमार्ग आणि महामार्गालगत असणाऱ्या जमिनीचे दर शहरात राहणाऱ्या आणि बडया उद्योगपतींनी प्रचंड वाढविले आहेत. मराठवाडा आणि विदर्भातील रस्त्यांना एकप्रकारे कुंपणाचे स्वरूप निर्माण होत आहे. स्थानिक शेतकरी शेतीच्या उत्पादनावर जमीन खरेदी करूच शकत नाही. गरीब माणूस शेती व्यवसायापासून दूर फेकला जातोय त्यासाठी काही ठोस तरतुदी कराव्या लागतील. २०११ च्या जनगणनेनुसार १९९१ च्या तुलनेत शेतकऱ्यांची संख्या दीड कोटींनी कमी झाल्याचे दिसते.

१९९६ ते २००७ या काळात शेतीवरील अरिष्टांमुळे देशभरात दीड लाख शेतकऱ्यांनी मरण पत्करले आहे. तर अलिकडे आपल्या राज्यात सुमारे ३०००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्यापैकी ७० टक्के शेतकरी हे विदर्भाच्या अकरा जिल्ह्यातील होते. त्यातही सर्वाधिक आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात झाल्या आहेत. यांची कारणं पाहिली असता असे समजते की नापिकी, सिंचनाच्या सुविधांचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, सावकारांकडून प्रचंड पिळवणूक आणि चिकनगुणीयाची साथ यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये भर पडली. राज्य सरकारचे दुर्लक्ष आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानसन्मान आणि उत्पादनाचे साधनच हातून निघून जात आहे म्हणूनही आत्महत्या होताना दिसतात.

रोजगार हमी योजनेने गरिबांना दुष्काळात तारले. धान्य आणि रोजगाराचा प्रश्न काही काळासाठी तरी सोडविण्यात आला. मागेल त्याच्या हाताला काम आणि स्त्री पुरूषांना समान व किमान वेतन ही राज्याच्या इतिहासातील महत्वाची बाब आहे. गेल्या ४० वर्षात रोहयो मध्ये अतिरीक्त निधी जमा होत गेला. मागील दोन वर्षात हेच कोटयावधी रूपये कृष्णा खोरे विकास महामंडळातील रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी वळविले तरीही योजना अपूर्णच आहे या गोष्टीची जाणीव सर्वांना झाली पाहिजे.

उपजीविकेसाठी वंचितांचे लढे : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० साली गायरान जमिनी दलितांनी ताब्यात घेण्याविषयीची भूमिका माणगांवच्या परिषदेत केली होती. त्याहीपुढे जमिनीचे राष्ट्रीयीकरण करून भूमीहीनांना किमान जमीन मिळेल असाही विचार त्यांनी मांडला होता. त्यानंतर कर्मवीर दादासाहेब गायकवाडांनी 'कसेल त्याची जमीन पण नसेल त्याचं काय' हा प्रश्न उभा केला आणि संपूर्ण देशभर जमीन हक्कासाठी भूमिहीनांची जेलभरो आंदोलने झाली. सध्याही मराठवाडयात जमीन अधिकार आंदोलन आणि मानवी हक्क अभियान शासकीय पडीत आणि गायरान जमिनीवरील उपजीविका शेती नियमानुकूल करण्याबाबत २८ डिसेंबर १९९१ च्या शासन निर्णयाच्या आधारावर लढा देत आहे. काही प्रकरणे नियमानुकूल करण्यात आली पण शासनाने अजूनही मोठया प्रमाणावर दलितांना जमिनी दिल्या नाहीत.

स्वातंत्र्याच्या ६८ वर्षानंतरही 'दलित आपले सेवक आहेत', 'त्यांना जमीन जुमला कशाला', 'आमच्या शेतावर काम कोण करणार', 'आमची गुरंढोरं कोण सांभाळणार', 'दलित म्हणजे केवळ रोजगार हमीवर राबण्यासाठी असणारी फौज' म्हणूनही मराठवाडयातील दलितांकडे उत्पादनांची साधने येऊ नयेत असा कावा दलितेतर समाजाकडून खेळला जात आहे. जमिनीच्या किंवा शेतीच्या वादांवरून दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये भर पडत आहे. मात्र अत्याचार प्रतिबंधक कायदाच रद्द करा असाही सूर

आपल्या कानी पडत आहे. पण असा निर्णय करणं ही मोठी चूक होईल म्हणून त्यात योग्य त्या सुधारणा करून सामाजिक न्यायाची पायमल्ली होणार नाही याची खबरदारी राज्यकर्त्यांना घ्यावी लागेल. भूमीहीन दलितांचे प्रश्न अजूनही निकालात काढलेले नाहीत म्हणूनही दलितांवरील अत्याचारात भर पडत आहे. महार वतन जमिनी, गायरान जमिनी, देवस्थानच्या जमिनी, शेती महामंडळाच्या जमिनी आज धनदांडग्यांनी बळकावलेल्या आहेत हा एक दलित समाजावर अन्यायच आहे. आर्थिकदृष्ट्या मागास व भूमीहीन दलितांना जमिनीच्या वाटपाचा कार्यक्रम हाती घ्यावा लागेल कारण जमीनविषयक लढे भविष्यकाळात अधिक स्फोटक होऊ द्यायचे नसतील तर वंचित व दुर्बलांच्या पाठीशी शासन, नागरी समाज आणि माध्यमांना उभे रहावे लागेल. शेतकरी, शेतमजुरांच्या किमान वेतनासाठी आग्रह, वेळोवेळी त्यात वाढ करावी लागेल. सीमांत शेतकरी आणि शेतमजुरांसाठी पेन्शनचाही आग्रह येत्या काळात धरावा लागेल. रोजगार हमीचा पैसा गायरानधारकांच्या विकास कामासाठी वापरला गेला तर जमिनीची सुफलता वाढेल आणि पर्यायाने राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल.

पॅकेज हा विकासाला पर्याय आहे का? : विदर्भातील अकरा जिल्हे आणि मराठवाडयातील आठ जिल्हे हे नेहमीच मागासलेपणाचे बळी ठरले आहेत. पॅकेजवर जगणारे विभाग म्हणून विदर्भ आणि मराठवाडयाची ओळख निर्माण होत आहे. दुष्काळ, दारिद्रय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कुपोषण, बेरोजगारी, विषमता, गरिबी आणि भूक हे शब्द जणू पाचवीलाच पुजलेले आहेत असे सर्वत्र पसरविले जात आहे. नैसर्गिक आणि मानवनिर्मित समस्यांबाबत लोकांची मानसिकता सरकार मायबाप यापुढे सरकलेली नाही. दोन्ही विभागातील मुख्यमंत्री किती वेळा झाले आणि त्यांना आपापल्या विभागासाठी पॅकेज आणता आले व ते कितपत टिकविता आले हा प्रश्न महत्वाचा आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळासाठी हजारो कोटी रूपये उभे होऊ शकतात मग या दोन विभागाच्या विकासासाठी का नाही होऊ शकत? दोन हजार कोटींचा प्रकल्प वीस हजार कोटींवर जातो याला जबाबदार कोण? दरवर्षी एक अधिवेशन नागपूरला घेऊन विदर्भाला काही हजार कोटी देउन खूष करण्यात येते त्याचप्रमाणे औरंगाबादेत काही बैठका घेऊन खेळवत ठेवले जात आहे.

संसाधने बळकावणारी विकासाची बेटं : विकासाचा सुवर्ण त्रिकोण म्हणजे मुंबई, पुणे आणि नाशिक होय. सर्व प्रकारची गुंतवणूक मोठया प्रमाणात याच भागात होत असताना दिसते. थोडयाअधिक प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक ही मोठया शहारांनजिक येताना दिसते जसे की औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर आणि कोकणातील सागरी किनाऱ्यालगतची मोठी गावे.

उद्योग, वाढ आणि दोनअंकी विकास दर गाठण्यासाठी आज देशपातळीवर सुमारे ११०१ आणि त्यापैकी सर्वाधिक सुमारे २०७ विशेष आर्थिक क्षेत्रांना (सेझ) आपल्या राज्यात मंजुरी देण्यात आली आहे. देशपातळीवर सुमारे ५९७६९२ एकर जमीन संपादन होत आहे. तर एकट्या महाराष्ट्रातून सेझसाठी सुमारे १५४१२३ एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. अत्यंत मोक्याच्या, शहराजवळच्या सुपीक आणि लाखो लोकांना रोजीरोटी मिळवुन देणाऱ्या जमिनी सेझसाठी संपादित केल्या जात आहेत. गेल्या दशकात जवळजवळ एक कोटी हेक्टर शेतजमिनीचे हस्तांतरण बिगरशेतीसाठी झाले आहे. बँकेत पैसा ठेवण्यापेक्षा तो जमिनीत गुंतवा आणि तोही पडिक जमिनीत अशी परिस्थिती आज निर्माण होत आहे. यातील काही सेझ विदर्भ मराठवाडयात येत आहेत. नागपूरला मिहान कार्गो हब तर औरंगाबादला व्हिडिओकॉनसारखे सेझ विकसित केले जात आहेत. बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत हजारो हेक्टर जमीन पडून असताना अमरावती आणि चंद्रपूरची जमीन मात्र सक्तीने संपादित करण्यात येत आहे. लोकांच्या आणि चळवळींच्या रेट्यामुळे पुणे व रायगड जिल्ह्यातील सेझ रद्द करावे लागले आहेत.

ज्या यवतमाळ जिल्ह्यातील हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत तिथे कोणीही गुंतवणूक करण्यास तयार नाही. पण जिथे भरमसाठ पायाभूत सुविधा निर्माण झाल्या आहेत किंवा होणार आहेत तिथेच सक्तीने जमिनी संपादित होत आहेत. म्हणजे सेझचे समर्थन करावे असे म्हणायचे नाही. कारण त्यामुळे विषमता आणि काही विकासाची बेटंच तयार होत आहेत.

जंगल, खनिजं आणि वनसंपत्ती : देशभर आज जंगलं आणि जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होत चालली आहे. काही भागात वाळवंटीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. मराठवाड्यात केवळ १ टक्का जंगल शिल्लक राहिले आहे. आज मराठवाड्यात जे जंगल उरले आहे ते वेगवेगळ्या मोठ्या प्रकल्पामध्ये जे विस्थापन झाले आहे त्याची भरपाई म्हणून लावण्यात आले आहे.

एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. जंगल आणि जंगलात राहणारे आदिवासी आणि इतर निवासी यांनी जंगलाचा ऱ्हास केला असा मोठा आरोप करण्यात येतो. त्यामध्ये तथ्य आहे का नाही हे तपासून पाहण्याची वेळ आपल्यावर आली आहे. वसाहत

काळात ब्रिटिशांनी जंगलासंबंधी कायदे केले व जंगलांची एक प्रकारे लूटच केली. जंगलात राहणाऱ्यांना तिथून बेदखल केले. मग तो १८७८ चा कायदा असो किंवा १९२७ चा. ब्रिटिशांनी जमिनीच्या मोजणीमध्ये आदिवासींची उपजीविका असणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनी विचारात घेतल्या नाहीत. पर्यायाने त्या जमिनी वरकड जमिनी मानून सरकारने त्यावरती आज आपला हक्क दाखवायला सुरुवात केली आहे. प्रचंड वनसंपदेची लूट करून आदिवासींना जंगलाच्या विध्वंसासाठी जबाबदार ठरवण्यात आले. आजही आपल्याकडील कायदे आदिवासी आणि वनात राहणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी परिपूर्ण ठरले आहेत असे म्हणणे धाडसाचे होईल. सामूहिक वनसंपदेचे संरक्षण करणाऱ्या आदिवासींना हक्काच्या जमिनी परत देण्यासाठी शासनाने थोडेथोडके प्रयत्न केले पण अजूनही सामूहिक दावे व वैयक्तिक दावे मिळवण्यासाठी आदिवासींना नाडवले जात आहे. खऱ्या अर्थाने स्थानिक आदिवासींची उपजीविका निसर्गावर, जैववैविध्यावर, भूमीवर, जंगलावर आणि पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास त्यांच्यासाठी एक प्रकारे अन्यायाचाच प्रकार आहे. खाणींमुळे मग ते लोखंड, कोळसा किंवा मँगेनीज असो त्यासाठी आदिवासींना विस्थापित केले जात आहे. त्यामध्ये मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, ओरिसा, कर्नाटक आघाडीवर आहेतच पण महाराष्ट्रही मागे नाही. म्हणून आपल्याला जर चिरस्थायी विकास हवा असेल तर आदिवासींना जंगलाचे शत्रू मानून कसे चालेल? तथाकथित विकासासाठी दर वेळी आदिवासी, गरीब आणि परिघावरच्या लोकांनीच त्याग का करायचा हा प्रश्न आपण कधी विचारणार आहोत की नाही? संपादनाच्या प्रक्रियेमध्ये अतिरिक्त, वरकड जमिनी घेतल्या जात आहेत. मात्र भांडवलदार, धनाढ्य उद्योजक आणि बहुतेक राजकारणी नेत्यांकडच्या वरकड संपत्तीला हात लावायचा विचार तरी आपल्या मनात येतो का?

सारांश : भविष्यात महाराष्ट्र आपल्याला सुजलाम, सुफलाम व विषमतारहित पहायचा असेल तर नक्कीच आपल्याला कठोर धोरणे, त्यांची अंमलबजावणी आणि नैसर्गिक संसाधनांची जोपासना एक नवीन विधी म्हणून करावी लागेल. निसर्गाचे आणि मानवाचे नातेसंबंध आधुनिकतेच्या कसोट्यांवरती तपासून घ्यावे लागतील. मात्र हे करताना भविष्यामध्ये पुढील पिढ्यांसाठी ही संसाधने उपलब्ध असतील याचा विचारही आपल्याला करावा लागेल. दोन अंकी विकास दराचा अट्टाहास धरायचा का लोकांचं जीवनमान, त्यांच्या जीवनातला आनंद, किमान गरजांची पूर्तता आणि घटनेने सांगितलेले मूलभूत अधिकार यांची अंमलबजावणी करायची हा विचार करावा लागेल. नैसर्गिक संसाधने सीमित आहेत याची जाणीव ठेवत असतानाच पर्याय उभे करावे लागतील जेणेकरून आहे त्या संसाधनांवर नव्याने ताण वाढणार नाही आणि भविष्यामध्ये पिण्याच्या पाण्यावरून युद्ध पेटणार नाही ही खबरदारी आपल्याला घ्यावी लागेल. महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे धरती आपली गरज भागवू शकते पण हाव नाही हे लक्षात ठेवावे लागणार.

गरिबाभिमुख धोरणे, सर्वसमावेशक योजना व त्यामध्ये सर्व समाज घटकांचा साकल्याने विचार करावा लागेल. आपल्या कोणत्याही घटकाला आपण विकास प्रक्रियेतून बाहेर फेकले गेलो आहोत अशी परात्म भावना जाणवणार नाही यासाठी सजगपणे काम करावे लागेल. समाजातल्या विशेषत: वंचित, दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांचं उल्लंघन होणार नाही यासाठी दक्ष समाज आणि कर्तव्यदक्ष शासन तितकेच आवश्यक आहे. अलिकडच्या काळात एकजिनसीपणाला खतपाणी घातले जात आहे. आपल्या देशासाठी ही खूप धोक्याची घंटा आहे. विविधतेच्या तत्त्वाला तडा देणारी ही बाब ठरेल. वैविध्य, आधुनिकता, स्वातंत्र्य जपत असतानाच समाजामध्ये बंधुभाव वाढीस लागणंही आवश्यक आहे. वंचितांच्या नजरेतून विकासाच्या संकल्पना पुढे येतील यासाठी शासनाने संवादी पद्धतीने राज्याचा कारभार चालवणं आवश्यक आहे. तरच जगाच्या पाठीवरचा आपला सर्वात मोठा लोकशाही देश समृद्ध, संपन्न आणि आनंदी लोकांचा देश बनू शकेल.

संदर्भ :—

1. *Diwan, Vijay. (2017). Dushkalat Samruddhi Mahamargcha Terava Mahina, Pune Andolan-Shawat Vikasasathi, May P.13.*
2. *Jamwal, Nidhi. (2008). Howl of the Hills, New Delhi Down to Earth, Vol. 17, No.8, September 5.*
3. *Kale, Sampat. (2010). Anti-SEZ movement in India, Pune NCAS P.08.*
4. *Kale, Sampat. (2013). Maharashtachi Jalniti and Dushkal Mahotsav, Pune Arthapurna P. 14.*
5. *Kale, Sampat. (2015). Grassroots Development Initiatives in India, New Delhi Aakar Books.*
6. *Kale, Sampat. (2016). Lokabhimukh Jalniyojan, Pune Vanrai P.269.*
7. *Mahajan, Sulakshana and Dandekar, Hemlata C. (2001). MSRDC and Mumbai-Pune Expressway, Mumbai Economic and Political Weekly, February 17, P.550.*
8. *Pote, Sunil. (2018). Devnadi Khoryatil Shashwat Vikasachi Vatchal, Sinnar Yuvamitra P. 45.*
9. *Teltumbde, Anand. (2007). Natural Resources Policies of the Maharashtra: An analytical review, Pune NCAS*

उत्तर जागतिकीकरणातील उपेक्षीतांचे संघटनीकरण : नवे प्रश्न व परामर्श

डॉ. धनराज ए. पाटील, समाजशास्त्र विभाग, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर. ९७६७७८९२७४

प्रस्तावना : सोलापूरातील विडी उद्योगाला शंभर वर्षाचा इतिहास आहे. साधारणत: १९ व्या शतकाच्या पुर्वार्धास सोलापूर मध्ये विडी हे एक प्रमुख कुटीर उद्योग म्हणून उदयास आले. (सोलापूर गॅझेट १९७७). सोलापूर शहरातील रोजगार पुरविणारे प्रमुख उद्योग विडी उत्पादनाशी संबंधित आहे. सध्या (२०१३—१४) साधारणत: ८० ते ८५ हजार नोंदणीकृत विडी कामगार शहरात आहेत. तर जवळपास १.०५ लाख अनोंदणीकृत कामगार आहेत. कामगारांची लिंगनिहाय रचना अभ्यासल्यास ९९ टक्के कामगार महिला असून एकप्रकारे या क्षेत्राचे स्त्रीकरण (Feminization) झाले असून त्यांचेच या श्रम रचनेमध्ये प्रभुत्व दिसते. जवळपास ६० टक्के कामगार 'पद्मशाली' या जाती समुहाशी संबंधीत असून उर्वरीत ४० टक्के समांतरपणे 'मुस्लीम', 'लोधी' व इतर मागासवर्गीय जातींशी निगडीत आहेत.

साधारणत: १९७० च्या कालावधी मध्ये विविध कामगार संघटनांनी या असंघटीत श्रमिकांच्या संघटीतपणासाठी व न्याय हक्कासाठी रचनात्मक प्रयत्न सुरू केले. यामध्ये 'अखिल भारतीय कामगार संघटना' व भारतीय कम्युनीस्ट पक्ष (मार्क्सवादी) संलग्नीत 'सिटू' (सेंटर ऑफ इंडीयन ट्रेड युनीयन) इ. समावेश होतो. सोलापूर शहर हे भारतातील विडी उद्योग व श्रमिकांचे केंद्र म्हणून स्वातंत्र पूर्व काळापासून प्रसिध्द आहे. विडी उद्योगासारख्या संपूर्ण खाजगी व सर्वार्थाने असंघटीत असलेल्या क्षेत्रातील श्रमिकांना कामगार संघटनांनी कशा प्रकारे सातत्यपुर्णरित्या संघटीत करुन आपल्या हक्कासाठी लढण्याचे सामर्थ्य व सामाजिक सुरक्षा प्राप्त करुन देत आहेत.

असे असले तरी, विडी उद्योगांच्या रचनात्मक व कार्यात्मक पध्दतीचे जवळून केलेल्या परिक्षणावरून असे स्पष्ट होते की, काही प्रमाणात जरी विडी कामगारांचे संघटन व संरक्षण झाले असले तरी, दैनंदिन जीवनातील या उद्योगासंबंधी असणारी त्याची दैनावस्था व गाऱ्हाणे मात्र आजूनही अखंडीतपणे सुरुच आहे. कामगारांच्या संरक्षणसाठी निर्माण केलेल्या कल्याणकारी कायद्यांना व योजनांना कारखान्याच्या मालकांव्दारे यशस्वीपणे बगल देण्यात येत असून कामगार मात्र त्यांच्या संविधानिक हक्कापासून वंचित होत आहेत. कारखानदार, मध्यस्त व ठेकेदार विडी कामगारांचे बहुविध प्रकारे शोषण करुन त्यांना परावलंबी करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

उपरोक्त पार्श्वभुमीस अनुसरुन प्रस्तुत शोध निबंधामध्ये खालील दोन प्रमुख प्रश्नांचा उहापोह करण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला गेला आहे. :

१. विडी उद्योगातील कामगारांच्या संघटनीकरणानंतर निर्माण झालेले शोषणाचे नवे आयाम व त्यातील संघटना, उद्योजक व राज्य यांच्यातील व्युव्हरचनात्मक संबंध दमनात्मकतेसाठी पोषक ठरतात का?

२. विडी उद्योग व पर्यायाने त्यातील उपेक्षीत कामगार वर्गासमोरील भविष्य काळात भेडसावणारे धोके कोणते आहेत? व त्या संदर्भातील पर्यायी संविधानात्मक मार्ग कोणते असतील? .

संशोधन पध्दती व तथ्ये : प्रस्तुत शोध निबंध हा लेखकाच्या नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (यु.एन.डी.पी) व यशदा पुरस्कृत 'सोलापूर जिल्हा मानव विकास अहवाल' मधील 'सोलापूरातील वंचीत समुह व मानवी विकास' या प्रकरणाच्या लिखाणासाठी संकलीत करण्यात आलेल्या व्यापक गुणात्मक प्राथमिक तथ्यांवर अंशत: आधारीत आहे. प्रामुख्याने कामगार संघटनांचे स्थानिक प्रतीनिधी कार्यकर्ते, विडी कामगार व उद्योगातील संबंधीत मुख्य संवादकांच्या प्रत्यक्ष अनौपचारीक मुलाखत, निरीक्षण व महत्वपुर्ण दुय्यम साहित्यांच्या (सोलापूर गॅझेट, १९७७) आधारे संकलीत करण्यात आले आहे. सदर तथ्य संकलन मार्च ते मे २०१४ या कालावधीमध्ये केले गेले होते.

विडी उद्योग : संघटीतपणानंतरचे शोषणाचे नवे प्रश्न व प्रवाह : विडी कामगारांच्या संघटनीकरणानंतर सुध्दा कारखानदार व ठेकेदारांमार्फत शोषणांच्या नवनवीन पर्यायी मार्गाचा अवलंब सुरूच आहे. अधिकाअधिक नफा मिळविण्याच्या उद्देशाने कामगार संघटनांच्या नियंत्रीत क्षेत्रामध्ये सुध्दा विडी उद्योजक व मध्यस्त शोषणाचे नवनवीन यंत्रणा व तंत्र शोधत आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या व्युव्हरचना अशा असतात की, जे कामगार व त्यांचे श्रम या दोहोंना वरकरणी पर्यायी नैसर्गिक वास्तवता वाटते. तथापि, ते वास्तव कृत्रिम असते ते पुढील प्रमुख शोषण पध्दती व प्रकाराव्दारे स्पष्ट होते.

१) **कच्चा माल व गुणवत्तेच्या तपासणीतील लबाडी** : अ) शासनाने प्रती हजार विडी तयार करण्यासाठी ८०० ग्रॅम तेंदू पत्ता व ३०० ग्रॅम तंबाखू देणे निर्धारित केले आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र ५५० — ६०० ग्रॅम तेंदू पत्ता व २०० ते २५० ग्रॅम तंबाखू

कामगारांना दिली जाते. त्यापैकी ५० ते १०० ग्रॅम तेंदूपत्ता खराब निघतो, ही नित्याची बाब आहे. या विरूध्द तक्रार केली असता 'काम बंद करून घरी बसा' असे धमकीवजा उत्तर दिले जाते. त्यातील खराब पाने बदलण्यासाठी व मुळातच कमी वजनाचे तेंदू पत्ते मिळाल्याने कामगाराला स्वत:च्या पैशातून ही भर पुर्ण करावी लागते. या पत्त्यांची उपलब्धता सहसा बाजारात नसते यासाठी या ठेकेदारानीच अनधिकृतपणे चालविलेल्या दुकानातून कामगारांना तेंदू पत्ते विकत घ्यावे लागतात ही शोकांतिका आहे.

ब) गुणवत्ता तपासणीच्या नावाखाली सर्रास विडी नीट वळली नाही असे दाखवीत हजार मधील किमान १०० ते २०० विडया बाजूला काढल्या जातात. या प्रकाराला 'छाट विडी' असे म्हणतात. त्या कामाची मजुरीही कामगारांना मिळत नाही. गुणवत्तेचे मानक ठेकेदार, मॅनेजर आपल्या मनानुसार ठरवितात. 'छाट' च्या नावाखाली महिला श्रमिकांचे विनयभंग व शारीरिक शोषण सारख्या कृत्यांना बळ मिळते. क) शासकीय नियमानुसार असे बाजुला काढण्यात येणाऱ्या विडया त्या कामगारांसमोरच नष्ट करावे असे स्पष्ट आहे. याउलट अशा विडया एकत्रीत करून एक तर विक्री केल्या जातात किंवा नंतर ज्या कामगारांची १००० ची गुणवत्तापुर्ण विडयाची संख्या पुर्ण होत नाही.

२) **वेतनातील आर्थिक शोषण :** वेतनातील भेद हे विडी कामगारांच्या समस्येचे मुळ आहे. केंद्र शासनाच्या कामगारांचे किमान वेत रू. १२५ पेक्षा कमी असू नये. तरीही विडी कारखानदार व ठेकेदार हे परवाना असलेल्या कामगारास रू. ११५ व कंत्राटी कामगारास रू. ८० प्रती दिन १००० विडया वळल्यानंतर देतात. या संदर्भात मंजुळा (वय ४१) या कंत्राटी विडीकामगार असे म्हणतात की:[१] 'विडया वळण्यासाठी १४–१५ तास काम करतो, आम्हाला यामुळे शारिरीक व्यांधीकडे ही दुर्लक्ष करावे लागते. सकाळी ५ वाजल्या पासून रात्री ११–१२ वाजे पर्यंत येथील घराघरामध्ये हेच काम सुरू असते. लाईट नसताना मेणबत्ती व दिव्याच्या उजेडात काम करावे लागते. परंतु दुर्देवाने अंतीम मजुरी मात्र रू.९० ते ६० रू. पर्यंतच पडते'.

विडी कामगार हे सोलापूरातील कामगारांच्या श्रेणी मधील अत्यंत शेवटच्या स्तरातील असून शिक्षणाचा अभाव, व्यसनाधीनता, दारीद्रय, पर्यायी रोजगारांचा अभाव कारखानदार, ठेकेदारांव्दारे शोषण इ. च्या दुष्टचक्रात त्यांचे जीवन नियंत्रीत झालेले आहेत.

३) **पेन्शन व पी.एफ. मधील भेद :** अ) १९७७ पासून शासनाने विडी कामगारांना भविष्य निर्वाह कायदा (पी.एफ.) लागू केला. त्याचे बंधन कारखानदारांना असहय झाले. त्यामुळे त्यांनी मोठे उद्योग बंद करून ते करार पध्दतीने व ठेकेदारांव्दारे करून घेणे सुरू केले. कामगारांनी प्रती दिवशी केलेल्या आपल्या कामानुसार त्यांना वेतन व त्याआधारे पी.एफ.चा समभाग कारखानादारांव्दारे देणे अपेक्षीत असते. परंतु पी.एफ.ची सुरक्षा कामगारांना मिळू नये म्हणून हेतुपुरस्सरपणे त्यांना अल्प काम देणे किंवा कंत्राटी कामगारांना जास्त काम देणे अधिक पसंत केले जाते जेणे करून पीएफ चा भार टळू शकेल. नवीन नियुक्त कामगारांना ५ वर्षे हा परिक्षाकालीन (प्रोबेशन) अवधी असल्याने पाच वर्षानंतर पूर्ण वेळ कामगारांना प्राप्त होणाऱ्या सुविधा प्राप्त होतील. अशा कामगारांना असल्याने कारखानदार अत्यंत अल्प मानधन त्यांना देतो ज्यामुळे पीएफचा खर्चही कमी होतो.

ब) विडी कामगारांना १९९५ पासून पेन्शन योजना लागू करण्यात आली. वयाची ५० वर्षे पूर्ण व दहा वर्षे सरळ सेवा हा निकष ठरविण्यात येऊन पूर्वी कमीत कमी रू.३१३ ते जास्तीत जास्त रू.११०१ निवृत्तीवेतन निर्धारीत करण्यात येई. कामगारांना प्राप्त होणाऱ्या सुविधा (पेंन्शन व पी.एफ.) इ. चा उपयोग भिन्न–भिन्न प्रकारे कसा केला जातो हे विशेष करून नमूद करणे गरजेचे वाटते. यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे विडी उद्योगाशी संबंधीत कामगार वर्गाचे स्त्रिकरण झालेले असून घरांमध्ये बसून त्या विडी तयार करतात. तसेच असे दिसून येते की, बहुसंख्य नोंदणीकृत कामगार आपापल्या विडी कारखान्यांमध्ये पेन्शनची १० वर्षाची अट पूर्ण होईपर्यंत स्थिर नसतात ज्यामुळे निवृत्तीवेतनाचा लाभ घेऊ शकत नाहीत. सोलापूर शहरातील परिस्थितीवरून असे स्पष्ट होते की, साधारणत: ३५ टक्के नोंदणीकृत विडी कामगार घरगुती कौटुंबिक आर्थिक दबावामुळे १० वर्षे पेन्शनचा निकष पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देतात. राजीनामा देण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे आपल्या पीएफच्या खात्यावर जमा झालेली एकत्रीत रक्कम काढून त्याव्दारे आपल्या कुटुंबाची आर्थिक अडचण सोडविणे हे असते. गरीबी, कर्जबाजारीपणातून निर्माण झालेली भयाण आगतीकता व तसेच कारखानदाराव्दारे होणारे शोषण हे कामगारांना उत्तरोत्तर असहाय्य बनवित आहे. विशेष म्हणजे, राजीनामानंतर पुनश्च तेच कामगार नव्याने कंत्राटी कामगार म्हणून अत्यंत अल्प मजूरीवर विडया तयार करण्याच्या कामात एकरूप होतात. सोलापूरातील विडी उद्योगाचे संघटनीकरण होऊनसुध्दा वरील घटना अत्यंत प्रबळ स्वरूपात अस्तित्वात आहेत. हे अधिक दुख:द वाटते.

४) नोंदणीकृत परवान्याचे हस्तांतरण : सांस्कृतिक संदर्भ : सोलापूरातील विडी उद्योगातील एक आणखीन विलक्षण बाब म्हणजे पूर्णवेळ परवाना असलेल्या महिला कामगारांव्दारे आपल्या परवान्याचे आपल्याच कुटुंबातील अविवाहीत मुलींच्या नावावर केले जाणारे हस्तांतरण होय. सद्या नोंदणीकृत कामगारांना कायमस्वरूपी कामगारांना प्राप्त होणारे सोई—सुविधा प्राप्त होतात. त्यामुळे अविवाहित मुली ज्या नोंदणीकृत कामगार असतात त्यांना कष्टकऱ्याच्या समुदायामध्ये विवाहासाठी अधिक पसंती असते. त्यामुळे कोणत्याही कष्टकरी आईला आपल्या अविवाहीत मुलीच्या लग्नाची काळजी असते. त्यासाठी आपली स्वत:ची व्यक्तीगत सुरक्षेची काळजी न करता ऐच्छीकपणे कामाचा राजीनामा देतात व आपले नोंदणीकृत असलेले हक्क मुलींच्या नावाने हस्तांतरीत करतात. सर्वसाधारण पाहणीनुसार जवळपास ४० टक्के महिला कामगार याप्रकारचे निर्णय घेतात.

संघटीतांचे संघटन करण्याच्या प्रक्रियेमध्ये वरील घडामोडीमुळे काही मुलभुत सैध्दांतिक व संवेदनशील प्रश्न उपस्थित होतात. या उद्योगामध्ये कुटुंब व नातेसंबंधाचे सुप्त पातळीवर परंतु प्रभावी स्वरूपाचे प्रतिबींब दिसून येते. परंतु या सर्व उत्पादनाच्या प्रक्रियेतील भावनिक संबंधाचा बेसूमार फायदा मात्र विडी कारखानदार व ठेकेदार अत्यंत योजनाबध्दपणे घेत आहेत. तसेच संघटना व राज्य संस्थांच्या परिस्थितीजन्य व्युव्हरचनात्मक दुर्लक्षीत भुमिका प्रस्तुत परिस्थितीत आणखीन दमनात्मक बनवीत आहेत.

विडी उद्योग : भविष्यकालीन धोके व पर्याय : प्रस्तुत शोधनिबंधाच्या सुरूवातीला जो अंतीम प्रश्न उपस्थित केला गेला आहे तो या उद्योगाचे व त्यावर निर्भर असणाऱ्या लाखो कष्टकरी समूहांच्या शाश्वत उपजीवीकेसंबंधी गंभीर प्रश्न उपस्थित करतो. सद्यपरिस्थितीत विडी उद्योग हा अत्यंत संकटकालीन अवस्थेतून मार्गक्रमण करीत असून ज्यामूळे केवळ या उद्योगाचेच नव्हे तर त्यातील कामगारांच्या व त्यांच्या कुटूंबीयांच्या सुरक्षीततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. धोके हे सर्वच बाजूंनी येत आहेत. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रभावी शक्तींमुळे राज्य संस्था आपल्या मुळ कल्याणकारी धोंरणांपासून अलिप्त होत आहे. विडी उद्योगाला हानी करणारा निर्णायक कायदा (The cigarettes and other tobacco products – Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution Act) २००३ साली करण्यात आला. प्रस्तुत कायद्यानंतर सोलापूरात विडीचे उत्पादन व आर्थिक उलाढाल यामध्ये जवळपास ४० टक्के घट झालेली दिसून येते. तसेच सुमारे २३ हजार विडी कामगारांना सन २००८—०९ दरम्यान सेवेतून मुक्त करण्यात आले.[२] सोलापूरातील स्थानिक बाजारपेठेमध्येही विडीची मागणी व वापर यामध्ये तिव्रतेने घसरण होत आहे. या प्रक्रियेमुळे कामगारांचा एक मोठा वर्ग सिमांतिक बनला आहे. त्याचप्रमाणे धुम्रपानासंबंधीचे बदलते आवडी निवडी, मुल्ये व जीवनशैली मुळे विडी बाजारपेठेचे अधपतन होत आहे. तसेच, अप्रत्यक्ष प्रसारमाध्यमातील जाहिराती व अभिजन वर्गाच्या आश्रय व प्रोत्साहनामुळे लोकांची आवड विडी पासून सिगारेटकडे परावर्तीत होत आहे. पुर्वी बिहार व उत्तर प्रदेश राज्यातून सोलापूरातील विडी उत्पादनाला मागणी होती. आता या राज्यांमध्ये तेथील स्थानिक बेरोजगार कामगार विडी क्षेत्राकडे वळत आहेत.

प्रस्तुत कारणांप्रमाणेच विडी उद्योगातील काही अंगभुत समस्या उदा. मालकत्वाचे स्वरूप, उत्पादन व वितरणातील संघटनेचे स्वरूप इ. मुळे हा उद्योग सिगारेट उद्योगाशी स्पर्धा करण्यात असमर्थ ठरत आहे. सिगारेट उद्योगाने प्रथम फिल्टरचा वापर केला, जो विडी पेक्षा अधिक सुरक्षीत समजला जाऊ लागला. काही विडी उत्पादकांनी फिल्टरचा वापर विडीच्या सुधारीत आवृत्तीमध्ये करण्याचा प्रयत्न केला पण तो अधिक महाग ठरू लागला. फिल्टरयुक्त एका विडीची अंदाजे किंमत ०.६० पैसे होते व ते त्यांच्या ग्राहकांना न परवडणारे आहे. खेदाने असे दिसून येते की, विडी उद्योगामध्ये स्पर्धात्मकता व नव अविष्कारासाठी संशोधन व विकास (आर ॲड डी) क्षेत्रामध्ये कमालीचा निरूत्साह आहे.आधुनिक ग्राहकांच्या अपेक्षापुर्तीसाठी या उद्योगामध्ये संशोधन व विकासाला पुष्कळ वाव दिसून येतो. परंतु या उद्योगांच्या सद्याच्या मालकत्वाच्या संरचनेचे स्वरूप अत्यंत नैराश्यपूर्ण असल्याने अशा प्रकारचे प्रयोग होणे दुरापास्त वाटते. जे त्यांनाही आर्थिक दृष्टया परवडणारे नसते.

जागतिक व स्थानिक पातळीवरील सातत्याने होणारे धोरण व बाजारपेठीय वातावरणातील बदलांमुळे नजीकच्या काळामध्ये विडी उद्योग व कामगार यांना पुढील प्रमुख आव्हानांचा सामना करावा लागेल व लागत आहे. यामध्ये प्रामुख्याने दोन मुख्य प्रवाह दिसून येतात. पहिला प्रवाह हा या दोन्ही घटकांची सुरक्षितता धोक्यात आणतो तर, दूसरा प्रवाह हे दोन्ही घटक कशा प्रकारे सुरीक्षित असू शकतो याचे गृहीतक मांडतो.

१) मानवी आरोग्यावर होणारे घातक परिणाम, शासकीय कायदे, आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटनांचा दबाव, राष्ट्रीय पातळीवरील मोठया उद्योजकांची

उदासीनता इ. मुळे हा उद्योग संकटात येत आहे. जागतिक आरोग्य संघटना (२०१५) अहवालानूसार, १० लाख भारतीयांचा दरवर्षी धुम्रपानामुळे होणाऱ्या विविध आजारामुळे मृत्यु होतो, जे भारतातील एकूण मृत्युंच्या कारणांपैकी ३ रे प्रमुख कारण आहे. भारतातील ३५ ते ६९ वयोगटातील तंबाखू, धुम्रपान इ. आजाराने त्रस्त असलेल्या व्यक्तींनी सन २०११ मध्ये साधारणत: रू.१५९० कोटी उपचारासाठी खर्च केले आहे. ही रक्कम केंद्र सरकारला तंबाखूजन्य पदार्थापासून मिळणाऱ्या एकूण कराच्या सुमारे ६ पटीने अधिक आहे (बाहरी २०१५:२). विशेषत: असे असतांनाही 'राज्य' हे विडी उद्योगांसंदर्भात धुर्त धोरण स्विकारत असून त्यामध्ये आखण्यात आलेल्या क्लुप्तींच्या लवचीकतेवर या उद्योगाचे भविष्य अवलंबून असेल.

मुख्यत: २००३ चा कायदा तसेच "Framework convention on tobacco control (FCTC)" आराखडयावर १० सप्टेंबर २००३ रोजी भारत सरकारव्दारे मान्यता देण्यात आलेली आहे.

२) वरील घडामोडी या विडी उद्योगाच्या व कामगारांच्या भवितव्यासाठी अंधकारमय असल्या तरी यामध्ये पुढील व्युव्हरचनात्मक धोरणांचा संदर्भ महत्वाचा ठरतो. विडी उद्योगांच्या तुलनेने सिगारेट उद्योग अधिक खर्चीक व समाजातील विशिष्ट अभिजन वर्गाशी निगडीत असून याचा ग्राहक वर्ग मर्यादित आहे. शिवाय यांची निर्मिती यंत्राव्दारे केले जाते. तसेच सरकारव्दारे विडी व सिगारेट या दोन्ही वरील करांमध्ये तफावत आहे.

विडी उद्योगातील मानवी व आर्थिक भांडवल : एका विडीच्या गठ्यांवर त्यांच्या किरकोळ विक्रीच्या किंमतींच्या ६ टक्के कर लागतो. जो जागतिक आरोग्य संघटनेच्या सूचनेपैक्षा ४० टक्के ने कमी आहे. विडीचे ग्राहक भारतातील एकूण १२ कोटी धुम्रपान करणाऱ्यापैकी ६० टक्के आहेत (जी.ए.टी.एस. २०१०). शासनाने विडी उद्योगाला पुढील सवलती दिल्या आहेत. (१) हाताने तयार केलेल्या विडी गटांव्दारे उत्पादीत २० लक्ष विड्यांना दर वर्षी अबकारी करातून माफ केले जाते. (२) मोठे विडी उद्योजक हाताने तयार केलेल्या एका विडीसाठी १.६ पैसे कर भरतात. याउलट हा कर रू.१.२८ ते रू.३.३७ प्रत्येक सिगारेटसाठी भरला जात असला तरी अखिल भारतीय विडी उद्योजक संघ यांच्या मते विडीवरील कर वाढविल्यास त्याचे उत्पादन व विक्री घटेल ज्यामुळे जवळपास ८० लाख विडी कामगार, लाखो तंबाखू उत्पादन शेतकरी व यावर आधारीत तितक्याच संख्येने विडी विकणाऱ्या लघु दुकानदारांची उपजिवीका धोक्यात येईल.

उपरोक्त कुटनितिक धोरणांमुळे विडी उद्योजक घरगुती हाताने विडी निर्मिती करणाऱ्या गटांनाच अधिक प्रोत्साहन देतात ज्याचे प्रमाण जवळपास ९८ टक्के इतके आहे परंतु त्याप्रमाणे त्यांना सोई—सुविधा प्राप्त करून देत नाहीत (बाहरी २०१५:५).

कामगार संघटना व उद्योजकांची उथळ युती : सोलापूरातील विडी उद्योगाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, या उद्योगांमध्ये निर्माण झालेल्या कोंडीमुळे उद्योजक, कामगार संघटना व कामगार यांच्या पारंपारिक संबंधामध्ये बदल होण्यासाठी निर्णायक नसली तरी आवश्यक परिस्थिती निर्माण होत आहे. या तीनही घटकांचे संघटन होऊन राज्याच्या विरूध्द प्रस्तुत समस्येतून मार्ग काढण्यासाठी निषेध केला जात आहे.

या तीनही समूहापैकी कामगारांची भूमिका मात्र या ठिकाणी नैसर्गिक वास्तवता दर्शविते. या उलट उर्वरित दोन्ही पक्षामध्ये असणाऱ्या सुप्त राजकीय जाणीवा मात्र ही युती उथळ असून याव्दारे प्रतिबिंबीत होणारी वास्तवता ही निर्मित वास्तवता आहे असे जाणवते.[३]

अशी युती विडी उद्योगाच्या इतिहासामध्ये कदाचीत पहिल्यांदाच झालेली असेल. उदारीकरणाच्या प्रक्रियेनंतर कामगार संघटना व उद्योजक यामधील संबंधामध्येही रचनात्मक बदल झालेले असून ते उत्पादनाच्या साधनांशी व संबंधाशी जुळलेले आहेत. कामगार संघटनांना आपल्या संघटनात्मक हितसंबंधाच्या सुरक्षीततेसाठी उत्पादनाची प्रक्रिया निरंतरपणे चालू ठेवणे आवश्यक असते (अग्रवाला २००८). या सुप्त भुमीकेतून त्यांनी कारखानदारांसाठी समायोजनात्मक करार केलेला दिसून येतो. या परिप्रेक्षेत त्यांचा प्रत्यक्ष राज्याशी संघर्ष करण्याचा उद्देश नसतो. परंतु तसे वास्तव निर्मित केले जाते. ज्यामध्ये कामगार, कारखानदार व कामगार संघटना या तिघांचा 'राज्य' हेच एकमेव शत्रु आहे असे चित्र उभे केले जात आहे. त्याच वेळेस या दोहोंचे भुमिका मात्र संरक्षकांची व कल्याणकारी स्वरूपाची असल्याचे असल्याचे प्रतीत केले जाते. या गुंतागुंतींच्या परिस्थितीचे अन्वेक्षण अधिक सुक्ष्म पातळीवर होणे क्रम प्राप्त ठरते.

परामर्श : सोलापूरातील सोलापूरातील विडी उद्योगाच्या संदर्भातील निर्माण झालेल्या उपरोक्त चर्चेच्या आधारे पुढील मुलभुत प्रश्न उपस्थित होतात.

१. मागील तीन—चार दशकांमध्ये असंघटीत विडी कामगारांना संघटीत करण्यामध्ये कामगार संघटनांचे प्रयत्न मर्यादित आहेत. २. कामगारांच्या हितसंबंधाचे संरक्षण या भावनीक मुद्दाच्या आधारे औद्योगीक संबंधातील सहअस्तीत्वाची जाणीव व सुरक्षा अबाधीत

राखण्यासाठी स्थानिक कामगार संघटनातील नेतृत्वाव्दारे पारंपारीक प्रतिस्पर्धी (विडी कारखानदार मालक) सोबत व्युव्हरचनात्मक संगनमत होत आहे. ३. कारखानदार व ठेकेदारांव्दारे होणाऱ्या दैनंदीन उत्पादन प्रक्रियेतील शोषणाविरूध्द मात्र कामगार संघटनांची भुमिका मूक स्वरूपाची असते. ४. विडी उद्योगातील कामगारांच्या दारिद्रयाचेही स्त्रीकरण (Feminization of poverty) झाले असून अशा लिंग विशिष्ठ असाहयतेमुळे हा समुह अधिकाधिक शोषीला जात आहे. ५. अशा परिस्थितीमध्ये राज्याची भूमीका मात्र अस्पष्ट व विरोधासात्मक वाटत आहे.

भारतातील उत्तर उदारीकरण व सुधारणा कालखंडानंतर राज्य व कामगार या दोहोतील संबंध अत्यंत सावध व व्युव्हरचनात्मक पध्दतीने कार्यान्वीत होत आहेत (चौधरी २००३). राज्य नेहमीच आपले संबंध व्यापक संख्येने असलेल्या असंघटीत कामगारांसोबत पुर्णपणे अनियंत्रीत न होण्याची काळजी घेत असते. या मुळेच नकळतपणे एका बाजुला विडी विषयक कायदे कडक करावयाचे तर, त्याच वेळेस विडी उद्योगांना विविध प्रकारे अप्रत्यक्ष सवलत दिल्याचे दिसून येते. ज्यामुळे उत्तर औद्योगिक उदारीकरणाच्या प्रक्रियेमध्ये अत्यंत कमी मुल्य व लवचिक असलेले श्रम प्राप्त होत असून ते राज्य व भांडवलदार दोहोंसाठी निर्णायक ठरते.

तथापि, या बदलत्या धोरणांच्या प्रत्युत्तरादाखल असंघटीत क्षेत्रातील कामगारानींही आपल्या स्वतंत्र संघटनात्मक व्युव्हरचनेमध्ये बदल करण्याची गरज असून या मार्गामुळे राज्य व श्रम या दोहोमधील सामाजिक करार पुर्नरचीत होऊ शकतात. कामगारांनी प्रत्यक्ष श्रमाच्या फायद्याची मागणी करण्यापेक्षा त्यांनी आपल्या कल्याणकारी फायद्यांची मागणी केली पाहिजे. या संदर्भात राज्य संस्थेचे लक्ष केंद्रीत करण्यासाठी कामगारांच्या हक्कांपेक्षा आपल्या मागण्यासाठी संविधानीक नागरीकत्वांच्या हक्कांच्या प्रभावीपणे वापर केल्याने आपल्या अनियंत्रीत श्रमाला राजकीय पाठींबा व तसेच राज्याव्दारे आधिमान्यता मिळविण्यामध्ये कामगारांना सहायक ठरेल. अशा प्रकारच्या अधिमान्यतेमुळे विडी कामगारांसारख्या असंघटीत कामगारांना काही प्रमाणात न्यायीकता बहाल होईल. ज्याव्दारे समाजातील त्यांचा विस्कळीत झालेला आदर व श्रम प्रतिष्ठा या दोहोंचे ते प्रमुख दावेदार बनतील. प्रस्तुत मार्ग कामगारांच्या शाश्वत उपजीवीकेच्या व हक्कांसंदर्भात अधिक परिणामकारक ठरू शकेल.

टिपा : १. प्रस्तुत तथ्ये महिला विडी कामगारांसोबत विडी घरकुल वसाहत येथील अनौपचारीक चर्चे दरम्यान संकलीत केले गेले. संशोधनाच्या नैतिक मार्गदर्शक तत्वांनुसार उत्तरदात्यांची ओळख बदलण्यात आलेली आहे. २. प्रस्तुत कायद्यानंतर कोणतेही धोरणात्मक निर्णय या कायद्यामुळे विस्थापीत झालेल्या कामगारांच्या पर्यायी उदरनिर्वाहाच्या संदर्भात घेण्यात आलेले नाही. ३. कामगार संघटना व कारखानदार मालक या परस्पराविरोधी वाटणाऱ्या दोन समुहांमध्ये निर्माण झालेल्या जवळीकीतून सोलापूरात 'विडी उद्योग संरक्षण संयुक्त संघर्ष समिती' या संयुक्त समितीचे अध्यक्ष प्रसिध्द विडी उद्योजक नथुभाई देसाई तर स्थानिक कामगार नेते सिटू चे नरसया आडम (मास्तर) यांच्या पुढाकाराने स्थापीत झालेली असून या संघर्ष समितीच्या नावामध्येही कामगारांचे अस्तीत्व कसे उद्योगावर अवलंबून आहे हे दर्शविण्यासाठी केवळ विडी उद्योगांचेच संरक्षण करणे असा संदेश अभिप्रेत होतो.

संदर्भ :

1. *Agarwala, R. (2008). Reshaping the social contract: emerging relations between the state and informal labor in India. Theory and Society, 37(4), 375-408.*
2. *Bahri, C. (2015). Why India Ignores A $16-Billion Smoking-Led Health Crisis. Indiaspend, 37 retrieved on 29 December 2015 http://www.indiaspend.com*
3. *Chowdhury, S. (2003). Old classes and new spaces: Urban poverty, unorganised labour and new unions. Economic and Political Weekly, 5277-5284.*
4. *Gazetteer of Sholapur District, (1977). Gazetteer of India Series (Gazetteer Department: Government of Maharastra).*
5. *Global adult tobacco survey (GATS). (2010). Findings from 2010 global adult tobacco survey: Implementation of MPOWER policy in China. Biomedical and Environmental Sciences 23, (6): 422-429.*
6. *WHO, (2015). Tobacco Use and smocking in Developing Countries: Status Report. Geneva*

सायबर स्त्रीवाद

प्रा. प्रवीण घोडेस्वार, समाजशास्त्र विभाग, य. च. म. मु. वि. नाशिक मो. ९४०३७७४५३०

साहित्यामध्ये 'स्त्रीवाद' आणि 'स्त्री प्रश्न' यांची मांडणी करणारे लेखन जवळपास सर्वच भारतीय भाषांमध्ये होतांना दिसून येत आहे. सध्याच्या काळात स्त्रीवादी साहित्याला नवे परिमाण लाभत आहे. स्त्रीवादी साहित्याचे उपयोजन, आकलन, समीक्षण, मूल्यमापन यावरही सातत्याने चर्चा होत आहे. मात्र असे असले तरीही सामाजात आणि साहित्यातही स्त्रियांची परिस्थिती उन्नत होताना मात्र दिसत नाहीये. स्त्री प्रश्नांची मांडणी केवळ औपचारिकता म्हणून न करणारी, वादविवादांचे मोहोळ न उठवणारी आणि अंमलबजावणीचा आग्रह धरणारी एक विचारधारा म्हणजे सायबर स्त्रीवाद, असे ढोबळमानाने सांगता येते.

जगातल्या कोणत्याही काना—कोपऱ्यातल्या स्त्री चा आवाज दुसऱ्या कोपऱ्यात पोहचवण्याचे कार्य सायबर स्त्रीवाद करत आहे. त्यासाठी स्त्रियांना एकत्रित आणत आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवर सहाय्यभूत ठरत आहे. मग आर्थिक गरज असो वा सामाजिक न्यायासाठीचा लढा अथवा एड्सग्रस्त स्त्रियांना मानसिक आधार देण्याचा मुद्दा असो, सायबर स्त्रीवादाचाचा विस्तार विश्वव्यापी आहे.

मुळात स्त्रीवाद या संकल्पनेबाबत अनेक समज—गैरसमज अस्तित्वात आहेत. साहजिकच सायबर स्त्रीवाद ही संकल्पना सुद्धा समजून न घेता याचा विपर्यास होण्याची दाट शक्यता आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानता प्रस्थापित होण्यासाठी उभी राहिलेली चळवळ म्हणजे स्त्रीवाद अशी शब्दकोशातल्या अर्थानुसार स्त्रीवाद ह्या संकल्पनेचा अर्थ सांगितला जातो. या मध्ये Black feminism, मार्क्सवादी स्त्रीवाद, दलित स्त्रीवाद या सारखे प्रवाह दिसून येतात. पुरुषांचा द्वेष करणाऱ्या आणि मुक्तपणे जगू पाहणाऱ्या स्त्रियां असा एक गैरसमज भारतात sisterhood वा स्त्रीवादाबाबत रूढ झालेला आहे. आधुनिक मुली/स्त्रियां यांनी थेट, बेधडक, कोणताही आडपडदा न ठेवता केलेले ब्लॉग लेखन आणि त्यांची मौज—मस्ती यालाच सायबर स्त्रीवाद समजण्याची चूक भारतीय पुरुष आणि स्त्रिया दोघेही डोळे झाकून करतात. वास्तविक हा विषय गांभीर्याने चर्चा करण्याचा आहे. जेव्हा आपण online असतो आणि आपली इमेल पाहतो, आपल्या आवडत्या वेबसाईटला भेट देतो त्यावेळी आपल्याला हे विसरता येत नाही की आपण आपल्या जीवनावर परिणाम करणाऱ्या एका सामाजिक बदलांमध्ये सहभागी होत आहोत. आपले दैनंदिन जगणे सुसह्य केल्याबद्दल आपण इंटरनेटचे आभार मानून कौतुक करत असतो. आपण नेट च्या माध्यमातून खरेदी करतो, दूरदेशातल्या आपल्या नातेवाईक, मित्र परिवाराशी संपर्क साधतो तसेच आपल्याला हवी असलेली प्रत्येक माहिती घरबसल्या प्राप्त करत असतो.

एव्हाना आपल्याला इंटरनेट च्या अफाट क्षमतेचा परिचय झालेला आहे. या क्षमतेचा सामाजिक परिवर्तनासाठी कसा उपयोग करून घेता येईल यासाठी जगभरातल्या जागरूक स्त्रियां प्रयत्नशील व कार्यरत आहेत. केवळ स्त्री स्वातंत्र्यासाठीच नाही तर इतरही अनेक क्षेत्रात आणि संदर्भासाठी स्त्रिया इंटरनेट च्या माध्यमातून एकत्रित होत आहेत. अधिकाधिक स्त्रियांना इंटरनेटचा वापर करता यावा, त्यांच्या क्षमताना योग्य वाव मिळावा, त्यांच्या सीमांचा विस्तार होण्यासाठी इंटरनेट स्त्रीयांसाठी नेमके friendly माध्यम आहे. यावरून कोणत्याही संगणक किंवा स्मार्ट फोन साक्षर स्त्री ला आवश्यक असलेली माहिती सहजपणे प्राप्त करून घेता येते. अलीकडे स्मार्ट फोन वरून इंटरनेट चा वापर करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत वाढ होत आहे. स्त्रियांशी निगडीत निरनिराळ्या विषयांच्या वेबसाईटस च्या हायपर लिंक च्या सहाय्याने स्त्रिया माहिती प्राप्त करून घेत आहेत. यामध्ये आरोग्यविषयक, कायदेविषयक, व्यक्तिमत्व विकास विषयक, पाककला विषयक माहितीचा समावेश असून वेब सिरीज, टीव्ही मालिका यातून मनोरंजनही करून घेत आहेत. याशिवाय शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, रोजगार संधी, अत्याचारित स्त्रियांसाठी काम करणाऱ्या शासकीय तथा NGOs यांचीही माहिती स्त्रिया मिळवत असतात.

इंटरनेटवर स्त्री प्रश्नांची चर्चा करणारे फोरम निर्माण झाले आहेत. केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही असे फोरम तयार होऊन त्यात भारतीय स्त्रियांदेखील वैचारिक आदान—प्रदानात सहभागी होत आहेत. Global Sisterhood कडे जाण्याच्या दिशेने जगातल्या बायकांचे प्रयत्न सुरु आहेत. इंटरनेट ची सहज उपलब्धता आणि वापरण्याची सुलभता याचाच हा परिपाक आहे. स्वताला व्यक्त करणे, आपले दुःख इतरांसमवेत शेअर करणे, आपसात बातचीत करणे यासाठी स्त्रिया विविध सोशल मिडिया चा उपयोग सकारात्मक पद्धतीने करताना दिसत आहेत. जगात सायबर विश्वातली स्त्रियांसाठी निर्माण झालेली पहिली

वेबसाईट म्हणजे www.feminist.com ही होय. १९९७ मध्ये जर्मनीत 'सायबर स्त्रीवाद ' यावर पहिले संमेलन संपन्न झाले. १९९५ मध्ये जगभरात इंटरनेट चा वापर करणाऱ्या स्त्रियांची संख्या फारच कमी होती. आता यामध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. परिणामी आज स्त्रियांच्या अस्तित्वाला नवीन ओळख प्रस्थपित होऊन अनेक समूह आणि फोरम या दिशेने आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करत आहेत. इथे केवळ घोषणाबाजी किंवा अनिर्बंध स्वातंत्र्याची मागणी न होता स्त्रियांच्या मुलभूत गरजांचा विचार केला जातो. यामध्ये स्त्रियांचे शारीरिक—मानसिक आरोग्य, शिक्षण, शोषण, दारिद्रय, गरोदरपणा, प्राथमिक आरोग्याचे धडे, कौटुंबिक हिंसाचार, सुरक्षितता यासारख्या विषयांचा अंतर्भाव असतो. घडलेल्या घटनेची माहिती पाठवणे आणि प्राप्त करणे एवढ्यापुरतीच इंटरनेट ची व्याप्ती मर्यादित राहिलेली नाहीये. इंटरनेटचे कार्य या पेक्षा विस्तारले आहे. लोकांना एकमेकांशी जोडण्याचे आणि विचारांची आदान—प्रदान करण्याचे इंटरनेट अत्यंत प्रभावी व उपयुक्त माध्यम आहे. वर्तमान संदर्भात स्त्री मुक्ती चळवळीची भूमिका आणि उद्देश जगभरात पोहचवण्याचे कार्य इंटरनेटच्या माध्यमातून करणे शक्य झाले आहे.

हे खरे आहे की १९७०—८० ह्या दशकातल्या स्त्रीवादाचे जुने दिवस आता राहिलेले नाहीत. तो काळ स्त्रियांच्या मुलभूत गरजांचा विचार करण्याइतपतच सीमित होता. मुक्तीच्या कल्पनेनेच त्या काळात स्त्रियांच्या मनात अपराधभाव निर्माण व्हायचा. त्या काळात स्त्रियांच्या लैंगिकतेबद्दल बोलणे, विचार करणे, विचार मांडणे एखाद्या गुन्ह्यापेक्षा कमी नव्हते. स्त्रियांना तंत्रज्ञान वापरू द्यायला तत्कालीन समाज तयार नव्हता. आज परिस्थिती खूप बदलली आहे. स्त्रिया सुद्धा मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानस्नेही झाल्या आहेत. Online self-help group, chat group, social network forum, discussion forum याद्वारे अभिव्यक्त होत आहेत. जवळपास सर्वच शासकीय खाती आणि NGOs इंटरनेटवर उपलब्ध आहेत त्यामुळे स्त्रियांना हवी असलेली माहिती किंवा सेवा मिळवता येते. आखाती देशाल्या स्त्रिया देखील आपला धर्म आणि समाजाच्या बरोबरीनेच स्वत:च्या अस्तित्वाबद्दलही जागरूक होत आहेत. त्या आपसात एकमेकींशी जोडल्या गेल्या आहेत आणि अर्थातच जगाशी सुद्धा! इराण मधल्या अनेक जागरूक स्त्रियांनी जगभरात दखल घेतली जावी इतपत मोठी कामगिरी केली आहे. नाजनीन फतही नामक एका मुलीचे उदाहरण वानगीदाखल सांगता येईल. तिच्यावर बलात्कार करणाऱ्या नराधमाची स्वरक्षणासाठी तिने हत्या केली. म्हणून तिच्या देशाने तिला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली. मात्र या विरोधात तिथल्या महिलांनी एकत्रित होऊन आवाज उठवला. जगभरातल्या अनेक संस्थांचे सहकार्य मिळवले. Amnesty International या जगप्रसिद्ध संस्थेने देखील त्यांना मदत केली. इराणमधल्या अनेक किचकट कायद्यांना तोड देउन एक प्रदीर्घ लढा ऊभा केला. शेवटी त्यांच्या या अथक प्रयत्नांना यश येऊन या मुलीला शिक्षेतून मुक्त करण्यात आले. तिथल्या न्यायालयाने मृत्यूदंड तर रद्द केला पण त्याऐवजी दंडाची खूप मोठी रक्कम ठोठावली. ती रक्कम होती ४०० मिलियन रियाल म्हणजे जवळपास ४३ हजार डॉलर. हा प्रश्न देखील सोडवण्यात आला. माजी मिस वर्ल्ड कॅनडा, पॉप सिंगर, मानवी हक्क चळवळ कार्यकर्ती नाजनीन आफनीनजान यांनी www.helpnajnin.com तयार करून एक आंतरराष्ट्रीय अभियान चालवले आणि आवश्यक तेवढा निधी जमवून दंडाची रक्कम भरण्यात आली. यालाच सायबर स्त्रीवादाचा धवल चेहरा म्हणायला हरकत नाही. तंत्रज्ञानस्नेही असलेल्या आजच्या युवा पिढीला स्त्रीमुक्ती आणि त्यासाठी दिलेल्या संघर्षमय लढ्याबाबत फारशी माहिती नाही, असे सध्याच्या परिस्थितीत खेदाने म्हणावे लागते. अत्याधुनिक वेशभूषा आणि मुक्त लैंगिक अभिव्यक्तीलाच ही पिढी स्वातंत्र्य समजते. त्यांच्यामते आता स्त्रीमुक्ती च्या घोषणांची गरज उरलेली नाहीये. ह्या पिढीची वाटचाल मुक्ततेकडून स्वैराचाराकडे होताना दिसत आहे. या पिढीला कास्टिंग काऊच किंवा लौन्चींग काऊच चे chronically anti feminism षडयंत्र समजत नाहीये. आजचा समाज सर्वार्थाने पुरुषप्रधान रचनेच्या अधिपत्याखाली आला असल्याची जाणीव या पिढीला नाहीये. एकीकडे स्त्री इंटरनेटवर नव्या प्रतिमेसह विराजमान होत आहे तर दुसरीकडे मिडिया आणि सायबर मिडिया स्त्री देहाचे वस्तुकरण करण्यात मश्गुल आहे. याचे कारण म्हणजे तंत्रज्ञानाच्या प्रत्येक प्रांतात पुरुषांनी वर्चस्व प्रस्थापित केले आहे आणि जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात पुरुषप्रधान दृष्टिकोनाचा वरचष्मा दिसून येत आहे. इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या प्रत्येक सामग्रीवर पुरुषांनी आपली मालकी स्थापन केली असून pornographic websites च्या माध्यमातून स्त्री देहाचा व्यापार चालवून यातून मोठ्या प्रमाणात फायदा उठवला जात आहे. सध्या पाश्चात्य स्त्रीवादाचे आधुनिक आणि लोकप्रिय स्वरूप म्हणजे cyber girlism. ह्या सायबर गटांचे वर्तन दृव्यवहार सदैव कमालीचा मुक्त, आक्रमक, आवेशपूर्ण आणि क्रोधयुक्त असतो. नव्या युगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ह्या मुली आणि स्त्रिया आपला प्रत्येक अनुभव सोशल मिडीयावर मांडत आहेत. यामध्ये लैंगिक अनुभव तसेच

लैंगिक शोषणावरही बेधडकपणे व्यक्त होत आहेत. त्या fame porn web magazines प्रकशित करून वेबकॅमेरा च्या सहाय्याने देहप्रदर्शन करायलाही मागे पुढे पाहत नाही. त्या इंटरनेटवरच आपल्यासाठी जोडीदार शोधतात, इंटरनेटवर औषधे शोधून आपल्या लठ्ठपणाचा आणि डिप्रेशनचा उपचार करतात. आपल्या क्षमतांबाबत पूर्णत: जागरूक आणि अवगत असलेल्या ह्या मुली आपली बुद्धिमत्ता, हुशारी, कला यांचा इंटरनेट च्या माध्यमातून केवळ प्रसार व प्रचारच करत नाही तर त्यासाठी मार्केट देखिल शोधून काढतात. मात्र यापैकी कोणीही राष्ट्रीय पातळीवर स्त्रियांची परिस्थिती यावर गंभीर विचार–विनिमय, चर्चा करायला राजी नसतात. Anything you wanna be end do in cyberspace is cool चा दृष्टीकोनच त्यांचे तथाकथित स्वातंत्र्य आहे.

आजच्या नव्या युगात टेक्नोलॉजी, मिडिया, शिक्षण आणि कार्यसंस्कृती स्त्रियांच्या विश्वाचाच एक अविभाज्य भाग बनल्याने त्यांना नव्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तसेच समाज माध्यमांवर सक्रीय असलेल्या आणि आपले स्वत:चे वेगळे मत मांडणाऱ्या स्त्रियांना trolling चा सामना करावा लागतो. त्याचप्रमाणे स्त्री शोषणाच्या नव–नवीन पध्दती, नवे स्वरूप पुढे येत आहे. स्वातंत्र्याच्या भ्रामक मुखवट्याआड सध्याचा ग्लोबल काळ सजलेला आहे. अशात स्त्रीवादाचे नवे रूप कसे असणार आहे? या परिस्थितीत सायबर स्त्रीवादाचा चा एक लहानसा मार्ग अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रूपाने ब्लॉग लेखन, फोरम किंवा social networking च्या अवकाशाला येऊन भेटत आहे. online स्त्री चे अभिव्यक्त स्वातंत्र्य आणि जगभरातल्या स्त्रियांशी जोडले जाणे तसेच आपसातली सहयोगपूर्ण चळवळ म्हणजे सायबर स्त्रीवाद.

ई–माध्यम हे पूर्णत: आधुनिक आणि सर्वसुलभ तांत्रिक माध्यम असून जे स्त्री ला आणि स्त्री च्या अभिव्यक्तीला नव्याने सुरुवात करण्याची संधी देत आहे. नवे माध्यम, नवी ओळख, नवी प्रतिमा आणि स्त्रीवादाची ची नवी बहुआयामी व्याख्या. सायबर स्त्रीवाद एक नवीन विचार प्रवाह असून हा एक 'युटोपिया' देखील आहे की हे सायबर माध्यम पूर्णत: आपले असून तिथे स्त्रिया पूर्णत: मुक्त आहेत, आपल्या स्त्री असण्यापासून, आपल्या स्त्री देहापासून, आपल्या वांशिक (जात/धर्म/पंथ) ओळखीपासून, आपल्या राष्ट्रीयत्वापासून तसेच आर्थिक स्तरापासून स्वतंत्र आहे. मात्र हे सायबर विश्व एक 'युटोपिया' नाहीये. इथे सुद्धा स्त्री आपले शरीर, आपला वंश, जात, धर्म, भाषा, वय, सामाजिक व आर्थिक स्तर यापासून स्वतंत्र नाहीये. सायबर स्त्रीवादाने ह्या युटोपिया आणि मिथकापासून अलिप्त राहण्याची गरज आहे. नेटवर स्त्रियांनी आपले अधिकार क्षेत्र (territory) तयार करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सद्यकालीन संदर्भात सायबर स्त्रीवादावर विचार मंथन, चर्चा घडून येणे आवश्यक आहे जेणेकरून याची व्याप्ती अजून विस्तारित करता येईल आणि वेगवेगळ्या समाज, समुह आणि विचारांच्या स्त्रिया एकमेकांसोबत ह्या ग्लोबल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जोडल्या जातील. सध्या सोशल मिडिया, निरनिराळ्या वेबसाईटस, ब्लॉग लेखनाच्या माध्यमातून हरेक प्रकारे स्त्रियां आपले अस्तित्व आधुनिक संदर्भात परिभाषित करीत आहेत. स्त्री स्वातंत्र्याच्या नव्या दिशा धुंडाळताना येणाऱ्या आव्हानांवरही चर्चा करत आहेत. मग कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ असो वा कन्या भ्रूण हत्येचा प्रश्न असो अथवा acid attack किंवा विनयभंग, बलात्कार या विरोधात एकजूट होऊन आवाज उठवण्याचा मुद्दा असो. अशा विचार विनिमय, चर्चा–संवाद, चळवळ–आंदोलन, विरोध प्रदर्शन यामुळेच समाजात रोज थोडे थोडे बदल होत जाणार आहेत, यात शंका नाही.

संदर्भ :–

1. *https://blogs.abo.fi/internetcultureandgender/2012/03/28/what-is-cyberfeminism/*
2. *https://en.wikipedia.org/wiki/Cyberfeminism*
3. *https://study.sagepub.com/sites/default/files/Ch17_Cyberfeminism.pdf*
4. *https://www.colorado.edu/faculty/hall-kira/sites/default/files/attached-files/hall-1996-cyberfeminism.pdf*

आदिवासी समाज व कुमारीमातांची समस्या

डॉ. श्रीराम खाडे, कला, वाणिज्य महाविद्यालय, मारेगांव ता. वणी जि. यवतमाळ. मो. ८४८४९१७५४८

प्रस्तावना :— आदिवासी समुदाय भारतीय समाजाचा अविभाज्य भाग आहे. भारताच्या विविध राज्यात आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. भारतात ४२७ अनुसूचित जमाती आहेत.[१] २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासींची एकूण लोकसंख्या १० कोटी ४२ लाख ८१ हजार ०३४ आहे. अनादिकाळापासून अरण्यात, वाळवंटात, दऱ्याखोऱ्यात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी समुदाय होय. आदिवासींना देशातील मूलनिवासी म्हटले आहे. म्हणून डॉ. वेरियर इल्विन, ठक्कर बाप्पा यांनी 'आदिवासी' म्हटले आहे.[२] डॉ. जी. एस. धुर्ये नी आदिवासींना 'मागासलेले हिंदू' म्हटले आहे.[३] आदिवासी अरण्यात वास्तव्य करीत आहेत, म्हणून त्यांना 'वन्यजाती' असेही म्हटले जाते. भारतीय संविधानातील कलम ३४१ आणि ३४२ मध्ये केलेल्या तरतुदीप्रमाणे आदिवासी समुदायांना 'अनुसूचित जमाती' असे म्हणतात.

प्रथितयश समाजशास्त्रज्ञ डॉ. रिव्हर्स ने, 'जमात किंवा आदिवासी हा एक सरळ, साधा सामाजिक समूह आहे. ज्यातील सदस्य एका समान बोली भाषेचा अवलंब करतात व युद्ध वगैरे सारख्या उद्देशपूर्तीकरिता एकत्रित कार्य करीत असतात.'[४]

सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ गिलिन यांच्यामते, 'आदिवासी समाज हा एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एक समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिय गटांचे एकत्रीकरण आहे.'[५]

थोडक्यात, आदिवासी जमाती म्हणजे एका विशिष्ट भूभागावर वास्तव्य करणा—या व समान बोलीभाषा बोलणा—या विशेषत: दुर्गम भागात राहणा—या लोकांचा समूह होय. आदिवासींना 'अनुसूचित जमाती' असेही म्हटले जाते. अनुसूचित जमाती पृथक आणि अंतर्मुखी जनसमूह असून उत्पादन आणि उपभोगाच्या दृष्टीने समरूप असतात. आर्थिक बाबतीत मागासलेल्या या आदिम समूहातील लोकांचे अआदिवासींकडून शोषण केले जाते. भाषा, वंश, धर्म व जीवनशैलीचा विचार करता त्यांच्यात इतरांपेक्षा वेगळेपणा आढळतो.

आदिवासी समाजातील स्त्रियांची व कुमारीमातांची स्थिती:— विभिन्न क्षेत्रात आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा वेगवेगळा असल्याचे आढळते. तथापि आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा विचारात घेतांना त्या—त्या समाजातील भूमिका विचारात घेऊनच निर्णय करावा लागतो. कुटुंब संघटन व विवाह संघटनांचा विचार करता असे आढळून येते की, या समाजात स्त्रियांची भूमिका पुरूषापेक्षा किंचितही कमी नाही. म्हणूनच आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा आदिवासी पुरूषांपेक्षा कमी नाही. असे म्हणता येते. तथापि, आधुनिक काळात आदिवासी समाजाचा इतर समाजाशी जो संपर्क येत आहे त्यामूळे इतर समाजातील स्त्रीविषयक अनुदाराचा दृष्टीकोणही या समाजात प्रवेशित झाला आहे. आज आदिवासी समाजातही स्त्रियांना इतर समाजाप्रमाणेच दुय्यम दर्जाची वागणूक मिळत आहे. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे, स्त्री म्हणजे पुरूषांची गुलाम, पतीची सेवा करणारी, अन्याय—अत्याचार निमूटपणे सहन करणारी, असे अनेक गैरसमज आदिवासी समाजात आज मोठया प्रमाणात आढळून येतात. आणि यामूळेच आदिवासी समाजात आज स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. स्त्रियांचे शारीरिक, मानसिक, आर्थिक शोषणही आदिवासी समाजात अधिक प्रमाणात केले जात आहे. आदिवासी स्त्रियांच्या शारीरिक किंवा लैंगिक शोषणातूनच या समाजात आज कुमारीमातांची अयोग्य व घृणास्पद समस्या निर्माण झालेली आहे.

आदिवासी समाज आणि कुमारीमातांची समस्या :— स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही आदिवासी समाज इतर ग्रामीण व शहरी समाजापेक्षा आजही वैशिष्ट्यपूर्ण आहे. आधुनिककाळात औद्योगिकरण, शहरीकरण व आधुनिकिकरणाच्या प्रक्रियेमूळे आदिवासी विभागात ही दळणवळणाच्या साधन सामुग्रीत वाढ झालेली आहे. अगदी ग्रामपंचायतपर्यंत शासकीय व्यवस्थापन आदिवासीपर्यंत काही प्रमाणात माहित आहे. प्राथमिक शाळा, आश्रमशाळा, आरोग्यकेंद्रे, समाजकल्याणाच्या शासकीय योजनाही आदिवासीपर्यंत काही प्रमाणात पोहचल्या आहेत. परंतु या सर्व गोष्टींचा लाभ आदिवासी समाजाला पाहिजे त्याप्रमाणात झालेला नाही. आजही आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीत अधिकांश बदल झालेला नाही. त्यांचा जीवनविषयक संघर्ष आहे त्या स्थितीतच आहे. त्यांच्या रूढी व परंपरामध्ये त्यांचे जीवन नियंत्रित झाले आहे. आदिवासी समाज अज्ञानी आणि बंदिस्त मानसिकतेचा असल्यामूळे व्यापारी, सावकार, ठेकेदार, नोकरशाही यांच्याकडून त्यांची प्रचंड प्रमाणात पिळवणूक आणि फसवणूक केली जात आहे. आदिवासींचा संबंध

उर्वरित जगाशी अत्यल्प प्रमाणात येतो. कारण आदिमात फार मोठया प्रमाणात न्यूनगंडाचे अत्याधिक प्रमाण आहे. इतर समाजातील लोकही त्यांच्याशी सद्भावना, सहकार्य, मैत्री या भावनेतून विनिमय करीत नाही. त्यांना त्यांचे मालकीहक्क, अधिकार देत नाहीत. त्यांचे समायोजनही करून घेत नाहीत. त्यांची व्यसनाधिनता, वाईट चालीरिती, इतरांना न कळणारी भाषा, हे सर्व उणीवा, दोष, दूर करण्याचा खऱ्या अर्थाने प्रयत्न केला जात नाही. याउलट त्यांचे अधिकाधिक शोषण, अन्याय कसे करता येईल, याचाच सर्वजण प्रयत्न करीत असल्याचे आढळते. आदिवासी स्त्रियां आणि मुलींचे लैंगिक शोषण अधिक प्रमाणात केले जात आहे आणि म्हणूनच आदिवासी समाजात कुमारी मातांची समस्या अधिकाधिक प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसते. आदिवासी समाजातील या कुमारीमातांकडे बघण्याचा समाजाचा अपमानित दृष्टीकोण, मुलांची होणारी गैरसोय हे प्रश्न सत्य अर्थाने सोडविले जात नाही. या कुमारीमातांची नोंद शासन दरबारी सन्माननिय पद्धतीने होत नाही. त्या अत्यंत गरीब असूनही त्यांना दारिद्रयरेषेखालचे कार्ड दिले जात नाही, रेशनकार्ड नाही, मतदानाची नोंद नाही. फक्त मुलाला बापाचे नाव हवे म्हणून त्या एखादे काल्पनिक नाव घेऊन मुलांच्या बापाची नोंद करीत आहेत. या कुमारीमातांनी अशाप्रकारे जीवन व्यतीत करणे हे या देशातील लोकशाहीकरीता अयोग्य, अनुचित घटना आहे.

'कुमारीमाता' संकल्पनेचा अर्थ :— भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्थेला प्रकार्यात्मक महत्त्व आहे. तसेच भारतीय कुटुंबसंस्थेत स्त्रियांबाबत विवाहाला आणि मातृत्वाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्त्रियांच्या बाबतीत विवाह अपरिहार्यतेने सक्तीचा असतो. या वैवाहिक जीवनातूनच लैंगिक समाधानाची अनुभूती स्त्रीने उपभोगायची असते. स्त्रियांचे विवाहबाहय संबध मूल्यव्यवस्थेत अंतर्भूत होत नाही आणि तिचे लैंगिक समाधान मूलभूतपणे प्रजोत्पादनासाठी असते. म्हणूनच एक पुरूष, एक स्त्री अशाच दोन व्यक्तींचा विवाह होतो. त्यांचे लैंगिक जीवन व त्यांचे समाधान हे सर्व प्रजोत्पादनाशी संबधीत असते ज्यातून वंश सातत्याचे संवर्धन केले जाते आहे. स्त्रियांच्या बाबतीत मातृत्वाला विशेषित महत्त्व आहे. कारण मातृत्वाशिवाय स्त्रीच्या जीवनशैलीला अर्थ नसतो. तथापी मातृत्व हे स्त्रीला विवाहाच्या अंर्तगत एका पुरूषाकडून मिळाले पाहिजे, अशी भारतीय समाजात प्रमाणसंहिता आहे. याउलट विधवा आणि कुमारीकांना विवाहाशिवाय प्राप्त झालेले मातृत्व हे अपवित्र, अयोग्य व कलंकित मातृत्व समजले जाते. विवाह न करता प्राप्त झालेले मातृत्व अभिशाप असल्याचे मानले जाते आणि अशा कुमारीमातांना समाज व्यभिचारिणी ठरवित असते. थोडक्यात, ज्या मुलींना विवाहाच्या पूर्वी इतर पुरूषांबरोबरच्या लैंगिक संबधातून अपत्यप्राप्ती होत असते, अशा मुलींना 'कुमारीमाता' म्हटले जाते.

भारतीय आदिवासी व कुमारीमातांची समस्या :— भारतात ग्रामीण व शहरी समाजापेक्षा कुमारीमातांचे प्रमाण आदिवासी समाजात अधिक आहे. आदिवासी मुलींच्या गरीबिचा, त्यांच्या साधे व सरळपणाचा फायदा अआदिवासी लोक घेत आहेत. त्यांचे लैंगिक शोषण करीत आहेत आणि त्यामूळेच आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या निर्माण झाली आहे. सुनीता शर्मा आणि अमरेंद्र किशोर[६] यांनी ओडिसा राज्यात केलेल्या एका सर्वेक्षणात ओडीसा राज्यांमध्ये आदिवासी समाजात जवळपास ४० हजार कुमारीमाता असल्याचे निदान केले आहे. यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील फुले—आंबेडकर महिला प्रबोधीनीच्या प्रा. लिला भेले[७] आणि महिलांच्या समस्यांच्या अभ्यासक डॉ. सीमा साखरे यांनी झरी—जामणी तालुक्यात केलेल्या कुमारीमातांच्या सर्वेक्षणात आदिवासी समाजात जवळपास २०० कुमारीमाता असल्याचे आढळून आले आहे.

भारतीय समाजाच्या नागरी व ग्रामीण समाजातील कुमारीमाता आणि आदिवासी समाजातील कुमारीमाता यात मुलत: फरक आहे. कारण ग्रामीण—नागरी समाजातील कुमारीमातांच्या समस्येपेक्षा आदिवासी समाजातील कुमारीमातांची संमस्या आणि स्वरूप वेगळे आहे. तेंव्हा ग्रामीण—नागरी समाजातील कुमारीमातांची समस्या आणि आदिवासी समाजातील कुमारीमातांची समस्या यात नेमका कोणता फरक आहे. हे अभ्यासण्यापूर्वी या दोन्ही प्रकारच्या समाजांतील वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

ग्रामीण व नागरी समाजातील मुलींच्या संदर्भात लैंगिक कुतूहल, आकर्षण वाटणे आणि लैंगिक संबंधांच्या परिणामांची अजिबात कल्पना नसणे किंवा अर्धवट, चुकीची कल्पना असल्यामुळे अनेक अविवाहित व अल्पवयीन मुलींच्या वाटयाला अकाली मातृत्व येते. घरातील पुरूषांच्या, परीचित पुरूषांकडून कधी आमिषे, कधी लग्नाचा असत्य वायदा करून, कधी धाक—धमकी—दडपण व दहशत अशा मार्गानी एकदा वा अनेकदा बलात्कार केला जातो; त्यातून गरोदर राहून आई बनलेल्या अशा कुमारीमातांची संख्या नागरी व ग्रामीण भागात अधिक प्रमाणात आढळते. या भयांमुळे घरी वेळेत कळविले जात नाही आणि घरी कळतं तेव्हा गर्भपात करण्याची वेळ निघून

गेलेली असते. तर आदिवासी समाजातील मुलींच्या संदर्भात दुष्काळापासून ते दहशतवादापर्यंत, नैसर्गिक ते मानवनिर्मित आपत्ती, आदिवासी अल्पवयीन मुलींसाठी सर्वार्थानं आपत्तीच असल्याचे आढळते. विस्थापन, स्थलांतर, दंडेली, मारहाण, निर्घृन कत्तली या गोष्टींना बहुतेक सर्व आदिवासी समाज सामोरे जात असले, तरी या सगळयांचे जास्त विपरित परिणाम आदिवासी स्त्रियांच्या वाटयाला आली आहेत. जीवनमरणाच्या प्रश्नात आदिवासी समाजातील नातीगोती, आप्तसंबंध बिनमहत्त्वाची असल्याचे आढळते. मग एखाद्या व्यापाऱ्याला घरात घेऊन कोवळी मुलगी त्याच्या स्वाधिन करणं, मजुरीवर मुकरदमांशी संबंध ठेवायला मुलींना भाग पाडणं, आई—वडिलांनीच मुलींना विकणं, हे प्रकार सर्रास घडत असतात. किंवा मुलगी अजाणतेपणी अशा एखाद्या प्रकाराची बळी ठरते आहे, हे लक्षात आल्यावरही स्वार्थापोटी आईबाप डोळयांवर कातडी ओढून घेत असतात. लग्नाचं आश्वासन देऊन, लग्न झालंच आहे असं भासवून या मुलींचा उपभोग घेतला जातो. हे तर घडतंच असते पण वेळप्रसंगी तिला आपल्या मित्रांच्या वा वरिष्ठांकडे सुर्पूद करणं किंवा सरळसरळ त्यांना विक्रि करून कमविण्याचे साधन असल्याचे मानले जाते. उपासमार, सतत परिश्रम, हेटाळणी, तुच्छता, तिरस्कार, घरगुती हिंसा हेच या मुलींच्या वाटयाला येत असतं. अशा स्थितीत कुणी प्रेमाचे दोन शब्द बोललं वा दोन—चार रूपयांच्या पावडर—लिपस्टिकच, टिकल्या—बांगडयांची भेट दिली; तरी ती गोष्ट त्यांच्यासाठी अप्रुपाची ठरते. अन्न, अंलकार, विविध वस्तू, पैसे अशा आमिषांनी अनेक गरीब आदिवासी मुली स्वत:चे शरीर पुरूषांच्या पुढे ठेवत असल्याचे सचित्र आहे. अशा मुलींच्या अंगात प्रतिकाराची शक्ती नाही, मूलत: प्रतिकार करायचा असतो. याचीही जाणीव नाही, अन्यायाविरूद्ध जाब विचारावा, न्याय मागावा, अशी जागाच नाही, अशा अवस्थेतल्या या मुली असतात. मुलांचे हक्क, महिलांचे हक्क, आदिवासींचे हक्क, हे शब्द परवलीचे असले तरी आदिवासी समाजातील कोणालाही हक्क, अधिकार माहित नाही, ही वस्तुस्थिती आहे.

आदिवासी मुलींची फसवणूक, अत्याचार सर्वांकडूनच होत असतात. रक्ताचे व कायदेशीर नात्याचे नातलग, जमीनदार, स्थानिक राजकारणी, व्यापारी, नोकरशाही यांच्यापासून तर स्वंयसेवी संस्थामधील कार्यकर्ते, नक्षलवादी, दहशतवादी सर्वांचे अत्याचार कोवळया आदिवासी मुलींना सहन करावे लागतात. आर्थिक प्रश्न, आरोग्यविषयक प्रश्न, एड्ससारख्या आजारांची शक्यता, मानसिक आरोग्याचे प्रश्न, सामाजिक बहिष्कार वा असहकार्य अशा अनेक स्तरांवरील समस्या या कोवळया मुलींच्या पदरी एका निष्पाप जीवाच्या जबाबदारीसह येतात. परंतु यापेक्षा भयानक म्हणजे या कुमारीमातांना कायमच सार्वजनिक उपभोगाची वस्तू असल्याप्रमाणे समाजात वागणूक मिळते. एकदा कुमारीमाता झाल्यानंतर तीचं कोणत्याही पुरूषाला सहजतेने उपलब्ध असणं हे गृहीतकृत्य असल्याचे काही प्रमाणात मानले जाते. कुमारीमातांचं पुनर्वसन करणं, त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी काही व्यावसायिक प्रशिक्षण देणं, शारीरिक आरोग्यासाठी औषधोपचार करणं, मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन करणं, कायदेशीर सल्ला देऊन त्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करणं, यासाठी आदिवासी भागात अनेक स्वंयसेवी संस्था कार्यरत आहेत. पण संस्थांची संख्या आणि पीडित महिलांची संख्या लक्षात घेतली तर कुमारीमातांची संख्या अधिक असल्याचे आढळते.

भारतातील ओडिसा, आसाम, केरळ, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र यासारख्या राज्यातील आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या विशेषत्वाने आढळून येते.

ओडिसा :— भारताच्या ओडिसा राज्यात एकुण ३२ जिल्हे असून या विविध जिल्हयातून ६२ आदिवासी जमाती वास्तव्य करीत आहेत. कोरापुट, रायगडा, नौरंगपूर, बउध, मल्कानगिरी, कालाहांडी, नुआपाडा, फूलबनी, क्योंझर, सुंदरगढ आणि मयुरगंज या जिल्हयात आदिवासींचं प्रमाण अत्याधिक आहे. कंद, संथाल, जोआंग, भुआंग, साओरा, बोंड आणि बथुदी ह्या आदिवासी जमातीही या राज्यात आहेत. ओडिसा राज्यातील कालाहांडी, कोरापूट, बोलांगीर, रायगडा, मल्कानगिरी, नुवापाडा, केंद्रपाडा, सोनपूर, सुंदरगड, फुलबनी आणि बारगड या जिल्हयात सुलक्ष्मी या अशासकीय संस्थेने २००४ ते २००६ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणानुसार उपरोक्त जिल्हयात आदिवासी कुमारीमातांची संख्या लक्षणिय आहे. या सर्वेक्षणानुसार ओडिसातील उपरोक्त जिल्हयात जवळपास ४० हजार कुमारीमाता आहेत.[८] ओडिसा राज्यातील सुलक्ष्मी संस्थेने कुमारीमातांसाठी विस्तृत कार्य केले आहे. कुमारीमातांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना आधार देण्याचे, व जिवनात त्यांना पुन्हा उभे करण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. या दुर्देवी कुमारीमातांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण व्हावा, यादृष्टीनं सुलक्ष्मी संस्थेने प्रयत्न केला आहे.

सुलक्ष्मी संस्थेच्या सर्वेक्षण अहवालानुसार आज ओडिसात सुमारे ४०,००० कुमारीमाता आहेत. कधी बळजबरीनं, तर कधी त्यांना आमिषे देऊन, मोहात पाडून मुलींना मातृत्वाकरिता बाध्य केले आहे.

विवाहाशिवाय लैंगिक संबंध स्थापित केल्यामुळे त्या आई वा माता झालेल्या आहेत. त्यापैकी काहींना समाजानं नावं ठेवली नाहीत किंवा वाईट चालीची आहे असे ही म्हटलं नाही, तरीही त्यांना जिवनात कमी व अधिक प्रमाणात त्रास सहन करावा लागला. समाजाकडून त्यांना सहानुभूती मिळाली नाही, त्यांच्या मुलांना संरक्षण मिळालं नाही की मदतीला वा आधार द्यायला कुणीही आलं नाही. परंतु वाटयाला आली फक्त उपेक्षा आणि एकटेपणा. मग ती माता ओडिसातील समुद्र किनाऱ्यालगतच्या भागातली असो की कालाहांडीच्या डोंगराळ भागातली; जगण्याचा संघर्ष त्यांच्या पाचवीला पुजलेला असल्याचे आढळते.

झारखंड :— पूर्व भारतातील झारखंड हे एक महत्त्वाचे राज्य आहे. झारखंड राज्याची निर्मिती अगदी अलीकडची म्हणजे १५ नोव्हेंबर २००० ची आहे. रांची हे या राज्याची राजधानी तर दुमका ही उपराजधानी आहे. झारखंड यूरेनियम, मीका, बॉक्साईट, ग्रेनाईट, सोना, चांदी, ग्रेफाईट, मैग्नेटाइट, डोलोमाइट, कोळसा इत्यादी खनीज साधन संपत्तीसाठी प्रसिद्ध आहे. मिरॅकल इंडीया, दिल्ली येथील अशासकीय संस्थेच्या संशोधन अहवालानूसार झारखंड राज्यात जवळपास ३० हजार कुमारीमाता असून त्यामध्ये आदिवासींचे प्रमाण सर्वाधिक आहे.[९] या राज्यातील आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण अधिक प्रमाणात केले जात असून त्यांना देहव्यापारासाठी परराज्यातही अधिक प्रमाणात पाठविले जाते. राज्यातील ३० हजार कुमारीमातासाठी आश्रयगृह बनविण्याचे कार्य झारखंड सरकारने हाती घेतले आहे. यावरून या राज्यातही आदिवासी कुमारीमातांची समस्या मोठया प्रमाणात असल्याचे दिसते.

केरळ :— केरळ राज्यातील वायनाड जिल्हयातील एकटया 'तिरूनेल्ली' येथे शेकडो आदिवासी कुमारीमाता आहेत. शासकीय आकडेवारीनुसार केरळमध्ये फक्त ३४२ कुमारीमाता आहेत.[१०] तथापि अशासकीय संस्थाच्या सर्वेक्षणानुसार वायनाड आणि पलक्कड या जिल्हयात ४०० पेक्षा जास्त आदिवासी कुमारीमाता आहेत.[११] केरळ मधील या सर्व कुमारीमाता लैंगिक शोषणाच्या बळी आहेत. यातील काही तर अगदी ११ वर्ष वयाच्या आहेत. या कुमारीमातांचे समाजातील धनदांडग्यांनी, व्यापारी, सावकार, ठेकेदार, अधिकारी यांनी लैंगिक शोषण करून, त्यांना विवाहाचे किंवा प्रेमाचे आमीष देवून त्यांचे लैंगिक शोषण केले व त्यांना कुमारीमाता होण्यास भाग पाडले आहे. श्रवे बिंजीनानसंउए डण ळवचपदंजी त्मककलए च्संसं ज्तपदंकीं त्व यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार एकटया वायनाड जिल्हयात जवळपास ५०० च्या वर कुमारीमाता असून त्यांच्या संदर्भात गरीबी, दारिद्रय, वेश्यावृत्ती, कर्जबाजारीपणा इत्यादी समस्या निर्माण झालेल्या आहेत.[१२]

मध्यप्रदेश :— भारतातील क्षेत्रफळाच्यादृष्टीने मोठे राज्य म्हणून मध्यप्रदेश चा उल्लेख केला जातो. मध्यप्रदेशात आदिवासींची लोकसंख्या लक्षणिय आहे. या राज्यात गोंड, भील्ल, कोरकू, बैगा, सहरिया, कोल, भारिया इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती वास्तव्य करीत आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार मध्यप्रदेशात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या भिल्ल जमातीची आहे. त्या पेक्षा कमी गोंड, कोल, कोरकू, सहारिया व बैगा या जमातीची आहे. मध्यप्रदेशातील झाबुआ, धार, बारवाणी, खरगोन, दिंडोरी, छिंदवाडा, मंडला, बैतुल, सिवनी व शहडोल या जिल्हयात आदिवासींची संख्या अधिक आहे. मध्यप्रदेशातील भिल्ल, गोंड, कोरकू व सहारिया या जमातीत काही कुमारीमाता आढळून येतात. शासकीय स्तरावर या कुमारीमातांची कोणतीही नोंद नाही. त्यामूळे त्यांचा निश्चित आकडा देता येणार नाही. तथापि काही स्वंयसेवी संस्थाच्या सर्वेक्षणानुसार मध्यप्रदेशातील आदिवासी समाजात कुमारीमातांची संख्या जवळपास ४०० ते ५०० इतकी आहे.[१३]

छत्तीसगड राज्य :— छत्तीसगढ राज्यातील आदिवासी जमाती आपल्या विशिष्ट जीवनशैली परंपरागत संस्कृतीमूळे भारतातील इतर आदिवासीपेक्षा वेगळयाप्रकारे ओळखल्या जातात. या राज्यात आदिवासींच्या एकूण ४२ जमाती आहेत. तथापि प्रमुख जमाती म्हणून गोंड, कंवर, बिंझवार, भैना, भतरा, उरांव, मुंडा, कमार, हलबा, बैगा, भरिया, नगेशिया, मंझवार, खारिया आणि धनवार इ. जमातीचा उल्लेख केला जातो. या राज्यात आदिवासी समाजातील अत्यंत मागास जमाती म्हणून अबूझमाडिया, कमार, पहाडी कोरबा, बैगा व बिरहोर या जमाती असून या जमातींच्या विकासासाठी छत्तीसगड शासनाचे विशेष प्रयत्न सुरू आहेत.[१४] पूणे येथे मार्च २०१४ मध्ये जवळपास ४५०० विद्यार्थ्यांनी यवतमाळ जिल्हयातील आदिवासी कुमारीमातांना न्याय मिळावा यासाठी एक मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनात या विद्यार्थ्यांनी यवतमाळ जिल्हयातील कुमारीमाता प्रमाणेच मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, झारखंड या राज्यातही आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या मोठया प्रमाणात असल्याचे सांगीतले. छत्तीसगड मधील आदिवासी समाजातील मुलींनाही ठेकेदार, सावकार, अधिकारी यांनी विविध आमीषे देऊन त्यांचे लैंगिक शोषण करून त्यांना कुमारीमाता बनविले असल्याचे या विद्यार्थ्यांनी माध्यमासमोर सांगीतले.

याचाच अर्थ छत्तीसगड राज्यातही आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या आहे.[१५]

महाराष्ट्र :— महाराष्ट्रात गोंड, वारली, कातकरी, कोलाम, बंजारा, महादेव कोळी, भिल्ल, ठाकूर, परधान, हलबा, हलबी इत्यादी आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, गडचिरोली, यवतमाळ या जिल्हयातील आदिवासी समाजात कुमारीमातांचे अधिक प्रमाण आहे. अलीकडच्या काळात यवतमाळ जिल्हयातील झरीजामणी या तालुक्यातील ४०० कुमारीमातांचा प्रश्न विविध माध्यमांतून फार मोठया प्रमाणात चर्चेत होता. या चर्चामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील आदिवासी समाजातील कुमारीमातांचा शोध घेण्यासाठी कार्यवाही सुरू केलेली आहे.[१६]

निरक्षरता आणि गरिबीच्या फेऱ्यात अडकलेल्या आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण करून, त्यांना कुमारीमाता करून पळ काढणाऱ्या परप्रांतीय ठेकेदारांविरोधात आता महाराष्ट्र शासनाने कडक भूमिका घेतली आहे. राज्यातील कुमारीमाता प्रकरणांच्या वाढत्या संख्येमुळे प्रकाशझोतात आलेल्या यवतमाळ जिल्हयाप्रमाणेच ठाणे, नाशिक, नंदुरबार आणि धुळे या आदिवासींची अधिक लोकसंख्या असलेल्या जिल्हयातही आता कुमारीमातांचा शोध घेण्यात येत आहे. परराज्य व जिल्हयातून आवागमन करणाऱ्या ठेकेदारांची ग्रामपंचायतीत नोंदणी करणे, अत्याचाराचा आरोप असलेल्यांची डीएनए चाचणी करणे, अशा उपाययोजना राज्य सरकारने निश्चित केलेल्या आहेत. आदिवासी समाजात कंत्राटाची कामे मिळालेले ठेकेदार गावात येतात, आदिवासी मुलींना लग्नाचे, पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याशी शारीरिक स्थापित करतात व त्यांची गावातील कामे पूर्ण झाली की ते परस्पर निघून जातात. त्यातून महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हयात आदिवासी समाजात कुमारीमाताची सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. याबाबत लोकसत्ता, लोकमत, सकाळ, दिव्य मराठी इत्यादी वर्तमानपत्रांनी सतत लेखन करून या प्रश्नाकडे शासनाचे व सर्वसामान्याचे व स्वयंसेवी संस्थाचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. तसेच शिवसेनेच्या आमदार डॉ. नीलम गो—हे यांनीही विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री विष्णू सावरा यांनी या विषयावर स्वतंत्र बैठक घेऊन आदिवासी मुलींचे शोषण थांबविण्यासाठी आणि सध्याच्या कुमारीमातांचे पुनर्वसन कसे करायचे, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कसा सोडवायचा, इत्यादी विषयावर चर्चा करून, या समस्येच्या निराकरणासाठी तातडीच्या उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मान्य केले होते.

यवतमाळ जिल्हयातील कुमारीमातांच्या समस्येप्रमाणेच ठाणे, नाशिक, नंदुरबार, धुळे या जिल्हयातूनही कुमारीमातांच्या तक्रारी येत आहेत. त्यामूळे या जिल्हयातील आदिवासी कुमारीमातांचा शोध घेण्यासाठी पुण्याच्या गोखले इंन्सिटटयूट ऑफ पॉलिटिक्स ॲंड इकॉनॉमिक्स या संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याचे मान्य केले होते. परंतु या संदर्भात आजपर्यंत पाहिजे त्या प्रमाणात प्रगती झालेली नाही. थोडक्यात महाराष्ट्र राज्यातील धुळे, नंदुरबार, नाशिक, ठाणे, यवतमाळ या जिल्हयात आदिवासी समाजातील कुमारीमातांची समस्या आजही आढळून येते. इतर जिल्हयाच्या तुलनेत यवतमाळ जिल्हयातील आदिवासी समाजात ही समस्या प्रकर्षाने आढळून येत आहे.

संदर्भसूची :—

1. *B. K. Khadse, (2008), Jati wa Varga: Bhartiya Aadiwasi, Nashik, Y. C. M. O. U. Publication, p. 42.*
2. *Census of India, (2011).*
3. *Census of India, (2011).*
4. *Aaglave Pradeep, (2010), 'Aadiwasi Samajache Samajshastra', Nagpur, Sainath Prakashan, p. no. 2.*
5. *Aaglave Pradeep, (2010), 'Aadiwasi Samajache Samajshastra', Nagpur, Sainath Prakashan, p. no. 2.*
6. *शर्मा सुनिता, अमरेंद्र किशोर, (२०१२) 'कुमारीमाता', अनुवाद — प्रतिमा डिके, पुणे, मनोविकास प्रकाशन..*
7. *भेले लिला, (२००८—०९) 'झरी—जामणी येथील आदिवासी कुमारीमातांचे सर्वेक्षण', पांढरकवडा, फुले आंबेडकर महिला प्रबोधिनी.*
8. *The Statee of Unwed Mothers of Orissa: Possibilities of Their Rehabilitation and Prevention to Mar This Malpractice, Research Project of Sulaxmi, Orissa, 2004-2006.*
9. *Unwed mothers, pregnant women may soon get shelter, RANCHI Updated: Jul 29, 2015 22:45 IST, Saurav Roy, Hindustan Times*
10. *The Rediff Special, Venu Menon, Unwed Mothers may spark tribal rebellion in Kerala.*
11. *Radhakrishnan M. G., (1998) 'On The Road to Justice', Backed by the Women's Commission, Wayanad's unwed tribal mothers may finally get their due, March 30.*
12. *Chathukulam Jos, Reddy M. Gopinath, Rao Palla Trinadha, (2012), 'An Assessment and Analysis of Tribal Sub-Plan (TSP) in Kerala', Research Unit for Livelihoods and Natural Resources, (Supported by Jamsetji Tata Trust), Hyderabad, Centre for Economic and Social Studies.*
13. *Ansari Mubarak, (2014), 'Look in to Unwed Tribal Mothers Issue', Pune Mirror | Dec 25, 2014, 02.30 AM IST,http://punemirror.indiatimes.com/pune/civic/ articleshow / 45634174 .cms? (News Paper Article)*
14. *http://www.chhattisgarhexams.in/2016/11/Tribes-of-Chhattisgarh-Art-culture.html*
15. *http://punemirror.indiatimes.com/pune/civic//articleshow/45 634174.cms? 'look in to Unwed Tribal Mothers Issue, By Mubarak Ansari, Pune Mirror | Dec 25, 2014, 02.30 AM IST (News Paper Article)*
16. *https://bkshinde.blogspot.in/2014/12/blog-post_41.html*

शासनाचे विना—अनुदान धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षण

डॉ. हनुमंत मिसाळ, श्री. मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद. मो. ९४०३९२३०३३

प्रस्तावना:— भारत हा गरीबांचा देश म्हणून ओळखला जातो, या गरीबीमागे शिक्षणाचे असलेले अल्प प्रमाण होय. थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी ''इतके अनर्थ एका अविद्येने केले'' हे सांगताना शिक्षणाचे विकासासाठी किती मोठे योगदान असते हे स्पष्ट स्वरूपात मांडले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचे प्रमाण थोड्याफार प्रमाणात वाढले हे खरे आहे, पण समाधानकारक आहे असे मात्र निश्चित म्हणता येत नाही. राज्यघटनेने व्यक्तीला विशेष मुलभूत अधिकार बहाल केले आहेत. त्यातील शिक्षणाचा मुलभूत अधिकार महत्त्वपूर्ण आहे. या अधिकारानंतरही शिक्षणाची विशेष पातळी उंचावली नाही हे वास्तव आहे. पुढे प्राथमिक शिक्षण सक्तीचा कायदा करावा लागला, परंतु हे सर्व प्रयत्न करूनही शाळाबाह्य मुलांची संख्या हा सध्याचा चिंताजनक विषय आहे. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची अशी स्थिती असल्याने उच्च शिक्षणाची 'स्थिती आणि गती' कशी असेल याची वास्तविकता लक्षात घेणे खूप आवश्यक ठरते. दुसरे असे की भारतामध्ये विविध प्रादेशिक असमतोल जसे आहेत तसे शैक्षणिकदृष्ट्या प्रादेशिक असमतोलही मोठ्या प्रमाणात दिसून येतात. उदा. महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण हे कमी आहे. पण त्यातही महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ या प्रदेशातील उच्च शिक्षणाचे प्रमाण हे अधिक कमी आहे. मराठवाडा आणि विदर्भ हे विभाग जसे कायम दुष्काळग्रस्त प्रदेश म्हणून ओळखले जातात तसेच ते उच्च शैक्षणिकदृष्ट्याही दुष्काळग्रस्त प्रदेश म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाही. एका बाजूला उच्च शिक्षणाचे हे अत्यल्प प्रमाण तर दुसऱ्या बाजूला सरकारने सुरू केलेले विना अनुदान धोरण होय. सरंजामशाही, राजेशाही, हुकूमशाही अशा पूर्वीच्या राज्यव्यवस्था त्यांच्यातील उणीवामुळे मागे पडल्या आहेत व सध्या परिपूर्ण अशा स्वरूपात भारतासह जागतिक स्तरावर कल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण झालेल्या आहेत. कल्याणकारी राज्यव्यवस्थेत नफेखोरीपेक्षा समाजकल्याणाला अधिक महत्त्व दिले जाते. कधी—कधी नुकसान सहन करुनही कांही कल्याणकारी योजना आग्रहाने समाजहितासाठी सरकार राबवत असते. 'शिक्षण' हा विषय भारतासारख्या शिक्षणाचे प्रमाण कमी असणाऱ्या देशात किती महत्त्वाचा आहे हे वेगळे मांडण्याची गरज नाही. म्हणूनच समाजाला शिक्षणाची योग्य सोय उपलब्ध करून देणे हे भारतासारख्या कल्याणकारी राज्याचे प्रथम उद्दिष्ट असायला हवे. परंतु तशी वस्तूस्थिती दिसून येत नाही. कारण १९८२ पासून सरकारने वेगळ्या कारणासाठी खाजगीकरण धोरण आणले पण १९९३ पासून सरकार हळूहळू शिक्षणाचेही खाजगीकरण करू पाहते आहे. सुरूवातीला 'विना अनुदान' असे म्हणता म्हणता पुढे 'कायम विना—अनुदान' धोरणाला सरकारने जन्म दिला. या धोरणातून जन्मलेले शिक्षण पुढे अतिशय दर्जाहिन आणि कुपोषित स्थितीला पोहचले आहे हे सध्याची शैक्षणिक स्थिती आणि गती पाहता सहज लक्षात येते. आज सरकारच्या या धोरणामुळे विशेषत: उच्च शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी अशांतता आणि अनियमितता आली आहे. याचे परिणाम विशेषत: मराठवाड्यासारख्या शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रदेशात कसे गंभीर स्वरूपात होत आहेत याचा अभ्यास त्यासाठीच महत्त्वपूर्ण ठरतो. यासाठीच महाराष्ट्रातील उच्च शैक्षणिकदृष्ट्या अतिमागास प्रदेश म्हणून मराठवाडा हा विभाग यासाठी निवडला आहे.

उच्च शिक्षणाचे अल्प प्रमाण ही खरे तर देशपातळीवरील एक गंभीर समस्या आहे. या समस्येचे निराकरण करणे हे सरकार आणि समाज यांच्यापुढील आव्हाणच आहे. उच्च शिक्षण क्षेत्राला विना—अनुदान धोरणाने गंभीर वळण दिले आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील ही अशांतता आणि अनियमितता दूर करुन उच्च शिक्षणाला योग्य दिशा आणि नियमितता प्राप्त करण्यासाठी 'उच्च शिक्षण क्षेत्रातील विना—अनुदान धोरणाची समस्या : विशेष संदर्भ मराठवाडा' या संदर्भातील वस्तूस्थितीचा शोध या लेखातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

शिक्षणातून संपूर्ण देशाची प्रगती अधोरेखित होत असते. आजपर्यंत जागतिक इतिहास हेच सांगतो की ज्यांनी शिक्षणाला दुय्यम लेखले त्यांचा विकासही दुय्यम ठरला. भारताच्या अप्रगतीचे उत्तर शैक्षणिक अप्रगतीत सापडते ही सत्यता सांगण्यासाठी वेगळ्या पुराव्याची आवश्यकता नाही, अमेरिका, इंग्लंड, रशिया, जपान अशा प्रगतिशील राष्ट्राला उच्च शिक्षणासाठीची त्यांची निर्णायक धोरणे व शिक्षणासाठीची मोठी गुंतवणूक त्यांना प्रगतीपर्यंत घेवून गेली आहे. भारतामध्ये आजही एकूण उत्पन्नापैकी फारच कमी उत्पन्न शैक्षणिक कारणांसाठी राखून ठेवले जाते. निवडणूकीनंतर जो पक्ष सरकार स्थापन करतो

तेव्हा मंत्रालय वाटप करताना सर्वात शेवटचे मंत्रालय म्हणून शिक्षण मंत्रालय असे उपरोधिकपणे म्हटले जाते. परिणामी हे मंत्रालय अनिच्छेने स्विकारले जाते. शिवाय कमी शैक्षणिक पात्रतेच्या व्यक्तीकडे ते सोपवले जाते. त्यातून शिक्षण क्षेत्रातील जागतिक स्पर्धेला तोंड देताना, शैक्षणिक क्षेत्रातील धोरणे ठरवतांना व नवे आयाम शोधतांना, नवे प्रयोग करतांना देशाचा शैक्षणिक स्तर उंचावतांना निश्चितच मर्यादा येतात. इतर देशाचे अनुकरण हे आपल्या परिस्थितीला झेपेल का? त्यासाठी नेमकी कोणती नवी तयारी करावी लागेल? कोणती व्यवस्था उभी करावी लागेल? त्यावर कसे नियंत्रण ठेवावे लागेल? या कोणत्याच बाबींचा विचार न करता उच्च शिक्षण क्षेत्रात 'कायम विना—अनुदान' सारखी धोरणे आखणे आणि त्यांची अंमलबजावणी परिणामांची तमा न बाळगता करणे ही अशैक्षणिकच गोष्ट ठरते. कारण शिक्षण ही 'सेवा' आहे तो 'उद्योग' नाही. थोडक्यात उच्च शिक्षणासारख्या महत्त्वपूर्ण विषयाला असे दुय्यम लेखणे वा अव्यवहार्य धोरण आखणे हे घातकच आहे.

सदर अभ्यासातून मराठवाड्यासारख्या शैक्षणिक मागासलेपण असलेल्या प्रदेशात विना अनुदान धोरणाने नेमक्या कोणत्या समस्या निर्माण केल्या आहेत याचा समाजशास्त्रीय अभ्यास त्यासाठीच महत्त्वाचा ठरतो. खरे तर हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरू शकतो. परंतु संशोधन पेपर लिहिताना एवढे विस्तृत विवेचन त्यासंदर्भाने करणे शक्य नाही. म्हणून या समस्येचे कोणते गंभीर परिणाम उद्‌भवले आहेत या दृष्टीने या समस्येची संक्षिप्त ओळख करून देणे हाच या शोध लेखाचा मुख्य हेतू आहे. विशेषत: मराठवाड्यासारख्या शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या प्रदेशात सदर धोरणांच्या परिणामांची तिव्रता या शोध लेखातून स्पष्ट होवू शकेल.

विना—अनुदान धोरणांमुळे शैक्षणिक पावित्र्य जावून बाजारूपण निर्माण झाले आहे. मोठ्या प्रमाणात शिक्षणाचे खाजगीकरण झाले आहे. सरकार आपल्याला अनुदान देईल या अपेक्षेने अनेकांनी आपली शैक्षणिक दुकानदारी चालू केली पण नंतर सरकारने विना अनुदान धोरण आणल्याने शैक्षणिक दुकानदारी तेजीत आली. भरमसाठ फिस आकारुन प्रवेश दिले जावू लागले. पर्यायाने गरीब पण हुशार मुलांना प्रवेशासाठी प्रश्न निर्माण झाले. मिळालेल्या प्रवेश फिमधून विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा देणे, ग्रंथालय सुसज्य असणे, खेळाचे मैदान असणे व विशेषकरुन अध्यापनासाठी पर्याप्त पात्रताधारक अध्यापक वर्ग यांची नियुक्ती करणे आवश्यक होते. पण या सर्व पातळीवर वस्तूस्थिती फारच गंभीर आहे. दोन खोल्यांमध्ये महाविद्यालये, अपात्र अध्यापक व इतर भौतिक सुविधांची प्रचंड वानवा, परीक्षेमध्ये सर्रास पास करुन देण्याची हमी अशा अनेक अशैक्षणिक बाबींनी मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात प्रवेश केला आहे. पर्यायाने मराठवाड्याच्या उच्च शिक्षणाला एक गंभीर वळण मिळाले आहे.

सरकारच्या चुकीच्या शैक्षणिक धोरणामुळे व शैक्षणिक क्षेत्रातील आपले उत्तरदायित्व कमी केल्याने जे शैक्षणिक खाजगीकरण झाले त्यातून जे अशैक्षणिक वातावरण निर्माण होत आहे त्यावर कोणाचेच नियंत्रण नसल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर असलेली वस्तुस्थिती या लेखातून संशोधित करण्याचा प्रयत्न आहे.

मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड या जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण खूप कमी म्हणजे ५६ टक्के ते ७२ टक्के दरम्यान आहे. २००२ च्या आकडेवारीनुसार मानवनिर्देशांकही कमी आहे अशा स्थितीत या विभागाकडे विशेष बाब म्हणून शैक्षणिक पालकत्वाची जबाबदारी निश्चितपणे सरकारची आहे. परंतु वस्तूत: हे पालकत्व तर नाहीच पण 'विना—अनुदान' सारखी धोरणे व शैक्षणिक खाजगीकरण यांना प्रेरणा देवू केल्याने मराठवाड्यात मोठे शैक्षणिक संकट निर्माण झाले आहे. या संकटामध्ये विद्यार्थी, पालक, अध्यापक हे अडचणीत आहेत. पर्यायाने यामुळे समाजजीवनावर दूरगामी परिणाम झाले आहेत. वरील सर्व दृष्टीकोणातून नव्याने निर्माण झालेल्या मराठवाड्यातील अशैक्षणिक वातावरणाची वस्तुस्थिती व परिणामांचा वस्तूनिष्ठ शोध घेतला गेला आहे.

मराठवाड्यात उच्च शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ नांदेड ही दोन विद्यापीठे कार्यरत आहेत. त्यातील एसआरटी विद्यापीठ नांदेडची स्थापना १४ जानेवारी १९९६ रोजी झाली. शैक्षणिक गुणवत्ता, शैक्षणिक व्यवस्थापन, शोध आणि संशोधक या संदर्भातील मराठवाड्याची उच्च शिक्षणाची जबाबदारी या दोन विद्यापीठावर आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या सहयोगातून ही जबाबदारी पूर्ण करण्याची प्रक्रिया या दोन विद्यापीठाच्या माध्यमातून पूर्ण होत असते. परंतु शासनाकडून जशी—जशी विना अनुदान धोरणांची अंमलबजावणी कठोरपणाने राबविण्याचा प्रयत्न झाला तशी—तशी या मराठवाड्याचे उच्च शिक्षण कमकुवत होत गेले. शासनाचे विना—अनुदान धोरण म्हणजे शिक्षणाचे व्यापारीकरण आणि शिक्षणाप्रती आपल्या सामाजिक

जबाबदारीतून मुक्तता आहे. शासनाच्या या भूमिकेमुळे मराठवाड्याच्या उच्च शिक्षणाची गती आणि मती खालावली आहे. शिक्षणाच्या अशा खालावलेल्या दर्जाबाबत दक्षिण आफ्रिकेच्या विद्यापीठातील एका प्राध्यापकाने त्यांच्या पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या आणि डॉक्टरेटसाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना भावना व्यक्त करण्यासाठी 'राष्ट्र केव्हा कोलमडते' या शिर्षकाने एक पत्र लिहिले आहे. हे पत्र त्या विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर लावले आहे. या पत्रात त्याने म्हटले आहे की, ''एखादे राष्ट्र कोलमडून पडण्यासाठी अनुबॉम्ब किंवा दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची गरज नसते. फक्त शिक्षणाचा दर्जा खालावला आणि विद्यार्थ्यांना परिक्षेत स्वत:ची फसवणूक करुन घ्यायला वाव दिला की ते राष्ट्र कोलमडून पडायला वेळ लागत नाही. अशा शिक्षणातून तयार झालेल्या डॉक्टरच्या हातून रुग्ण मरण पावतो. अभियंत्याने बांधलेली इमारत कोसळते. लेखापालच्या हातातून रक्कम गायब होते. न्यायधिशांच्या हातून न्याय मिळत नाही. पोलिसांचा तपास वेगळ्या वाटेवर भरकटतो. त्यातून चोरांना प्रतिष्ठा मिळते आणि धर्मकार्य करणाऱ्याकडून माणूसकीची हत्या होते''

वरील पत्राचा संदर्भ लक्षात घेतला तर स्पष्टपणे असे जाणवते की मराठवाड्याचे शिक्षण ही याच स्थितीत येवून पोहचले आहे. परिणामी मराठवाड्याचा विकास पूर्णपणे कोलमडल्याच्या स्थितीत आहे. या संदर्भाने संशोधकाने घेतलेला आढावा जी महाविद्यालयाचे विना—अनुदानीत आहेत पण त्यांनी आपला शैक्षणिक दर्जा राखून ठेवला आहे त्यांच्या संदर्भातील हे विवेचन नाही तर ज्यांनी किमान शैक्षणिक दर्जाही ठेवलेला नाही यासंदर्भातील हे विवेचन आहे.

शासनाच्या विना—अनुदान धोरणाचे मराठवाड्याच्या उच्च शिक्षणावर झालेले परिणाम :

१. खाजगी महाविद्यालये मंजूर करताना गुणवत्तेच्या निकषाकडे दुर्लक्ष : उच्च शिक्षण देण्यासाठी विद्यापीठाकडून विविध महाविद्यालयाचे प्रस्ताव स्विकारले जातात आणि ते शासनाकडे मंजूरीसाठी पाठवले जातात. शासनाने प्रस्ताव पाठवताना संबंधित व्यवस्थापनाकडे कोणत्या पायाभूत शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत याची चौकशी न करता केवळ आर्थिक आणि राजकीय वजन लक्षात घेवून महाविद्यालयांना मंजूरी दिली जाते. जरी चौकशी केली तरी ती अगदीच वरवरची असते. पर्यायाने भाड्याच्या दोन खोल्या घेवून महाविद्यालये सुरु असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. खाजगी महाविद्यालयाला कसलेच अनुदान देणे नसल्याने जो जे महाविद्यालय मागेल त्याला ते ते महाविद्यालय देवू करण्याचा प्रघात सुरु झाला आहे. परिणामी विद्यापीठाच्या सलंग्नित महाविद्यालयाची संख्या सांभाळताना विद्यापीठाचे प्रशासन मोडकळीस आले आहे. महाविद्यालयाचा प्रस्ताव टाकणारा व्यवस्थापक, संस्था त्या पात्रतेची आहे का? मुलभूत सुविधा जसे की त्यांच्या मालकीची पर्याप्त जागा, खेळासाठी मैदान, ग्रंथालयासाठी इमारत, पर्याप्त वर्गखोल्या पाणी, विज, रस्ते यांची उपलब्धता या सुविधा नसतानांही अनेक महाविद्यालयांना मंजूरी कशी दिली गेली हा प्रश्न मराठवाड्याचे उच्च शैक्षणिक वातावरण पूर्णपणे दुषित झाल्याचे निर्देशित करणारा आहे. याचा अर्थ शासनाच्या विना अनुदान धोरणामुळे मराठवाड्याच्या उच्च शैक्षणिक गुणवत्तेच्या निकषाकडे पूर्ण दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. त्यातून शैक्षणिक दुकानदारी मात्र तेजीत आल्याचे वास्तव निदर्शनास येते. ही बाब केवळ पारंपारिक महाविद्यालये जसे की, कला, वाणिज्य, विज्ञान यांच्यासाठीच लागू नाही तर व्यावसायिक महाविद्यालयांच्या बाबतीतही हेच सत्य आहे. या व्यावसायिक महाविद्यालयातून प्रयोगशाळा, वर्कशॉप, विविध तंत्र साधने व प्रशिक्षित टिचिंग स्टॉफ उपलब्ध नसताना व जो उपलब्ध आहे त्याची गुणवत्ता विद्यापीठाची मान्यता घेण्याइतपत पात्र नसल्याने अशा ठिकाणाहून प्रशिक्षित विद्यार्थी कसा बाहेर पडावा हा मोठा प्रश्न आहे. या सर्व दुष्परीणामाचे समाज घटकावर विपरीत परिणाम होत असल्याचे सत्य सरकारच्या विनाअनुदान धोरणामुळे विद्यापीठ आणि सरकार यांच्यापर्यंत पोहंचू शकत नाही ही सुद्धा एक वास्तविकता आहे.

२. व्यापारी हेतू प्रबळ झाला : खोट्या जाहिराती, पास होण्याची हमी, महाविद्यालयात गैरहजर राहाण्याची परवानगी, विद्यापीठाचे 'परिक्षा नियंत्रक' हे केवळ परिक्षा घेण्याच्या व्यवस्थेचे 'नियंत्रक' आहेत व ते तसेच असले पाहिजेत. 'आमचे महाविद्यालय आहे, येथे आम्ही आमच्या पद्धतीने नियंत्रक' आहोत. असा दृढ समज अशा बहुतांश महाविद्यालयांनी करुन घेतला आहे. विद्यापीठाच्या परिक्षा नियंत्रकाने गुणवत्तापूर्ण नियंत्रण ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तर त्याचेच 'नियंत्रण' कसे करायचे यासाठी प्रयत्नपूर्वक प्रयत्न केला जातो. परिणामी 'आमची फिस आम्हाला द्या तुमची पदवी आम्ही तुम्हाला देवू, गुणवत्तेचे विचाराल तर त्याच्याशी आमचा संबंध नाही.' अशा अलिखित करारावर ही महाविद्यालये जोरात आहेत. विद्यार्थ्यांकडून जमा केलेली फि, इमारत, पुस्तके, गुणवत्तापूर्ण शिक्षण यासाठी फार कमी उपयोगात आणली जाते. परिणामी विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे शैक्षणिक मुलभूत सुविधापासून वंचित रहावे लागते. याचा अर्थ इतर क्षेत्रामध्ये जसे नफा—तोट्याचे सूत्र चालते तेच सूत्र शैक्षणिक क्षेत्रातही आले आहे. परिणामी काही अपवाद वगळता अशा बहुतांश महाविद्यालयासाठी आपल्या गुणवत्तेचे मानांकन नॅक सारख्या देशपातळीवरील संस्थेकडून करुन घेतलेले नाही. किंवा गुणवत्तेचे ISO मानांकनही यांच्याकडे नाही.

३. शैक्षणिक मूल्य हरवले : शासनाच्या विना—अनुदान धोरणाने मराठवाड्याचे शैक्षणिक मूल्य

हरवले असल्याची वास्तविकता दिसून येते. महाविद्यालय म्हणजे ज्ञान घेणे आणि देणे ही प्रक्रिया सुलभ पद्धतीने पार पाडणारी यंत्रणा होय. पण विना—अनुदान धोरणाने शैक्षणिक मूल्याचा आत्मा हरवला जात आहे. गुरु—शिष्य परंपरा मोडीत निघाली आहे. वाचन, मनन, चिंतन, शोध, संशोधन, कार्यकुशलता, व्यक्तीमत्त्वाचा विकास, साहित्य संस्कृती या बाबी शैक्षणिक मूल्याच्या मूलाधार आहेत पण अशा महाविद्यालयातून गुरु—शिष्यांची भेट दुर्मिळ झाली आहे. पदव्या मिळाल्या पण त्या लायक व्यक्तीमत्त्व हरवून गेले. मागील काही काळात अभियांत्रिकी महाविद्यालयाची मोठी रेल—चेल झाली आणि अभियंत्याची बेरोजगारची ही नवीनच समस्या निर्माण झाली. समाजामध्ये असलेल्या 'आदर्श शिक्षक' आणि 'आदर्श विद्यार्थी' या संकल्पना या विना—अनुदान धोरणाने मोडीस काढल्या आहेत. विद्यापीठाच्या सलंग्नता समितीच्या सभासदावरही अवैद्य दबावतंत्राचा वापर करायला विना—अनुदान धोरण भाग पाडते. कारण विनाअनुदान धोरणाच्या तंत्रातील शक्ती अंतर्भूत आहे. परिणामी अशा धोरणातून एकूणच शैक्षणिक मूल्य हरवले असल्याचे दिसून येते.

४. समान काम समान वेतन या कायद्याचा भंग : विनाअनुदान महाविद्यालयात शिकवत असलेले कांही पात्रताधारक शिक्षक यांना अमर्याद वर्कलोड दिले जाते पण वेतन मात्र त्यातुलनेत अत्यल्प असते. इतरत्र संधी उपलब्ध होईपर्यंत हे शिक्षक या महाविद्यालयातून आपले ज्ञानदानाचे काम कमी वेतनावर करतात. पण विना—अनुदान प्रवृत्तीमुळे सरकार अनुदानित शिक्षणही बिघडवत चालले आहे. वर्षानुवर्षे प्राध्यापकांच्या जागा रिक्त ठेवल्या जात आहेत व अनुदानित महाविद्यालयातही प्रत्येक विषयाला 'एक शिक्षक' पद्धती सुरु केली आहे. परिणामी त्या विषयातील सर्व पेपरच्या अभ्यासक्रमाला एका शिक्षकाला न्याय देता येत नाही. शिक्षण ही 'सेवा' आहे 'व्यापार' नाही पण सरकार आपल्या पैसे वाचवण्याच्या भूमिकेतून शिक्षणावरील खर्चातून स्वत:ला दूर घेवून जात आहे. परिणामी विना—अनुदान धोरणाने अनुदानित शिक्षणही प्रदुषित केल्याचे वास्तव आहे. विना—अनुदानीत महाविद्यालयात शिकवत असलेल्या प्राध्यापकांना अनुदानित महाविद्यालयात असलेल्या शिपायाएवढेही वेतन मिळत नाही मात्र त्याच कामासाठी अनुदानित महाविद्यालयात शिक्षकाला शासन नियमाप्रमाणे व पदानुसार वेतन मिळते. परिणामी 'समान काम समान वेतन' हा सरकारचा कायदा सरकारनेच विना अनुदान कायद्याने मोडीत काढल्याचे दिसते. इतकी वर्षे शिक्षणात घालवून पेट, सेट, नेट, एम. फिल, पीएच. डी. अशा गुणवत्तापूर्ण परिक्षा, पदव्या उतीर्ण होवूनही संबंधीत व्यक्तीला वेठबिगारासारखी वागणूक शासन देणार असेल तर जेथे माणूस घडवला जातो तेथेच माणसाच्या चांगुलपणाची त्यांच्या कर्तृत्वाची आणि स्वाभीमानाची हत्या करण्याचाच हा प्रकार आहे.

५. शैक्षणिक वातावरणात नैराश्य : ज्या संस्था वा व्यवस्थापकांनी महाविद्यालयास रितसर विनाअनुदान तत्वावर परवानगी घेवून ती चालू केली आहेत ती महाविद्यालये नियमित चालू ठेवणे हे त्यांच्यासमोरील आव्हान आहे. आज ना उद्या शासन विनाअनुदान धोरण बदलेल व आपल्याला अनुदान मिळेल या आशेवर त्यांनी महाविद्यालये मोठ्या हिंमतीने चालू ठेवल्याचे दिसून येते. शासनाचे अनुदान नसताना व पारंपरिक महाविद्यालयातून कॉलेज व्यवस्थापन होईल एवढीही विद्यार्थ्यांची फिस जमा होत नसल्याने बऱ्याचवेळा स्वत:चे वैयक्तीक योगदान देवून शैक्षणिक कार्य करावे लागणे हे त्यांच्या समोरील आव्हान आहे. परिणामी इच्छा नसताना हा 'शैक्षणिक उठाठेव' करावा लागत असल्याने व्यवस्थापकात नैराश्य आहे. महाविद्यालय परवानगी घेताना मनातला हेतू व प्रत्यक्ष परिस्थिती यांच्यात ताळमेळ होत नसल्याने महाविद्यालयाच्या कॅम्पसमधील उत्साह नष्ट झाला आहे. प्राध्यापकांना वेतन, मानधन पुरेसे नसल्याने ते वर्गात कमी तर बाहेर अधिक दिसत आहेत. गुणवत्तापूर्ण पात्रताधारक प्राध्यापक न मिळाल्याने विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या प्रक्रियेत तिव्र गतिरोध निर्माण होत आहेत. त्यातून विद्यार्थ्यामध्ये असलेले चैतन्य नष्ट झाले आहे यामुळे पालकात नाराजी आहे.

शिक्षक विद्यार्थी यांचे नाते विना—अनुदान धोरणाने पवित्र न ठेवता व्यावहारीक बनविले आहे. शिक्षणाच्या या दुरावस्थेमुळे शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि व्यवस्थापक हे सर्वजन समाजात तिरस्काराचे आणि चिंतेचे विषय बनू पहात आहेत. म्हणूनच शासनाचे विना—अनुदान हे धोरण शिक्षण क्षेत्रातून हद्दपार करणे व शिक्षणाचे पावित्र्य राखणे खूप गरजेचे आहे. त्यातूनच शैक्षणिक गुणवत्ता राखता येईल. मुलांना स्पर्धेत टिकता येईल. बरोजगारीवर मात करता येईल, अन्यथा मराठवाडाच काय पण सर्व महाराष्ट्रच शिक्षण क्षेत्रातील विनाअनुदान धोरणाचा बळी ठरुन कोलमडून पडेल व तो सावरायला पुन्हा दुप्पट अनुदान व श्रम लागतील हे निश्चित.

संदर्भसूची :

1. xhttps :// www.blogger.com
2. shikshak-patra-blogspot.com 22 sept. 2011
3. BIXIN : 2015
4. Shantanukale. blogspot.com
5. विकासाच्या प्रतीक्षेतलं व्यवसायिक उच्च शिक्षण क्षेत्र, मंगळवार २९ डिसेंबर २०१५
6. यालाच उच्च शिक्षण म्हणतात का? बुध १६ डिसेंबर २०१५
7. लबाडी शास्त्र आणि भारतातील उच्च शिक्षण, मंगळवार १५ डिसेंबर २०१५
8. शासन शैक्षणिक विषयात खरोखरच गंभीर आहे का? महाराष्ट्र टाईम्स १६ डिसेंबर २०१५
9. Tilak, B.G., 2007, 'The kothari commission and financing of Education, Economic and political weekly. vol.XLV. No. 130 March 10, 2007
10. Social Problems in India, Ram Ahuja, Rawat Publition, New Delhi, 1997.

महिला सक्षमीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

डॉ. ज्योती अरविंद पोटे, समाजशास्त्र विभाग, पी.डी.कारखानीस महाविद्यालय, अंबरनाथ. मो. ९३२६७५८६९१

प्रस्तावना : प्राचीन समाजातील वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीव्यवस्थेत झाले. जातीव्यवस्थेने समाजामध्ये श्रेष्ठ—कनिष्ठत्वाची कधीही न संपणारी उतरंड निर्माण केली. हिंदू संस्कृतीने निर्माण केलेल्या पुरूषप्रधान व्यवस्थेने व जातीव्यवस्थेने स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अशी सर्व प्रकारची समानता प्रदान करणारे हक्क नाकारले. स्त्रियांवर ज्ञानबंदी लादून त्यांना बौध्दीकदृष्टया गुलाम बनविले. त्यामुळेच स्त्रियांचा दर्जा व स्थान पुरूषांच्या तुलनेत दुय्यम झाले. आणि पुरूषांच्या जीवनामध्ये सर्व क्षेत्रात एकाधिकारशाही निर्माण झाली. भारतीय समाजाच्या विकासाच्या प्रत्येक कालखंडामध्ये काही अपवाद वगळता स्त्रियांचे स्थान व दर्जा घसरत गेलेला दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित उद्धार चळवळीस प्रारंभ केल्यानंतर त्यांनी जे महत्वपूर्ण कार्य पार पाडले त्यामध्ये सामूहिकरित्या २५ डिसेंबर १९२७ रोजी 'मनुस्मृतीचे दहन' केले. स्त्रियांचे हक्क, त्यांचे स्वातंत्र्य नाकारणाऱ्या आणि स्त्री—दास्याच्या सर्वांगीण अंधकारमय ठरलेल्या मनुस्मृतीचे दहन करून स्त्रियांच्या उद्धाराची आणि स्वातंत्र्याची दिशा दिली. पुढे हिंदू कोडबिलांमध्ये स्त्रियांच्या अधिकारांची दखल त्यांनी घेतली. भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये स्त्रियांना 'समानता' संकल्पनेमध्ये आणून त्यांना पोटगीसारखे अधिकार मिळवून दिले.

संशोधनाची उद्दीष्टये : १) राष्ट्र उभारणीच्या कार्यातील महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान जाणून घेणे. २) मनुस्मृतीच्या संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जाणून घेणे. ३) हिंदू कोडबिलाद्वारे महिलांना मिळालेले अधिकार जाणून घेणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे कैवारी नव्हे तर, दलित, शुद्र मानल्या गेलेल्या स्त्रियांचेही ते कैवारी होते. भारतातील अस्पृश्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळायलाच हवा. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांना समता, स्वातंत्र्य व बंधुत्व मिळावयास हवे यासाठी त्यांनी इ. स. १९२७ ते १९५६ या तीन दशकाच्या कालखंडात आपला मानव मुक्तीचा लढा सुरू ठेवला. या मानव मुक्तीच्या, दलित मुक्तीच्या लढ्याचा अविभाज्य घटक म्हणजेच स्त्री मुक्तीचा लढा होय. त्यांनी दलितांबरोबरच स्त्रियांनाही शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा उपदेश दिला.

स्त्री ही पुरूषांसारखीच एक व्यक्ती आहे आणि जे हक्क आणि अधिकार कोणत्याही व्यक्तीला आहेत तेच हक्क आणि अधिकार स्त्रियांना असायलाच पाहिजेत. हा विचार संपूर्ण विश्वात प्रथम भगवान गौतम बुध्दांनी प्रस्थापित केला. परंतु गौतम बुध्दाने स्त्रियांना दिलेले हे स्वातंत्र्य मनुस्मृतीने हिरावून घेतले. स्त्रियांवर जाचक निर्बंध लादून त्यांचे जीवन पशुतूल्य हिन बनविले.

अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या भारतीय स्त्रियांच्या जीवनात महात्मा फुल्यांनी ज्ञानाच्या प्रकाशाची पहिली ज्योत पेटविली. आणि १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. याच महात्मा फुलेंची प्रेरणा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या समस्यांचा विचार करून स्त्री उद्धाराचे कार्य केले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात स्त्री—पुरूष हा भेदभावही मोठ्या प्रमाणावर सर्वत्र होता. राष्ट्रीय जीवनात स्त्रियांचे स्थान व हिस्सा सारखाच असला पाहिजे. पण याकाळात स्त्रियांचे समाजातील स्थान दुय्यमच होते.

मनुस्मृतीचे दहन : 'मनुस्मृती' या प्राचीन ग्रंथाला प्रमाण मानून 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हती' असे सांगण्यात येई. म्हणजेच या ग्रंथाने स्त्रियांना सर्व हक्क नाकारले होते. स्त्रियांचा व त्यांच्या हक्कांचा स्वतंत्रपणे विचारच त्याकाळात होत नव्हता. मनुस्मृतीचे जोखड मनुस्मृतीने घातलेली बंधणे शतकानुशतके भारतीय समाज बघत आला होता. याला विरोध करण्याचे धैर्य काहींनी दाखविले. त्यातून स्त्री—शिक्षण, विवाह संमती सारख्या अधिकारांना विचारात घेतले जाऊ लागले. यासाठी महाराष्ट्रात महात्मा फुले तर बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यासारख्या समाजसुधारकांनी पुढाकार घेतला. त्यातूनच सतीपध्दत बंदीचा कायदा अस्तित्वात आला व स्त्रियांना स्वतंत्र शिक्षणसंस्थाही उपलब्ध होऊ लागल्या. तरी देखील विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात स्त्री—पुरूष समानता याचा अभावच होता. स्त्रियांना अर्थाजन, स्वावलंबन, राजकीय अधिकार मिळाले नव्हते. या पार्श्वभूमीवर मनुस्मृतीचे दहन घडवून जुनाट, अप्रमाणित विचारांचा धिक्कार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री—मुक्ती चळवळीचे पुरस्कर्ते ठरतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे केलेले दहन ही एक प्रतिगामी व विषमतावादी विचारसरणी विरूध्द प्रतिकात्मक कृती होती. बऱ्याच स्त्रिया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पाहण्यासाठी खूप लांबून आल्या होत्या. या स्त्रियांशी संवाद करण्याची एकत्र हितगुज करण्याची ही संधी बाबासाहेबांनी दवडली नाही तर अत्यंत साध्या भाषेत त्यांनी हा संवाद साधला. डॉ. आंबेडकर म्हणाले की, 'तुम्ही स्वत:ला अस्पृश्य मानू नका. आपल्या घरात स्वच्छता ठेवा.' स्वच्छ कपडे घाला. फाटके लुगडे का असेना ते स्पृश्य हिंदू स्त्रियांसारखे नेसा. तुमच्यापोटी जन्म घेऊन अपत्यास आपण पाप केले आहे ही भावना का यावी? त्याकरीता तुम्ही सर्वांनी जुन्या व कालबाह्य चालिरीती सोडून दिल्या पाहिजेत. थोडक्यात स्त्रियांनी त्यांच्या राहणीमानात तसेच व्यावहारिक गोष्टीमध्ये सुधारणा करावी. अंगावरील कथिल पितळेच्या दागिन्याचा त्याग करून वेशभूषा बदलली पाहिजे सर्वात महत्वाचे म्हणजे मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करा व कोणालाही देऊ नका. मुलांप्रमाणे मुलींनाही शिक्षण द्या. ज्ञान आणि विद्या या दोन्ही गोष्टी स्त्रियांनाही आवश्यक आहेत.

कुटुंब नियोजनाबाबतचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृष्टीकोन : कुटुंब नियोजनाबद्दलचा डॉ. बाबासाहेबांचा दृष्टीकोनही स्त्रियांच्या विकासाचा, स्त्री शक्तीचा विचार करणारा होता. त्यांच्यामते कुटुंब नियोजनाची जबाबदारी ही स्त्री—पुरूष दोघांची आहे असे सांगितले. कमी मुले झाल्यामुळे स्त्रियांची जीवघेण्या बाळंतपणातून सुटका होईल आणि त्यांची शक्ती इतर कामांकडे वळवता येईल.

जास्त मुले जन्माला घालाव्या लागणाऱ्या स्त्रियांना त्या संकटातून मुक्त करण्याचा दिलासा देणाऱ्या संतती नियमनाचा पुरस्कार करण्यामागे डॉ. आंबेडकरांची स्त्रियांबद्दलची एक विशिष्ट मानवतावादी दृष्टी दिसून येते. तसेच अधिक मुलांना जन्म द्यावा लागणाऱ्या स्त्रियांच्या दु:खाकडे त्यांनी भारतीयांचे लक्ष वेधले. मोठ्या संख्येने मुले होणे. लागोपाठ मुले होणे यामुळे अनेक स्त्रियां मृत्युमुखी पडतात. तसंच नको असलेली संतती टाळण्यासाठी अनेक स्त्रियांचा अघोरी पध्दतीने गर्भपात करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्वाचा विचार मांडला आहे. ते म्हणतात, कोणत्याही कारणासाठी का होईना ज्यावेळी एखाद्या स्त्रीची मुल होऊ न देण्याची इच्छा नसेल त्यावेळी तिला गर्भधारणाच टाळता येण्याची शक्यता असली पाहिजे. संतती जन्माला घालणे हे पूर्णपणे तिच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे. कारण गरोदरपणाचा, बाळंतपणाचा आणि मुलांच्या संगोपनाचा भार स्त्रीलाच सोसावा लागतो. त्यामुळे मुले केव्हा आणि किती होऊ द्यायची हा निर्णय तिचाच असला पाहिजे. यामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री स्वातंत्र्याचा व स्त्रियाबद्दलच्या उदात्त विचारांमध्ये स्त्री—मुक्तीची बीजे ठिकठिकाणी सापडतात.

महिला सक्षमीकरण आणि हिंदू कोड बिल : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या सक्षमीकरणाकरीता हिंदू कोडबिलाची मागणी धरून ठेवली. आणि स्त्रीकल्याणासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलले. इ. स. १९४७ ते १९५१ याकाळात सतत परिश्रम घेऊन हिंदू कोड बिल तयार केले. हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांबाबत जो भेदभाव होता त्यास आळा बसेल व स्त्रिया अधिक सक्षम होतील अशी त्यांची धारणा होती. त्यांच्यामते, ''स्त्रियांना दैनंदिन जीवनाच्या गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना सामाजिक उत्पादनात भाग घेण्याची संधी उपलब्ध करून दिल्याखेरीज स्त्री—मुक्त होणार नाही.'' याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री—पुरूष समानतेच्या दृष्टीकोनातून स्त्रियांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी ११एप्रिल १९४७ रोजी 'हिंदू कोड बिल' संसदे समोर मांडले. ते पुढील प्रमाणे — १) भारतातील राज्य घटनेतील तरतुदीनुसार या देशातील सर्व जाती जमातीच्या स्त्रियांना समान संधी व पुरूषांबरोबर समान हक्क राहतील. २) मुलींनाही वारसा हक्क असावा व त्या वारसा हक्काप्रमाणे प्रत्येक मुलीला वडिलांच्या संपत्तीत मुलांबरोबर समान हिस्सा मिळावा. ३) स्त्रियांच्या स्वत:च्या मिळकतीवर पूर्ण हक्क व अधिकार असावा. ४) पती—पत्नीचे काही कारणास्तव पटत नसल्यास व एकत्र संसार करणे शक्य नसल्यास तिला घटस्फोट मिळावा व घटस्फोट झालेल्या नवऱ्याकडून पोटगी मिळावी. ५) पती — पत्नीमध्ये कोणतेही शारीरिक दोष नसल्यास व पहिली पत्नी जिवंत असल्यास दुसरी पत्नी करण्यास बंदी असावी. ६) एखाद्या स्त्रीला वारस नसल्यास तिला दत्तक घेण्याची परवानगी असावी व तसेच मुलीला दुसऱ्यास दत्तक जाण्यास परवानगी असावी. ७) कोणत्याही स्त्रीला आंतरजातीय विवाह करण्यास संमती असावी व तसे करण्यास तिला अधिकार असावा. ८) सार्वजनिक ठिकाणी स्त्रीला क्षुद्र मानले जावू नये. व तिला कमी लेखू नये. ९) स्त्रियांना राजकिय, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात आरक्षण मिळावे इत्यादी विषयांचा अंतर्भाव होता.

देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्व नागरिक समान पातळीवर आले पाहिजेत. राज्यघटनेनुसार सर्व नागरिकांना व स्त्री—पुरूषांना समान संधी मिळाली पाहिजे. त्याकरिता सर्व स्त्री—पुरूषांना सर्व क्षेत्रात समान पातळीवर येण्यासाठी 'हिंदू कोडबिल' पास करणे ही

काळाची गरज आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पं. नेहरूंना पटवून दिले. पण देशातील कट्टर मनुवाद्यांनी या बिलाला विरोध केला. या कारणास्तव शेवटी १९५१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा मंत्रीपदाचा राजीनामा दिला. पुढे १९५६ साली हे हिंदू कोडबिल चार भागात विभागत भारत सरकारने मंजुर केले.

१) हिंदू विवाह कायदा (१९५५), २) हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६), ३) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा (१९५६) व ४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा (१९५६)

हिंदू कोडबिलाची वैशिष्टये : १) हा एकच कायदा सर्व देशभर लागू करण्यात आला. २) हा कायदा जाती—पंथातील भेद मानत नाही. ३) हिंदूतील सर्व जाती—जमाती, पंथ—उपपंथ या कायद्याअंतर्गत येतात.

थोडक्यात या देशातील पुरूषप्रधान धर्मसंस्कृतीने स्त्रियांचे नाकारलेले हक्क हिंदू कोडबिलाने स्त्रियांना प्राप्त करून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कामगारांसाठी केलेल्या विशेष तरतुदी: मजूर पक्षाची स्थापना करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार कल्याणासाठी कार्य करताना स्त्री कामगारांसंबंधी सुध्दा विशेष तरतुदी सुचवल्या होत्या. त्यांनी गिरण्या, कारखाने, खाणी येथे काम करणाऱ्या स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, स्त्रियांना बाळंतपणाची रजा मिळावी. तसेच कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावीत, पुरूषांबरोबर स्त्रियांनाही मताधिकार असावेत. अशा मागण्या मांडल्या व मान्य करून घेतल्या. भारतीय संविधानात कलम १४ ते १८ द्वारे स्त्री—पुरूषांत कोणताही भेदभाव न करता समानता प्रस्थापित केली.

सारांश : भारतीय समाजातील एक महत्वाचा वर्ग म्हणजे स्त्रिया. स्त्रीवर्गाच्या हक्कांविषयी पुरूषवर्गाच्या बरोबरीने समानता आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक भाषणे व लेख लिहिले. 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती: जबाबदार कोण?' हा लेख म्हणजे भारतीय स्त्रीवादाचा आवाज आहे. या लेखात भारतीय स्त्रीवादी चळवळीच्या सैध्दांतिक मांडणीबरोबरच मनुवादी पित्तृसत्ताक व्यवस्थेचे टिकात्मक परिक्षणही केले आहे. तसेच बौध्द धम्म आणि स्त्रिया, ज्ञानार्जन आणि स्त्रिया इत्यादी अनेक पैलूंवर प्रकाश टाकला आहे. जुनाट रूढी—परंपरांचे जोखड टाकून स्त्री—शिक्षणाचा पुरस्कार त्यांनी केला.

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री सामर्थ्यावर खूप विश्वास होता. संपूर्ण समाज बदलण्याची जबाबदारी स्त्री घेऊ शकते. समाजाला प्रेरित करू शकते. म्हणूनच स्त्री हक्कांची पायमल्ली होऊ नये असे बाबासाहेबांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणत्याही एका समाजातील किंवा वर्गातील स्त्रियांच्या उत्थानासाठी कार्य केले नाही तर समस्त स्त्री वर्गाच्या सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. परंतु महिलांचे हक्क मिळवण्यासाठी महिला सक्षमीकरणासाठी स्त्रियांनीच पुढे आले पाहिजे तरच महिला सक्षमीकरण शक्य आहे. असे ठाम मत त्यांचे होते. आणि त्याप्रमाणे खरोखरच महिलांनी आपली मानसिकता बदलून स्वत: आपल्या सबलीकरणासाठी प्रयत्न करतील तर महिलांच्या समस्या दूर होऊन महिला सक्षम होण्यास वेळ लागणार नाही.

संदर्भ ग्रंथसूची :

१. *कीर धनंजय (२००६): डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.*
२. *थत्ते यदुनाथ (१९९४): भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन, विचार, कार्य आणि परिणाम, कौस्तुभ प्रकाशन, मुंबई.*
३. *गाठाळ एस.एस. (२०१०): आंबेडकरी चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.*
४. *पानतावणे गंगाधर (१९९६): पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.*
५. *बागुल योगिराज (२००८): आठवणीतले बाबासाहेब, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.*
६. *आंबेडकर बी. आर. (१९८२): हिंदू कोडबिलासंबंधी, प्रतीवादी प्रकाशन, नागपूर.*
७. *खैरमोडे चांगदेव (२०००): डॉ भीमराव रामजी आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे.*

'देवदासी प्रथा' : एक समाजशास्त्रीय चिंतन

डॉ. जयमाला लाडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मिलिंद महाविद्यालय, मुळावा जि. यवतमाळ मो.९४२००४५६३२

प्रस्तावना :— आज भारत २१ व्या शतकात विविध क्षेत्रात प्रगती करीत आहे. त्याच भारतात देवदासी सारखी प्रथा दिसून येते. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'एखाद्या राष्ट्राची प्रगती तेंव्हाच होईल जेंव्हा त्या राष्ट्रातील महिलांची प्रगती होईल.' परंतु आज देशात वास्तविकता काही वेगळीच दिसुन येते. अनेक प्रश्नांना महिलांना तोंड द्यावे लागत आहे. कारण भारतीय समाजात स्त्रीवर लादलेले निकृष्ट जिवन हेच तिची दुरावस्था असण्याचे कारण आहे. त्यातूनच देवदासी सारखी प्रथा अस्तित्वात आलेली आहे. देवाला केलेले नवस फेडण्यासासठी आपल्या मुलींना देव आणि देवींना देवदासी व मुरळया म्हणुन सोडणे किंवा वाहणे ही दलित समाजात एक प्रथा पडलेली आहे. ही अनिष्ठ प्रथा प्राचीन काळापासून या देशात चालु आहे. हा हिंदु धर्माला, मानवी संस्कृतीला आणि समाजाला काळीमा फासणारा व स्त्रियांचे सर्व प्रकारचे शोषण करणारा अमानुष प्रकार आहे. हा प्रकार गेली हजारो वर्षे देवाधर्माच्या नावावर निरंकुशपणे चाललेला आहे. तो अमानुष प्रकार बंद व्हावा, देवदासींना समाजात मान सन्मानाने जगता यावे, स्त्रियांचे शोषण थांबाचे म्हणुन आज समाज सुधारकांचे, स्वयंसेवी सामाजिक संस्थेचे, सरकारचे, महिला संघटनाचे प्रयत्न सुरू आहेत. तरी सुध्दा आजच्या २१ व्या शतकात सुध्दा ही प्रथा बंद झालेली नाही. देवदासी प्रथा आणि वेश्या व्यवसाय हा आजही एक कळीचा, चिंतेचा व चिंतनाचा प्रश्न झालेला आहे. त्यामुळेच हया विषयावर लेखन, चर्चासत्र आयोजित झाले पाहिजे. अलिकडे मात्र पुरोगामी मंडळी आणि स्वयंसेवी संघटना देवदासी मुक्ती चळवळ चालवित आहेत. तसेच अनेक लेखकांनी हया प्रथेवर पुस्तके लिहिली आहेत.

एकीकडे देशाची तंत्रज्ञान, क्रिडा, विज्ञान या क्षेत्रात प्रगती होत आहे. तर दुसरीकडे सामाजिक अस्वस्थता असलेली दिसून येते. म्हणजेच हया देशात देवदासी प्रथेतुन महिलांचे फार शोषण झालेले आहे. तसेच देवदासी प्रथेसोबतच मुलींची आणि महिलांची मोठ्या प्रमाणात विक्री व तस्करी होते. १२ लाखाच्या वर महिला वेश्या व्यवसायात गुंतलेल्या आहेत. एवढी महिलांची दुरावस्था असलेली दिसुन येते. तर समाजाची प्रगती होईल कशी? कारण 'स्त्रियांची प्रगती झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने राष्ट्रांची प्रगती होऊ शकत नाही' म्हणूनच स्त्रियांची दुरावस्था करणारी ही प्रथा समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी व सर्वांसाठी चिंतनाची बाब ठरते.

देवदासी प्रथेचा उदय :— देवदासी प्रथा प्रथम पाश्चिमात्य देशात उदयाला आली आणि त्यानंतर ती भारतात आली. असे काही अभ्यासकांचे मत आहे. पण देवदासींची प्रथा या देशात वैदिक काळापासून अस्तित्वात आहे. आज ही ती समाजात प्रचलित आहे.

स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ हया राज्यामध्ये अनुक्रमे, देव, मनुष्य व राक्षसांचे राज्य असायचे असे मानीत असत. स्वर्गात देवलोकांचे मनोरंजन अप्सरा करीत असत असे मानत असे. या अप्सरा नृत्य व गायन करून देवलोकांचे मनोरंजन करीत असत. तर पृथ्वीवर देवलोक म्हणजे ब्राम्हण व देवदेवतांची सेवा करण्यासाठी तरूण व सुंदर मुली देवदासी म्हणुन देवळात नेमाव्यात, भक्तांनी आणि राजेलोकांनी मुली विकत घेऊन त्या मुलींना देवदासी म्हणून अर्पण कराव्यात सूर्य देवाला रूपवान तरूण मुली देवदासी म्हणून अर्पण केल्याने सूर्य लोकांना जिंकता येते. आपल्या मुलींना देवदासी म्हणून सोडणे हे मोठे पवित्र धर्मकार्य व पुण्यकर्म आहे असे हिंदूचे पौराणिक 'पद्मपुराण' आणि 'सृष्टीखंड' या ग्रंथात सांगितले आहे, त्याला अज्ञानी, अंधश्रध्दाळू, देवभोळा निधर्मभोळा समाज आणि क्षत्रिय राजे बळी पडले.

१९३४ च्या मुंबई देवदासी संरक्षण कायद्यानुसार देवदासीची व्याख्या केलेली दिसून येते. जशी — ''एखाद्या अविवाहीत स्त्रीला एखाद्या हिंदू देवतेला, देव भावनेला, देवळांना किंवा इतर धार्मिक संस्थांना वाहिले जाते. त्या स्त्रीला देवदासी म्हणतात'' देवदासी म्हणजे आजन्म अविवाहित राहून गणिका वृत्तीने देवदेवतांची सेवा करणारी अथवा नवस फेडण्यासाठी देवदेवींना अर्पण केलेली स्त्री पूजेच्या वेळी देवदेवतांना फुले, धूप, धान्य, शिजविलेले अन्न, पेय इत्यादी वस्तू अर्पण केल्या जातात. कारण देवदेवतांनी सुध्दा भौतिक सुखाचा उपभोग घ्यावा, त्याकरिता सुंदर व तरूण मुली देवांना अर्पण कराव्यात. ते पवित्र कार्य आहे. ते केल्याने मानवाला स्वर्गात मोक्ष प्राप्त होतो असे 'पद्मपुराण' याज्ञवाल्क्यस्मृतीत सांगितलेले आहे.

देवळात ठेवलेल्या देवदासी म्हणजे पुजारी आणि राजे यांची कामवासना शमविण्याचे एक हुकमी व हक्काचे साधन झाल्या. ते देवदासींचा उपभोग घेऊ लागले. परंतु 'देवदासींवर' मालकी हक्क कुणाचा? यासाठी पुजारी व राजेलोक यांच्यात वाद निर्माण होत

असे. ''आम्ही भूदेव (ब्राम्हण पुजारी) स्वर्गातील देवांचे प्रतिनिधी आहोत. देवाला अर्पण केलेल्या नैवेद्यावर व इतर वस्तूंवर पुजाऱ्याचा हक्क असतो. तसा देवाला अर्पण केलेल्या देवदासींवरही आम्हा पुरोहितांचाच हक्क असतो.'' असा पुजाऱ्यांचा दावा असे तर ''आम्ही देवदासींची नेमणूक करतो. त्यांना रोख रक्कम तसेच वतन म्हणून जमीन देतो. त्यांच्या पोटापाण्याची सोय आम्ही करतो म्हणून देवदासींवर आमचा हक्क असतो.'' असा राजांचाही दावा असे. त्यामुळे पुजारी व राजे यांच्यात वितुष्ट निर्माण होऊन झगडे होत. त्याबाबतीत समझोता करून पुजाऱ्यांची व राजांची देवदासी कोणती हयासाठी देवदासीच्या उरोभागावर 'शंख' 'चक्र' 'गरूड' ही चिन्हे मुद्रांकित केली. 'शंख' चिन्हे असलेली पुजाऱ्याची आणि 'चक्र' व 'गरूड' चिन्हे असलेली राजाची देवदासी. त्यांनी आपापल्या देवदासींचा भोग घ्यावा म्हणजे पूर्वी पुजारी आणि राजे लोकांच्या उपभोगासाठी देवदासीमध्ये राखीवता होती हे कळुन येतं. पुर्वी राजे, सरदार आणि जहागिरदार आपल्या व राण्यांच्या सेवेसाठी दासदासी ठेवीत. त्यांना स्थळ कालाप्रमाणे वेगवेगळी नावे असत. जसे देवदासी, जोगतीण, कलावंतीण, सालमे, आराधिणी, कसबिणी, गणिका, मुरळी, देवळी, सुळी, महारिस, दासर, दासी इत्यादी नावांनी ओळखले जात असे.

पुर्वीच्या काळी देवदासींना समाजात मान होता. धार्मिक व नैतिक दर्जा होता. त्यांना प्रसिध्दी होती. परंतु कालांतराने देवाचे पुजारी, राजे, सरदार, इनामदार, गावचे पुढारी आणि श्रीमंत यात्रेकरू देवदासींचा उपभोग घेऊ लागले. त्यामुळे देवदासींचे नैतिक अध:पतन झाले. समाजात त्यांना प्रतिष्ठा राहिली नाही. हिंदू धर्मात 'अन्नदान' 'विद्यादान' महत्वाचं समजलं जातं त्याचप्रमाणे कन्या (देवदासी) दान हे सर्वश्रेष्ठ पुण्यकर्म मानलं जातं. उदा. आपला राज्याभिषेक केला म्हणून एका क्षत्रिय राजाने ब्राम्हण पुरोहिताला दहा हजार दासी दान दिल्याचा 'ऐतरेय ब्राम्हण' या ग्रंथात पुरावा सापडतो. पौराणिक काळात व इतिहासात काही नामवंत दासी होऊन गेल्या. त्यामध्ये रामायणातील 'मंथरा' महाभारतातील 'उत्तरा' मौर्य काळातील 'मुरा' रजपूत काळातील 'पन्ना' या दासी प्रसिध्द आहेत.

''स्त्री ही पुरूषांची केवळ भोगवस्तू आहे, स्त्रीने अतिथीला भोग देणे हे मोठे पवित्र धर्मकार्य आहे. ते तिचे भाग्य आहे.'' असे पूर्वीच्या काळी समजले जाई. त्यामुळे एखादा पाहुणा आपल्या घरी आला तर यजमान त्याला आपली पत्नी भोगण्यास देई. इतकेच नव्हे तर आपली पत्नी किंवा मुलगी दुसऱ्याला भाडयाने देणे, तिची खरेदी—विक्री करणे, तिचे दुसऱ्याबरोबर लग्न लावून देणे अशी पध्दत पूर्वी समाजात प्रचलित होती. ययाती राजाने स्वत:ची मुलगी माधवी हिला गुरूगालब याला अर्पण केलेली होती. पण गुरूगालबनेही तिचा उपभोग घेऊन त्यानंतर माधवीला ठराविक काळासाठी तीन राजांना भाडयाने दिली होती. ती मुदत संपल्यानंतर ययाती राजाने तिचे लग्न विश्वमित्राशी लावून दिले. अशा तऱ्हेने स्त्रीचे अस्तित्व एका निर्जिव वस्तू सारखे दिसून येते. तिच्या ईच्छा, भावना, आकांक्षा हयाला काहीही स्थान नव्हते. तिचे स्वत:चे अस्तित्वच नव्हते हयासारखी आणखी काय दुरावस्था असू शकते? म्हणून ही चिंतनाची व चिंतेची बाब दिसून येते.

अशा प्रकारच्या विलासी चंगळवादी भोगवादी हिंदु संस्कृतीत अशी परंपरा होती. वयात आलेल्या मुलींनी विवाहापूर्वी आपले कौमार्य पुजाऱ्याला अर्पण करावे की ज्यामुळे ती मुलगी पवित्र होईल अशी अघोरी प्रथा तसेच प्रत्येक घरातील एक स्त्री एका रात्रीसाठी, नवरात्रात नऊ दिवसासाठी पुजाऱ्याला भोग देण्यासाठी देवळात पाठविण्याची चाल गुजराथ व राजस्थानात होती. १९ व्या शतकाच्या आरंभी पेशवाईत ही प्रथा चालु होती. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या वेळी शनिवारवाडयात रोज ३०० स्त्रिया जमत. आपल्या बायकांना पेशव्याकडे पाठविणाऱ्या सरदारांना व इतर नोकरांना त्यांच्या नोकरीत बढती किंवा इनाम मिळत असे. त्यासाठी सरदार व नोकर चार—चार लग्न करीत. त्यापैकी एकीला स्वत: जवळ ठेवून इतर बायकांना आळीपाळीने पेशव्यासाठी शनिवार वाड्यात पाठवीत असत. जेंव्हा १८१८ साली इंग्रजांनी पेशवाई नष्ट केली, तेंव्हा पुण्यातील स्त्रियांनी पेढे वाटुन आपला आनंद व्यक्त केला आणि पेशव्याच्या पापी नजरेतुन व व्यभिचारातून मुक्त झाल्याचा सुस्कारा सोडला. अशा या अनितीच्या प्रकाराविरूध्द प्राचीन काळी चार्वाक, बुध्द आणि १९ व्या शतकात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बंड केले व महिलांना स्वातंत्र्य, समानता आणि न्याय मिळवून दिले. प्राचीन काळापासून स्त्रियांवर चाललेला अन्याय अत्याचार व देवाधर्माच्या नावावर चालत आलेल्या हया अनिष्ठ रूढी धर्मशास्त्र पुराणात सांगितलेल्या होत्या. धर्मशास्त्रानी व ब्राम्हण पुरोहितांनी भारतीय नारीचं जीवन उद्ध्वस्त केललं आहे हयात शंका नाही. ही स्त्री जीवनाची मोठी शोकांतिका आहे.

देवदासी प्रथेची कारणे :— देवदासी म्हणजे देवतेला वाहिलेली मुलगी. देवदासी प्रथा निर्माण होण्यासाठी वेगवेगळी कारणे अस्तित्वात आहेत. भारतातील विविध भागात ही प्रथा अस्तित्वात होती व आहे. परंतु जुन्या ग्रीक लोकांतही तसेच बॅबिलोनीयातील ईस्टर मंदिरातही अशा प्रथा दिसून येत

होत्या. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा या राज्यातही दिसून येते. अपत्य प्राप्तीसाठी, देवीचा नवस फेडण्यासाठी लोक आपल्या मुलींना देवीला अर्पण करीत असत. देवदासी प्रथेची अनेक कारणे आहेत. जसे— मुलींच्या केसात जट धरणे, मुला—मुलींना खरूज, नायटे, इसब असे त्वचारोग होणं, ते रोग बरे नं होणं, मुले वरचेवर आजारी पडणे, मूल न होणे, मुलींचे बाळंतपण व्यवस्थित न होणं, झालंच तर मूल न जगणं, घरात सुख—समाधान नसणं, देवीचे नवस फेडणं, घराण्याची परंपरा पुढं चालविणे या कारणामुळे लोक आपल्या मुलींना 'यलम्मा' च्या मंदीरात देवदासी म्हणून सोडीत असत. बॅबिलोनीया मध्ये सुध्दा ईस्टर मंदिरात ही प्रथा होती. बॅबिलीनीयातील प्रत्येक स्त्रीने एकदातरी ॲफ्रोडाइटीच्या मंदिरात प्रथम चांदीचे नाणे देणाऱ्या पुरूषांची इच्छा पूर्ण करायची असा समज होता जेणेकरून देवी प्रसन्न होईल. देवदासींना उदरनिर्वाहाकरिता ठराविक रक्कम किंवा जमीन मिळत असे. त्यामुळे सुध्दा आपल्या मुलीला देवतेला दान देत असत. कर्नाटकात देवदासीला 'बसवी' म्हणुन ओळखले जाते. धार्मिक विधी व विवाहाच्या प्रसंगी स्त्रीयांना मदत करणे, वधू—वरांची आरती ओवाळणे हयासारखी कामे देवदासीला करावी लागत. बेळगांव जिल्हयात दर पोर्णिमेला देवदासीची जत्रा भरते. येथे देवदासींना जोगतिणी सुध्दा म्हणतात. केस गुंतल्यावर किंवा जट तयार झाल्यावर तो देवीचा कोप मानून ती मुलगी देवीला वाहण्यात येते.

देवदासींचे जीवन :— भारतातील विविध भागात असलेल्या देवदासी प्रथेमुळे तिची फार दुरावस्था झालेली दिसून येते. आज देशात सर्वच क्षेत्रात स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने प्रगती करीत आहे. परंतु असाही एक वर्ग दिसून येतो ज्याची सामाजिक प्रगती झालेली दिसून येत नाही तो म्हणजे देवदासी महिलांचा वर्ग होय. हया प्रथेचा त्यांच्या जिवनावर फार अनिष्ट परिणाम झालेला दिसून येतो. आजच्या ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात समाजातील या प्रथेने स्त्रियांची अब्रुच वेशीवर टांगलेली दिसून येते. आज कायद्यांनी ही प्रथा बंद असली तरी या प्रथेतुन ज्या देवदासी निर्माण झालेल्या होत्या त्यांना फार नरकयातना भोगावा लागल्यात व लागत आहे. ज्या दिवशी ही मुलगी देवदासी म्हणून अर्पण केली जाते तोच दिवस तिच्या अस्तित्वाचा शेवटचा दिवस ठरतो. वयांनी कोवळया असलेल्या मुलींचे मूर्तीरूपी देवाशी विवाह लावले जाते पण त्या मंदीरातील पुजारी—ब्राम्हण स्वत:ला पृथ्वीवरील देव मानून त्या कोवळया मुलीचा उपभोग घेतो तो दिवस त्या मुलीचा जिवनाचा शेवट असतो, नाही तर ती रोज मरत असते.

देवदासी प्रथेतून वेश्याव्यवसायाची निर्मिती झाली. तारूण्य संपले की हया स्त्रिया ज्या मंदीरातील देवाशी तिचा विवाह लावला जातो त्याच मंदीराच्या पायऱ्यावर बसून भिक मागतांना दिसून येते. हया प्रथेमध्ये सगळयात वाईट गोष्ट असेल तर ते म्हणजे त्या जन्मदात्या आई—वडिलाकडून त्या मुलीला देवदासी बनविले जाते. म्हणजे देव—धर्माच्या नावावर स्त्रियांचाच बळी घेतला जातो. देवदासी स्त्रिला नृत्य करावे लागते. म्हणजे ती स्वत: एवढी दु:खी राहुन दुसऱ्याला प्रसन्न ठेवण्याचे काम ती करते हयापेक्षा कोणता त्याग मोठा असू शकतो?

देवदासी प्रथेमुळे समाजात त्याचे खुप गंभीर परिणाम दिसून येतात. देवदासी झालेल्या स्त्रियांना वेश्याव्यवसायात ढकलले जाते. एखाद्या पुरूषासोबत जर ती राहत असेल तरी मात्र तिला पत्नीचा दर्जा मिळत नाही. त्या पुरूषापासून त्या स्त्रिला मुल झाले तरी तो त्या पुरूषांचे नाव त्या मुलाचा बाप म्हणुन त्याचे नाव लावीत नाहीत तर आईचेच नाव लावले जाते. हयामुळे शाळेत प्रवेश घ्यायच्या वेळेस कायदेशीर अडचण निर्माण होते. अशाप्रकारे देवदासीच्या बेवारशी मुलांना कायद्याचं बंधन आडवं येते. अलीकडे अपत्यांना मुलांच्या नावामागे आईचे नाव लिहिण्याचे जी.आर. आहे. अलीकडे सरकारनं देवदासींना आर्थिक मदत व पेन्शन योजना लागू केली आहे. पण नवऱ्याचं नाव नाही, म्हणुन त्यांना सरकारी सवलती मिळत नाहीत. हा त्यांच्यावर अन्याय आहे ही त्यांच्या जीवनाची शोकांतिका आहे.

देवदासींना दुर्धर अशा आजारांना सुध्दा तोंड द्यावे लागते. रोज जागरण, दारू, गुटखा, गर्द यासारख्या मादक पदार्थाचे सेवन, निसत्व अन्न या इत्यादी कारणांमुळे देवदासी—वेश्यांना टि.बी. गुप्तरोग, एड्स सारख्या जीवघेण्या रोगांना तोंड द्यावे लागते. पण हया प्रथेमुळे समाजाच आरोग्य बिघडतं. तसेच देवदासी वेश्या वृध्द झाल्यानंतर मात्र त्यांना भिक मागून जगावे लागते. कुणी नातेवाईक त्यांना जवळ करीत नाही. तेंव्हा त्या निराधारी देवदासी वेश्या डोक्यावर यल्लम्माचा जग घेऊन पोटासाठी दारोदार जोगवा (भीक) मागून कसंतरी जगतात. शेवटी त्यांच्या जीवनाची परवड होते. ही त्यांच्या जीवनाची शोकांतिका आहे.

देवदासी प्रथेचे निर्मुलन / पुनर्वसन :— देवदासी प्रथेवर कायद्याने बंदी असली तरी भारतात आजही मोठया प्रमाणात ही प्रथा सुरू असल्याचे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने एका अहवालात म्हटले आहे. गुरूच्या सांगण्यावरून अनुसूचित जातीतील गरीब लोक आपल्या मुलींना देवाच्या भीतीपोटी देवदासी प्रथेत

ढकलतात असे या अहवालात म्हटले आहे. कोणाच्या सडक्या मेंदूतून ही कल्पना निघाली असेल ते माहित नाही पण ही प्रथा आपल्या समाजात असणे म्हणजे माणुस म्हणून जगायच्या आपण लायकीचे नाही हेच दर्शविते.

देवदासी प्रथेचे निर्मुलन करण्यासाठी 'मुंबई देवदासी संरक्षण कायदा १९३४ हा कायदा पास करण्यात आला होता.' देवदासी प्रथा बंद करण्याचा प्रथम प्रयत्न म्हैसूर संस्थानाने १९१० साली एक कायदा केला. त्यानंतर मुंबई प्रांताने मुंबई देवदासी संरक्षण कायदा १९३४ तसेच मद्रास प्रांताने १९४७ साली अशा प्रकारचा कायदा केला. १९७५ साली गडहिंग्लज येथे महात्मा फुले समता प्रतिष्ठान तर्फे देवदासी भगिनी परिषद भरविण्यात आली होती. निरनिराळया राज्यांनी देवतेला मुली वाहण्यास प्रतिबंध करणारे असे कायदे जरी केले असले तरी देवदासी प्रथा पूर्णत: बंद झाली नाही. विशेषत: महाराष्ट्र–कर्नाटक, गोवा या राज्यामध्ये सामाजिक स्वयंसेवी संस्थेनी मोठ्या प्रमाणात जागृतता निर्माण केली. हिंदु संस्कृतीच्या व अनीतीच्या या प्रकाराविरूध्द प्राचीन काळी चार्वाक, बुध्द आणि १९ व्या शतकात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बंड केले. त्यांनी स्त्रियांना समता, स्वातंत्र्य व न्याय मिळवून दिला.

कायदेशीर पातळीवर देवदासी प्रथेविरूध्द झालेले प्रयत्न :– महाराष्ट्रात अंधश्रध्दा निर्मूलन समितीव्दारे ही प्रथा बंद व्हावी म्हणुन कार्यकर्ते प्रयत्न करीत आहे. तसेच महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. रामकृष्ण भांडारकर, शिवराम जानबा कांबळे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. समाजसुधारकांनी व काका कारखानीस, राजाराम पैगंणीकर या सारख्या सुधारणावादी कार्यकर्त्यांनी आपल्या परीने अखंड प्रयत्न केल्याचे दिसून येतात. तसेच शासकीय व कायदेशीर पातळीवरही कारवाई करण्याचा प्रयत्न झाला होता. या कायद्यामुळे देवदासी प्रथा समूळ नष्ट झाली नाही. पण या अनिष्ट प्रथेला खीळ घालण्याचा प्रयत्न नक्कीच झाला.

वाडीयार घराण्याचे कायदेशीर प्रयत्न :– हया अनिष्ट प्रथेला धर्माचा आधार होता. म्हणुन आई–वडिल स्वत:च्या ६ वर्षाच्या मुलीला सुध्दा या पापकर्मात ढकलीत असत. तसेच ज्यांना मुली नसायच्या ते २००० रू. देवून दुसऱ्याची मुलगी ओटीत घ्यायची व त्या मुलीला देवाला अर्पण करीत असत. ही प्रथा बंद करण्यासाठी कायद्याने आणलेले बिल मद्रास मध्ये मंजूर झाले नाही. म्हणुन प्रथमत: म्हैसूर संस्थानचे राजे कृष्णराज वाडीयार यांनी आपल्या संस्थानात सन १९८२ मध्ये नांदी येथील श्रीभोगानंदीश्वर स्वामीच्या मंदिरात देवदासीच्या नृत्यावर बंदी घालणारा कायदा पास करून प्रथमत: या देवदासी प्रथेविरूध्द आवाज उठविला. म्हैसूर नरेशंनी यांनी प्रथेकडे जास्ती लक्ष देवून १८९९ मध्ये नानजागुड येथील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरातील देवदासीच्या नृत्यावर बंदी घालणारा कायदा पास करून ही प्रथा कायद्याने बंद केली. पुढे मद्रास, महाराष्ट्र, केरळ, उत्तरप्रदेश इत्यादी प्रदेशांमध्ये अशाच प्रकारचे कायदे करण्यात आले.

१९२३ मध्ये देवदासींना चांगल्या मार्गाला लावण्यासाठी 'हिंदु युवती शरणालयम्' ही संस्था स्थापन केली. १९२७ मध्ये प्रथम सारडा बिल पास करण्यात येऊन हिंदु मंदिरामध्ये देवदासी म्हणुन मुलींना सोडण्याची प्रथा बंद केली. तामिळनाडू मध्ये जेष्ठ नेते पेरियर स्वामी व डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी हयांनी खूप प्रयत्न केले. त्याचा परिणाम १९३२ मध्ये मुंबई व सावंतवाडी मध्येही हया प्रथेला बंद करण्यात आली.

१९६० मध्ये महाराष्ट्र स्वतंत्र झाला पण हया अगोदरच पश्चिम महाराष्ट्रातील राजे छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी देवाधर्माच्या फसव्या कल्पना बाजुला ठेवून या विषयाला हात घातला. त्यांनी देवदासी, मुरळी, जोगतीण, भावीण प्रथेविरूध्द १०–११–१९१९ मध्ये अनौरस संतती व जोगतिणीचा कायदा मंजुर झाला पण तो तारीख १० जानेवारी १९२० ला लागू करण्यात आला. शाहु महाराजांनी दोन कलम कायदा लागू केल्यामुळे काही प्रमाणात या प्रथेला खीळ बसल्याचे दिसून येते.

१९३४ मध्ये देवदासी संरक्षण कायदा, मुंबई पारीत करण्यात आला. पूर्वी हा कायदा मुंबई, देवदासी संरक्षण कायदा १९३४ या नावाने ओळखण्यात येत असे. मात्र आता या कायद्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रात झालेली आहे. या कायद्याने देवदासीचा अर्थ सुध्दा स्पष्ट केला आहे. या कायद्यानुसार एखाद्या स्त्रीला देवदासी म्हणून अर्पण करण्याच्या हेतुने केलेल्या कोणत्याही विधीमुळे अथवा कृतीमुळे एखादी स्त्री देवदासी बनत असेल तर त्या विधीला अथवा कृतीला त्या स्त्रीने अनुमती दिलेली असो अथवा नसो तर असा विधी अथवा कृती या कायद्यान्वये बेकायदेशीर घोषित करण्यात येईल. तसेच जिला देवदासी, मुरळी, जोगतीण, भावीण म्हणुन वाहण्यात येणार आहे अशी स्त्री सोडून इतर कोणी व्यक्ती देवदासी बनण्यासाठी कृती करेल, तसेच त्यास परवानगी देईल किंवा या विधीमध्ये सहभागी होईल अशा व्यक्तीला दंड देण्यात येईल असे या कायद्यात नमूद करण्यात आले.

२६ जानेवारी १९९० चा देवदासी प्रथा निर्मुलन आणि पुनर्वसन कायदा:— हा कायदा देवीदेवतांना मुले मुली, स्त्रिया, पुरूष वाहण्यात येणारी प्रथा बंद करणे, अशा प्रकारे वाहण्यात आलेल्या व्यक्तींना स्वत:च्या फायद्याकरीता उपयोगात आणले जाते त्यापासुन सदर व्यक्तीचे संरक्षण करणे व त्या व्यक्तीचे पुर्नवसन करणे या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात हा कायदा अंमलात आणला. ह्या कायद्यात सुध्दा देवदासीचा अर्थ स्पष्ट केला आहे. अशा प्रकारे देवदासीच्या हिताचा विचार करणारा १९९० चा कायदा पास होवून जरी आज देवदासी प्रथा उघडपणे होण्याचे प्रमाण कमी झाले असले तरी ते छुप्या पद्धतीने चालुच आहे. तिचे समूळ उच्चाटन झालेले दिसत नाही. २१ व्या शतकाच्या सुरूवातीला ही प्रथा उघडपणे चालूच होती आणि आहे. या अनिष्ठ प्रथेचे वाढते प्रमाण पाहुन २१ व्या शतकातही महाराष्ट्र शासनाला महाराष्ट्र देवदासी प्रथा नाहिशी करणे यासाठी अधिनियम २००५ हा कायदा करावा लागला. ह्या कायद्याला राष्ट्रपतीची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्रात दि.११ ऑगस्ट २००६ रोजी लागू केला.

११ ऑगष्ट, २००६ चा महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहिशी करणे) अधिनियम २००५:—

कायद्याचा उद्देश :— हिंदु देवता, मूर्तीपूजा करावयाच्या प्रतिमा, देवळे किंवा धार्मिक संस्था यांना देवदासी म्हणून स्त्रिया अर्पण करण्याची प्रथा नाहीशी करण्यासाठी व अशाप्रकारे अर्पण करण्यात आलेल्या स्त्रियांचे शोषण होण्यापासून संरक्षण, शिक्षा करण्यासाठी त्यांच्याशी संबंधित बाबीसाठी सर्वसमावेशक कायदा तसेच स्त्रियांचे शोषण करणारी देवदासीची ही प्रथा नाहीशी करण्यासाठी देवदासींना आदरपूर्वक जीवन जगणे शक्य व्हावे म्हणुन त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना म्हणून हा कायदा अस्तित्वात आला. ह्या कायद्यानुसार दोषी व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

अशाप्रकारे देवदासी प्रथा निर्मूलनासाठी काही दशकापासुनच प्रयत्न सुरू आहेत. आज ही काही सामाजिक कार्यकर्ते, अंधश्रध्दा निर्मुलन समितीची कार्यकर्ती नंदिनी जाधव या कार्य करीत आहेत. देवदासी प्रथेला जबाबदार असलेली केसांची जट आज ही अनेक स्त्रियांच जगणं असहय करीत आहेत. हया जटेमुळे स्त्रीला मानेचे, मणक्याचे, पाठीचे विकार होतात हेच लक्षात घेऊन नंदिनी जाधव ह्या जटनिर्मूलनाचं कार्य करीत आहेत. जवळपास त्यांनी ७९ स्त्रियांना जटांच्या या जोखडातून बाहेर काढलं आहे. वरील प्रमाणे देवदासी प्रथेच्या निर्मुलनासाठी समाजपातळीवर, शासकीय पातळीवर प्रयत्न होत आहेत.

सारांश:— आज २१ व्या शतकात महिला विविध क्षेत्रात आपली छाप पाडीत असतांना त्याच समाजात दलित समाजातील महिला धर्माच्या नावावर निर्माण झालेल्या अंधश्रध्देला बळी पडत आहेत. केवळ देवदासीच हया अमानवीय समस्येलाच तोंड द्यावे लागत नाही तर देहविक्रय, मानवी तस्करी, विवाहबाह्य संबंध, समलैंगिकता, मंदिर प्रवेश अशा वा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे.

देवदासी प्रथा ही धार्मिक रूढीतुन निर्माण झाली. ह्या प्रथेमुळे स्त्री ही पुरूषांची केवळ भोगवस्तू आहे. असा समज निर्माण केला होता. ही प्रथा केवळ भारतातच नाही तर पाश्चिमात्य देशात सुध्दा प्रचलित आहे. हया प्रथेतुन केवळ चंगळवादी, विलासी भोगवादी संस्कृती निर्माण झाली. अशा या अनितिच्या प्रथेविरूध्द चार्वाक, बुध्द, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. आंबेडकर हयांनी बंड केले. आज ही प्रथा बंद करण्यासाठी कायदेशीर उपाययोजना आहे. तरी पण छुप्या प्रमाणात ही प्रथा सुरू आहे. मात्र हया प्रथेमुळे जी देवाधर्माच्या नावावर चालत आल्या त्या अनिष्ट रूढी धर्मशास्त्रात सांगितलेल्या होत्या. धर्मशास्त्रानी व ब्राम्हण पुरोहितांनी भारतीय नारीचं जीवन उद्ध्वस्त केले यात शंका नाही ही स्त्री जिवनाची मोठी शोकांतिका आहे.

संदर्भ :—

१. *प्रा. बन्ने, विठ्ठल, ''देवदासी प्रथा'' (उगम, विस्तार आणि उपाय), सुगावा प्रकाशन, पुणे, जून २०१५.*
२. *राजस वसंत, 'देवदासी शोध आणि बोध' सुगावा प्रकाशन, पुणे, मे—२०१५.*
३. *जाधव नंदिनी, 'अंधश्रध्देच्या जटेतून सुटका' 'लोकसत्ता', १३ ऑक्टोबर, २०१८.*
४. *http://mr.vikaspedia.in/social-welfare*
५. *www.reliableacademy.com.*

भारतीय महिलांचा राजकीय सहभाग

डॉ. प्रविण दि. मुधोळकर, संशोधक विद्यार्थी, रा. तु. म. ना. वि. नागपूर. मो. ९८२२२२९६५५

प्रस्तावना :— मानवी समाजव्यवस्थेचे अंग असलेल्या स्त्रीला वर्षानुवर्षे हिन दर्जाचे मानून त्यांना दुय्यम स्थिती प्रदान करण्यात आली आणि तीला मुलभूत अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले. तिचा राजकारणातील अत्यल्प सहभाग हा याच अन्यायाचा परिणाम आहे. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक रूढी परंपरांच्या आधारावर स्त्रीला अबला घोषित करण्यात आले. पुरूषांप्रमाणेच तिच्यामध्येही सर्व क्षमता विद्यमान असतांना तिला पुरूषांपेक्षा कनिष्ठ मानून मानवी अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले. यामुळे महिला वर्गाचे, समाजाचे आणि पर्यायाने देशाचे अतोनात नुकसान झाले. स्थळ, काळ आणि परिस्थितीनुसार या अन्यायाचे स्वरूप आणि तिव्रता वेगवेगळी असली तरी स्त्रीयांवरील अन्याय व तीचा दुय्यम दर्जा हे जगातल्या बहूतेक मानवी समुदायाचे वैशिष्टय आहे हे एक कटू वास्तव आहे. मानवी जातीच्या प्रारंभीच्या काळात मातृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात होती. शेती व कुटूंबव्यवस्था या महत्वाच्या गोष्टींना स्त्रीयांनी चालना दीली. पण पुढे पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेने स्त्रीयांचे सर्व अधिकार काढून घेतले आणि तीला गुलाम बनवीले. प्रदीर्घ काळापासून चालत आलेली ही गुलामीची मानसिकता महिलांमध्ये अजुनही कायम असून राजकारणामध्ये सत्ता आणि पद मीळाल्यानंतर देखील त्या पुरूषांवर अवलंबून असल्याचे लक्षात येते. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांना राजकारणात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाल्यावरही ती स्वत:चा विकास साधून घेऊ शकली नाही. वैदिक काळापासून ते आजच्या स्वातंत्र्योत्तर काळातही स्त्रीयांवरील अन्यायाची परंपरा अजुनही कायम आहे. सामाजिक जीवनात स्त्रीयांचे स्थान अत्यंत दुर्लक्षित असून त्यातही अनुसूचीत आणि इतर खालच्या जातीतील महिलांची स्थिती तर अगदी दयनीय आहे. भारतीय राज्यघटनेतील ७३ व्या घटनादुरूस्तीमुळे भारतीय ग्रामीण महिलांसाठी राजकारणातील सत्तेची दारे आपोआप मोकळी झाली. आणि विशेष म्हणजे त्यांना यासाठी पाश्चात्य महिलांप्रमाणे कुठलाही संघर्ष करावा लागला नाही. अशा या आयत्या मीळालेल्या संधीचा उपयोग करून घेण्यास महिला का उदासीन आहेतद्य? हा संशोधनाचा विषय आहे. महिलांचा समाजातील खालावलेला दर्जा, राजकारणातील भ्रष्टाचार व गुन्हेगारी, महिलांची परावलंबी वृत्ती आणि अज्ञान अशा अनेक कारणांमुळे महिलांचा राजकारणातील सहभाग अत्यल्प आहे. आणि जो काही आहे तो ही नाममात्र आहे. असे असले तरी विविध स्तरांवरून होणारे प्रयत्न तसेच अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय चळवळींमुळे पंचायत राज व्यवस्थेतील काही महिला त्यांना मीळालेल्या संधीचे सोने करीत आहे असेही लक्षात येते.

राजकीय सहभाग:— जे.एल वुडवर्ड आणि **एफ. रॉबर्टच्या** मते राजकीय सहभागात पुढील कार्याचा समावेश होतो. १) निवडणुकीच्या वेळी मतदान करणे, मतदानाव्दारे सहमती दर्शविणे किंवा विरोधी मतदान करून असहमती दर्शवीणे. २) एखाद्या राजकीय पक्षाचा, दबावगटाचा सभासद बनणे. ३) विधिमंडळ सदस्याशी संपर्क साधणे. त्यांना आपल्या मागण्या अवगत करून देणे. ४) स्वत: विधिमंडळ सदस्यासाठी निवडणूक लढविणे व राजकीय पदप्राप्ती करणे. ५) लोकांशी संपर्क साधून प्रसार माध्यमाव्दारे शासन कार्याची स्तुती करणे किंवा निंदा करणे.

"Women in Indian politics" या पुस्तकात **कल्पना रॉय** या राजकीय सहभागाची संकल्पना स्पष्ट करताना म्हणतात की, राजकीय सहभाग ही संज्ञा बऱ्याच ऐच्छिक कार्याचा क्रम आहे की, ज्याचा प्रभाव राजकीय कार्यावर पडतो ते पुढीलप्रमाणे आहेत — १) निवडणूकीत मतदान करणे. २) पक्षाचे सदस्यांनी दबावगट तयार साधणे. ३) प्रत्यक्ष संसद सदस्यांशी संवाद साधणे. ४) राजकीय पक्षाच्या कार्यात सहभागी होणे आणि, ५) इतर नागरीकांशी वारंवार तोंडी संवादातून राजकीय मत तयार करण्यामध्ये सहभागी होणे.

अध्ययन उद्देश:— १) भारतीय समाजव्यवस्थेमधील महिलांच्या दर्जाचे अध्ययन करणे. २) महिलांचा अल्प राजकीय सहभाग आणि त्याबाबतच्या उदासीनतेच्या कारणांचा शोध घेणे. ३) सक्षमीकरणविषयक प्रयत्नांचा महिलांच्या राजकीय सहभागावर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.

गृहिकृत्ये:— १) महिलांचा अल्प राजकीय सहभाग आणि लिंगभेदप्रणित समाजव्यवस्था यांचा सहसंबंध आहे. २) पुरूषप्रधान समाजव्यवस्था आणि राजकारणातील भ्रष्टाचाराचा महिलांच्या राजकीय सहभागावर नकारात्मक परिणाम होतो. ३) महिलांच्या सक्षमीकरणासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम होत आहे.

अध्ययन पध्दती :— प्रस्तुत शोध निबंधात तथ्यांच्या संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन तंत्राचा वापर करण्यात आला आहे. तथ्य सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी लिखित ग्रंथ, दैनिक वर्तमान पत्रे, मासीके तसेच संशोधन पत्रिका या सर्व अध्ययन साहित्याचा उपयोग केला आहे.

विश्लेषणात्मक निर्वचन :— भारतीय समाजव्यवस्थेत महिलांचा दर्जा :— सुसान जे कॅरोल यांच्या मते स्त्रियांचा न्युनतन सहभाग हा लोकशाही पध्दती पुरुषप्रधान असण्याचे दर्शक आहे. निवडणूकीतील स्त्रियांचा अधिक सहभाग हा लोकनिर्णय बदलविण्यास व प्रभावकारी ठरण्यास महत्वपुर्ण भूमिका बजावतात. परंतु भारतातील काही अपवादात्मक उदाहरणे वगळता बहुतांश महिला राजकीय सहभागाबाबत उदासीन असल्याचे लक्षात येते. महिलांच्या या उदासीनतेची कारणे या देशाच्या परंपरावादी समाजव्यवस्थेत अंर्तभूत असल्याचे लक्षात येते. स्वातंत्र्यानंतरच्या ६५ वर्षांच्या काळात स्त्री—शिक्षणाचा प्रसार झाला आणि घटनेने जरी स्त्री—पुरूष समानता मान्य केली असली तरी आज विविध क्षेत्रात स्त्रीला सापत्नभावाची वागणूक मीळते, तिची नागवणूक केली जाते. आणि आजच्या स्त्रीयांना पूर्वीच्या प्रश्नांपेक्षा थोडया वेगळया प्रश्नांना तोंड द्यावे लागते.

सन १९७१ मध्ये श्रीमती इंदीरा गांधीच्या शासन काळात प्रथमच स्टेटस ऑफ वुमेन कमिटी व्दारे भारतीय महिलांच्या स्थितीचे सर्वेक्षण केल्या गेले. त्या अहवालाच्या निष्कर्षानुसार भारतीय महिलांचा दर्जा काय आहे हे लक्षात येते.

१) कधी घराच्या बाहेर न निघणारी व कधी स्वत:साठी काही न मागणारी स्त्री समाजात आदर्श मानली जाते. २) आर्थिक व सामाजिक असमानता गृहित असणाऱ्या सामाजिक मान्यतेमध्ये महिलांचे आदर्श प्रतिमान (रोल मॉडेल) असून यांचा प्रभाव महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजनितीक परिवर्तन आणि स्थीतीवर पडतो.

कमिटीनुसार भारतीय महिलांच्या परिस्थितीला प्रभावीत करणारे कारक खालील प्रमाणे आहेत.

१) पुरूष व स्त्रीच्या परिस्थितीमध्ये असमानतेचे कारण समाजामध्ये असलेल्या मान्यता व प्रवृती आहे. ज्यामुळे मुलीचा जन्म अशुभ मानल्या जातो. काही समुदायात त्यांना जन्मत:च मारून टाकल्या जाते. २) भारतामध्ये लींगप्रमाणाचे घटते स्वरूप ही जैववैज्ञानीक घटना नसून बालीका भ्रूण हत्येकडे संकेत आहे. ज्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो. ३) मुलगा मुलीच्या पालन पोषणात भेदभाव होतो व त्यामुळे मुलींना कमी पौष्टीक जेवण दिल्या जाते. ४) सामाजीक कुप्रथा, बालविवाह, हुंडाप्रथा इ. कारणांमुळे महिला सामाजीक, आर्थिक व मानसिक दृष्टीने दबलेल्या असतात आणि यासोबतच घर सांभाळण्यामध्ये मनोवैज्ञानिक दृष्टीकोणातून महिला आपली जबाबदारी जास्त असल्याचे मानतात. ५) वरील जबाबदारीचे संस्कार आई आपल्या मुलीला बाल्यावस्थेतूनच प्रदान करीत असते. परिणामत: मुली शिक्षण व अन्य विकासाच्या पैलुपासून वंचित होतात. ६) या व्यतिरिक्त महिलांचे पुरूषावर निर्भर असणे हे एक प्रमुख कारण आहे.

या सर्वेक्षणाला अर्धशतक पुर्ण होत आहे. पण भारतातील स्त्रियांची स्थिती अजुनही बदलली नाही असे लक्षात येते.

भारतीय समाजात स्त्रियांकडे एक उपभोग्य वस्तु म्हणून पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोन अजुनही कायम आहे. विद्युत भागवत या स्त्रिवादी लेखिकेने स्त्रीची भूमिका ही उत्पादन म्हणजे काम करण्यासाठी, पुनरूत्पादन म्हणजे प्रजोत्पादन आणि लैंगिकता अर्थात लींग भावना या मुद्यांनीच बंदिस्त झाली आहे असे म्हटले आहे. भारतातील स्त्रीला ही वस्तुस्थिती तंतोतंत लागु होते. ग्रामीण भागातील कामाची परिस्थिती अजुनही बदलली नाही. ग्रामीण स्त्रियांना सकाळी उजाडल्यापासून शेतावर व घरात अविश्रांत काम करावे लागते. या सर्वांचा विपरीत परिणाम तीच्या आरोग्यावर होतो. नवऱ्याची व्यसनाधीनता, बाहेरख्यालीपणा व मारपीट यामुळे अनेक स्त्रिया त्रस्त असतात. एकत्र कुटुंब व्यवस्थेतील पितृसत्ताक रचनेमुळे स्त्रियांच्या घरकामातील काबाडकष्टात अधिकच वाढ होते. अंधश्रध्दा, कर्मकांड, उपासतापास, निरक्षरता, आर्थिक अडचणी, सामाजिक दृष्टीकोणातील पारंपारीकता, खेडयातील संकुचीत वातावरण, शाळेच्या सोयीचा अभाव, पालकांची उदासीनता, आईचे गर्भारपण, लहान भावंडाचे संगोपण, घरकाम, घराबाहेरची कामे असे अनेक प्रश्न आहेत. ग्रामीण जीवनाशी संलग्न असलेल्या आदिवासी समुदायामध्ये महिलांची स्थिती अशीच आहे. कुटूंबाचा आधार असलेली ही आदिवासी स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात उदासीन आहे. भारतात अनेक भटक्या जाती असून त्यातील स्त्रीयांचे प्रश्न पुन्हा वेगळे आहेत. या जातींमध्ये स्त्रीयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगवेगळया प्रथा किंवा पध्दती अवलंबिल्या जातात. भारतात अनेक धर्म आहेत पण प्रत्येक धर्मात स्त्रीयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी देव आणि धर्म या दोन संकल्पनांचा पुरेपूर वापर करून घेण्यात आला आहे. मासिक पाळीच्या कारणावरून शनिशिंगणापूरमध्ये आणि मुंबईतील प्रसिध्द अशा हाजी

अली दर्ग्याच्या 'मझार' (गाभारा) महिलांना अनेक वर्षांपासून महिलांना प्रवेश बंदी केली होती. या दोन घटना भिन्न धर्मीय महिलांच्या असल्या तरी धार्मिक कारणांवरून महिलांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्याचा दृष्टीकोण मात्र सारखा आहे असे लक्षात येते. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये महिलांचा दर्जा अत्यंत दुर्लक्षित स्वरूपाचा आहे. त्यांच्या असहायतेचा आणि अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांचे शोषण केल्या जाते. 'मी टू' चळवळीच्या माध्यमातून कामाच्या स्थळी होणाऱ्या शोषणाच्या विरोधातील तक्रारी पाहाता या समस्येची व्याप्ती लक्षात येते. राजकीय क्षेत्रातील महिला आपल्या घरातील पुरूषांना का सोबत नेत असाव्यात याचा अंदाज येतो. महिलांच्या या असहायतेचा फायदा घेऊन कुटूंबातील पुरूष महिलांना नामधारी पदाधिकारी ठेवून राजकारणावर आपले नियंत्रण कायम ठेवतात. याचा नकारात्मक परिणाम महिलांच्या राजकीय सहभागीतेवर झालेला आहे. विविध कालखंडातील उदाहरणांवरून लक्षात येते की तीची राजकीय व्यक्ती म्हणून भुमिका फार कमी ठीकाणी आहे. कारण या प्रदिर्घ कालखंडातील सर्वात मोठा काळ हा तीच्या स्वत:च्या अस्तित्वाचे रक्षण करण्यासाठी खर्च झाला.

२० वे शतक आणि स्त्रियांचे स्थान — या शतकात अनेक स्त्री संघटना उदयास आल्या. जसे १९२७ मध्ये All Indian Womens Conference व डोरोथी मिनाराला यांनी १९१७ मध्ये (The National Council For Womens) ही संस्था ॲनीबेझंट यांच्याकडून प्रेरित होऊन निर्माण झाली. या संस्थाच्या पाठींब्याने व म. गांधी यांच्या सहाय्याने सरोजिनी नायडू ह्यांनी लॉर्ड मोर्ले ह्यांना १९१७ ला भारतीय महिलांना मतदानाचा पुरूषांसमान अधिकार द्यावा अशी मागणी केली. ही भारतीय महिलांकडून राजकीय अधिकारांबाबत केलेली पहिली मागणी होय.

मुथुलक्ष्मी रेडडी (मद्रास) ही मद्रास मंत्री मंडळावरील प्रथम नामनिर्देशित स्त्री सदस्य असून त्या मंत्रिमंडळाची उपाध्यक्ष म्हणून निवडून आल्या. त्यांनीच देवदासी बिल मांडले. राधाबाई, सुब्बाराय, रेणुका रॉय, अन्नु स्वामीनाथन या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या प्रथम सदस्य होत्या. महात्मा गांधीजींच्या प्रोत्साहनामुळे १९३० च्या मीठाच्या सत्याग्रहातील दांडी यात्रेत मोठया संख्येने स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. मुंबईत सरोजिनी नायडू यांच्या अध्यक्षतेखाली लिंगभेदाविषयी व महिलांना सार्वत्रिक प्रौढ मताधिकार मिळावा या राजकीय अधिकाराच्या मागणीसाठी गोलमेज परिषदेच्या पार्श्वभूमीवर महिला प्रतिनिधींची सभा झाली. १९३७ च्या निवडणूकीत महिलांनी त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचा पुरेपूर वापर केला. १९३७ च्या निवडणूकीत ४२ महिला विधिमंडळात आणि ५ वरिष्ठ सभागृहात नामनिर्देशित झाल्या. आक्टोंबर, १९४६ मध्ये संविधान समितीची स्थापना झाली. यात कायदेमंडळ सदस्यांना निवडले गेले, यात सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख, रेणुका रॉय आणि हंसा मेहता या इतर सदस्यांसोबत स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण करणाऱ्या सदस्या होत्या. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात देखील स्त्रीयांच्या राजकीय स्थितीमध्ये फारसा फरक झालेला नाही असे लक्षात येते.

महिलांचा विविध पातळीवर राजकीय सहभाग:—

राष्ट्रीय स्तरावर स्त्री सहभाग :— भारतात स्त्रियांची संख्या एकूण लोकसंख्येच्या निम्मी आहे. म्हणजेच स्त्री पुरूषांचे ५०—५० टक्के असे सरळ प्रमाण आहे पण त्या प्रमाणात स्त्रियांची संख्या संसदेत व विधिमंडळात दिसत नाही. गेल्या ५० वर्षात लोकसभेतील महिला खासदारांची संख्या बोटावर मोजण्याइतकीच राहिलेली आहे. आणि आजदेखील त्या स्थितीमध्ये फारसा फरक जाणवत नाही.

केंद्रीय मंत्रिमंडळातील स्त्री सहभाग :— १९५२ ते १९८९ या कालावधीत लोकसभेच्या १२ वेळा निवडणुका झाल्या. त्यामध्ये ६३३८ जागांपैकी आजपर्यंत अवघ्या ३६८ जागा महिला उमेदवारांनी जिंकल्या. त्यानंतरच्या काळात देखील महिलांच्या संख्येत फारशी वाढ झालेली नाही असे लक्षात येते.

राज्यस्तरावर महिला सहभाग :— महाराष्ट्र राज्य विधिमंडळात स्त्री सदस्यांचे प्रमाण १.९ टक्के ते ९.३ टक्के दरम्यान दिसते. ज्यांची सरासरी ४.७ टक्के आहे. सर्व राज्याच्या विधिमंडळात हे प्रमाण १.८ ते ६.३ टक्के आहे. ज्याची सरासरी ४ टक्के आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या विधिमंडळात १०० सदस्यांमागे ५ स्त्री सभासद तर सर्व राज्यांच्या विधिमंडळात १०० सदस्यांमागे केवळ ४ स्त्री सदस्य इतके कमी प्रमाण आहे.

राजकीय पक्षातील सहभाग :— मतदार संघात उमेदवार व पक्षातील अधिकार पदांवर स्त्रियांना स्थान मिळावे असे सर्वच राजकीय पक्ष म्हणत असले तरी, हा त्यांचा नारा असला तरी, प्रत्यक्षात कोणत्याही राजकीय पक्षामध्ये मोठया प्रमाणात स्त्रियांना उमेदवारी दिली जात नाही. १९८९ च्या निवडणुकीत कॉंग्रेसतर्फे १० टक्के, भाजपातर्फे ६.४ टक्के सीपीआय व सीपीएमतर्फे प्रत्येकी ५.५ टक्के, जनता दल ३.४ टक्के तर स.ज.द. २.३ टक्के स्त्री उमेदवार होत्या. आजघडीला राजकीय पक्षांमध्ये ज्या काही स्त्रीया सत्तेवर आहेत त्या स्वकर्तृत्वाने समोर आलेल्या आहेत.

पंचायती राज संस्थाव्दारे स्त्री सहभाग :— १९९२—९३ साली ७३ वी घटनादुरुस्तीमुळे देशभरात १० लाख स्त्रियांना पंचायती राज्य व्यवस्थेमध्ये आणले. पंचायती राज्य संस्थामधील स्त्री सहभाग राजकीय कुटुंबातून आलेल्या महिलांचा अधिक दिसतो. पंचायती राजकारणातही राज्य व सक्रीय पातळीवरील राजकारणाप्रमाणेच बिबी, बेटी, बहू बेवा सूत्रानूसार महिलांना राजकारणात आणले जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब व भूमीहिन मजुरांच्या प्रतिनिधींना अत्यल्प संधी मिळते. पंचायतीतील महिला आरक्षण जागेवर, राजकारणी पुरूषांच्या घरातील स्त्रिया निवडून येतात. अधिकार पुरूष गाजवतात व स्त्रिया केवळ नाममात्र कळसूत्री बाहुले बनून राहतात.

महिलांच्या अल्प राजकीय सहभागाची कारणमीमांसा:— सुसान जे कॅरोल यांच्या मते निवडणूकीतील स्त्रियांचा अधिक सहभाग हा लोकनिर्णय बदलविण्यास व प्रभावकारी ठरण्यास महत्वपुर्ण भूमिका बजावतात. परंतु महिलांना संधी मीळून देखील त्या आपल्या राजकीय सहभागाबाबत उदासीन का? या महत्वपुर्ण प्रश्नाची कारणमीमांसा करणे देखील गरजेचे वाटते. देशात स्त्रीमुक्ती चळवळी वाढल्या पण महिला चळवळीनी मात्र कधीही महिलांना राजकारणात आरक्षण मिळावे असा आग्रह धरलेला नाही. तसेच कुठल्याही राजकीय पक्षाच्या महिलाही याबाबतीत उदासीन दिसतात. पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामीण महिलांची स्थिती फार दयनीय आहे. आतापर्यंत महिला आरक्षणाचे विधेयक पास झाले नाही. यावरून राजकारणामध्ये पुरूषसत्ताक व्यवस्थेचे प्रभावी नियंत्रण असल्याचे लक्षात येते. राजकारणाबाबत स्त्रीयांच्या उदासीनतेबाबत विविध कारणे आहेत. पक्षापक्षांतील हेवेदावे, संघर्ष, लाथाळी, दिखावा करणारे पण प्रत्यक्षात पाठपुरावा न होणारे पक्षाच्या कार्यक्रम, पक्षशिस्त व बंधने तसेच विरोधी पक्षांवर अनेक वेळा येणारी बंदी यामुळे क्रियाशिल सभासद होण्याकडे त्यांचा कल दिसत नाही. राजकीय डावपेचासाठी खऱ्याचे खोटे व खोटयाचे खरे करणे स्त्रीयांना पटत नाही. आर्थिक अडचण हे स्त्रियांच्या उदासीनतेचे कारण आहे. पण अलिकडच्या काळात संयुक्त राष्ट्रसंघाने महिला विकासासाठी टप्प्याटप्प्याने केलेल्या प्रयत्नांना यश येत आहे असे आपल्या लक्षात येते. भारतातील ग्रामीण महिलांसाठी पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांच्या विकासाच्या दृष्टीने अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. इंडिया इंटरनॅशनल सेंटर, नवी दिल्ली येथे १ ते ३ जानेवारी १९९९ या काळात झालेल्या नॅशनल वर्कशॉप ऑन पंचायत ॲड वूमेन यातील नोंदीवरून काही आवश्यक पुर्वअटींच्या आधारे आरक्षणामुळे स्त्रिया महत्वाची शक्ती ठरतील असे भाकीत केले होते. ग्रामीण पातळीवर पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांचा सक्रीय सहभागाला हळूहळू चालना मीळत आहे असे लक्षात येते.

पंचायती राज व्यवस्थेव्दारे ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण :— विकासाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून महिलांना राजकीय क्षेत्रात प्राधान्यक्रमाने पुढारीपणाची संधी देणे संयुक्त राष्ट्रसंघाने आवश्यक मानले आहे. राष्ट्रसंघाने १९५२ साली 'स्त्रियांच्या राजकीय अधिकारांची सनद' केली तरी या विषयाला पुरेसे महत्त्व दिले गेले नव्हते. नैरोबीतील जागतिक स्त्री परिषदेच्या १९८५ सालच्या जाहीरनाम्याने या विषयाला पुष्टी दिली. जाहीरनाम्यात म्हटले गेले की, ''स्त्री समतेचा विचार प्रत्यक्षात येण्यासाठी स्त्रियांची पुरूषांच्या बरोबरीने सत्तेत भागीदारी असणे आवश्यक आहे.''त्यादृष्टीने राजकीय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग लोकसभेपासून सुरू करण्याऐवजी ग्राम पंचायतीपासून सुरू झाली ही एक महत्वपूर्ण बाब म्हणावी लागेल. कारण तळागाळापासून स्त्री नेतृत्व विकसीत करण्याच्या दृष्टिने असा प्रयत्न सुरू होणे आवश्यक होते. भारतामध्ये पंचायत राज व्यवस्थेत महिलांना आरक्षण प्रदान करणे म्हणजे संयुक्त राष्ट्र संघाच्या महिला सक्षमीकरणाच्या धोरणाशी संलग्न असा प्रयत्न होय. सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा संदर्भ व्यक्तिगत आत्मविश्वास ते सामुदायीक प्रतिकार शक्ती वाढण्याकडे आहे. परंपरागत साचेबध्द सत्तासंबंधांचा निषेध करून त्यामध्ये परिवर्तन घडवून आणने हे सक्षमीकरणाचे उद्दीष्ट होय. सक्षमीकरणाची प्रक्रीया ही स्त्रीयांना कमजोर करणाऱ्या शक्तींची दिशा बदलवीणे होय. महिलांना निर्णयक्षमतेचा अधिकार तसेच त्यांच्या दर्जा आणि अधिकारांबाबत जाणिव निर्माण करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. सक्षमीकरणाच्या रणनीतीनुसार सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक संस्था आणि प्रक्रीयांमध्ये परिवर्तन आणने की ज्यामुळे पैतृक प्रभाव कमी होईल. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेला सुरूवात झालेली आहे. स्त्रियांना राखीव जागा ठेवण्याची सुरूवातीला तरतूद नसल्यामुळे पंचायत राजच्या सुरूवातीच्या काळात पंचायत समिती व जिल्हा परिषद यामध्ये स्त्रिया अपवादानेच दिसत असत. स्त्रिया या संस्थामध्ये भाग घेण्यास सहसा तयार होत नसल्यामुळे सुरूवातीची काही वर्षे स्त्रियांना या संस्थामध्ये स्थान असल्याचा देखावा निर्माण करण्यासाठी स्वीकृत सदस्य म्हणून काही स्त्री सभासद घेतल्या जात असत. त्यामुळे पंचायत राज संस्थाच्या नेतृत्वात स्त्रियांना फारसा वाव मिळू शकला नाही. काही गावांच्या ग्रामपंचायती या चावडीजवळ असल्यामुळे चावडीसमोरून जाताना महिलांना पायातील चप्पल हातात घेऊन व पदर डोक्यावर असलाच पाहिजे. अशा जाचक अटीमुळे चावडीच्या दिशेला जाणेच महिलांसाठी वर्ज्य होते. पुढे ७३ व्या घटना दुरूस्तीमुळे ग्रामपंचायत आणि ग्रामसभांमध्ये

महिलांची उपस्थिती अनिवार्य झाली असली तरी महिलांची उपस्थिती नगण्यच होती. काही स्वयंसेवी संस्थांव्दारे आयोजित ग्रामपंचायत दर्शन कार्यक्रमामुळे महिलांमधील ग्रामपंचायतीविषयीची भीती कमी झाली. पंचायत राज मधील ५० टक्के आरक्षणाच्या अपरिहार्यतेमुळे लहान लहान वस्त्या, वाडया, पाडे इथल्या अगदी तळागाळातल्या स्त्रियांना आयुष्यात प्रथमच गावच्या शासन व्यवस्थेत काम करण्याची संधी मिळाली. अनुसूचित जाती, मागास जमाती, निरक्षर, भूमीहीन, संपत्ती विरहीत व गरीब स्त्रीचा या विकासकेंद्रीत शासनात समाविष्ट होत ग्रामपंचायतीचे राजकारण, कायदे, हळूहळू शिकत आहेत. दारुबंदी, वनीकरण, बायोगॅस प्लॅन्ट लावणे, नव्या शाळा उघडणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इ. प्रश्न सोडवून ग्रामीण महिलांचे जीवन सुकर बनविण्यासाठी या स्त्री सदस्य व पदाधिकाऱ्यांनी कार्य केलेले दिसुन येते. पुरूष राजकारण्यांपुढे आपल्या समस्या मांडतांना पुर्वी होणारा संकोच दुर सारून त्या नि:संकोचपणे आपले गाऱ्हाणे या महिला लोकप्रतिनिधींकडे मांडत त्या एकमेकींना उत्तमपणे प्रतिसाद देत आहेत. पुर्वी स्थानिक राजकारणात थिल्लरपणे वागणारे राजकारणी पुरूष महिला प्रतिनिधींच्या वावरामुळे सभ्यतेने वागू लागले आहेत. अनेक बचत गटांची मोठया प्रमाणात ग्रामीण भागात सुरूवात झाल्याने ग्रामीण स्त्रियांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली यास पुरूषांचे, कुटूंबाचे प्रोत्साहन मिळते आहे. विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे पंचायतींना गतिमान करण्याचे विद्यमान सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी डिजीटल तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यावर भर दिल्या जात आहे. त्यामुळे जनतेशी सुसंवाद प्रस्थापीत होण्यासाठी संधी निर्माण झाली आहे. असे एक ना अनेक साधे वाटत असले तरी असामान्य सकारात्मक बदल घडून येऊ लागले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एक निरर्थक परंपरा म्हणुन 'सरपंच पती' ही संकल्पना संपवीण्याची त्यांनी गरज व्यक्त केली. अनेक शिक्षित व पदवीधर महिला लोकप्रतिनिधी घरातील वा बाहेरील पुरूषमंडळींच्या प्रभावाखाली न येता स्वतंत्र बुध्दीने कुशलतेने कारभार करू लागल्या आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने सुरू झालेली महिला सक्षमीकरणाची चळवळ वैश्विक पातळीवरून गावखेडयापर्यंत येऊन पोहोचली आहे याचा प्रत्यय येत आहे. याचे सकारात्मक परिणाम हळुहळु दृष्टीपथास येत आहेत.

अध्ययनाचे निष्कर्ष :— १) भारतीय समाजव्यवस्थेतील लींगभेदविषयक भावना ही महिलांच्या प्रभावी राजकीय सहभागामध्ये मोठा अडथळा आहे. २) धार्मिक आणि जातीय परंपरा या लिंगभेदाला पुरक आहेत. ३) पुरूषसत्ताक मानसिकतेमुळे स्त्रीया स्वत:च्या क्षमता विसरल्या आहेत. ४) ऐतिहासिक कालखंडातील स्त्रीयांचा राजकीय सहभाग हा त्यांच्या संघर्षशीलतेमुळे आणि आर्थिक संपन्नतेमुळे होता. ५) भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी यामुळे राजकारण हे निषिध्द क्षेत्र मानून अनेक महिला या क्षेत्रात सहभागी होत नाहीत. ६) सामाजिक व आर्थिक चळवळीतून आलेल्या महिला हया जास्त प्रभावीपणे कार्य करतात.महिलांच्या सहभागामुळे गावाच्या राजकारणातील मुद्दे विकासाभिमुख होत आहेत. ७) महिला सक्षमीकरणासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने घेतलेला पुढाकार आणि भारत सरकारचे प्रयत्न यामुळे राजकीय सहभागातून महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेला चालना मीळत आहे.

शिफारशी:— १) राजकारणातील लिंगभेद दुर करण्यासाठी सत्ताधारी सरकारने आपल्या मंत्रीमंडळातील स्त्रीयांची संख्या वाढवून महिलांच्या राजकीय सहभागाला प्रोत्साहन द्यावे. २) महिलांना राजकीय क्षेत्रात काम करतांना पुरेशी सुरक्षा मीळेल याची काळजी सरकार आणि प्रशासनाने गंभीरतेने घेतली पाहिजे. ३) ग्रामीण भागातील ग्रामपंचायत सदस्य निर्वाचीत होताच त्यांना लगेच प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच ई प्रशिक्षण अनिवार्य करण्यात यावे. ४) महिला पदाधिकाऱ्यांना कुटूंबातून प्रोत्साहन मीळण्यासाठी त्यांच्या कुटूंबीयांचे मार्गदर्शन आणि समुपदेशन करणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची:—

१. *बंदूनी,शशिबाला.(२०१२). महिला सशक्तिकरण एवं अधिकार. दिल्ली: पूर्वांचल प्रकाशन.*
२. *गव्हाणकर, रोहिणी.(१९८६).मराठी स्त्री— शक्तीचे राजकारणी रूप. पुणे: आदित्य प्रकाशन.*
३. *घडियाली,रेहाना.(२००८). समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, पुणे: डायमंड पब्लिकेशन.*
४. *घोंगडे,अश्विनी. (२०१५). बदलाच्या शोधातली ग्रामीण स्त्री, दै. लोकसत्ता,दि. २९ ऑगस्ट २०१५.*
५. *जाधव,निर्मला. (२००८). 'भारतीय स्त्रीप्रश्न'आकलनाच्या दिशेने, औरंगाबाद: ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.*
६. *कवि, माधवी. (१९९९).महिला कल्याण आणि विकास, नागपुर: विद्या प्रकाशन.*
७. *महाकरकार, श्रीराम. (२००६).आदिवासी स्त्री व राजकारण, गडचिरोली : राजराजेश्वर बहूद्देशीय संस्था.*
८. *मेहेत्रे, स्मीता. (२०११).भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, नागपूर: साईनाथ प्रकाशन.*
९. *पवार, दीपक. (२०१३). महिलांचे राजकीय सक्षमीकरण, नागपूर: साईनाथ प्रकाशन.*
१०. *रासकर, भीम. (२०१५). बाई झाली सरपंच, सुधारला गावाचा प्रपंच, लोकसत्ता, १८ जुलै २०१५.*
११. *तांबे,सुनील. (२०१८). मी टू, दै.लोकमत, १४ ऑक्टोबर २०१८.*
१२. *ICSSR Sponsered National Seminar. (2013). 'PANCHAYAT RAJ SYSTEM; A Tool For Empowering Women and Empowering Democracy', Chandrapur: SRM College.*

भटक्या–विमुक्त समाजातील वर्तमान समस्या व परिवर्तन

डॉ. दिपक कृष्णराव पवार, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड कॉमर्स, नंदनवन, नागपूर. मो. ९४२३४०५८१६

प्रस्तावना:– भटक्या–विमुक्त समाजाला स्वातंत्र्यानंतर विमुक्त करण्यात आले. तरीही त्यांच्यावरील जन्मजात गुन्हेगारी जमात हा कलंक कायम राहीला. समाज, शासन आणि राजकारणी यांनी त्यांना उपेक्षित ठेवले. आजही त्यांना सामाजिक, आर्थिक भेदभावाचा सामना करावा लागतो आहे. पण झिरपलेले शिक्षण, बदललेली सामाजिक स्थिती, त्यांच्या जीवनात काहीशी आलेली स्थिरता, पोलिस प्रशासन आणि समाजाची बदललेली मानसिकता व थोडया फार शासनांच्या पोहचलेल्या विकास योजना यामुळे भटक्या समाजात परिवर्तन घडत आहे व नविन समस्यांचा सामना करावा लागत आहे.

भारतातील भटका वर्ग आदिवासी आणि अस्पृश्य समाजापेक्षा वेगळा आहे. त्याला घर ना दार, शेत ना गाव! त्याला वस्ती करुन एकाच ठिकाणी राहणे शक्य झाले नाही. पोटासाठी डोक्यावर बिऱ्हाड घेऊन त्यांना सदैव भटकंती करावी लागली. आजपर्यंत कोणाचेही लक्ष अपवाद वगळता या समाजाकडे गेलेले नाही. आणि लक्ष गेले तर त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता किंवा त्याच्या उत्थानाकरिता विशेष प्रयत्न झालेले नाहीत. मात्र युरोप खंडातील काही देशांनी अशा भटक्या टोळ्यांची भटकंती थांबवून त्यांच्या जीवनात स्थैर्य आणले आहे. नागरी जीवन जगण्याची संधी त्यांना उपलब्ध करुन दिली आहे[१].

भटका समाज :– 'भटक्या' समाजाची व्याख्या आणि व्युत्पत्ती या संदर्भात वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत. भारतीय समाजविज्ञान कोश खंड–३ नुसार 'कोणत्याही एके ठिकाणी स्थायी स्वरुपाची वस्ती न करता उपजिवीकेसाठी सतत आणि वरचेवर स्थलांतर करणाऱ्या जमाती म्हणजे भटक्या जमाती होय'[२]. तर The Royal Anthropological Institute of Great British यांच्या नुसार "Nomadic People are those who depend principally on hunting or collection for their supplies having no permanent addresss"[3] अर्थात भटके लोक प्रामुख्याने आपल्या जीवनोपयोगी वस्तू गोळा करण्याकरिता व शिकारीकरीता भटकत राहणारे असून त्याच्या समुहाला स्थिर असे कोणतेही ठिकाण नाही, ते सतत भटकंती करीत असतात. शाब्दीक अर्थाने 'भटका' हा शब्द ग्रीक भाषेतील 'Nomad' या शब्दापासून आला असून या शब्दाचा अर्थ 'Wandering in Search of Pasture' असा होतो. यावरुन असे म्हणता येते की, ज्यांचे स्वत:चे कायम स्वरुपाचे घर किंवा शेतजमीन नाहीत परंतु गुरांचे कळप आहेत असे लोक गुरांसाठी चराऊ कुरणांच्या शोधात सतत भटकत असतात. अशा भटकंती करणाऱ्या लोकांच्या समुहांना 'भटक्या' (Nomad) संबोधण्यात आले आहे.

'भटका समाज हा शब्द किंवा संकल्पना फक्त जंगलात भटकणाऱ्या लोकांसाठीच वापरला जाते असे नाही, तर एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत भटकंती करणाऱ्या लोकांसाठी सुध्दा वापरला जाते. खेचरे, गाढवे, तट्टू, घोडे, गायी, बैल, उंट इत्यादीवर आपली मालमत्ता लादून स्वत:च्या इच्छेनुसार किंवा परिस्थितीच्या दडपणामुळे चांगली उपजीविका होऊ शकेल अशा ठिकाणाच्या शोधात असे लोक सतत स्थलांतर करीत राहतात.

भारतात सद्यस्थितीत भटक्या–विमुक्तांच्या ७५० जाती–जमाती असून त्याच्या १६२० उपजाती आहे. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशीनुसार त्यामध्ये नव्याने १८ जातीचा समावेश करण्यात आला आहे. २००८ च्या मा. रेणके आयोगाच्या अहवालानुसार एकूण लोकसंख्येपैकी भटक्या विमुक्तांची लोकसंख्या अंदाजीत १३ कोटी होती. तर ती महाराष्ट्रात २ कोटीच्या जवळपास आहे. (कारण जनगणनेत भटक्या समाजाची जनगणना योग्यरित्या होत नाही त्यामुळे जनगणना अहवालात सुध्दा भटक्या–विमुक्तांची पूर्ण आकडेवारी सादर होत नाही.) सांख्यकी मंत्रालयाकडून केले जाणारे सर्वेक्षण आणि जनगणना किंवा अन्य कोणत्याही प्रकारे गोळा करण्यात येणाऱ्या माहितीच्या अभावी, भारतातील व पुरोगामी व प्रगतीशील समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील सरकारचे आणि लोकांचे लक्ष भटक्या आणि विमुक्ताकडे गेलेले नाही. इंग्रजांना जेरीस आणणाऱ्या व प्रतिकार करणाऱ्या लढवय्या समुदायाविरुध्द धसका घेऊन ब्रिटीशांच्या कायदा सुव्यवस्था कौन्सीलाचे सदस्य टी. व्ही. स्टीफन्स यांनी १८७१ ला गुन्हेगारी जमाती कायदा पास करुन अशा लढवय्या भटक्या समाजाच्या लोकांना गुन्हेगार घोषित करुन त्यांना सेंटलमेंटमध्ये डांबले. याप्रकारची बंदी त्यांच्यावर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र होऊनही आणि २६ जानेवारी १९५० ला संविधान लागू होऊनही कायम राहीली होती. देश स्वतंत्र झाला, देशातील इतर जनता स्वतंत्र झाली पण इंग्रजांनी सेटलमेंटमध्ये डांबलेले भटक्या समाजाचे लोक मात्र

पारतंत्र्यात होते. पण १९६० ला भारताचे पंतप्रधान मा. पंडित. जवाहरलाल नेहरु यांच्या ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर ११ एप्रिल १९६० ला त्यांची यातून मुक्तता करण्यात आली. त्यांची मुक्तता झाली ते विमुक्त झालेत परंतु त्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणतीही ठोस उपाययोजना न केल्यामुळे कोंडवाड्यातुन सोडलेल्या जनावरांप्रमाणे ते सैरभैर होऊन पळत सुटले, भटकत राहिले. जीवनचरितार्थाचा कोणताही व्यवसाय किंवा साधन नसल्यामुळे भुक भागविण्याकरिता चोरीमारी करणे व भीक मागणे हेच साधन झाले. गुन्हेगारीचा इंग्रजांनी शिक्का मारलेले स्वतंत्र भारतात सुध्दा पुनर्वसनाच्या अभावी नाईलाजाने गुन्हेगार झालेत. दुसरीकडे प्रगत व नागरी असणारा समाजाच्या व पोलिस प्रशासनाच्या मानसिकतेत किंवा डोक्यात ते १९५१ च्या कायद्याच्या प्रभावाने गुन्हेगारात होते. यामुळे प्रजासत्ताक गणतंत्र असलेल्या भारताच्या पण ११ एप्रिल १९६० ला स्वतंत्र झालेल्या विमुक्तांना व भटक्यांना त्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात भेदभावाचा सामना करावा लागत आहे. कायमचा ठावठिकाणा आणि स्थायी शासनमान्य व्यवसायाअभावी ते अद्यापही भटके जीवन जगत आहे. काही भटके—विमुक्त अलीकडे अनेक कारणांनी खेड्याच्या आडोशाला आणि शहरांच्या झोपडपट्टयांमध्ये स्थिर झाले आहे, पण तेही काही प्रमाणात (अंशत) भटके जीवन जगत असतात.

महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांची संख्या इतर राज्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात असून लातूर, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, कोल्हापूर, नागपूर, भंडारा, यवतमाळ, गोंदिया, चंद्रपूर व वर्धा या जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात आहे. भारताची स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाकडे वाटचाल होत असतांना आणि जगातील तिसरी महाशक्ती म्हणून भारत पुढे येत असतांना प्रगतीशील समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात सुध्दा अभ्यासाअंती असे दिसून येते की, भटक्यांची स्थिती अत्यंत विदारक आहे. पण पुर्वीच्या परिस्थितीत काही परिवर्तन घडून आलेले आहे.

भटक्यांमध्ये घडून आलेले परिवर्तन व वर्तमान स्थितीतील समस्या—

१) भटक्या विमुक्तांचे प्रगत समाजात फार कमी सम्मीलन झाले असून ते फक्त शहरी भागात आहे. आजही ग्रामीण भागात हा समाज प्रगत समाजाच्या दूर गावकुसाबाहेर राहतो आहे. भटक्या विमुक्तांचे प्रत्यक्ष विलगीकरण अद्याप कायम आहे.

२) भटका समाज काही प्रमाणात स्थायी झाला आहे, त्यापैकी जवळजवळ २५ टक्के पक्क्या घरात, ५० टक्के अर्धवट पक्क्या घरात तर १० टक्के झोपड्या किंवा पालात राहतो. यापैकी पक्क्या घरातील लोकांना स्वच्छतागृह वापरतात तर अर्धवट पक्क्या घरातील व झोपड्या आणि पालातील लोक अजूनही उघड्यावर शौचास जातात[४].

३) भटक्यांच्या पुर्वीच्या पारंपारीक व्यवसायात आता मोठया प्रमाणात बदल झाला असून फार कमी लोक पारंपारीक व्यवसाय करतात. पुर्वी भटका समाज गावगाडयाचा एक भाग होता, ते लोकांच्या धार्मिक श्रध्देचे वाहक होते. पण शिक्षणाचे सार्वत्रीकरण सर्वत्र झाल्याने लोक पूर्वीसारखे भावडे राहिलेले नाहीत. मरिआईचा देव्हारा, बहुरुप्याचे सोंग, भविष्य पाहणे इतकेच नव्हे तर वनऔषधी वर आता भरवसा ठेवत नाही. दूरदर्शन वरुन सर्व प्रकारचे खेळ प्रत्यक्ष बघत असल्याने डोंबाऱ्याच्या खेळाचे आकर्षण राहिले नाही. तर रामायण—महाभारत आणि इतर धार्मिक मालिकांमुळे धार्मिक सोंगे घेणाऱ्या बहुरुप्याचे समाजाला आकर्षण राहिलेले नाही. त्यामुळे ते आता उदरनिर्वाहाकरिता इतर कामे करीत आहेत. विशेष म्हणजे भिक मागून उपजिवीका करण्याचे प्रमाण भटक्या विमुक्तात बरेच कमी झालेले आहे. आणि जे अशा प्रकारचे व्यवसाय करीत आहे ते समाज माध्यमांच्या अफवांना बळी पडून मारल्या जात आहेत. जमावाच्या हिंसाचाराला सामोरे जात आहे. त्यामुळेसुध्दा ते वेगवेगळया प्रकारची सोंगे घेऊन भिक मागू शकत नाहीत.

बंजारा, गोसावी, राजपूत, भामटा, मांग—गारुडी व पारधी समाजातील लोक स्वत:ची शेती करीत आहे. पण भटक्या समाजातील लोक मोठया प्रमाणात मोलमजूर व रोजंदारी करीत आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्सेसच्या अहवालानुसार महाराष्ट्रातील भटक्या—विमुक्तांतील ५८ टक्के मोलमजूरीवर, १० टक्के शेतकरी आणि ५ टक्के सेवा क्षेत्रात आहेत.[५]

४) शहरी भागात स्थायी झालेल्या भटक्या समाजाने काही नागरी गरजेच्या व्यवसायात पदार्पण केले आहे. त्यात स्टोव्ह, कुकर व मिक्सर दुरुस्ती, भंगार गोळा करणे, भांडी देऊन केस गोळा करणे, चौकामध्ये किंवा इतर गर्दीच्या ठिकाणी खेळणी किंवा इतर वस्तू विकणे, टिकल्या, पिना, बेन्टेक्सची दागिणे विकणे, बंगल्यातील किंवा घरातील झाडांची कटाई करणे, विहीरीतील गाळ काढणे अशी साहशी कामे करतात. या नागरी गरजेच्या व्यवसायात मात्र बऱ्यापैकी उत्पन्न मिळत असते पण व्यसनाधिनता आणि भविष्यातील नियोजनाचा यामुळे मिळणारे उत्पन्नाचा वापर योग्य प्रकारे होत नाही.

५) भटक्या समाजात उदरनिर्वाहाकरिता चोरी व उचलेगिरी केली जायची पण थोडाफार शिक्षणाचा

शिरकाव, जागृकता आणि सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, उदरनिर्वाहाकरिता इतर शोधलेले पर्यायी व्यवसाय व समाजाचा दबाव यामुळे यात मोठा बदल आणि सकारात्मक बदल झाला आहे. काही अपवाद वगळता पोलिस यंत्रणेची व समाजाची जन्मजात गुन्हेगारी जमात ही मानसिकता राहिलेली नाही.

६) शैक्षणिकदृष्ट्या अजूनही भटका समाज हा मागासलेलाच आहे. शालेय शिक्षणसंस्था मध्ये नोंदणी झालेले केवळ ६२ टक्के आहे. त्यातील प्राथमिक शिक्षण घेतलेले ४२ टक्के, माध्यमिक ३३ टक्के, उच्च माध्यमिक १२ टक्के आणि पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले १३ टक्के आहेत.

ज्यांनी शाळेत नाव दाखल केले आणि शाळा सोडली त्यात अर्ध्या मुलांनी गरीबीमुळे तर उर्वरित मुलांनी शिक्षणाबाबत जागृतता नसल्याने लग्न, शिक्षणात आवड नाही, आणि भाषेची अडचण व शाळेत मिळालेली सापत्न वागणूक ही कारणे आहेत[६].

७) या समाजाची एक मोठी समस्या आरोग्याची आहे. त्यांच्यात अस्वच्छतेमुळे चर्मरोग, दातांचे विकार मोठया प्रमाणात आहेत. अलीकडे शहरी जीवनाशी आलेला संपर्क आणि टी.व्ही., मोबाईल, चित्रपट यातील अश्लीलता यामुळे तरुण मुलांचे इतरत्र लैंगिक संबंध. पण जागृकता नाही. यातून लैंगिक रोगांचे प्रसरण देखील वाढले आहे. इतर अनेक आजार जसे रक्तदाब, मधुमेह इत्यादी आहेत पण आरोग्यविषयक जागृतता नसल्याने शासनाच्या आरोग्यविषयक सुविधा अपुऱ्या असल्याने आणि खाजगी आरोग्यविषयक सुविधा परवडत नसल्याने आरोग्याची गंभीर समस्या भटक्या समाजात निर्माण झाली आहे.

८) भटक्या विमुक्तांकरिता शासनाच्या योजना खूप आहेत. पण त्या त्यांच्यापर्यंत पोहचत नाही म्हणजे धरणातून कॅनालने पाणी निघते पण शेतात जाऊन सिंचन होत नाही अशी आहे. शासनाचे अधिकारी व कर्मचारी या समाजापर्यंत योजना पोहचत नाही किंवा उदासीन आहेत. योजना पोहचून लाभ घेण्यासाठी समाजाचे वास्तव्य स्थिर नाही. योजना घेण्याकरिता लागणारे रेशनकार्ड, आधारकार्ड, जातीजमातीचा दाखला इत्यादी कागदपत्रांचा अभाव आहे. योजना मिळण्याकरिता लाभार्थ्याने स्वत:कडून काही रक्कम भरावी लागते, ती नाही. या व इतर कारणांमुळे भटक्या–विमुक्तांच्या विकासाच्या योजनांचे सिंचन होत नाही.

तथापी अलीकडे शिक्षणाचा काही प्रमाणातील प्रसार, जागृतता, स्थिरता, सामाजिक–राजकीय चळवळीचा प्रभाव, भटक्यांप्रती कणव असणारे इतर समाजातील सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्थामुळे शासकीय योजना भटक्या समाजापर्यंत पोहचून त्याचा लाभ त्यांना मिळत आहे त्यामुळे भटक्या समाजाची परिस्थिती बदलत आहे.

एकूणच वर्तमान स्थितीत भटक्या–विमुक्त समाजातील या समस्या आणि त्यांच्यातील झालेले परिवर्तन आहे

संदर्भ –

१. *राठोड प्रा. मोतीराम, विमुक्त – (भटक्या – विमुक्तांचे ऐतिहासिक सिंहावलोकन), कर्मवीर किशनराव राठोड, अमृतमहोत्सव समिती, वसंतनगर, ता. मुखेड, जि. नांदेड–१५, २००६, पृष्ठ क्र. १८८.*

२. *गर्गे स.मा. (संपादक), भारतीय समाज विज्ञान कोश, खंड–३, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे–३४, २००७, पृष्ठ क्र. २९२.*

३. *पवार डॉ. दिपक पवार, पारधी समाजाचे अंतरंग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्र. १५.*

४. *डॉ. थोरात सुखदेव, गुन्हेगारीचा शिक्का, भटकंती शाप मिटावा, दैनिक लोकसत्ता संपादकीय, शुक्रवार, २२ मे, २०१८, पृष्ठ क्र. ७.*

५. *तत्रैव : पृष्ठ क्र. ७.*

६. *तत्रैव : पृष्ठ क्र. ७.*

संदर्भ ग्रंथ–

१. *माने लक्ष्मण, विमुक्तायन (महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकीत्सक अभ्यास), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–२१.*

२. *पवार डॉ. दिपक पवार, पारधी समाजाचे अंतरंग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*

जागतिक तापमान वाढीचे संभाव्य धोके व उपाययोजना

प्रा. बाळकृष्ण कारु रामटेके, समर्थ महाविद्यालय लाखनी जि. भंडारा. मोबाईल नंबर ९९२३३४०७७२

प्रस्तावना :— पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान सतत वाढत राहण्याच्या प्रकाराला तापमान वाढ असे म्हटले जाते. कारण त्याला आपण ग्लोबल वॉर्मिग असे म्हणतो. पृथ्वी तापमानाचा हा प्रकार काही नवीन नाही. पृथ्वीच्या अस्तित्वापासून म्हणजे ४.४६ अब्ज वर्षापासून अनेकदा ती तापलीही आहे आणि थंड ही झाली आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान १५ अंश सेल्सिअस आहे. या तापमानात कमी—जास्त प्रमाणात बदल होतच आला आहे. अनेकदा हे तापमान कमी देखील झाले आहे. मात्र मागील ३० ते ३५ वर्षापासून हे तापमान वाढू लागले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे इंधनामुळे होणारे प्रदूषण होय.

कोळसा, पेट्रोल अन्य नैसर्गिक वायू यांचा इंधन म्हणून होणारा उपयोग कितीतरी पटीने वाढला आहे. त्यांच्या ज्वलनामुळे कार्बन डाय ऑक्साईड (co2) कार्बन मोनॉक्साईड (co) आणि इतर काही घटक हवेत मिसळतात. या प्रदूषणकारी वायूंना हरितगृह वायू म्हणतात. त्यामुळे पृथ्वीच्या तापमानात वृध्दी झाली आहे. गेल्या शतकात पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या तापमानात ०.६ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. प्रदूषणावर नियंत्रण न ठेवल्यास २०८० पर्यंत ५ अंश सेल्सिअसची वाढ होण्याची शक्यता आहे असा इशारा आयपीसीसी ने दिला आहे.

डॉक्टर नित्यानंद सिंह (हवामान शास्त्रज्ञ) यांच्या मते, १९४१ ते १९७९ या काळात प्रदूषण आणि हरितगृह वायूंचे प्रमाण वाढतच होते. परंतु त्यावेळी पृथ्वीचे तापमान मात्र कमी झाले होते त्यावेळी ग्लोबल कुलिंगची वैर्श्विक शीतलीकरणाची चर्चा केली जात होती. १९८० नंतर पृथ्वीचे तापमान वाढू लागले आहे. आणखी काही वर्षांनी या स्थितीत बदल होऊ शकतो आणि तापमान कमी होऊ लागेल. गेल्या दहा (१०) हजार वर्षात पृथ्वीचे तापमान १४ अंश सेल्सिअस ते १६ अंश सेल्सिअस यांच्या दरम्यान आहे.

आयपीसीसी— IPCC (Inter Govermental Panel on Climate Change) च्या अहवालानुसार १९२ सदस्य राष्ट्रांपैकी ११३ शासनाचे प्रतिनिधी आणि ६२० जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ यांनी एकत्र येऊन जागतिक तापमान वृद्धीविषयी एकवाक्यता निर्माण केली. गेल्या साडेसहा लाख वर्षापेक्षा Co, No, मिथेन या हरितगृह वायूंचे वातावरणातील प्रमाण जास्त वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे पृथ्वीचे तापमान खूपच वेगाने वाढू लागल्याचे गेल्या ५० वर्षाच्या आकडेवारीतून दिसून येते. हवामानात प्रचंड प्रमाणात बदल घडून येत आहे. त्यामुळे संभाव्य तापमान वाढीचे धोके टाळता येणार नाहीत.

१) आर्क्टिक प्रदेशातील बर्फ वितळून सागराची पातळी अनेक मीटर्सनी वाढण्याची शक्यता आहे.

२) भारतातील मुंबईसारख्या मोठ्या महानगरांना प्रचंड धोका आहे. सागराचे पाणी शहरांना बुडवेल आणि परिणामी लक्षावधी लोक विस्थापित होतील. (मुंबईत २६ जुलै २००५ रोजी एका दिवसात ९४४ मि.मी. पाऊस पडल्यामुळे १००० पेक्षा जास्त लोक बळी गेले व (१७००) सतराशे कोटींपेक्षा अधिक नुकसान झाले.)

३) मालदीव आणि बांगलादेश यांना जबरदस्त फटका बसेल. त्याचबरोबर मॅग्रोव्ह किंवा तिवरांच्या जंगलांचा नाश होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४) उष्ण महासागरी पाण्यामुळे प्रवाळांचा नाश होऊन आम्लीकरणाद्वारे शिंपल्याचाही नाश होऊ शकतो.

५) जगातील उंच उंच पर्वतराशीतील हिमनदया वितळल्यामुळे त्रिभुज प्रदेशातील जल संतुलन बिघडून शेतीचे नुकसान होऊ शकेल.

६) (२०३५) दोन हजार पस्तीस पर्यंत हिमालयातील हिमनदया पूर्णपणे वितळत जाऊन नाहीशा होतील. त्यामुळे हिमालयातील परिस्थितीकी (Ecosystem) तंत्रावरच नव्हे तर पठारी आणि मैदानी प्रदेशावर मोठे संकट येण्याची शक्यता आहे. कारण भारतातील गंगा—यमुनासारख्या मोठ्या उत्तरदिशीय नदयातील बारमाही पाणी या हिमनदयातूनच येते.

७) हिमनदया वितळल्यामुळे मोठे त्रिभुज प्रदेश पुरात बुडतील नंतर पाण्याची पातळी कमी झाल्यावर मैदानी भागात राहणाऱ्या लोकांना प्रचंड जलसंकटांचा सामना करावा लागेल.

८) भारतीय उपखंडामध्ये पडणारा हिवाळी पाऊस देखील कमी होऊन जलसाठा कमी होईल आणि पाणी प्रश्नांची गंभीरता वाढेल. भारतात पाण्याची दरडोई उपलब्धता वार्षिक १८२० घनमीटर वरून २०५० साली ११४० घनमीटर इतकी म्हणजे ३० टक्के कमी होईल त्यामुळे देशातील जनता पाण्याच्या अरिष्टाने त्रस्त होईल.

९) शेतीवरील परिणाम सर्वात गंभीर असेल. उत्पादकता पुढील ३० वर्षात ३० टक्केनी कमी होईल.

१०) हिवाळ्यातील तापमान ०.५ अंश सेल्सिअस ने वाढल्यास गहू उत्पादनात हेक्टरी ०.४५ टन म्हणजे १७ टक्के घट होईल. भारताबाबतही असेच घडेल.

११) समुद्रपातळी २१ व्या शतकाच्या शेवटी ४० सेंटिमीटरने वाढल्यामुळे किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या लक्षावधी लोकांची घरे पुरात जातील. भारतातील ५० दशलक्ष लोकांना याचा फटका बसेल.

१२) वाळवंटीकरणाचा वेग वाढून नैसर्गिक गवताळ प्रदेश कमी होईल. देशातील ५० टक्के जैवविविधतेला प्रचंड धोका असून १.५ अंश सेल्सिअस ते २.५ अंश सेल्सिअस तापमान वाढ झाल्यास २५ लाख प्राणी व वनस्पती जीवन कायमचे नष्ट होईल.

१३) मानवी आरोग्यावर दुष्परिणाम दिसून येतील. डासांमुळे पसरणाऱ्या रोगांचा आणि जलजन्य आजारांचा फैलाव होईल. (डेंगू , हिवताप हे रोग फैलावतील कारण डासांसाठी हे वातावरण पोषक असणार आहे.)

जागतिक तापमान वाढीवरील उपाय :— जागतीक तापमान वाढ नियंत्रणात आणायची असेल तर वातावरणातील कार्बन डॉय ऑक्साईड वायू कमी करण्यासाठी उपाय योजावे लागतील. झाडे लावणे व वाढविणे. सध्याचे कार्बन डॉय ऑक्साईडचे वातावरणातील प्रमाण कमी करावयाचे असेल तर त्याची निर्मिती कमी करणे आवश्यक आहे. जंगलाखालची जमीन सध्याच्या तीन ते पाच पट वाढवायला हवी. दुसरे म्हणजे कार्बन डायऑक्साईड निर्माण होताच, तो पकडून सागरात सोडण्याची व्यवस्था करायला पाहिजे किंवा याचे दुसऱ्या एखाद्या अविघटनशील संयुगात रूपांतर करावे लागेल. सागरात मोठ्या प्रमाणावर लोहसंयुगे ओतली तर वानसप्लवंकांची (प्लॅस्टॉन वनस्पती) वृध्दी होऊन त्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण कमी व्हायला मदत होईल.

सध्याच्या युगात कोणताही देश उर्जेचा वापर कमी करून आपली प्रगती खोळंबून घेणार नाही. विकसित देशांचा ऊर्जेचा वापर हा विकसनशील देशांपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. या देशांपुढील मोठा प्रश्न आहे, तो म्हणजे ऊर्जेचा वापर कसा कमी करायचा जेणे करून हरितवायूंचे प्रमाण कमी होईल. भारत, चीन या देशात दरडोई वापर कमी असला तरी वापराचे प्रमाण हे दरवर्षी लक्षणीयरीत्या वाढत आहे. काही वर्षातच हे देश जगातील इतर देशांना हरितवायूंच्या उत्सर्जनात मागे टाकतील. जगातील इतर विकसनशील देशांच्या बाबतीत हेच लागू पडते. म्हणून सध्या ऊर्जेचा वापर कमी करून जागतिक तापमानावर मात करता येणे कठीण आहे. कार्बन डायऑक्साईड या मुख्य हरितवायूला वातावरणात सोडण्यापासून रोखणे, ज्यामुळे वातावरणात कार्बन डाय आक्साईड सोडला जाणार नाही व ऊर्जेचे उत्पादन खोळंबणार नाही. मध्यम स्वरुपातील उपायांमध्ये वाहनांसाठी व वीजनिर्मिती प्रकल्पांसाठी नवीन प्रकारचे इंधन शोधून काढणे, कायमस्वरूपी उपायांमध्ये तंत्रज्ञ विकसीत करणे, जेणेकरून मानवाचे खनिज व निसर्गातील अमूल्य ठेव्यांवर अवलंबून राहणे कमी होईल.

१) कार्बन डॉय—ऑक्साईड रोखणे व साठवण :— ऊर्जा निर्मिती करिता मग ती कारखान्यातील कामांसाठी असो की, घरगुती विजेसाठी असो, वाहने चालविणाऱ्यांसाठी असो, यासाठी प्रामुख्याने कोळसा व पेट्रोल यांचे ज्वलन केले जाते. या ज्वलनातून कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन होते. सध्या ज्वलन प्रक्रिया व कार्बन डाय ऑक्साईड वातावरणात जाण्यापासून रोखणाऱ्या प्रक्रियांचा विकास चालू आहे. या प्रक्रियांमध्ये प्रामुख्याने कोळशाचा ज्वलनानंतर त्यातील कार्बन डाय ऑक्साईड वेगळा करायचा व वेगळा झालेला कार्बन डाय—ऑक्साइड भूगर्भातील मोकळया खाणींमध्ये साठवून ठेवायचा. कार्बन डाय ऑक्साईड वेगळे करण्यासाठी विविध तंत्रे आहेत.

२) नवीन प्रकारची इंधने :— कार्बन डाय ऑक्साईडला ज्वलनानंतर रोखणे व त्याची साठवण करणे हे वीज निर्मिती प्रकल्पांमध्ये शक्य आहे. कारण तेथे मोठ्या प्रमाणावर (एकूण ४० टक्के) प्रदूषकांची निर्मिती होते. ३३ ते ३७ टक्के कार्बन डायॉक्साईडचे उत्सर्जन हे वाहनांमुळे होत असते. परंतु वीज प्रकल्पा प्रमाणे त्याचे उत्सर्जन केंद्रीय नसल्याने प्रत्येक वाहनातील co2 रोखून त्याची साठवण करणे महाकठीण काम आहे. यावर उपाय म्हणजे नवीन प्रकारची इंधने शोधणे, जेणेकरून या इंधनातून कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन होणार नाही.

३) हायड्रोजन —एक प्रभावी इंधन :— हायड्रोजन ही एक प्रभावी इंधन आहे. हायड्रोजनच्या ज्वलनाने फक्त पाण्याची निर्मिती होते. पाण्याचे विघटनातून पेट्रोलियम पदार्थातून तसेच जैविक पदार्थांमधून हायड्रोजनची निर्मिती करता येते. सध्या हायड्रोजनचे नियोजन कसे करायचे याचे उत्तर शास्त्रज्ञ शोधत आहेत. कारण हायड्रोजन हा हलका वायू असल्याने त्याला केवळ दाबाखाली साठवता येते. अतिशय ज्वालाग्राही असल्याने याचे इंधन म्हणून वापरण्यावर बंधने आहेत.

४) जैविक इंधने :— शेतीत निर्माण होणाऱ्या उत्पादनातून निर्माण होणाऱ्या इंधनांना जैविक इंधने म्हणतात. ही इंधने प्रामुख्याने सूर्यप्रकाशापासून होणाऱ्या

प्रकाश संश्लेषणातून तयार होतात. या इंधनापासून कार्बन डाय ऑक्साईडची निर्मिती अटळ असली तरी आपणास खनिज तेलांपासून अथवा कोळशांपासून कार्बन डाय ऑक्साईडची निर्मिती टाळता येते. अशी इंधने co2 न्यूट्रल मानण्यात येतात. भाताचे तूस, उसाचे चिपाड ही काही जैविक इंधनाची उदाहरणे आहेत.

५) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत :— सध्या अपारंपरिक ऊर्जा स्रोतांच्या निर्मितीवर बहुतांशी देशांचा भर आहे. अपारंपारिक स्त्रोत म्हणजे ज्यात खनिज संपत्तीचा वापर केला जात नाही. असे स्त्रोत जलविद्युत, पवन चक्की, सौर ऊर्जेचा विविध प्रकारे वापर बायोगॅस निर्मिती, शेतीमालाचे वायू करण, भरती—ओहोटी पासून जलविद्युत इत्यादी हे काही अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत आहेत.

६) आर्थिक, कायदेशीर व सामाजिक उपाय :— १) उत्सर्जनावर कर :— हरितवायूंचा जादा उत्सर्जनावर कर लावणे हा उत्तम उपाय आहे. हा कर सरळपणे इंधनावर लावला जाऊ शकतो. किंवा इंधनाच्या उपयोगानंतर एखाद्या उद्योगाने किती हरितवायूंचे उत्सर्जन केले याचे गणित मांडून केला जाऊ शकतो. ज्यादा कराने इंधनाच्या वापरावर बंधने येतील असा अंदाज आहे, व उद्योगधंदे नविन प्रकारच्या हरित वायू रहित इंधनामध्ये जास्त गुंतवणूक करतील असा अंदाज आहे. मात्र ज्यादा कराने अर्थव्यवस्था संथ होण्याची शक्यता आहे. २) निर्बंध लादणे :— हरितवायूंच्या उत्सर्जनांची पर्वा न करणारे देश अथवा त्यांच्या उद्योगधंदयावर आर्थिक निर्बंध लादणे, जेणेकरून त्यांना हरितवायूंची पर्वा करणे भाग पडेल, असे काहीसे उपाय करणे शक्य आहे.

७) कार्बन क्रेडीट :— विकसित देशांमध्ये क्योटो प्रोटोकॉल अंतर्गत हरितवायूंचे उत्सर्जन कमी करण्यासाठी देशांतर्गत मोठे बदल करावे लागत आहेत. विकासाची भूक प्रचंड असतांना असे बदल काही देशांसाठी दिवाळखोरीचे कारण बनू शकते. तसेच सामाजिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. यासाठी क्योटो प्रोटोकॉलमध्ये क्लीन डेव्हलपमेंट मेकॅनिझम (CDM) अंतर्गत कार्बन—क्रेडिट ची सोय केली आहे. या कलमानुसार विकसित देशांनी अविकसित देशात विकास केल्यास त्याचा फायदा त्यांना मिळतो. उदाहरणार्थ आफ्रिकेतील एखाद्या देशात जपान ने पवनचक्यांची निर्मिती केली व त्या देशाच्या विकासास हातभार लावला, तर पवनचक्यांनी जेवढे हरितवायूंचे उत्सर्जन वाचवले ते जपान या देशाच्या खात्यात जमा होते. अथवा एखादा आजारी उद्योग समूह जर कारखाने बंद करत असेल, तर त्या कारखान्याकडून होणारे उत्सर्जनाचे प्रमाणपत्र इतर देश अथवा इतर कंपनी विकत घेऊ शकते. याला कार्बन क्रेडिट म्हणतात.

निष्कर्ष :— देशातील खनिज तेलजन्य इंधनाचा मागणी वेगाने वाढत आहे. (बाईक, कार इत्यादी वाहने गरजेपुरतेच वापरावीत. सहसा एस.टी.ने प्रवास करावा. वीजनिर्मिती कार्यक्षमता आणणे त्याचे वितरण व खप सुधारणे.) विजेवर चालणारी उपकरणे आवश्यकतेनुसार गरजेपुरती वापरावीत सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा चिरंतर ऊर्जा पर्यायांचाही वापर करावा. जलसंवर्धन पाण्याचा गरजेनुसार वापर करावा. उद्योगातून येणारे हरितगृहवायूंचे उत्सर्जन नियंत्रणात आणणे त्याचबरोबर फॉरेस्ट (वन) निर्माण करणे हे जर वेळेवरच केले तर परिस्थितीवर मात करता येईल. सर्वसामान्य लोकांचा असा गैरसमज असतो की, प्रदूषण हे एकतर रासायनिक शेतीमुळे आणि कारखानदारीमुळे होते. त्यात आपला काहीही सहभाग नाही त्यामुळे पर्यावरण रक्षण करणे हे आपले काम नाही त्यावर चर्चासत्र, उपयोजना करणे हे वैज्ञानिक संशोधनाचे काम आहे. या विषयातून ते स्वत:ला अलिप्त ठेवतात. आज प्रत्येक जण प्रदूषणाला हातभार लावत आहे. तोच हातभार पर्यावरण संरक्षणासाठी लावावा. अगदी मुंगी इतका किंवा खारीचा सहभाग प्रत्येकाने दयावा. या सर्व गोष्टी जपण्यासाठी आपल्याला वेळेवर योग्य ते उपाय करायला हवेत अन्यथा आपला भविष्यकाळ आपल्या हातातून निघून जाईल.

संदर्भ ग्रंथसूची:—

१. *ढमढेरे डॉ.एस.व्ही (२०१६) भारतीय जलसंपदा : महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात डायमंड पब्लिकेशन्स पुणे.*
२. *घारपुरे डॉ. विठ्ठल (२०१२) हवामानशास्त्र : पिंपळापुरे ॲण्ड क.पब्लिशर्स, नागपूर*
३. *मुसमाडे डॉ. अर्जुन मोरे , डॉ.ज्योतीराम (२०१४) : आपत्ती व्यवस्थापनाचा भूगोल डायमंड पब्लिकेशन्स पूणे.*
४. *शिक्षण संक्रमण : मार्च २०१७*

बचत गटाच्या संकल्पनेतील महिला सशक्तीकरण

डॉ. गणेश बहादे, सा. लो. प्र. कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा मो. ९०४९६७३१६४

प्रस्तावना:— समाजातील मध्यमवर्गिय व दुर्बल घटकांना आशेचा किरण म्हणून स्वंयसहाय्यता गटाकडे पाहिले जात आहे. बचत ही नविन संकल्पना नसली तरी जगात फंड, भीशी अशा वेगवेगळया स्वरूपात बचत करण्याची पध्दत चालू होती. दक्षिण अमेरीका व आफ्रिका भागात (roting saving and credit association) हा बचतीचा प्रकार भीशीसी संबंधीत होता. आशिया खंडातील मागासलेले राष्ट्र म्हणून बांगलादेशाकडे पाहिले जाते. या देशात फार मोठया प्रमाणात दारिद्रय होते. या देशातील दारिद्रय दुर करण्यासाठी चितगांव विद्यापिठात प्राध्यापक असणारे व जगप्रसिध्द बांगलादेश ग्रामिण बॅकेचे प्रणेते व नोबेल पुरस्काराचे मानकरी डॉ. महंमद युनूस यांनी स्वयंसहाय्यता गटाची सुरूवात 'जोबरा' या गावापासून केली. भारतामध्ये स्वंयसहाय्यता गटाची चळवळ 'म्हैसूर रिसेटलमेंट ॲड डेव्हलोपमेंट एजन्सी' (मायगडा) या संस्थने सुरू केली. त्यांनी 'credit management group' निर्माण केले नाबार्डने स्वंयसहाय्यता गटांना आर्थिक क्षेत्रात कायदेशीर मान्यता देऊन बचत गटांच्या चळवळीला सुरूवात केली. या चळवळीत महिलांचा सहभाग वाढत गेला. बचत गटाकरीता स्वयंसेवी संस्थांचे फार मोठे योगदान असून 'सधन', 'धन फाऊंडेशन' आणि 'आसा' या सारख्या संस्था बचत गटाचे काम करतात.

बचत गटाची संकल्पना — महाराष्ट्रात महिला बचत गटाची चळवळ जोमाने सुरू असुन ग्रामिण भागात नवनविन बचत गट सुरू होत आहे. त्याव्दारे आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दिशेने होणारी महिलांची वाटचाल ही अत्यंत स्फूर्तीदायक आहे. स्वयंसहाय्यता गट, बचत गट, काटकसर व कर्ज गट अशा वेगवेगळया नावांनी बचत गट ओळखल्या जातो. ''ज्या गटात दहा ते विस सभासदांची निवड करून नियमीत बचतीतून एकमेकांच्या गरजा, अडचणी व जिवन मुल्य उंचविण्यासाठी कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य केले जाते, उद्योगधंदा उभारला जातो. तसेच सर्वानूमते निर्णय घेवुन संघटन शक्ति वाढविली जाते. परस्पर सहकार्य, सहभाग, नेतृत्व व कर्तव्य, विचारांची देवाणघेवाण सातत्यपूर्ण व प्रयत्नशिल सदस्यांच्या समुहाला बचत गट असे म्हणतात.''

बचत गट : कार्यपध्दती — १) महिला बचत गट — आपल्या दारिद्रयामुळे अनेक अडचणी निर्माण झालेल्या असतात. अशा अडचणीच्या वेळी परस्परांना बचतीतून अर्थसहाय्य करणे, आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून स्वत:चे भांडवल तयार करणे या हेतूने बचत गटाची स्थापना केली जाते. अशा संघटीत झालेल्या महिलांची शक्ती आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी एकमेकांच्या सहकार्याने तयार झालेल्या गटाला बचत गट असे म्हटले जाते. आपण स्वत: बचत करून त्या बचतीव्दारे कर्ज घेवून एखादा छोटा—मोठा व्यवसाय करावा आणि स्वावलंबी व्हावे हा गट स्थापन करण्यामागचा उद्देश असतो.

२) बचत गटाची निर्मिती — कोणत्याही कार्याची सुरूवात करतांना त्यांच्यात प्रेरणा निर्माण करणे आवश्यक असते. त्यासाठी कोणीतरी पूढे येवून गावगाडयातील महिलांना एकत्र करून गटाची निर्मिती केली जाते. एकाच गावातील समविचारी आणि आर्थिक परिस्थिती समान असणाऱ्या दहा ते विस महिलांचा गट स्थापन करून विशीष्ट नाव देवून त्या गटाच्या नावाने आर्थिक व्यवहार केले जातात.

३) बचत गटातील प्रवेश — बचत गट हा महिलांचा असल्यामुळे फक्त महिलांनाच प्रवेश दिला जातो. यामध्ये जात, धर्म, वर्ण आणि आर्थिक स्थितीचा विचार न करता प्रत्येक गरजू महिलेला गटात प्रवेश दिला जातो. प्रवेश घेणारी महिला त्या गावातील रहिवासी असावी लागते. बचत गटाचा सभासद होण्यासाठी कोणावरही बळजबरी केली जात नाही. प्रत्येक महिला सभासदाकडून एकदाच नोंदनी शुल्क घेतले जाते.

४) बचतीची पध्दत — गटातील सर्व महिला सभासदाची बचतीची रक्कम सारख्या प्रमाणात असते, दरमहा गटाने ठरविलेल्या तारखेला, ठिकाणी आणि निश्चित वेळी सर्व सभासदानी एकत्र येवून आपआपली बचतीची रक्कम जमा करावी लागते. दरमहा बचत गटाच्या बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक असून सोबत बचतीचे पासबुक आणुन जमा केलेल्या बचत रक्कमेची नोंद करून घेणे ही जबाबदारी सदस्यांची असते. त्यास गटप्रमुख जबाबदार नसतो. बैठकीच्या दिवशी गटाच्या अध्यक्षा जमा झालेल्या बचत रक्कमेचा तपशील सर्व सभासदांना समजावून सांगत असतो. बचतीला सहा महिने पुर्ण झाल्यानंतरच कर्ज देण्यास सुरवात केली जाते. जमा झालेली रक्कम जवळच्या बॅकेत गटाच्या नावाने असलेल्या खात्यात ठेवली जाते.

५) कर्ज देण्याची पध्दत — ज्या महिलेने सतत सहा महिने बचतीची रक्कम जमा केली असेल अशाच महिलांना कर्ज दिले जाते. गटातील महिलेस कर्ज दयावयाचे की नाही याचा अंतिम निर्णय सर्व सभासद घेतात. कर्ज दिलेल्या सभासदांना कर्जावरील व्याज दरमहा वसुल केले जाते. कर्जाची रक्कम जास्तीत जास्त सहा समान टप्यात वसुल केली जाते. कर्जाचा टप्पा व व्याज वेळेवर न भरणाऱ्या महिलेकडून ठरविलेला दंड वसुल केला जातो. नियमित बचत करणाऱ्या सर्व मासिक बैठकांना हजर असणाऱ्या सभासदांना कर्जाविषयी प्राधान्यक्रम दिला जातो. तसेच सभासदाच्या गरजेनुसार कर्जाचे वाटप केले जाते.

६) व्याजदार आणि दंड — प्रत्येक महिला बचत गट वर्तमान परिस्थितीचा विचार करून व्याजाचा दर ठरवित असतो. सध्यास्थितीचा विचार करता महिला

बचत गटाच्या व्याजाचा दर म्हणून दरमहा दरशेकडा दोन रूपये असून एकूण नफा बचतीच्या प्रमाणात सर्वांना समप्रमाणात वाटला जातो. परंतु बचतीची रक्कम ठरविलेल्या तारखेस न देणाऱ्या गटातील महिला सभासदांकडून दंड म्हणुन पन्नास रूपये किंवा ठरल्याप्रमाणे घेतला जातो.

७) सभासदत्व रद्द करण्याबाबत — गटातील ज्या महिलेस आपले सभासदत्व रद्द करायचे आहे. अशा महिलेनी लेखी स्वरूपात आपला अर्ज गटाकडे सादर करणे आवश्यक असून घेतलेले कर्ज व व्याज सभासदत्व रद्द करण्याआधी पूर्ण परतफेड करणे बंधनकारक असते. सभासदत्व रद्द झाल्याबरोबर आपले नोंदणी कार्ड गटाकडे जमा करणे आवश्यक असते. सभासदत्व रद्द झाल्यावर एक महिण्याचे जमा रक्कम व्याजासह सभासदास परत केली जाते. तसेच सतत चार महिने वेळेवर बचत न करणाऱ्या महिलेचे सभासदत्व रद्द केले जाते. ग्रामिण भागातील विषमता आणि दारिद्रय कमी करण्यासाठी तसेच महिलांचे सबलिकरण होण्यासाठी शासनाने अनेक विकास योजनांची निर्मिती केली. १ एप्रिल १९९९ पासून सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेला प्रारंभ झाला. या योजनेतर्गत स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती करण्यात आली. गेल्या दहा ते पंधरा वर्षात स्वयंसहाय्यता गटाव्दारे महिलांचे विविध स्तरावर सबलिकरण होत आहे.

१) आर्थिक सबलिकरण — महिला समाज राष्ट्राच्या विकासातील एक महत्वपूर्ण अंग असून त्यांचकडे दूर्लक्ष करून आर्थिक प्रगती करू शकणार नाही. महिलांच्या कामाला केंद्रबिंदु मानूण त्यांचा कामाचा, त्यागाचा विचार केल्यास सबलिकरणास सूरूवात होईल. महिला बचत गट म्हणजे त्यांच्या आर्थिक सक्षमिकरणाची फार मोठी ताकद आहे. बचत गटाच्या माध्यमातून उद्योग, प्रशिक्षण, भांडवल उभारणी, विक्री व्यवस्था, यंत्रसामुग्री, कच्चामाल, कर्जफेड इत्यादी गोष्टींचा सल्ला व मार्गदर्शन त्यांना दिल्या जाते. त्यामुळे महिलांची निर्णय क्षमता, कार्यक्षमता, व्यवस्थापन कौशल्य, रोजगार निर्मिती इत्यादी गोष्टी बचत गटाव्दारे प्राप्त होते. बचत गटाच्या माध्यमातून असहाय्य व दारिद्रयाचे जिवन जगणाऱ्या महिलांच्या आयुष्यात क्रांतीकारक बदल होत आहे.

२) सामाजिक सबलिकरण — समाजातील चालीरीती, प्रथा, परंपरा या सामाजिक बंधनामुळे महिलांचे खच्चीकरण मोठया प्रमाणात होत आहे. या निरर्थक सामाजिक बंधनामुळे स्त्री अबला बनली आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक समाज सुधारकांनी प्रबोधनाच्या माध्यमातून सामाजिक बंधने शितील करण्यास सुरूवात केली होती. परंतु आज महत्वाचा घटक म्हणून महिला बचत गटाची भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे. बचत गटातून महिला एकत्र येवू लागल्या. गावातील चावडीवर, मंदिरात एकत्र येवून गाव प्रश्नावर चर्चा करू लागल्या. गटामुळे स्त्री—पुरूष समानता निर्माण होवू लागली. गटामुळे हुंडाबळी, महिला अत्याचार, अंधश्रध्दा अशा वाईट सामाजिक प्रथांना आळा बसू लागला. महिला साक्षर होवू लागल्या, जनजागृती होवू लागली, बचत गटामुळे विचारांची आदानप्रदाण होवू लागली. महिला स्वत:च्या प्रश्नासंबंधी मोर्चे, आंदोलने करू लागल्या आपल्या हिताकरीता गटामार्फत चळवळी उभ्या करीत असल्याचे दिसून येते.

३) राजकीय सक्षमिकरण — बचत गटाच्या माध्यमातून महिला राजकारणात सहभागी होत आहे. गटामध्येच संघटन व्यवस्थापन, निर्णय क्षमता आणि राजकारणातील डावपेच इत्यादी गुण आत्मसात करीत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परीषद इत्यादी पंचायतराज संस्थांचा कारभार सुरळीतपणे पार पाडीत आहे. बचत गटामुळे राजकीय दबाव गट तयार होत असून त्यांना राजकिय व्यासपिठावर सन्मानाने वागविले जात आहे. अशा प्रकारे समाजाच्या, प्रगतीच्या व परिवर्तनाच्या दिशेने महिलांचे राजकीय सक्षमिकरण होत असून ही एक प्रभावी बाब ठरलेली आहे. सबलीकरण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यासाठी अथक परीश्रमाची गरज आहे. महिला सर्व क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने कार्य करीत असली तरी, तिच्या सक्षमिकरणात समाजाचा होत असलेला विरोध, चारीत्र्यावर संशय, शैक्षणिक भेदभाव, महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोण, कौटूंबिक स्थान, काम व वेतनात तफावत अशा अनेक अडचणी निर्माण होत आहे. असे असले तरी या अडचणींवर बचत गटाच्या माध्यमातुन त्यावर मात करता येऊ शकते.

निष्कर्ष — बचत गट म्हणजे आर्थिक दृष्टया कमकुवत स्तरातील महिलांच्या सबलिकरणाची एक यशोगाथाच आहे. महिला सक्षमिकरणामध्ये महिला बचत गटाची फार मोठी भूमिका आहे. डॉ. महंम्मद युनूस यांनी बांगलादेशातील दूर्बल घटकातील महिलांसाठी बचत गटाला प्रारंभ केल्यामुळे भारतातील ग्रामिण समाजातील अनेक शतकापासून रूढी, परंपरेच्या साखळीत जखडलेल्या महिला बचत गटामुळे सक्षम होत आहे. बचत गटामुळे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात योग्य भूमिका पार पाडत असून महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग, क्षमतावृध्दी होत आहे. बचत गटामुळे गावात दारूमुक्ती चळवळ, ग्राम संरक्षण दल, तंटामुक्ती अध्यक्ष अशा विविध क्षेत्रात तिचे योगदान असून ती सक्षम होत असल्याचे दिसून येत आहे.

संदर्भ ग्रंथ सूची —

१. *योजना मासिक — डिसेंबर २००४, अंक ५ वा.*
२. *मुलानी एम. यु. २००६, महिला स्वंयसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लीकेशन पुणे.*
३. *बर्वे पांडुरंग, २०१६, राष्ट्र उभारणीत महिलांचे योगदान — संपादकीय, अक्षरवेल प्रकाशन पुर्णा*
४. *चौधरी राजेश, २०१६, महिला बचत गट — मार्गदर्शिका, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव, पुणे.*

समाजशास्त्र: समस्या व आव्हाने

डॉ. कमलकिशोर इंगोले, रा. सुं. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा मो. ८५५१८८०७४६

मानवाविना विज्ञान की विज्ञानाविना मानव हे एक न सुटणारे कोडे आहे. कारण विज्ञान हे मानवी जीवनासाठी दुधारी शस्त्र आहे. कारण मानवी समाजासाठी कोणतेही विज्ञान हे कधी शाप तर कधी वरदान ठरले आहे. मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर अनेक शोध लावून अनेक विज्ञानाची निर्मिती ही मानवी कल्याणासाठी केली आणि आज असे दिसते की, जगातील सर्व विज्ञाने मानवी समाजाचे अविभाज्य अंग बनले आहे. कारण विज्ञानाशिवाय मानवी जीवनाची संकल्पना मांडणे अत्यंत कठीण आहे. हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही. त्यातून समाजशास्त्र तर अपवाद राहूच शकत नाही. कारण समाजशास्त्र हे मानवी समाज व मानवी वर्तनाचे अध्ययन करणारे विज्ञान आहे. परंतु आज मात्र समाजशास्त्र विषयातील सामाजिक समस्या व भविष्यातील सामाजिक आव्हाने हा एक मोठा संशोधनाचा विषय आहे. ज्यावर अनेक सामाजिक विचारवंत आपले बौध्दिक मंथन करीत आहे. जगातील काही विचारवंत समाजशास्त्राला शास्त्र किंवा विज्ञानाचा दर्जा देत नाही. पण जगातील काही विचारवंत समाजशास्त्राला शास्त्र किंवा विज्ञानाचा दर्जा देतात. त्याचबरोबर जगातील बहुसंख्य विचारवंताचा असा सूर आहे की, जोपर्यंत मानवी वर्तनाच्या समस्यांचे योग्य निराकरण होत नाही तोपर्यंत भविष्यकाळातील मानवी समाजासमोर सामाजिक आव्हाने कायम राहतील. ज्यामुळे सकल मानवी समाजाची व राष्ट्राची प्रगती साधने कठीण आहे. एवढेच नाही तर यातून सामाजिक अस्थिरता निर्माण होवून नवराष्ट्रनिर्मितीची संकल्पना करणे चुकीचे होईल. यासाठी सर्वप्रथम मानवी वर्तनाचे अध्ययन होणे अनिवार्य आहे. ज्यावर राष्ट्रहित व राष्ट्रकल्याण अवलंबून आहे. एकूणच सकल मानवी समाजाचे कल्याण जर साधायचे असेल तर समाजशास्त्राची भूमिका फार महत्वाची आहे.

जगामध्ये असा एकही देश नाही तिथे मानवी समाज नाही व जगात असा एकही मानवी समाज नाही तिथे सामाजिक समस्या नाही. आणि या सामाजिक समस्येचे सखोल अध्ययन करण्यासाठी समाजशास्त्रासारखा दुसरा पर्याय जगात उपलब्ध नाही कारण समाजशास्त्र हे एक असे विज्ञान आहे की जे मानवी समाजाचे अनुभवात्मक, अन्वेषनात्मक, वर्णनात्मक व प्रयोगात्मक अध्ययन करून निष्कर्ष मांडते व त्यावर योग्य उपाययोजना सूचविते. ज्या प्रमाणे नैसर्गीक विज्ञानात प्रयोगात्मक पध्दती अमलात आनली जाते. त्याचप्रमाणे समाजशास्त्र हे नैसर्गीक शास्त्राच्या सर्व कसोटयांचे/पध्दतीचे काटेकोर पालन करते. तरीही काही विचारवंत समाजशास्त्राला पूर्ण विज्ञान किंवा शास्त्राचा दर्जा द्यायला तयार होत नाही. याचे कारण असे की, समाजशास्त्रात प्रयोगात्मक पध्दतीचा फार कमी अवलंब केला जातो. तसेच त्यातील निष्कर्ष हे त्रिकालाबाधित वस्तुनिष्ठ नसतात. हे जरी अनुभव व तर्काच्या आधारावर खरे असले तरी माझ्या मते समाजशास्त्राएवढी विशाल प्रयोगशाळा जगात कोणत्याही विज्ञानाकडे नाही. जसे इतर विज्ञानाची प्रयोग शाळा ही चार भिंतीच्या आत मर्यादित संसाधानात बंदिस्त आहे. परंतु समाजशास्त्राची प्रयोगशाळा एवढी विशाल व महाकाय आहे की, ज्या प्रयोगशाळेची व्याप्ती मोजणे कठीण आहे. व त्याचबरोबर या प्रयोग शाळेतील संसाधनावर प्रयोग करणे एवढे सोपे नाही. कारण समाजशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय हा मानवी समाज आहे. आणि मानव समाजाची व्याप्ती प्रचंड आहे. जसे तिथे जिथे मानवी समाज आहे तिथे तिथे समाजविज्ञान आहे व जिथे जिथे समाजविज्ञान आहे तिथे तिथे समाजविज्ञानाची प्रयोगशाळा आहे. अर्थातच संपूर्ण जग हे समाज विज्ञानाची प्रयोगशाळा आहे. असे म्हटले तरी ही अतिशयोक्ती होणार नाही.

आजच्या कालखंडात समाजविज्ञानासमोर अनेक आव्हाने आहेत. कारण समाजात दिवसेन दिवस अनेक नवीन सामाजिक समस्या निर्माण होत आहे. या नवनिर्मित समस्यामुळे भविष्यातील सामाजिक संगठन व नवराष्ट्रनिर्मित सारखे नवनवीन आव्हाने समाजविज्ञाना समोर आहेत. जर मानवी समाजातील सामाजिक संगठन अखंडित ठेवायचे असेल तर सामाजविज्ञानाच्या अध्ययनाची अनिवार्यता नाकारता येत नाही. यासाठी समाज विज्ञानाने सर्व सामाजिक समस्यांच्या मुळासी जावून त्याची वस्तूनिष्ठ कारणे शोधून त्या समस्यावर उपाययोजना सचवणे आवश्यक आहे. आज समाजामध्ये लोकसंख्या, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, मध्यपान, अंमली पदार्थाचे सेवन, वृध्दाची, दारिद्राची, बेरेजगारीची, भ्रष्टाचार, काळा पैसा, मागासवर्ग व दुर्बल घटक, अंधश्रध्दा, व वेश्यावृत्ती या सारख्या पारंपारिक सामाजिक समस्याचे मोठे आव्हान असतांना शेतकरी आत्महत्या, भूकबळी, हुंडाबळी, आतंकवाद, नक्षलवाद, प्रादेशिकवाद, कुपोषण, जातीय

हिसाचार, आरक्षण चळवळी, प्रदूषण, धार्मिकअसंतोष, पांढरपेशीय गुन्हेगारी, शिक्षणाचे खाजगीकरण, महागाई, दूरचित्र वाहिण्याची राजकीय मक्तेदारी, स्त्री बलात्कार, स्त्री अत्याचार (मी—टू) या सारख्या नव्या समस्यांचे वर्तमान स्वरूप गंभीर आहे. या समस्यांचे वस्तूनिष्ठ अध्ययन करणे ही सर्वात महत्वाची समस्या समाजविज्ञानासमोर आहे. मानवाने अनेक विज्ञानाची निर्मिती ही मानवी कल्यानासाठी केली तसेच मानवाने विज्ञानाचा उपयोग करून अनेक शोध लावले. आज विज्ञान हे मानवी जीवनाचा प्राणवायू आहे. कारण प्रत्येकाला विज्ञाना शिवाय जगणे कठीण आहे. कारण मानवी जीवनाचा प्रत्येक भाग विज्ञानाशी जोडला आहे. आणि प्रत्येक विज्ञानातील वस्तूनिष्ठता व सत्याचा शोध घेणे विज्ञानासमोर एक मोठे आव्हान आहे.

आज दुरचित्रवाहीन्या, राशीभविष्य, वास्तुशास्त्र, आरोग्यविषय तक्रारी त्वरीत दुर करण्यासाठी औषधे, ग्रहणे यांचे आरोग्यावरील परिणाम व त्यासाठी आवश्यक अनुष्ठाने इत्यादीविषयीचे कार्यक्रम तासनतास प्रसारन करीत असतात. हे अहोरात्र चालणारे कार्यक्रम विज्ञान व उपचारशास्त्राचे नियम तर धुडकावतातच त्याचबरोबर बेफाम अंधश्रध्दांना खतपाणीही घालतात. यामुळे समाजमनावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव असणारा वर्गच या कार्यक्रमांचा हिस्सा असल्याचे निदर्शनास येते. (उदा. सत्यसाईबाबा, असाराम बापू, राधे मॉ) देवधर्माच्या नावाने अवडंबर माजविणारे—ढोंगी पाखंडी बाबा, बुवा महाराज. यांचे प्रस्थ सातत्याने वाढत असून त्यांच्या भक्तीमंडळीतही विलक्षण वाढ होत आहे. त्यामूळे आजच्या विज्ञानयुगातील अंधश्रध्दा ही समाजाला लागलेली फार मोठी कीड आहे. व अश्या समाजातील प्रसारित होणाऱ्या अंधश्रध्देचे अध्ययन करणे लोकांना जागरूक करणे हे समाजविज्ञानासमोर एक मोठे आव्हान आहे.

समाजजीवनात विवेक तार्कीकता आणि तारतम्य यांना तिलांजली दिली गेली आहे. आणि त्यामुळे सर्वत्र दांभिकता व फसवणुक याचे साम्राज्य वाढले. याचे नुकतेच एक उदाहरण म्हणजे दिल्लीमधील बुरारी भागातील संतनगरमधील एकाच कुटूंबातील सदस्यांनी सामुहीक आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्या कुटूंबातील सर्व सदस्य ६ दिवस दरोरोज आत्महत्येचा सराव करत होते. त्या कुटूंबातील एक सदस्य कोणाच्या तरी आदेशावरून या सर्व घटना मध्ये डायरी लिहीत असे व त्या डायरितून असे लक्षात आले की, मोक्षप्राप्तीसाठी त्यांनी ही आत्महत्या केली. व अत्यंत महत्वाचे म्हणजे आत्महत्या करणारे सदस्य हे अशिक्षीत नसुन सुशिक्षीत होते. त्यांच्याकडून असा प्रकार घडवुन येने ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे.

देव आहे की नाही यावर चर्चा करत बसण्यापेक्षा आज या बुवा बाबांच्या टोळयांचे वाढते प्रमाण व त्यांचा दिवसेंदिवस वाढत चाललेला राजकीय हस्तक्षेप याला वेळीच पायबंद घालणे गरजेचे आहे. कारण व्यापारी टोळया देवभक्तीच्या नावावर जनतेला समोहीत करून त्यांच्या भावना भडकावुन गैरफायदाप उडवून स्वत: गडगंज होताना दिसतात. ही आधुनिक समाजातील एक सामाजिक समस्या असून समाजविज्ञानासमोर एक मोठे आव्हान आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. पानसरे व कलबुर्गी पत्रकार गौरी लंकेश या सुधारकांचा बळी घेवुन अत्यंत रौद्स्वरूप धारण करीत आहे. यामुळे सुजाण, सुस्कंकृत, सुशिक्षीत मंडळींनी याकडे वेळीच लक्ष देवुन आपण नेमके कशाचे पोषण करतो याचे भान ठेवायला हवे. अंधश्रध्दा आणि बुरसटलेल्या रूढी — चालीरीतीच्या मागे धावणाऱ्या जनतेला विवेकयुक्त व वस्तुनिष्ठ आणि तार्कीक विचार रूजवण्याची सामाजिक जबाबदारी पार पाडणे ही समाजविज्ञानासमोर एक आव्हान आहे. जादु — तंत्र नरबळी तसेच भूतपिशाच्च या संबंधीत अंधविश्वास पसरवणे व कृती करणे या कृतीचा इतर प्राणी जीवनावर विपरीत परिणाम होणे म्हणजे अंधश्रध्दा होय.

आजच्या विज्ञानयुगातील इंटरनेट हे नवे तंत्रज्ञान हे एक मायाजाल आहे. आजकालच्या आधुनिक व गतिमान जावनाला त्यांचा जितका उपयोग तितकेच ते धोकादायकही ठरू शकते. हे आता उघड झाले आहे. त्यात माहिती आहे ज्ञान विज्ञान आहे. खेळ आहेत, तुम्हाला हवे नको ते तुमच्या एका क्लिकवर उपलब्ध आहे. परंतु त्यात तुम्हाला शारीरिक व मानसिकदृष्टया पंगु करून तुमचा जीव घेण्यापर्यंतचे धोकादायक ऑनलाईन खेळ देखील आहे. याचा समाजाने विचार करणे ही आज काळाची गरज ठरली आहे. ब्लु व्हेल आणि मेमी यासारख्या इंटरनेट गेम्स माहितीच्या महाजालात लहान मुले अडकु लागली आहेत.

ब्लु. व्हेल चॅलेज, किकी चॅलेंज, मेमी चॅलेंज पास आऊट चॅलेंज, सॉल्ड ॲन्ड ऑइस चॅलेंज फायर चॅलेंज यासारखे एक ना दोन अनेक गेम्सला मुले बळी पडली आहेत. अर्थातच लहान मुलाचे आरोग्य धोक्यात आहे. औद्योगिकीकरणामुळे आई—वडील घराबाहेर असल्याने शहरातील मुले या गेम्सच्या अधिक आहारी जाऊ लागले आहेत. ब्लु. व्हेल नावाच्या खेळाने कितीतरी मुलांचे बळी घेतले हा खेळच जीव देण्यास भाग पाडत आहे. भारतात या खेळावर बंदी घालण्यात आली खरी परंतू इंटरनेटच्या सर्व्हर भारताबाहेर असल्याने आणि एकदा हा खेळ डाऊनलोड केला की तो डिलीट किंवा अनइन्स्टॉल करता येत नाही. १२ ते १६ वर्षाच्या मूलांच्या हाती

मोबाईल आल्यामुळे पालक आणि मुले इंटरनेटच्या महाजालात ऑनलाइन अडकली जात आहेत. या महाजालात कोण चांगले कोण वाईट. कोण धोकादायक हे समजण्याचे वय नसलेली मुले आपोआप ओढली जात आहे. याला जबाबदार कोण ? हा प्रश्न भेडसावत आहे. या प्रकारची मोहीम चालवण्याची विचारमंथन करण्याची आणि प्रबोधन करण्याची वेळ आली आहे. हे प्रकार असेच सुरू राहिले तर युवकांची एक पीढी उधवस्त होईल की काय ? अशी भीती निर्माण झाली आहे. देशात औदयोगिक क्रांती अशा विविध पातळयांवर क्रांती झाली. आता गरज आहे. वैज्ञानिक क्रांतीची विज्ञान शाप की बरदान ? यावर नेहमीच चर्चा होत. याचे खरे उत्तर म्हणजे विज्ञानाला माणसाने शाप बनवले आहे. विज्ञानाबाबच्या असंख्य गैरसमाजामुळे ते किचकट वाटु लागते. अणुऊर्जा हे त्याचे एक उदाहरण अणुऊर्जेची ओळख आपल्याला अणुबॉम्बमुळे झाली यामुळै आपण ऊर्जानिर्मीतीमधील अणुचे महत्व विसरू लागलो. व त्यातून आपला विनाशच होईल, अशी मनात निर्माण झाली. असे गैरसमज दुर करणे गरजेचे आहे.

सामाजिक विकास साधण्यासाठी वैज्ञानिक प्रगती शिवाय पर्याय नाही वैज्ञानिक प्रगती म्हणजे केवळ संशोधन नव्हे, तर प्रत्येकाला विज्ञान रूपी जिवन जगता आले पाहिजे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाला विज्ञानाचे वरदान आहे. याची जाणीव झाली तरच वैज्ञानिक क्रांती शक्य आहे. यासाठी आपल्याला दैनंदीन जीवनातील विज्ञानाचे महत्व जाणता आले पाहिजे. त्यात शालेय शिक्षणातील बदल, समाजातील विविध घटकांची विज्ञानाकडे बघण्याची मानसीकता बदलने असे मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. आपण विज्ञानाविषयी बेफीकीर का असतो ? इतर देशातील सार्वजनिक जबाबदारीची श्रीमती आपल्याकडे का नसावी ? शाळांमधील शिक्षक पुस्तकाबाहेरचे शिकवीत का नाही. पुस्तकाबाहेर जाऊ पाहणाऱ्याला अटकाव का होतो. अशा शिक्षण पध्दतीतून मुलांवर विचार करण्याचे संस्कार कसे होणार तसेच शिक्षक पध्दतीत आमुलाग्र बदल झाल्याशिवाय आपले विदयार्थी चौकटीबाहेरचा विचार करू शकणार नाही. आणि तशा विचारासाठी पोषक वातावरणही तयार होणार नाही. हे सर्व बदलण्यास समाजातील विविध सदस्यानी एकत्रीत येवून हे आव्हान पेलावयाचे आहे व याची सूरवात स्वत:पासून होणे गरजेचे आहे.

वैज्ञानिक क्रांती घडवायची तर तिला शैक्षणीक क्रांतीची जोड हवी. त्यातुनच विकास साध्य करणे शक्य आहे मात्र सध्या आपली विज्ञानाशी फारकत झाली आहे. भविष्यात संपन्न जीवन जगण्यासाठी वैज्ञानिक आणि शैक्षणीक क्रांती करावी लागेल. यासाठी सरकार, प्रशासन व शैक्षणीक संस्थांसोबत समाजातील प्रत्येक घटकाने विशेष योगदान द्यायला हवे जसे आपल्या आजुबाजूला असंख्य घटना घडत असतात. त्याच निरीक्षणही आपल्याकडुन करून नळकत घडत असते. आपल्याला लाबुन एखादया ठिकाणी धुर दिसला तर तिथे एखादया ठिकाणी आग पेटली असावी हा तर्क आपण धरतो. तो आपल्याला पुर्वीच जाणवलेली आग आणि धुर यातील कार्यकारणसंबंधामुळे त्याला आपण काही दिव्याचा राक्षस चमत्कार किंवा अंर्तज्ञान म्हणत नाही.

अनुमानानंतरचा पुढचा टप्पा म्हणजे प्रचितीची किंवा अनुभवांची पध्दती होय जसे जर कूणी आगीत हात घातला की चटका बसतो असा प्रत्यक्ष अनुभव आपण घेतो. आणि कोणी जर आग अगदी थंडगार असते असं म्हटलं तर त्याला मुर्खात काढतो. कारण ते प्रत्यक्ष अनुभवलेलं सत्य असतं. पण योग्यशिक्षणा अभावी किंवा वशिल्याअभावी आपल्याला नोकरी मिळत नाही. हे जेव्हा लक्षात आलं असते तरीही एखादी सर्व समस्या सोडवणारी अंगठी ध्यायला, आपण चटकन तयार होतो. समजा हजार सुशिक्षीत बेकारांनी आज या प्रकारच्या अंगठया घेतल्या तरी त्यातल्या ५० टक्के लोकांना तरी नोकऱ्या मिळतील का ? हा एक प्रश्न आहे. कारण ही गोष्ठ मुळातच पूर्णपणे अवैज्ञानीक आहे जसे एके काळी देवीच्या कोपामुळे देवीचा आजार (अंगावर फोड येणे) ही श्रध्दा होती. देवी, काजण्या, गोवर, मलेरिया, कॉलरा इ. संसर्गजन्य आजार विषाणु व जंतुमुळे होतात हे विज्ञानाने तपासले देवीचा कोप ही अंधश्रध्दा विज्ञानाने झुगारून दिली.

कोणताही निष्कर्ष हा प्रयोगाने तपासून बघता आला पाहिजे हाच तर विज्ञानाच्या मुख्य आहे. म्हणजेच आपल्यांला ते सिध्द करता आले पाहिजे. यासाठी अध्यात्मवादयांनी विज्ञानाचे आभार मानले पाहिजेत. म्हणजेच याचे तात्पर्य असे की, वैज्ञानिक दृष्टीकोन हा ज्ञानाचा पाया असावा. श्रध्देचा निकष ज्ञान असावे अज्ञान नाही म्हणजेच थोडक्यात योग्य श्रध्दा तपासाण्या व सोबतच चूकीच्या श्रध्दांना त्याग करावा.

थोडक्यात सांगायचे झाल्यास मानवी समाजाच्या अंनत सामाजिक समस्या असून या सामाजिक समस्यांचे योग्य अध्ययन करणे हे सामाजिक विज्ञानासमोरचे फार मोठे आव्हान आजच्या आधूनिक काळात आहे.

संदर्भ ग्रंथसूची —

१. *आगलावे प्रदिप, २०१५, समाजशास्त्र, नागपूर, साईनाथ प्रकाशन.*
२. *लोटे रा. ज., १९९९, भारतातील सामाजिक समस्या, नागपूर, पिंपळापूरे प्रकाशन.*
३. *मायी सुनील, १९९८, भारतीय सामाजिक समस्या, नागपूर, अंशुल पब्लिकेशन.*
४. *माने शैलजा, २०११, भारतीय समाज : संरचना व गतिमानता, पुणे, निराली प्रकाशन.*
५. *www.googal.in (Wikipedia)*

जागतिकीकरणाचा आदिवासी समाज जीवनावर झालेला परिणाम

मनोहर भी. येरकलवार, मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय, नागपूर. मो. ८६२५९७७४५८

आज जगाने एकविसाव्या शतकात पदार्पण केले आहे.या शतकाच्या सुरूवातीपासूनच जागतिकीकरणाची प्रक्रिया ही झपाट्याने वाढतांना दिसून येते. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राचा विकास अगदी जलद गतीने होतांना दिसून येत आहे. या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मानवाने स्वत:ला एवढे वाहून घेतले आहे की, तो जगातील प्रत्येक क्षेत्रामध्ये सहभागी होण्याचा कसोशिने प्रयत्न करत आहे. त्यामुळे तो नेहमी जगातील प्रत्येक गोष्टीला आपलेसे करण्याच्या प्रयत्नात असतो. परंतु या नादात तो आपले असणारी जवळची माणसे, पशु, पक्षी, प्राणी, वनस्पती, निसर्गसौंदर्य व नैतिक मूल्ये यांच्यापासून फारच लांब जात असल्याचे दिसून येते. कारण हा जागतिकीकरणाचा त्याच्यावर झालेला प्रतिकूल परिणाम होय.

आजच्या ह्या धावपळीच्या युगामध्ये प्रत्येक व्यक्ती स्वत:ला सिद्ध करण्यासाठी धावपळ करत आहे. यामूळे त्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्र हे धावते झाले आहे. त्यामध्ये त्याचे साम, दाम, दंड, भेद, व्यवहार, जीवन, मृत्यु यामध्ये गती आलेली आहे. म्हणून मानवी जीवन हे वाऱ्यासारखे झाले आहे. अशा या प्रतिकूल परिस्थितीने मानवी जीवनाला अशा प्रकारे वेढलेले आहे की, तो यापासून स्वत:ला सावरू शकत नाही. प्रत्येक मानवाला जीवनामध्ये अनेक प्रकारच्या सुख—सुविधांची आवश्यकता वाटते. पण ज्यांच्यामूळे त्यांना हे सर्व मिळतात त्या जीवलग माणसांनाच (आई, वडील, पालक) विसरत चालला आहे. त्यामूळे आजचा हा मानव भौतिक दृष्टीने जरी सुखी वाटत असला तरी, तो मानसिक दृष्टीने फारच दु:खी, कष्टी, नैराश्यमय जीवन जगत असल्याचे दिसून येते. त्या दु:खाचे मुळ कारण म्हणजे भौतिक सुखसुविधांची खैरात घेवून आलेली ही जागतिकीकरणाची प्रक्रिया होय. यामध्ये व्यक्ती स्वत:ला जास्तीत जास्त भौतिक सुख सुविधेमध्ये रममाण होण्यातच आपले पूर्ण आयुष्य घालवत आहे. भौतीक सुखाच्या मागे धावण्यातच तो स्वत:वर दु:खाचा डोंगर ओढवून घेत आहे. "वैश्वीकरण अनियंत्रित है। जिसकी एक विशेषता यही है कि, इसके विरुद्ध जन आंदोलन प्रतिबंधित है। सबसे बड़ी बात है कि, अमीर देशों और गरीब देशों के बीच पूँजी प्रवाह अत्यंत असंतुलित है। पिछले दो दशकों में अमीर देशों ने गरीब या विकसित देशों को ५० से ८० अरब डॉलर की सहायता की है। पर इन्हीं देशों से ५०० से ८०० अरब डॉलर अवैध रूप से वसूल किए गए हैं। इसका अर्थ यह भी हुआ कि अवैध दिए गए डॉलर के बदले में अवैध तरीके से ही १० गुणा डॉलर खींच लिए गए हैं।"[१]

जागतिकीकरणामुळेच बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त व्यापार करण्याची संधी मिळते. त्यामुळे जागतीक दर्जाचे भांडवलदार ज्या देशामध्ये खर्च कमी व नफा जास्त मिळतो त्या ठिकाणी भांडवल गुंतवून नफा कमावण्याच्या मागे लागतात. त्यामुळे फुटीरतेची बिजे पेरली जाऊन त्या देशांमध्ये गरिबी, बेरोजगारी, मागासलेपणा, गून्हेगारी यामध्ये वाढ होते. त्यामुळे विकासाची उर्मी दडपली जाते. त्यातूनच व्यक्तीला सामाजिक हितापेक्षा स्वत:चे हित महत्वाचे वाटते. त्यामुळे अरेरावी, हुकूमशाही व एकाधिकारशाहीमध्ये वाढ होते. त्यातून विजय माल्या, निरव मोदी सारखे उद्योगपती देशातील अर्थव्यवस्थेला खोल गर्तेत टाकून देशाबाहेर सुखरूप जातात व तेथे आनंदाने जीवन जगू लागतात. हा जागतिकीकरणाचा नकारात्मक परिणाम आहे.

जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंना किंवा घटकांना जागतिक स्तरावर स्थान प्राप्त करून देण्याची प्रक्रिया होय. या संकल्पनेला 'विश्वची माझे घर' या अर्थाने उपयोगात आणली गेली आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांची देवाणघेवाण होते. तसेच व्यापार, पर्यटन, विदेशी गुंतवणूक व भांडवलाचे हस्तांतरणही होते .

भारतामध्ये जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला खऱ्या अर्थाने १९९१ सालापासून सुरुवात झाली. एकेकाळी भारतातून सोन्याचा धूर निघत होता. त्याच देशांमध्ये आज जागतिकीकरणाच्या माध्यमातून अनेक कुटीरउद्योगांचा ऱ्हास होताना दिसून येतो. शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी उध्वस्त होताना दिसून येतात. जंगल कापला जातो व त्या ठिकाणी मोठमोठ्या जागतिक कंपन्या स्थापन होत आहेत व इथला शेतकरी भूमीहीन, बेरोजगार होत आहे. प्रदूषणाची समस्या वरचेवर वाढत चालली आहे. अनेक आदिवासींच्या जमिनी, जंगल हस्तांतरित केल्या जात आहेत. त्यामुळे सोन्याचा धूर निघणाऱ्या या देशांमध्ये आज आदिवासी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या चितेचा धूर निघताना दिसून येतो.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील ७० टक्के लोक हे शेतीवरच जीवन जगत असतात.

त्यातल्या त्यात ९० टक्के आदिवासींच्या उपजीविकेचे साधन म्हणजे शेती व जंगलसंपत्ती आहे. परंतु जागतिकीकरणाच्या माध्यमातून आदिवासींच्या जगण्याचा मुख्य आधार असलेली शेती व जंगलाचा नायनाट होऊन, त्या ठिकाणी विदेशी कंपन्यांचे टोलेजंग इमारती व कारखाने स्थापल्या जात आहेत. त्यामुळे आदिवासींच्या स्वयंपूर्ण असणाऱ्या अर्थव्यस्थेला ग्रहण लागले असल्याचे दिसून येते. त्यामुळे आदिवासी जमातींचे संपूर्ण जीवनच उद्ध्वस्त होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर इंग्रजांची गुलामी संपूष्टात आली, परंतु स्वतंत्र भारताची आर्थिक स्थिती डबघाईस आली, त्यातून सावरणे फारच जिकरीचे व कठीण वाटत होते व भारत सरकार समोर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. त्या समस्या सोडविण्यासाठी भारताला इतर विकसीत देशांची मदत घेणे फारच गरजेचे होते. त्यामुळे "शासनाने १९९१ च्या जून—जुलै महिन्यात रिझर्व बँकेकडील ६७ किलो टन सोने विकून परकीय चलन मिळविले."[२] परंतु त्यातूनही भारतीसमोरील प्रश्न सुटले नाहीत. त्यामुळे भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले व भारतीय बाजारपेठ विदेशातील कंपण्यासाठी खुले करण्यात आले. त्यामुळे भारतातील अनेक छोटे—मोटे व्यवसाय व कुटीरउद्योग बंद पडू लागले. गरीब—श्रीमंत दरी वाढू लागली. अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण व स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या आदिवासी जमातींनाही देशोधडीला लावले.

जागतिकीकरणाचा आदिवासी समाज जीवनावर झालेला प्रभाव :—

१. सांस्कृतिक प्रभाव :— जागतिकीकरणाच्या माध्यमातून विश्व एक कुटुंब बनलेले आहे. त्यामुळे धार्मिक व सांस्कृतिक बंधने शिथिल झालेली आहेत. त्यातूनच रेडिओ, टीव्ही, सिनेमा, फेसबुक, व्हाटसअप, ट्विटर यासारख्या माध्यमातून आदिवासींची संपन्न असणारी संस्कृती हळूहळू बिघडत चालली आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक जबाबदारी व मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊन एक नैतिकतेची पोकळी निर्माण झालेली आहे. जाहिरातीच्या धंद्यामुळे लैंगिकता एका अभूतपूर्व टोकाला जाऊन पोहोचलेली आहे. नफा मिळविण्याच्या आशेने स्त्रियांच्या शरीराचे विचित्र पद्धतीने प्रदर्शन होतांना दिसून येत आहे. अशा प्रकारच्या प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून आदिवासी जमातीचे तरूण आपली संस्कृती विसरून विकृत मार्गाकडे लागल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे आदिवासींच्या पवित्र संस्कृतीचे विकृतीकरण होताना दिसून येते.

२. **भाषिक परिणाम :—** जागतिकीकरणाच्या माध्यमातून आदिवासींच्या भाषेवरही त्याचा आघात होताना दिसून येतो. कारण आदिवासींच्या भाषेला लिपी नसल्यामुळे ते लिखित स्वरूपात उपलब्ध होत नाही. दुसऱ्यांना आदिवासींच्या भाषेचा काही उपयोग होत नसल्यामुळे ते त्या भाषेचा वापर करत नाहीत. परंतु आदिवासींना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सामील होण्यासाठी व विकासाच्या प्रक्रियेत सामील होण्यासाठी इतर प्रमाण भाषेचा स्वीकार करणे गरजेचे आहे. म्हणून इंग्रजी व हिंदी भाषेच्या प्रभावामुळे त्यांची असणारी मुळ भाषा लयास जात आहे. जर आदिवासींना मुख्य प्रवाहात यायचे असेल तर इतरांची भाषा शिकणे हा घटक फारच महत्त्वाचा आहे. त्यामुळे त्यांची असणारी मुळ भाषा ते विसरत चालले आहेत.

३. **शैक्षणिक परिणाम :—** जागतिकीकरणाच्या माध्यमातून आजच्या काळात जागतिक दर्जाची भाषा म्हणून इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयांना असे वाटत आहे की, इंग्रजी भाषा आपल्यालाही आली पाहिजे, त्यामुळे इंग्रजी भाषेच्या शाळा खाजगी तत्वावर चालवल्या जात आहेत व त्या शाळेत प्रवेश घेणे म्हणजे प्रतिष्ठेचे मानले जात आहे. म्हणून भारतातील प्रत्येक व्यक्ती आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळेत प्रवेश देण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावत आहेत. आदिवासी जमातींच्या पालकांना इंग्रजी भाषेच्या शाळेमध्ये त्यांच्या मुलांना प्रवेश देणे म्हणजे त्यांच्यासाठी फारच कठीण काम आहे. कारण त्यांची परिस्थिती ही अत्यंत नाजूक आहे. तसेच त्यांच्या घरी आदिवासी भाषा बोलल्या जाते. तर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इंग्रजी, हिंदी किंवा मराठीमध्ये संभाषण केल्या जाते. त्यामुळे या जमातीच्या मुलांना इंग्रजी भाषा शिकणे म्हणजे फारच कठीण असते. कारण त्यांच्या कुटुंबामध्ये इंग्रजी भाषा कुणालाही येत नाही. त्यामुळे ते इंग्रजी भाषेमध्ये आपल्या मुलांना बोलू शकत नाहीत. त्यामुळे त्यांची मुले आनंदाने शाळेत जात नाहीत. तसेच महाराष्ट्र शासनाने मराठी माध्यमांच्या शाळेत विद्यार्थी येत नाहीत म्हणून "राज्यातील तेराशे शाळा बंद करण्याचे धोरण राज्यसरकारणे अवलंबिले आहे"[३]. त्याचाही दूरगामी परिणाम म्हणुन आदिवासी जमातीच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे चित्र दिसून येते. आदिवासी जमातीच्या मुलांना इंग्रजी भाषेचे शिक्षण देणे म्हणजे फारच कसरत असते. कारण त्यांच्या कुटुंबामध्ये कुणालाही इंग्रजी भाषा समजत नाही, त्यामुळे ते आपल्या मुलांना इंग्रजी भाषा शिकवू शकत नाहीत. तसेच शाळेतील शिक्षक त्या मुलांना त्यांच्या

भाषेतून इंग्रजी शिकवू शकत नाहीत. म्हणून आदिवासी जमातीच्या मुलांना इंग्रजी भाषा शिकणे कठीण जाते.

४. **बेरोजगारीची समस्या :—** जागतिकीकरणाच्या माध्यमातून अनेक प्रकारचे मोठमोठे उद्योग स्थापले जात आहेत. त्यामुळे त्या ग्रामीण व आदिवासी भागातील अनेक प्रकारच्या कुटिरोद्योगांचा फार मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे त्या परिसरातील अनेक लोक बेरोजगार झाले आहेत. त्यांच्या सुपीक जमिनीवर मोठमोठे कारखाने काढल्या जात असल्यामुळे त्या परिसरातील अनेक लोकांना बेरोजगारीच्या समस्येने त्रस्त केले आहे. कारखान्यात काम करण्यासाठी कुशल कारागिरांची निवड होते. तसेच कारखान्यात काम करण्यासाठी इंग्रजी भाषा समजणाऱ्यांनाच काम मिळते. त्यामुळे आदिवासी जमातीच्या लोकांना इंग्रजी भाषा सुध्दा येत नाही. त्यामुळे त्यांच्यामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. बेरोजगार झालेले तरुण अनेक प्रकारच्या वाईट मार्गाकडे वळत असल्याचे दिसून येते. त्यातूनच नक्षलवादासारख्या चळवळीमध्ये अनेक बेरोजगार तरुण सहभागी होतांना दिसून येतात.

५. **कुटीर उद्योगांचा ऱ्हास :—** जागतिकीकरणाच्या माध्यमातून आदिवासी जमातीच्या अनेक प्रकारच्या स्थानिक जंगलावर आधारित चालणाऱ्या कुटीर उद्योगांचा फार मोठ्या प्रमाणात ऱ्हास होताना दिसून येतो. बांबू पासून चटया, टोपली, दुरड्या, कणगी या वस्तू हाताने बनवल्या जातात. परंतु आजच्या काळात प्लास्टिकची, स्टिलची, लोखंडाच्या दर्जेदार वस्तू या कारखान्यात तयार होणाऱ्या मजबूत टोपली, चटया, दूरड्या बाजारपेठांमध्ये कमी किमतीमध्ये लोकांना मिळत असल्यामुळे ग्राहकांमध्ये कुटीर उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू घेणाऱ्यांचे प्रमाणही कमी होत आहे. त्यामुळे अनेक प्रकारच्या कुटीर उद्योगावर चालणाऱ्या व्यवसाय व जोडव्यवसायाचा फार मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतांना दिसून येतो.

६. **जंगलांचा ऱ्हास :—** जागतिकीकरणामुळे रस्त्यांचे रुंदीकरण व मोठमोठ्या कारखान्यांची स्थापना करण्यात येत असल्यामुळे आदिवासींच्या हक्काचे असणारे जंगलाचे प्रमाण वरचेवर कमी होत आहे. त्यामुळे वरचेवर पर्यावरणाचाही समतोल बिघडत असल्याचे दिसून येते. प्रदूषणाचे प्रमाणही वाढत आहे व प्रदूषणाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण झालेल्या आहेत. तसेच जंगलातील अनेक प्रकारच्या उपयोगी वनऔषधांचा पण नायनाट होत आहे. जंगलतोड झाल्यामुळे आदिवासींच्या जीवनावर फार मोठा आघात होताना दिसून येतो. जंगलतोड झाल्यामुळे जमिनीची योग्य प्रमाणात धूप होत नाही व वेळेवर पाऊस पडत नाही. त्यामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाहासाठी व उपजीविकेसाठी असणारी शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. जंगलाचा ऱ्हास होत असल्यामुळे पावसाचे पाणी वेळेवर पडत नाही. त्यामुळे आदिवासींची सुपीक असणारी शेती सुद्धा नापिकी होतांना दिसून येते. जंगल हे आदिवासींचे जीवन जगण्याचे व उपजीविकीचे फार महत्वाचे साधन ह्या जागतिकीकरणाने हिरावून घेतले आहे.

७. **कृषी विषयक समस्या :—** जागतिकीकरणाने प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रवेश केलेला आहे. त्यामुळे अनेक प्रकारचे औद्योगिक कारखान्याची निर्मिती झालेली आहे. अनेक प्रकारच्या शेतीविषयक औजारांची निर्मिती कारखान्यात होत आहे. परंतु आदिवासींना नवीन कृषिविषयक तंत्रज्ञानाचे परिपूर्ण ज्ञान नसल्यामुळे काही आदिवासी हे पारंपारिक व स्थलांतरीत शेती करीत आहेत. तसेच औद्योगिकरणाच्या माध्यमातून त्यांच्या सुपीक असणाऱ्या जमिनी शासन हस्तांतरित करीत आहे. त्यामुळे त्यांच्यावर बेकारीची व उपासमारीची समस्या निर्माण झालेली आहे. तसेच शेतामध्ये अनेक प्रकारच्या रासायनिक खते व किटकनाशके यांच्या अतिवापरामुळे सुद्धा शेती नापिकी होताना दिसून येते. त्यामुळे जागतिकीकरणाचा आदिवासींच्या कृषी व्यवसायावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते. त्यांच्या सुपीक व कसदार असणारी शेती ही जागतिकीकरणाच्या माध्यमातून त्यामध्ये यांत्रिकीकरण आल्यामुळे तसेच रासायनिक खतांचा वापर फार मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढले आहे परंतु ते सकस नाही. त्यामुळे अनेक प्रकारचे नवनवीन रोग होतांना दिसून येतात.

८. **स्थलांतर व विस्थापनाची समस्या :—** जागतिकीकरणाच्या माध्यमातून आदिवासींच्या जमिनीवर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी ताबा मिळविलेला आहे. त्यामुळे त्यांच्या स्थलांतराच्या व विस्थापनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांच्या जमिनी जबरदस्तीने हस्तांतरित केल्या जात आहेत. परंतु त्यांना त्या जमिनीचा योग्य मोबदला दिला जात नाही व दिलेला मोबदलाही त्याच्या उपजीविकेसाठी पुरेसा नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी रोजगाराची कोणत्याही प्रकारची तरतूद केल्या जात नाही. तसेच त्यांच्या जमिनीचा मोबदला योग्य वेळी दिल्या जात नाही. त्यांचे विस्थापन योग्य ठिकाणी केल्या जात नाही. ज्या ठिकाणी विस्थापन केले जाते त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या प्राथमिक सोयीसुविधा पुरविल्या जात नाहीत. मुख्य म्हणजे त्यांना रोजगार दिल्या जात नाही त्याकडे डोळेझाक

केल्या जाते. त्यातूनच राजकीय पुढारी आपला स्वार्थ साधून घेतात. परंतु आदिवासी ज्या जमिनीचे मालक आहेत त्यांना त्यांचा जमिनीचा कोणत्याही प्रकारचा मोबदला वेळवर दिला जात नाही. अशी ही आदिवासींची दयनीय स्थिती पाहावयास मिळते.

अशा प्रकारे जागतिकीकरणाचा आदिवासी समाजजीवनावर अनेक अंगानी दूरगामी परिणाम झाल्याचे चित्र दिसून येते. जागतिकीकरणाचा उद्देश चांगलाच होता. परंतु जागतिकीकरणाची प्रक्रिया राबविणाऱ्या लोकांची मानसिकता त्या दृष्टीने नसल्यामुळे ही स्थिती निर्माण झालेली आहे. या प्रक्रियेमुळे कांही प्रमाणामध्ये कांही आदिवासी जमातीचे सक्षमीकरण झालेले आहे. परंतु अशिक्षित व अतिमागास असणारे आदिवासी यामध्ये मागे पडले असल्याचे दिसून येतात.

जागतिकीकरण हे विकसित व साम्राज्यवादी राष्ट्रांचे एक प्रभावी हत्यार आहे. त्या माध्यमातून ते जगातील विकसनशील देशांचे शोषण करतात. जागतिकीकरणाचा देशातील आदिवासींना कोणताच फायदा झालेला नाही. परंतु विकसनशील देशांचे आर्थिक मंदीचे संकट मात्र टळलेले आहे. व त्याचा भार भारतासारख्या विकसनशील देशांवर लादल्या गेलेला आहे. "इंटरनॅशनल मोनीटरी फंड, वर्ल्ड बँक, विश्व व्यापार संगठन वैश्विकरण के प्रभावी उपकरण है।"[४] या माध्यमातून ते आपल्यासारख्या देशातील लोकांचे शोषण करून त्या देशांतील खनिज संपत्ती लुटून नेतील. व त्यातूनच मिळालेला नफा आपल्यालाच कर्ज म्हणुन देतात. अशा प्रकारे भारतासारख्या विकसनशील देशाला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने लुटले जात आहे.

जागतिकीकरणाचे फलित म्हणून स्पर्धा वाढते आहे. देशी बाजारपेठ हे केवळ देशातील व मर्यादित प्रमाणात बाहेरील उत्पादकांपुरतीच मर्यादित न राहता, तशा प्रकारच्या वस्तू व सेवांची उत्पादन करणाऱ्या सर्वच उत्पादकांसाठी मुक्त होते. अर्थातच एकच वस्तू तयार करणारे अनेक उत्पादक असल्याने बाजारपेठेत त्यांना ग्राहक मिळविण्यासाठी स्पर्धेला तोंड द्यावे लागते. त्यामुळे ग्राहक आपल्या गरजेनुसार योग्य वस्तू वाजवी किंमतीत मिळवू शकतो. परंतु ती वस्तू तयार करण्यासाठी जागतिकीकरणाच्या माध्यमातून कारखान्यांमधून यंत्राच्या साह्याने कमी किमतीमध्ये ती वस्तू तयार होते व ती वस्तू तयार करणाऱ्या कामगाराला त्याचा योग्य मोबदला मिळत नाही? कामगारांच्या श्रमाचे विभाजन होऊन त्यांच्या समस्या कमी होण्याऐवजी वाढतच असल्याचे चित्र दिसून येते.

सारांश :— आज मानवी समाजाचा जो विकास झालेला आहे. तो माहिती तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून होय. मानवी समाजाचा विकास हा एक प्रकारचा संख्यात्मक विकास होय. केवळ संख्यात्मक विकासामूळे मानवी समस्याचे निर्मुलन होत नाही तर समस्या ह्या वरचेवर वाढत जाताना दिसून येतात. म्हणूनच जेवढ्या प्रमाणामध्ये लोकसंख्या वाढत आहे. त्याच प्रमाणामध्ये समाजामध्ये अराजकता, बंडखोरी, नैतिक मूल्यांचा ऱ्हास होतांना दिसून येतो. म्हणून विकास या संकल्पनेमध्ये संख्यात्मक बदल महत्वाचा नसून त्यापेक्षा जास्त गुणात्मक, परिणात्मक बदल फारच महत्वाचा आहे. जर वरचेवर भारतीय समाजाची अशाच प्रकारची स्थिती राहीली तर पुन्हा एकदा स्वतंत्र भारत हा जागतिकीकरणाच्या माध्यमातून जागतिक भांडवलदाराचे गुलाम झाल्याशिवाय राहणार नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त व्यापार करण्याची संधी प्राप्त होते. परंतु त्या देशातील लोकांना ते योग्य प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देत नाहीत. ते फक्त जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी तिथे आलेले असतात. त्यामुळे तेथे बेरोजगारीचे प्रमाण वाढते. लोकांची क्रयशक्ती वाढावी व श्रमाचे मूल्य वाढावे या संबंधित यांचा काहीच संबंध येत नाही. त्यामुळे फुटीरतेची बिजे पेरली जातात. तसेच जागतिकीकरणाच्या मुक्त बाजारपेठेच्या कारणामुळे कमी दर्जाचे असलेले, टाकावू वस्तू व तेथे न विकल्या जाणाऱ्या वस्तू भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये चढ्या दरांने विकले जातात. अशा प्रकारे जागतिकीकरणाच्या माध्यमातून आदिवासींच्या समस्या दूर होतील या भ्रमात राहता कामा नये.

आधुनिक समाजात माणूस एकलकोंडा होत आहे व माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. आज जागतिकीकरणाने प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रवेश केलेला आहे शिक्षण, वैद्यकीय व्यवसाय, अभियांत्रिकी व शेती असो प्रत्येक क्षेत्रामध्ये जागतिकीकरणाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होताना दिसून येतात. एका दृष्टीने जागतिकीकरण हे फायद्याचे होते, परंतु जागतिकीकरणाच्या माध्यमातून नैतिकतेचा ऱ्हास होतांना दिसून येतो. त्यामुळे माणूस माणसाला न ओळखता माणूस फक्त पैशाला ओळखत आहे आणि पैशांच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला माणसांपेक्षा पैसाच जास्त महत्वाचा व प्रिय वाटतो आहे. अशा समाजात सामाजिक संस्थांची मानवाबरोबरच बंधुभावाची सहकार्याची भावना कमकुवत होताना दिसून येते. व मानव हा नैतिक दृष्ट्या दुर्बल होत चालला आहे असे चित्र दिसून येते. जागतिकीकरणाचा हाच आदिवासींच्या समाजजीवनावर झालेला दुरगामी परिणाम होय.

संदर्भ ग्रंथ :—

१. *भार्गव नरेश (२०१४), 'समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य 'वैश्वीकरण समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य', रावत पब्लिकेशन, जयपुर. पृष्ठ क्रमांक १६०*
२. *पंडित नलिनी, (२००४), 'जागतिकीकरण आणि भारत', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृष्ठ क्रमांक ११.*
३. *दै. सामना, दिनांक ०२ डिसेंबर २०१७.*
४. *गुप्ता रमणिका (२००८) 'आदिवासी कोण' राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली. पृष्ठ क्रमांक १८७.*

सेझ जमीन अधिग्रहण विरोधी शेतकऱ्यांचा संघर्ष

डॉ. मंजुषा नळगीरकर, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, जि. औरंगाबाद. मो. ९४०३७५६१५६

प्रस्तावना:— भारत हा कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. अन्नधान्य उत्पादनात आज भारत स्वयंपूर्ण आहे. भारताच्या कृषी प्रधान अर्थव्यवस्थेचा शेतकरी हा कणा आहे. शेतकरी आपल्याकडे असलेल्या शेतीच्या माध्यमातून अन्नधान्याचे उत्पादन करतो. त्यामुळेच त्याला देशाचा पोशिंदा देखील म्हटले जाते. हाच शेतकरी स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी पूर्णत: शेती या उत्पन्नाच्या मुख्य स्त्रोतांवरच अवलंबून असतो. आज शासन देशाच्या आर्थिक विकासासाठी सेझ सारखे औद्योगिक प्रकल्प जागोजागी उभारत आहे. अशा प्रकल्पांसाठी शासन शेतकऱ्यांची शेतजमीन मोठ्या प्रमाणात अधिग्रहीत करीत आहे. २००५ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्राला भारतात मान्यता देण्यात आली आणि तसा कायदाच करण्यात आला. मात्र, त्याचा विपरित परिणाम येथील शेती आणि शेतकऱ्यांवर झाला. देशात अनेक ठिकाणी 'सेझ' साठी जमीनी अधिग्रहीत करण्यात आल्या. त्यात औरंगाबादचाही समावेश होता. शेंद्रा येथे पंचतारांकित एम. आय. डी. सी. त्यासाठीच निर्माण करून तिथे मोठमोठ्या कंपन्यांसाठी 'सेझ' उभारण्यात आले. त्यापैकी बहुतेक जमीनी रीतसर करार करून शेतकऱ्यांच्या संमतीने घेण्यात आल्या. त्यांना योग्य मोबदलाही मिळाला; पण 'अजंता फार्मा लिमिटेड' बाबत तसे झाले नाही. वेगळ्याच पध्दती वापरून या 'सेझ' साठी जमीनी ताब्यात घेण्यात आल्या. त्यासाठी 'सेझ' च्या नियमांचा आणि तरतुदींचा फायदा घेण्यात आला.

या जमीन अधिग्रहण प्रक्रियेचे बळी ठरले नाथनगर (वडखा) येथील शेतकरी. सेझ सारख्या विकासात्मक प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे असलेले महत्त्वाचे शेती साधन हीरावून घेण्यात येत आहेत. ज्यांचे गंभीर सामाजिक व आर्थिक परिणाम शेतकऱ्यांना भोगावे लागत आहे. या गंभीर आर्थिक व सामाजिक परिणामावर प्रकाश टाकण्यासाठी सदरील विषयाची व्यष्टी अध्ययनासाठी निवड करण्यात आली आहे.

उदिष्ट्ये :— १) विकासात्मक प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या शेती योग्य जमीनी अधिग्रहीत करण्याच्या अमानवीय प्रक्रियेविषयी चर्चा करणे. २) जमीन अधिग्रहणानंतर शेतकऱ्यांना भोगाव्या लागणाऱ्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधन क्षेत्राची माहिती :— औरंगाबाद पासून जालना रोडवर सुमारे २५ किलोमिटर अंतरावर शेंद्रा पंचतारांकित औद्यगिक क्षेत्र 'सेझ' उभे असलेले दिसते. तिथून डाव्या बाजूला सुमारे तीन ते चार किलोमिटर अंतरावर डोंगराच्या पायथ्याशी मौजे नाथनगर (वडखा) हे गाव वसलेले आहे. नाथनगर (वडखा) गावाची एकूण लेकसंख्या २५०० आहे. गावात जि. प. हायस्कूलची ७ वी पर्यंतची शाळा आहे. गावातील जवळपास ६० शेतकऱ्यांची १०० हेक्टर जमीन २००८ या वर्षी अजंता फार्मा कंपनी सेझ प्रकल्पासाठी अधिग्रहीत करण्यात आली. त्यापैकी बहुतांश ४५ शेतकऱ्यांना जमीनीचा मोबदला देखील मिळाला नाही.

संशोधन पद्धती :— प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

नमुना निवड :— नाथनगर (वडखा) या संशोधन क्षेत्रातून तथ्य संकलनासाठी मुलाखत या तंत्राचा अवलंब करण्यात आला. मुलाखतीसाठी सहेतूक व सोयीस्कर नमूना निवड पध्दतीचा अवलंब करून ज्या शेतकऱ्यांची सेझसाठी जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे अशा ४० शेतकरी उत्तरदात्यांची निवड करण्यात आली. ज्यात ३० उत्तरदाते शेतकरी (पुरूष) आणि १० उत्तरदाते (महिला) होत्या.

शेतकऱ्यांच्या मुलाखती सोबतच, ज्यांनी शेतकऱ्यांची केस कोर्टात लढविली ते ॲडव्होकेट विलास सोनवणे यांची मुलाखत घेण्यात आली. नाथनगर (वडखा) शेतकऱ्यांच्या आंदोलनाला ज्यांचे मार्गदर्शन व नेतृत्व लाभले अशा जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्याशी फोनद्वारे संवाद सांधून त्यांची मते जाणून घेतली गेली आहेत. (टिप : नाथनगर (वडखा) या गावाची माहीती गावाच्या सरपंचाकडून घेण्यात आली आहे.)

तथ्य संकलन :— तथ्य संकलनाचे प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत या तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे. तथ्य संकलनाचे दुय्यम स्त्रोत म्हणून नाथनगर (वडखा) येथील शेतकऱ्यांवर जमीन अधिग्रहणाच्या वेळी झालेल्या अमाणूष हल्ला आणि जमीन अधिग्रहणाविरोधी शेतकऱ्यांनी उभारलेला लढा यासंबंधी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या, लेख, आधुनिक किसान या मासिकातील लेख, शेतकऱ्यांनी माहितीच्या अधिकाराखाली जमा केलेल्या सर्व बनावट कागदपत्रांच्या झेरॉक्स, फोटो, शेतकऱ्यांकडे पूर्वीच्या जमीनीचे व आत्ताच्या जमीनीचे असलेले व्हिडीओ रेकॉर्डी इ.

तथ्याचे विश्लेषण :— नाथनगर (वडखा) या संशोधन क्षेत्रातून तथ्य संकलनासाठी मुलाखत या तंत्राचा अवलंब करण्यात आला. मुलाखतीद्वारे पुढील माहिती (तथ्य) समोर आली.

जमीन अधिग्रहणाची कायदेशीर प्रक्रिया :— सरकारला सेझ किंवा अन्य कामांसाठी भूसंपादन करायचे असल्यास एक विशिष्ट प्रक्रिया ठरविण्यात आलेली आहे. त्या संबंधित शेतकऱ्यांना, जमीन मालकांना पूर्व कल्पना, पूर्व सूचना देणे. त्यांचे पुनर्वसन होण्यासाठी प्रयत्न करणे. त्या जमीनींची बाजार भावाप्रमाणे किंमत ठरविणे, शेतकऱ्यांचे विस्थापन होणार असल्याने नियमानूसार बाजारभावाप्रमाणे ठरलेल्या किमतीच्या ३३ टक्के अधिक रक्कम संबंधित विस्थपिताला देणे, या सर्व कामात मूळ जमीन मालकाची परवानगी घेणे, त्याच्याशी चर्चा करणे, नंतर त्याला योग्य तो मोबदला देणे, प्रत्यक्ष जमीन संपादित करताना जमीन मालकांना तशी पूर्व सूचना किंवा नोटिस देणे, यासंदर्भात गावातील सर्वमान्य पंचांसमक्ष कायदेशीर आणि रास्त प्रक्रिया झाल्यानंतर आणि संबंधित शेतकऱ्याला मान्य असेल, तरच त्याच्या जमीनीचे संपादन होते.[१] भारतात सेझ (विशेष आर्थिक क्षेत्र) प्रक्रिया लागू झाल्यानंतर अनेक ठिकाणी हीच प्रक्रिया राबविण्यात आली. त्यात शेतकऱ्यांना कायदेशीर मोबदला मिळाला, तर बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांनी कायदेशीर भूसंपादनाला विरोध केल्यानंतर 'सेझ' प्रकल्प रद्द करण्यात आला. नवी मुंबई जवळील रायगड आणि कर्नाटक मधील पॉस्को अशी काही रद्द केलेल्या 'सेझ' ची उदाहरणे आहेत.[२]

नाथनगर (वडखा) येथील शेतकऱ्यांच्या जमीनीचे अधिग्रहण :— नाथनगर (वडखा) येथील शेतकऱ्यांच्या वाट्याला वरील प्रमाणे कोणतीही कायदेशीर किंवा रीतसर प्रक्रिया आली नाही. स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि शासकीय अधिकाऱ्यांचा वापर करून 'अंजता फार्मा लिमीटेड' या कंपनीने येथील 'सेझ' साठी बळजबरीने शेतकऱ्यांची जमीन पटकावली. दि. ३ आणि ४ डिसेंबर २००८ रोजी शेतकरी नेहमीप्रमाणे आपल्या शेतात काम करीत असतांना अचानक पोलीस ताफ्यासह या जागेवरील शेतकऱ्यांना अटक करून हटविण्यात आले. त्यावेळी त्यांच्या झोपड्या व पिकांवरून बुलडोझर फिरविण्यात आला. ग्रामस्थांना हे काय होतेय ते कळतच नव्हते. पण ज्यांनी विरोध केला, त्यांच्या विरोधात तत्काळ पोलीसात गुन्हे दाखल करण्यात आले. आपली जमीन आपल्या डोळ्यादेखत लुटली जाते हे पाहून विरोध करणाऱ्या शेतकरी महिलांना पोलीसांनी निर्दयीपणे मारहाण सुध्दा केली. त्यात एक महिला तर ८० वर्षाची होती.

जेव्हा पोलीस शेतकऱ्यांच्या उभ्या पिकावर बुलडोझर फिरवित होते तेव्हा एक ६० वर्षाची महिला आपल्या कडेवर नातवाला घेऊन बुलडोझर समोर उभी राहीली व म्हणू लागली मी माझ्या शेतात बुलडोझर जाऊ देणार नाही. ती बाजूला सरकत नाही हे पाहून एका महिला पोलीस कॉन्स्टेबलने त्या महिलेच्या कडेवरील बाळ हिसकावून घेतले आणि तिथे जवळच असलेल्या विहीरी जवळ जाऊन म्हणाली, ''आजी तू बाजूला होतेस का टाकू तुझ्या नातवाला विहीरीत.'' नाईलाजाने आजीला बाजूला व्हावे लागले.

जमीनी अधिग्रहणाला विरोध करणाऱ्या पुरूष, महिला, म्हाताऱ्या व्यक्ती आणि लहान मुले यांच्यावर लाठी हल्ला करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. पोलीस व्हॅन मध्ये टाकून पोलीस ठाण्यात नेण्यात आले. त्यांनी सोबत नेलेली पिके, फळे, भालीपाला खोटा ठरविण्यात आला. शेतकऱ्यांचे म्हणणे पोलीसांनी व न्याय व्यवस्थेने देखील ऐकले नाही.

बरेच दिवस गावात पोलीसांची व्हॅन येत असे आणि बाया माणसांना गाडीत टाकून पोलीस स्टेशनला चौकशीसाठी नेत असे. पोलीसांच्या या धर—पकडीमुळे गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीसांची गाडी दिसली की अनेक जण डोंगरात वा झाडावर लपून बसत. शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत करण्याचा प्रकार मनाला अतिशय व्यथीत करणार आहे. विशेष म्हणजे हे सर्व करतांना बनावट पंचनामे, बनावट दस्तऐवज, नोटिसा न पाठविणे यांसारख्या न्यायबाह्य प्रकारांचा वापर तर झालाच, त्या जोडीला स्थानिक शेतकऱ्यांवर पैशांचा, ताकदींचा आणि सरकारी धाकटपटशाहीचा दबाव आणून त्यांना हक्काच्या जमीनींपासून विस्थापित करण्यात आले. काहींना पैसे आणि दारूचे आमिष दाखवून त्यांच्याकडून बळजबरीने शपथपत्र घेण्यात आल्याचे काही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

सेझ प्रकल्पात जमीन गमावलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनावर झालेले आर्थिक आणि सामाजिक परिणाम:— सेझ प्रकल्पात जमीन गमावलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनावर गंभीर असे आर्थिक आणि सामाजिक परिणाम झाले त्यांचा सविस्तर वृत्तांत पुढीलप्रमोण — सेझ कंपनी उभारण्यासाठी कंपनी अधिकाऱ्यांने केलेल्या फसवणुकीच्या धक्याने शेतकऱ्यांचे मृत्यू देखील झाले आहेत. यापैकीच एक ज्वलंत उदाहरण म्हणजे गणेश काकडे या तरूणाच्या आत्महत्येचे होय. १. नाथनगर (वडखा) येथील सरस्वतीबाई आणि त्यांचे

पती पुंडलीकराव काकडे हे सत्तरी ओलांडलेले दामप्त्य. त्यांच्या एक मुलगा गणेश काकडे. गणेश काकडे हा ३०—३२ वर्षे वयाचा उमदा तरूण होता. गावात सगळ्यांशी मिळून मिसळून राहायचा. गावठाण लागत त्याची सुमारे १५ एकर शेती होती. त्यात गणेश भाजीपाला घ्यायचा. तो उत्तम शेतकरी होता. गावात सगळ्यात जास्त म्हणजेच वर्षाकाठी ५ ते ६ लाखांचे उत्पन्न तो काढायचा. आई—वडील, पत्नी आणि तीन मुली असा गणेशचा सुखी संसार होता. एक दिवस 'अजंता फार्मा' कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्याला गोड बोलून 'सेझ' साठी जमीन मिळविली. सुरूवातीला त्याला ४.९५ लाखाचा चेक दिला गेला आणि नंतर आणखी पैसे आणि नोकरी मिळवून देऊ, असे आश्वासन दिले. गणेशने मिळालेल्या पैशांमधून पैठण तालुक्यातील पासंडी या सासुरवाडीच्या गावी दोन एकर जमीन घेतली. त्यासाठी १५ लाख रूपये खर्च होता. तेव्हा गणेशने नाथनगर मधील राहते घर सहा लाखांना विकून आणि काही बँकेतील शिल्लक मोडून जमीन घेतली. पण सिंचनाची चांगली सोय नसल्याने सरकी शिवाय (कापूस) जमीनीवर काहीच पिकले नाही. त्यात त्याला तोटा झाला. दरम्यान गावातील अनेक शेतकऱ्यांनी 'सेझ' च्या नावाखाली जमीनींचे बेकायदा पध्दतीने संपादन होण्याला विरोध दर्शविला आणि त्या विरोधात आवाज उठवला. त्यात गणेशचे मित्रही होते. आपण फसविले गेलो, मित्रांना साथ देऊ शकलो नाही, या विचाराने अनेक दिवस तो कोणाशिही बोलायचा नाही. नंतर तोही 'सेझ' विरोधी लढ्यात सक्रिय झाला. तेव्हा त्याच्यावर कंपनीने खोटे गुन्हे नोंदविले. या सगळ्या प्रकाराने गणेश कोलमडून पडला आणि एक दिवस त्याने आत्महत्या केली. कर्ता मुलगा गेल्याने सरस्वतीबाईचे कुंटुंब उघड्यावर आले. बाजारभावाप्रमाणे २००८ साली ज्या जमीनीला ७ ते ८ कोटी रूपये किंमत मिळायला पाहिजे होती, तिला भ्रष्ट यंत्रणेमुळे केवळ पाच लाख रूपये मिळू शकले आणि त्यात एका होतकरू शेतकऱ्याचा नाहक बळी गेला. आज बेघर गणेशचे आई—वडिल गावातच दुसऱ्याच्या घरात राहत आहेत. गावकऱ्यांच्या मदतीवर त्यांचा उदरनिर्वाह चालला आहे. तर गणेशची पत्नी आपल्या माहेरी दोन एकरात कसाबसा संसार रेटत आहे. मुलींच्या भविष्याची तिला चिंता आहे.

२. 'सेझ' विरोधातील चळवळ नेटाने पुढे नेणारा याच गावातील दुसरा तरूण बबन काकडे यांचे वडिल जमीन गेल्याची हाय खाऊन हृदयविकाराने मरण पावले. गट नं. ५२ मध्ये नागोराव काकडे यांची दीड एकर बागायती जमीन होती. मध्यंतरी बबनला झालेल्या अपघातामुळे अपंगत्व आले. त्यामुळे सध्या तो मजुरीही करू शकत नाही, अशी त्याची अवस्था आहे.

३. गावातील दुसरे एक ज्येष्ठ शेतकरी नामदेव काकडे यांची १४ ते १५ एक जमीन हिसकावली गेली तेव्हा ते कित्येक रात्र त्या प्रकाराबद्दल झोपेत बरळत असत आणि एक दिवस त्याच धक्क्याने वयाच्या ६५ व्या वर्षी त्यांचा मृत्यूही झाला.

४. या शिवाय कचरू काकडे हे ६० च्या जवळपास वय असणारे शेतकरीही जमीन गेल्याचे धक्क्याने मृत्यू पावले. त्यांची गट नं. ३३ मध्ये सुमारे ३ एकर जमीन होती. भूमीहीन होण्याबरोबरच पोरके होणं गावातील अनेक कुंटुंबाच्या माथी आल्याचे येथील लोक सांगतात. जमीनी हीरावून आणि मृत्यू घडवून आणूनही ही कंपनी शांत राहिलेली नाही. तिची कारस्थाने सुरूच असतात. आपल्यावरील अन्याया विरोधात आवाज उठविणाऱ्या ग्रामस्थांना धमकावणे, संपवून टाकू असे म्हणणे अशा गोष्टी कंपनीतर्फे सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्याबद्दल एक प्रकारची दहशतच त्यांच्या मनात बसली आहे.

५. शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत केल्यामुळे शेतकऱ्यांच्या उपजिवीकेचे साधनच हीरावून घेण्यात आले होते. एकेकाळी बागायत जमीनदार असलेला शेतकरी लाखो रूपयांचे उत्पन्न घेत होता. आज त्या शेतकऱ्यावर मजूरी करण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान तर झालेच पण शेतकऱ्यांना त्यांची शेती ही मातेप्रमाणे वाटते. आपली वडिलोपार्जित जमीन हातातून गेल्याचे शेतकऱ्यांना प्रंचड दु:ख आहे. शेतकरी आणि शेती यामध्ये असलेले भावनिक नाते आज संपुष्टात आले आहे.

६. 'सेझ' प्रकल्पामध्ये जमीनी गमावलेल्या शतकऱ्यांना सामाजिक अडचणींना देखील तोंड द्यावे लागले आहे. जमीनी गमावल्यामुळे त्यांचे नातेवाईक व मित्रमंडळी त्यांच्या पासून दूर गेले आहेत. त्यांना कोणी बोलायला व विचारायला तयार नाही. नातेवाईकांना ही भिती वाटते की आपण जर यांना बोलायला गेलो तर ते आपल्याला पैसे मागतील म्हणून त्यांनी ह्या शेतकऱ्यांशी नातेसंबंध तोडून टाकले आहेत.

जमीन अधिग्रहणा विरूध्द शेतकऱ्यांनी उभारलेला लढा :— शेतकऱ्यांना जेव्हा त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणिव झाली तेव्हा त्यांनी या विरोधात लढा सुरू केला. गेली ८ वर्षे हा लढा सुरू आहे. या लढ्याची सुरूवात अशी झाली.

नाथनगर (वडखा) येथील शेत जमीन अधिग्रहणात वयोवृध्द भानुदास काकडे यांचीही जमीन होती. याबाबीची माहिती काकडे यांनी त्यांचे जावई कल्याण दुगले यांना दिली असता, कल्याण दुगले यांनी

प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी माहिती अधिकाराच्या हत्याराचा वापर केला. त्यानुसार मिळालेल्या माहितीत अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या. नोटीसा बजावल्याचे दाखवले, पण त्या प्रत्यक्षात मिळाल्याच नाहीत. मग ज्या पंचांच्या उपस्थितीत नोटीसा बजावल्याचे दाखविले त्यांच्या जमीनी मात्र पध्दतशीरपणे भूसंपादनातून वगळण्यात आल्या. विशेष म्हणजे भानुदास काकडे यांनी नेमलेले वकीड ॲड. विलास सोनवणे यांनी ही बनावट कागदपत्रांची फसवेगिरी समोर आणली आणि नाथनगरच्या शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका बजावली. शेतकऱ्यांच्या झालेल्या फसवणुकीबद्दल ॲड. विलास सोनवणे यांचे म्हणणे मोठे मार्मिक आणि विचार करण्याजोगे आहे. ते म्हणतात की, 'महाभारतात द्रौपदीच्या पाच मुलांवर झोपेत असताना भ्याडपणे तलवार चालवून मारल्याचे उदाहरण आहे. शेंद्रा नाथनगर येथील शेतकऱ्यांच्या बाबतीत प्रशासनाने हीच गोष्ट केली आहे. घटनेच्या २१ व्या कलमात शांततापूर्ण जगण्याचा अधिकार बहाल करण्यात आलेला आहे. येथे मात्र बळजबरीने शेत हिरावून या आपल्या देशाच्या घटनेचीच पायमल्ली करण्यात आली आहे. शिवाय, मानवी अधिकाराचाही भंग या प्रकरणात झाला आहे.' एखादा अधिकारी कामावर उशिरा आला, तर त्याला त्याबद्दल उत्तर द्यावे लागते. मात्र एम. आय. डी. सी. आणि महसूल प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्याही पुढे जाऊन बनावट कागदपत्रे बनवून जमीन बळकावली आहे. त्यांच्या विरोधात काय कारवाई होणार आहे? शेतकऱ्यांच्या जमीन अधिग्रहणासंदर्भात जे अवॉर्ड केले ते सर्व खोटे आहेत. पंचनामेही खोटे आहेत. भूसंपादनाची संपूर्ण प्रक्रियाच बेकायदेशीर आणि बनावट पध्दतीने झाली आहे. भानुदास काकडे यांच्या प्रमाणेच मौजे शेंद्राबन येथील नामदेवराव तुपे, बाजीराव पांडू तुपे, तात्या बंडू तुपे नाथनगर येथील बबन काकडे, रंगनाथ किसन दांडगे, विष्णू रामभाऊ काकडे आदी शेतकऱ्यांची देखील फसवणूक झाली आहे. हा सर्व प्रकार ॲड. विलास सोनवणे यांनी उच्च न्यायालयाच्या निदर्शनाला आणला आणि त्यानंतर न्यायालयाने 'अजंता फार्मा' ने जमीनीचा ताबा न घेता परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश दिला. हा एक प्रकारे फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचाच प्रकार होता. न्यायालयाच्या या आदेशानंतर अधिग्रहणाची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली. भानुदास काकडे यांच्या बाबत अशी आशादायक घटना घडल्यानंतर मग नाथनगरच्या उर्वरित फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनीही एकजूट करून आपल्या अन्याया विरोधात आवाज उठवला. त्यांच्या बाजूने लढण्यासाठी ॲड. विलास सोनवणे यांच्या सारखा खंबीर वकील तर होताच. मात्र त्याच दरम्यान डी. एम. आय. सी आंदोलनाच्या संदर्भात जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर, औरंगाबाद येथे आल्या होत्या. त्यांना हे पिडीत शेतकरी भेटले. मेधा पाटकर यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून यासंदर्भातील आंदोलनात पुढाकर घेतला. दिनांक २३ व २४ जुलै २०१३ रोजी सुमारे तीनशे ग्रामस्थांसह त्यांच्या हक्काच्या जमीनींवर पुन्हा कब्जा केला. मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन कर्त्यांनी दोन दिवस कंपनी अधिग्रहीत जमीनीवर तेथे ठिय्या मांडला आणि सुमारे सहा वर्षा पासून पडिक राहिलेल्या जमीनीला शेतकऱ्यांच्या हाताचा आणि नांगराचा स्पर्श झाला. शेतकऱ्यांनी तिथे पेरणीही केली. या आंदोलनामुळे पालकमंत्री बाळासाहेब थोरात, उपविभागीय अधिकारी संभाजीराव अडकुणे, एम. आय. डी. सी. चे प्रादेशिक अधिकारी अण्णासाहेब शिंदे आणि पोलीस उपअधिक्षीका कल्पना बारावकर उपस्थित झाल्या. सर्वांनी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून अतिक्रमण करणाऱ्या कंपनी विरोधात गुन्हे दाखल करणे, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, शेतकऱ्यांची जमीन परत देणे अशा अनेक गोष्टींबाबत चर्चा केली. त्यांनीही शेतकऱ्यांना सहकार्य करण्याचीच भूमिका घेतली.

मेधा पाटकर यांनी या आंदोलनाच्या संदर्भात आपले मनोगत फोन द्वारे मांडतांना त्या म्हणाल्या, ''नाथनगरच्या शेतकऱ्यांसंदर्भात जो अन्याय झाला त्या विरोधात शेवट पर्यंत आमची लढाई सुरू राहणार आहे. एम. आय. डी. सी. ने गरज नसतांना हजारो हेक्टर जमीन संपादीत करून ठेवली आहे. अगोदर या जमीनींचा वापर 'सेझ' साठी करून नंतरच शेतकऱ्यांच्या जमीनी घेतल्या पाहिजेत. शेतकऱ्यांना कुठलाही मोबदला न देता पोलीस बळाचा वापर करून त्यांच्या जमीनी ताब्यात घेणे कुठल्या नियमात बसते? पश्चिम बंगाल मध्ये तर 'सेझ' च्या मुद्यावर सरकारला हार पत्कारावी लागली होती. शेतकऱ्यांच्या लाखमोलाच्या जमीनी 'सेझ' सारखा खोटा कायदा करून मूठभर उद्योजकांच्या हाती दिल्या जात आहेत. शेतकऱ्यांना भूमीहीन करण्याचा हा शासनाचा डाव आहे. मेगासिटी, झालर क्षेत्र, इंडस्ट्रिअल कॉरिडॉरच्या नावाखाली लाखो रूपयांच्या शेतकऱ्यांच्या जमीनी गिंळकृत केल्या जात आहेत. रक्षकच भक्षक झाले आहेत. शेतीस पूरक असे औद्योगिकरण न होता शेतकऱ्यांना मारक असेच ते झाले आहे. त्यामुळे हा विकास नेमका कुणाचा? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. वरील सर्व पार्श्वभूमी पाहता जमीन अधिग्रहणा

विरोधी नाथनगर (वडखा) येथील शेतकऱ्यांनी जवळ—जवळ ८ वर्षे लढा दिला. ज्याची फलश्रुती म्हणून त्यांना दोन वर्षापूर्वी एक यश मिळाले आहे.

शेतकऱ्यांच्या लढ्याला मिळालेले यश :— मागील दोन वर्षापूर्वी १० जानेवारी २०१६ रोजी कोर्टाने नाथनगर (वडखा) मधील ३३.४५ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत दिली आहे. हे नाथनगर (वडखा) येथील शेतकऱ्यांच्या लढ्याला मिळालेले यश आहे. या यशामुळे उर्वरित जमीन ही आम्ही मिळवू असा विश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे.

समारोप:— देशभरात सेझ सारख्या औद्योगिक प्रकल्पासाठी होत असलेल्या शेत जमीनीच्या अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांमध्ये जो असंतोष पसरतोय त्याचेच एक प्रातिनिधीक उदाहरण म्हणजे नाथनगर (वडखा) येथील शेतकऱ्यांचा लढा होय.

शेतीचा विकास म्हणजेच भारताचा विकास होय. शेती जगल्याशिवाय उद्योग जगणार नाही. औद्योगिकरणामुळे उत्पादन वाढीचा दर वाढला आहे. पण याचा फायदा सामान्य शेतकरी वर्गाला किती झाला आहे या विचार देखील झाला पाहिजे. शेतकरी अनेक संकटांना व प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जाऊन शेती करतो. अशा परिस्थितीत सेझसाठी जमीन बळजबरीने घेऊन शेतकऱ्यांना भूमिहीन करणे हे आपल्या सारख्या कृषीप्रधान देशाला परवडणार नाही. महाराष्ट्रात पडीक, नापिक, डोंगराळ, मुरमाड अकृषिकरणास सक्षम असलेल्या जमीनीचे क्षेत्रफळ खूप आहे. अशा जमीनींचाच विचार सेझसाठी प्राधान्याने झाला पाहिजे. शासनाच्या सध्याच्या औद्योगिक धोरणामुळे भांडवलदार मोठे होत जातील व शेतकरी गरीब होत जातील. आज मालक असणारा शेतकरी उद्या स्वत:च्या जमीनीवरील कारखान्यात चौकीदार, मजूर, माळी, सुतार, गवंडी, स्वच्छक म्हणून लाचारीची कामे करणार आहे. म्हणून कोणताही विकास हा जनकल्याण साधणाराच असावा. देशासाठी विकासात्मक प्रकल्पांची आवश्यकता आहेच, पण प्रकल्पग्रस्तांचा मोबदला, विस्थापन, आर्थिक व सामाजिक पुनर्वसन यांचा गांभिर्याने विचार व अंमलबजावणी होणे देखील गरजेचे आहे. उद्योजकांनी देखील देश हिताचा विचार करून शेती योग्य जमीन अकृषिकरणासाठी उपयोगात न आणण्याचा चांगुलपणा दाखवायला पाहिजे. तरच आपण चिरस्थायी विकासाच्या दिशेने वाटचाल करू शकू.

संदर्भसूची :—

1. *Arunachalam P. 2008. Special Economics Zones in India: Principles, Problems and Prospects. New Delhi: Serials Publications. P. N. 229.*
2. *Patil, R. B. and Mane, P. M. 2010. 'Special Economic Zones in Maharashtra and Farmers Agitation against Mahamumbai SEZ', Arunachalam, P. (Edited): Special Economic Zones in India (Chinses way of Development) New Delhi: Serials Publications. P. N. 137-148.*

जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांची धार्मिक स्थिती

डॉ. राजेंद्र बगाटे, संशोधक विद्यार्थी, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. मो. ९९६०१०३५८२

प्रस्तावना :— जेष्ठ नागरिकत्व ही मानवी जीवनातील अंतिम, अटळ आणि सार्वत्रिक स्वरुपाची घटना आहे. सातत्याने वाढत जाणारी जेष्ठ नागरिकांची लोकसंख्या हे जागतिक लोकसंख्येचे वैशिष्ट्य आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढत जात आहे तसतशी जेष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येतही वाढ होत आहे. घटता जन्मदर व मृत्यूदर यामुळे जेष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या जेष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येमुळे जेष्ठ नागरिक ही समस्या निर्माण झाली आहे. "एकविसाव्या शतकाची सगळ्यात मोठी खूण म्हणजे हे शतक वयोवर्धनाचे आहे."[१] म्हणजेच या शतकात जेष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. "संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या पाहणीनुसार भारतात इ.स. २०२५ साली ज्येष्ठ लोकांची संख्या १७ कोटी ७४ लाख होईल. ही संख्या जगातील ज्येष्ठ लोकांच्या १५ टक्के इतकी असेल. आता जगातील ६० टक्के ज्येष्ठ नागरिक विकसनशील देशात राहतात."[२] लोकसंख्या संक्रमणामुळे देशाला जसा लोकसांख्यिकी लाभांशाचा फायदा होतो, अगदी तसेच कालांतराने नवीन आव्हानांना देखिल सामोरे जावे लागते. या अनेक आव्हानांपैकी लोकसंख्येतील जेष्ठ नागरिकांचे वाढते प्रमाण हे एक महत्वाचे आव्हान आहे.

"आज जगात एकूण ५८ कोटी जेष्ठ नागरिक राहत आहेत. त्यापौकी ३८ कोटी जेष्ठ नागरिक हे विकसनशील देशातील आहेत. याचाच अर्थ आज जेष्ठ नागरिकांची संख्या १० टक्के आहे. इ. स. २०२० मध्ये जगात एकूण १०० कोटी जेष्ठ नागरिक असतील. त्यापैकी ७० कोटी हे विकसनशील देशातील असणार आहेत."[३] म्हणजेच विकसनशील देशांमध्ये जेष्ठ नागरिकांचे प्रमाण जास्त असणार आहे. "२०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये १० कोटी ज्येष्ठ नागरिक (६० वर्षावरील) जनता आहे, तर सध्या देशामध्ये १२ कोटी जेष्ठ नागरिक असून पुढील १५ वर्षात म्हणजेच २०३० मध्ये ही संख्या ३० कोटीच्या घरात जाणार आहे."[४] आज आरोग्याच्या दृष्टीने विज्ञानाने अनेक रोगावर मात केलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आज मनुष्याचे आयुर्मान वाढलेले आढळते. एकीकडे ही जरी चांगली बाब असली तरी आज नव्याने जेष्ठ नागरिकत्व ही समस्या निर्माण झाली आहे. कारण वृध्दापकाळी या जेष्ठ नागरिकांची सुश्रुषा कोण करणार? त्यांची काळजी कोण घेणार? हा मोठा प्रश्न आज कुटुंबासमोर निर्माण झाला आहे. यामुळे कुटुंबामध्ये सतत वाद होऊन जेष्ठ नागरिकांना वाईट वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. त्यांचबरोबर जेष्ठ नागरिकत्वातून जेष्ठ नागरिकांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. यातूनच त्यांना एकलकोंडे जिवन जगावे लागत आहे किंवा घरदार सोडून त्यांना वृध्दाश्रमात राहावे लागत आहे. "इ. स. १९५० मध्ये भारतात मनुष्याचे आयुर्मान हे ४१ वर्ष होते. १९९० मध्ये ते ६२ वर्षापर्यत वाढलेले असून इ.स. २०२० मध्ये ७० वर्षापर्यत जाईल. सध्या जगातील एकूण २० देशातील मनुष्याचे आयुर्मान हे ७२ वर्ष आहे. आजच काही प्रगत राष्ट्रांतील जेष्ठ नागरिकांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या २० टक्क्यांपर्यत वाढलेली आहे."[५] त्यामुळे जेष्ठ नागरिकांचा प्रश्न, त्यांच्या समस्या गंभीर होत आहेत. त्या सोडविण्याकडे लक्ष जावे आणि जेष्ठ नागरिकांचे आयुष्य आनंदमय चौतन्यमय व्हावे यासाठी प्रत्येक राष्ट्राने, त्या दिशेने कार्य करण्याची गरज आहे.

वयोवर्धन (Aging) ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. जन्माला येणारा प्रत्येक माणूस जन्मल्यापासून वार्धक्याच्या दिशेने वाटचाल करतच असतो. परंतु "ज्यावेळी जगातील लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढू लागले त्यावेळेला या प्रश्नाची दखल राज्यकत्यांनी विशेषत: नियोजन मंडळाने आणि सामाजिक कार्यकत्यांनी घेतली. वयोवर्धन हा काही केवळ सामाजिक प्रश्न नाही, तर आजच्या राज्यकर्त्यापुढे असणारे ते एक मोठेच आव्हान आहे."[६] म्हणून आज जेष्ठ नागरिकांकडे लक्ष देण्याची गरज आहे. "वयोवर्धन हा केवळ संख्याशास्त्राचा विषय नाही, तो आपल्या संस्कृतीशी संबंधित आहे. इतकेच नव्हे तर हा विषय भारताच्या विकासाशीही प्रत्यक्षपणे जोडलेला आहे. प्रत्येक समाजामध्ये त्या समाजातील ज्येष्ठांना कसे वागविले जाते, हे त्या त्या समाजाची सांस्कृतिक पातळी दाखविणारे महत्वाचे गमक आहे."[७] एकूण विचार करता असे दिसते की, "कोणताही ज्येष्ठ माणूस त्याला जर आर्थिक संरक्षण नसेल किंवा त्याला समाजात सामावून घेतले जात नसेल तर अशी ज्येष्ठ माणसे एकटी पडतात आणि त्यांचे आयुष्य म्हणजे केवळ एक हेतुहीन अस्तित्व, केवळ वनस्पतीसम जीवन किंवा एक प्रकारे ते त्यांचे सामाजिक मरणच होते. जशी वर्षे जातात, तसतसे आपले सहकारी, सहयोगी काळाच्या पडद्याआड जातात. सामाजिक

संबंध तुटत जातात, आपल्या सुखदु:खाची वाटणी करायला किंवा सुखदु:खाच्या चार गोष्टी बोलायला कोणी उरत नाही. आणि अशा वेळी ही ज्येष्ठ माणसे स्वत:ला कुटुंबावरचा किंवा समाजावरचा आपण बोजा आहोत असे मानू लागतात. त्यांना वाटते की, आपला समाजाला कुठलाच उपयोग नाही, आपण मरत नाही म्हणून जगतो आहोत, एक प्रकारचे परावलंबी, कुटुंबावरचे व समाजावरचे ओझे होऊन जीवन जगतो आहोत."[८] याच्या उलट आज वाढते आयुर्मान किंवा दीर्घायुपणा ही मानव जातीच्या दृष्टीने एक प्रचंड महत्वाच्या विजयाची निशाणी आहे. "वाढते तंत्रज्ञान, वैद्यकीय संशोधनाने घेतलेली झेप, नवनव्या औषधांचे शोध, त्यामुळे वयोवर्धन आणि दीर्घायुपणा ही या नव्या युगाची एक नांदीच आहे. पण वाढलेल्या या वयाचा उपयोग समाजाला होतो का? या दृष्टीने ज्येष्ठांच्या प्रश्नांकडे सारे जग आता बघत आहे. या मनुष्यबळाचा समाजविकासाच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल किंवा अनुभवाच्या या प्रचंड खजिन्याचा समाजाच्या सुखासाठी कसा उपयोग करून घेता येईल? आपण आपल्या जीवनात केवळ वर्षे वाढवतो, का त्या वाढलेल्या वर्षांना जीवनाची चेतना देतो ? असा विचार आज जगभर सुरू झाला आहे."[९] या दृष्टीने वयोवर्धनाचे आव्हान समाजाला कसे स्विकारता येईल, ज्येष्ठांचा सामाजिक सहभाग कसा वाढेल आणि त्यांचे आयुष्य सुखद कसे होईल याचा विचार केला जात आहे.

आधुनिक भारतातील 'जेष्ठ नागरिकांची समस्या' ही एक ज्वलंत समस्या आहे. "भारतीय समाजात संयुक्त कुटुंबाचा होत आलेला ऱ्हास आणि अर्थव्यवस्थेतील परिवर्तनातून ही एक नविन समस्या निर्माण झाली. या समस्येची तिव्रता भारतासोबतच चिनसारख्या देशालाही जाणवत आहे. नवीन नवीन उपाययोजना जेष्ठ नागरिकांसाठी योजण्याचा कार्यक्रम सुरूवात झालेला आहे. जेष्ठ नागरिकांचा प्रश्न प्राचीन काळात नव्हता, कारण जेष्ठ नागरिक हे कुटुंबाचे संरक्षण करीत होते. भारतात एकोणीसाव्या शतकापर्यंत जेष्ठ नागरिकांसंबधी कोणताही प्रश्न नव्हता परंतु २१ व्या शतकात मात्र जेष्ठ नागरिकांच्या समस्येसंबंधी, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालीके, त्रैमासिके इत्यादीत जेष्ठ नागरिकांच्या समस्या मांडल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाचे विवेचन होत आहे. अमेरिका, इंग्लड, फ्रान्स, डेन्मार्क, रशिया इत्यादी देशात जेष्ठ नागरिकांची समस्या अनेक शतकांपासून आजतागायत अस्तित्वात आहे. म्हणून त्या देशात जेष्ठ नागरिकाश्रम, जेष्ठ नागरिकत्व वेतन, जेष्ठ नागरिक सहाय्यता इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात. जेष्ठ नागरिकांची समस्या आता केवळ एकाच देशाची नसून ही एक जागतिक समस्या निर्माण झालेली आहे."[१०] म्हणूनच या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे.

जेष्ठ नागरिकांच्या समस्येचे जागतिक स्वरूप लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने १९९९ हे आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ लोकांचे वर्ष म्हणून घोषित केले होते. लोकांचे लक्ष ह्या समस्येकडे वेधले जाऊन त्या संदर्भात निश्चित योजनांची आखणी व कार्यान्विकरण व्हावे असा उद्देश त्यामागे होता. "भारतात ज्येष्ठ लोकांचा प्रश्न शहर महानगरात प्रकर्षाने दिसतो. परंतु आता ग्रामीण समुदायातही ह्या समस्येचे गांभीर्य वाढलेले आहे. एकट्या ज्येष्ठ व्यक्तींचा प्रश्न ग्रामीण क्षेत्रात प्रत्ययास येत नाही. मात्र शहरी समुदायात एकट्या जेष्ठ नागरिकांचा प्रश्न जटिल झाला आहे."[११] यामुळे जेष्ठ नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

प्राचीन भारतीय समाजात संयुक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात होती. तरुण व्यक्तीला प्रसंगानुरुप उपदेश व मार्गदर्शन जेष्ठ नागरिक व्यक्तीलाच करावे लागत असे. त्यामुळेच कुटुंबाला जेष्ठ नागरिकांचा आणि जेष्ठ नागरिकांना कुटुंबाचा आधार होता. तरुण पिढी अर्थार्जनाचे काम करत असल्यामुळे जेष्ठ नागरिकांच्या मार्गदर्शनाचा, अनुभवाचा, उपदेशाचा उपयोग या तरुण पिढीला होत असे. परंतु आज जागतिकीकरण, आधुनिकीकरण, औद्योगिकरण व तसेच नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबपध्दतीत अमुलाग्र बदल होऊन विभक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आली. विभक्त कुटुंबात पती—पत्नी व त्यांची अविवाहित मुले राहत असल्याने जेष्ठ नागरिकांची त्यांना अडचण वाटु लागली आहे. शिक्षणाच्या प्रसारामुळे वय किंवा जेष्ठ नागरिक या घटकांपेक्षा गुणवत्ता पात्रता आणि प्राविण्यता यांना महत्व प्राप्त झाले त्यामुळे जेष्ठ नागरिकांचे महत्व, कमी होऊन त्यांच्यावर जेष्ठ नागरिकाश्रमात राहण्याची वेळ येत आहे.

जेष्ठ नागरिकाश्रम/वृध्दाश्रम म्हणजे काय? :— "जेष्ठ नागरिकाश्रम हे अशा प्रकारचे रहिवाशी केंद्र असते की ज्यामध्ये ६० वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या किमान २५ व्यक्तींची सोय केली जाते. निवाऱ्याची गरज असणाऱ्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील जेष्ठ नागरिक व्यक्तींनाही जेष्ठ नागरिकाश्रमात प्रवेश दिला जातो."[१२]

संशोधनाची उद्दिष्टे :— १. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांच्या वौयक्तिक स्थितीचा अभ्यास करणे. २. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांची धार्मिक स्थिती जाणून घेणे.

गृहितकृत्ये:— १. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणारे जेष्ठ नागरिक देव मानतात. २. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणारे जेष्ठ नागरिक धार्मिक प्रवृत्तीचे असलेले दिसून येतात.

संशोधनाचे अध्ययन क्षेत्र :— प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग एवढेच मर्यादीत करण्यात आलेले आहे.

संशोधन आराखडा :— प्रस्तुत संशोधनामध्ये 'वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा' अवलंब करण्यात आला आहे.

नमुना निवड पध्दती :— मराठवाडा विभागात सद्यस्थितीत सुरू असलेल्या एकूण दहा जेष्ठ नागरिकाश्रामांमध्ये राहणाऱ्या एकूण ४०० जेष्ठ नागरिकांपैकी ५० टक्के म्हणजेच २०० उत्तरदात्यांची 'सहेतुक नमुना निवड पध्दतीचा' वापर करून संशोधनासाठी नमुना म्हणून निवड केली आहे.

तथ्य संकलनाच्या पध्दती :— १) प्राथमिक स्त्रोत : प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासकार्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामध्ये 'मुलाखत अनुसूची' या साधनांचा उपयोग केला आहे. २) दुय्यम स्त्रोत : दुय्यम स्त्रोतांमध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखान, वर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासिके, वेगवेगळे अहवाल, इंटरनेट इत्यादी उपलब्ध स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्याजेष्ठ नागरिकांची वयैक्तिक व धार्मिक स्थिती कशी आहे हे शोधण्याचा प्रयत्न केलेला असून हे पुढील माहितीवरून अधिक स्पष्ट होईल.

तक्ता क्र. १.

जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांची वैयक्तिक माहिती

(एकूण २०० उत्तरदाते, मराठवाडा विभाग, ऑक्टोबर — डिसेंबर २०१४.)

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे शिर्षक	पर्याय	जेष्ठ नागरिकांची	टक्केवारी
१.१	**जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचा वयोगट**	६०—६९ वर्ष	५१	२५.५०
		७०—७९ वर्ष	७९	३९.५०
		८०—८९ वर्ष	५८	२९.००
		९० पेक्षा जास्त वर्ष	१२	०६.००
१.२	**जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे लिंग**	स्त्री	१११	५५.५०
		पुरुष	८९	४४.५०
१.३	**जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे शिक्षण**	अशिक्षित	९४	४७.००
		प्राथमिक	५१	२५.५०
		माध्यमिक	३७	१८.५०
		उच्च माध्यमिक	०६	०३.००
		पदवी	०६	०३.००
		पदव्यूत्तर	०४	०२.००
		प्रौढ शिक्षित	०२	०१.००
१.४	**जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचा वौवाहिक दर्जा**	अविवाहित	०८	०४.००
		विवाहित	५०	२५.००
		विधवा	९४	४७.००
		विधुर	४७	२३.५०
		घटस्फोटित	०१	००.५०
१.५	**जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचा जात प्रवर्ग**	खुला	११९	५९.५०
		अनुसूचित जाती	२१	१०.५०
		इतर मागास प्रवर्ग	३६	१८.००
		भटक्या विमुक्त जाती/जमाती	२२	११.००
		विशेष मागास प्रवर्ग	०२	०१.००
		एकूण	**२००**	**१००.००**

सदरील तक्ता क्र. १.१ वरुन असे दिसते की, '६० ते ६९ वर्षे' या 'तरुण जेष्ठ नागरिक' (Young Old) वयोगटातील २५.५० टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते आहेत. तर '७० ते ७९ वर्ष' या 'मध्यम जेष्ठ नागरिक' (Middel Old) वयोगटातील ३९.५० टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते आहेत. तर '८० ते ८९ वर्षे' या 'जेष्ठ नागरिक—जेष्ठ नागरिक' (Old&Old) वयोगटातील २९ टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते आहेत. तर '९० व त्यापेक्षा जास्त वर्षे' या 'अतिशय जेष्ठ नागरिक' (Oldest Old) वयोगटातील ०६ टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते असलेले दिसून येतात. यावरून आपणास असे म्हणता येईल की वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन संशोधने, शासनाची कल्याणकारी राज्याची संकल्पना यामुळे आज जन्मदरात व मृत्युदरात घट

होत असल्यामुळे आज व्यक्तीची आयुर्मयादा दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहे आणि ती येत्या काळात सतत वाढतच राहणार आहे हे आपल्याला वरीलप्रमाणे दिसून येते.

तसेच वरील तक्ता क्र. १.२ चा विचार करता असे दिसते की, ५५.५० टक्के 'स्त्री' उत्तरदात्या असून ४४.५० टक्के उत्तरदाते 'पुरुष' असलेले दिसून येतात. म्हणजेच जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या एकूण जेष्ठ नागरिकांमध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.

तर सदरील तक्ता क्र. १.३ चा विचार करता असे स्पष्ट होते की, अशिक्षित ४७ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण प्राथमिक २५.५० टक्के, माध्यमिक १८.५० टक्के, उच्च माध्यमिक व पदवी अनुक्रमे ३ टक्के, पदव्यूत्तर २ टक्के आणि प्रौढ शिक्षित १ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. यावरून असे म्हणता येते की, जसजसा शिक्षणाचा स्तर उंचावत जातो तसतसे जेष्ठ नागरिकांमधील शिक्षणाचे प्रमाण कमी असलेले दिसून येते.

तर सदरील तक्ता क्र. १.४ वरून असे दिसते की, 'अविवाहित' जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण ०४ टक्के एवढे आहे. तर 'विवाहित' जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण २५ टक्के एवढे आहे, तर ७०.५० टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांच्या जोडीदारांचा मृत्यू झालेला असून त्यामध्ये ४७ टक्के 'विधवा' असून २३.५० टक्के विधुर असलेले दिसतात, तर १ जेष्ठ नागरिक उत्तरदाता घटस्फोटित आढळला असून त्याचे एकूण उत्तरदात्यांशी शेकडा प्रमाण ०.५० टक्के इतके आहे. वरील तक्त्याचा विचार करता असे दिसते की, 'विवाहित' जेष्ठ नागरिक उत्तरदाते ९६ टक्के असून हे प्रमाण 'अविवाहित' ०४ टक्के उत्तरदात्यापेक्षा अधिक आहे. यावरून आपणास असे दिसते की, भारतीय समाजामध्ये विवाह करणे अनिवार्य मानलेले आहे. यावरून आपणास विवाहाची अनिवार्यता हे भारतीय समाजाचे वैशिष्टय स्पष्ट होते.

तसेच सदरील तक्ता क्र. १.५ वरून असे दिसते की, 'खुल्या' प्रवर्गातील जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे प्रमाण ५९.५० टक्के आहे, तर 'अनुसूचित जाती' प्रवर्गातील जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे प्रमाण १०.५० टक्के आहे, तर 'इतर मागास' प्रवर्गातील जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे प्रमाण १८ टक्के एवढे आहे, तर 'भटक्या विमुक्त जाती जमाती' या प्रवर्गातील जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे प्रमाण ११ टक्के एवढे आहे तर 'विशेष मागास' प्रवर्गातील जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे प्रमाण ०१ टक्का एवढे असून 'अनुसूचित जमाती' या प्रवर्गातील एकही उत्तरदाता जेष्ठ नागरिकाश्रमात राहत असलेला आढळला नाही. सदरील तक्ता क्र. १.५ चा विचार करता असे दिसते की, खुल्या प्रवर्गातील ५९.५० टक्के उत्तरदाते असून ते अनुसूचीत जाती १०.५० टक्के, इतर मागास प्रवर्ग १८ टक्के, भटक्या विमुक्त जाती जमाती ११ टक्के व विशेष मागास प्रवर्ग ०१ टक्का या प्रवर्गापेक्षा जास्त आहे.

तक्ता क्र. २

जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचे धर्माच्या आधारे वर्गीकरण व त्यांचे धार्मिक आचरण

(एकूण २०० उत्तरदाते, मराठवाडा विभाग, ऑक्टोबर — डिसेंबर २०१४.)

तक्त्यांचे	तक्त्यांचे शिर्षक	पर्याय	जेष्ठ नागरिकांची	टक्केवारी
२.१	जेष्ठ नागरिक उत्तरदात्यांचा धर्म	हिन्दु	१६९	८४.५०
		बौध्द	१३	०६.५०
		जौन	०९	०४.५०
		शिख	०८	०४.००
		ख्रिश्चन	०१	००.५०
२.२	जेष्ठ नागरिक उत्तरदाते देव मानतात का	होय	१९३	९६.५०
		नाही	०७	०३.५०
२.३	जेष्ठ नागरिक उत्तरदाते धर्माप्रमाणे कोणते धार्मीक आचरण करतात	प्रार्थना	४९	२४.५०
		उपवास	१०	०५.००
		प्रार्थना +	१३९	६९.५०
		कोणतेच नाही	०२	०१.००
२.४	जेष्ठ नागरिक उत्तरदाते धार्मिक प्रार्थना केव्हा करतात?	दररोज	१७५	८७.५०
		आठवड्याला	११	०५.५०
		महिन्याला	१	००.५०
		कधी तरी	१	००.५०
		लागू नाही	१२	०६.००
२.५	जेष्ठ नागरिक उत्तरदाते धार्मिक उपवास केव्हा करतात'	आठवड्याला	२६	१३.००
		पंधरा दिवसाला	११३	५६.५०
		महिन्याला	१०	०५.००

		लागू नाही	५१	२५.५०
२.६	उत्तरदाते रेडिओ / टि. व्ही. वर धार्मीक कार्यक्रम ऐकतात /बघतात का	होय	८८	४४.००
		नाही	११२	५६.००
२.७	एखाद्या धार्मिक संघटनेचे सदस्य आहेत का?	होय	९	०४.५०
		नाही	१९१	९५.५०
२.८	उत्तरदाते एखाद्या धार्मीक संघटनेचे कोणत्या प्रकारचे सदस्य आहेत'	वार्षीक	१	००.५०
		अजीव	८	०४.००
		लागू नाही	१९१	९५.५०
२.९	उत्तरदाते एखाद्या धार्मीक संघटनेला आर्थिक मदत करतात का	होय	७	०३.५०
		नाही	१९३	९६.५०
		एकूण	२००	१००.

वरील तक्ता क्र. २.१ चा विचार करता असे दिसते की, 'हिंदू' या धर्मातील सर्वाधिक म्हणजेच ८४.५० टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते असून हे प्रमाण 'बौध्द' ०६.५० टक्के, जैन ०४.५० टक्के, सिख ०४.०० टक्के व ख्रिश्चन ०.५० टक्के या सर्व धर्मातील उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. हे प्रमाण जास्त असण्याचे कारण म्हणजे मराठवाड्यात 'हिंदू' धर्मीयांची लोकसंख्या सर्वाधिक असल्यामुळे जेष्ठ नागरिकाश्रमात राहण्याचे प्रमाणही 'हिंदू' धर्मीयांमध्ये अधिक असणे साहजिकच आहे.

तसेच वरील तक्ता क्र. २.२ वरून असे स्पष्ट होते की, आम्ही देव मानतो असे उत्तर देणारे ९६.५० टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्ही देव मानत नाही असे उत्तर देणाऱ्या ३.५० टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. हे प्रमाण अधिक असण्याचे कारण म्हणजे मराठवाड्यामध्ये आजसुध्दा अदृश्य शक्ती म्हणजेच देव किंवा ईश्वरावर विश्वास असलेले जेष्ठ नागरिक आहेत.

तर वरील तक्ता क्र. २.३ वरून असे दिसते की, आम्ही आमच्या धर्माप्रमाणे प्रार्थना करतो असे उत्तर देणारे २४.५० टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते आहेत, तर आम्ही आमच्या धर्माप्रमाणे उपवास करतो असे उत्तर देणारे ५ टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते आहेत, तर आम्ही आमच्या धर्माप्रमाण प्रार्थना व उपवास दोन्हीही करतो असे उत्तर देणारे ६९.५० टक्के जेष्ठ नागरिक उत्तरदाते आहेत, तर आम्ही आमच्या धर्माप्रमाणे कोणतेच आचरण करत नाही असे उत्तर देणारे ०१ टक्का जेष्ठ नागरिक उत्तरदाते आहेत. या वरून असे स्पष्ट होते की, जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या एकूण जेष्ठ नागरिकापैकी ९९ टक्के जेष्ठ नागरिक हे कोणत्याना कोणत्या प्रकारचे धार्मिक आचरण करतात.

तर वरील तक्ता क्र. २.४ वरून असे स्पष्ट होते की, आम्ही आमच्या धर्माच्या आचरणाप्रमाणे दररोज प्रार्थना करतो असे उत्तर देणारे ८७.५० टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आठवड्याला ५.५० टक्के, महिन्याला ०.५० टक्के व कधी तरी करतो असे उत्तर देणाऱ्या ०.५० टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तर ५ टक्के उत्तरदाते फक्त उपवासच करतात आणि १ टक्का उत्तरदाते धर्माप्रमाणे कोणतेच धार्मिक आचरण करत नसल्यामुळे या ६ टक्के उत्तरदात्यांना हा प्रश्न लागू होत नाही.

तसेच वरील तक्ता क्र. २.५ वरून असे स्पष्ट होते की, आम्ही आमच्या धर्माच्या आचरणाप्रमाणे दर पंधरा दिवसाला उपवास करतो असे उत्तर देणारे ५६.५० टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आठवड्याला उपवास करतो असे उत्तर देणाऱ्या १३ टक्के व महिन्याला उपवास करतो असे उत्तर देणाऱ्या ५ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तर २४.५० टक्के उत्तरदाते फक्त प्रार्थनाच करतात आणि १ टक्का उत्तरदाते धर्माप्रमाणे कोणतेच धार्मिक आचरण करत नसल्यामुळे या २५.५० टक्के उत्तरदात्यांना हा प्रश्न लागू होत नाही.

तर वरील तक्ता क्र. २.६ वरून असे स्पष्ट होत की, आम्ही रेडिओ/टी. व्ही. वर धार्मिक कार्यक्रम ऐकत/बघत नाही असे उत्तर देणारे ५६ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्ही रेडिओ/टी. व्ही. वर धार्मिक कार्यक्रम ऐकतो/बघतो असे उत्तर देणाऱ्या ४४ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे.

तर वरील तक्ता क्र. २.७ वरून असे स्पष्ट होत की, आम्ही कोणत्याच धार्मिक संघटनेचे सदस्य नाहीत असे उत्तर देणारे ९५.५० टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्ही धार्मिक संघटनेचे सदस्य आहोत असे उत्तर देणाऱ्या ४.५० टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे.

तसेच वरील तक्ता क्र. २.८ वरून असे स्पष्ट होते की, ४.५० टक्के उत्तरदाते धार्मिक संघटनेचे सदस्य आहेत त्यापैकी १ म्हणजेच ०.५० टक्के उत्तरदाता हा 'वार्षिक' प्रकारचा सदस्य आहे, तर ८ म्हणजेच ४ टक्के उत्तरदाते हे धार्मीक संघटनेचे 'आजीव' सदस्य आहेत. तर ९५.५० टक्के उत्तरदाते हे कोणत्याच प्रकारच्या संघटनेचे सदस्य नसल्यामुळे त्यांना हा प्रश्न लागू होत नाही.

तर वरील तक्ता क्र. २.९ वरून असे स्पष्ट होते की, ३.५० टक्के उत्तरदात्यांनी होय आम्ही धार्मिक संघटनेला आर्थिक मदत करतो असे म्हटले आहे. तर ९६.५० टक्के उत्तरदात्यांनी आम्ही कोणत्याच धार्मिक संघटनेला आर्थिक मदत करत नाही असे म्हटले आहे

निष्कर्ष:— १. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये ७०—७९ वर्षे या मध्यम जेष्ठ नागरिक (Middle Age) वयोगटातील उत्तरदाते सर्वाधिक म्हणजेच ३९.५० टक्के आहेत. २. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये स्त्री जेष्ठ नागरिकांचे प्रमाण अधिक म्हणजेच ५५.५० टक्के एवढे आहे. ३. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये हिंदू धर्मियांचे व खुल्या प्रवर्गातील उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहे. ४. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये विवाहित उत्तरदात्यांचे प्रमाण ९६ टक्के असून त्यामध्ये विधवांचे प्रमाण अधिक (४७ टक्के) आहे. ५. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये अशिक्षित जेष्ठ नागरिकांचे प्रमाण अधिक आहे. ६. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये देव आहे असे माणनाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक म्हणजेच ९६.५० टक्के एवढे आहे. ७. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये सर्वाधिक म्हणजेच ९९ टक्के उत्तरदाते हे त्यांच्या धर्माप्रमाणे कोणतेनाकोणते धार्मिक आचरण करतात. ८. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये अधिक म्हणजेच ८७.५० टक्के उत्तरदाते हे त्यांच्या धर्माच्या आचरणाप्रमाणे दररोज प्रार्थना करतात. ९. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये आम्ही आमच्या धर्माच्या आचरणाप्रमाणे पंधरा दिवसाला उपवास करतो असे म्हणणारे सर्वाधिक म्हणजेच ५६.५० टक्के उत्तरदाते आहेत. १०. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये आम्ही रेडिओ / टी. व्ही. वर धार्मिक कार्यक्रम ऐकत / बघत नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक ५६ टक्के उत्तरदाते आहेत. ११. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये आम्ही कोणत्याच धार्मिक संघटनेचे सदस्य नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक ९५.५० टक्के उत्तरदाते आहेत. १२. जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांपैकी ९६.५० टक्के उत्तरदात्यांनी आम्ही कोणत्याच धार्मिक संघटनेला आर्थिक मदत करत नाही असे म्हटले आहे. अशा प्रकारे प्रस्तुत शोधनिबंधातून जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांची धार्मिक स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संदर्भग्रंथ सूची:—

१. *गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ४५.*
२. *खडसे भा. कि., (२००४), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ. क्र. १४६.*
३. *लिमकर सुधाकर, (२००५), 'आरोग्य संवाद', औरंगाबाद, संवाद प्रकाशन, पृ. क्र. ६१.*
४. *महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद, सोमवार, दिनांक, १३ जुलै २०१५, पृ. क्र. ०५.*
५. *लिमकर सुधाकर, (२००५), 'आरोग्य संवाद', औरंगाबाद, संवाद प्रकाशन, पृ. क्र. ६१.*
६. *गोखले शरच्चंद्र, (२०१२), समाधानी वार्धक्य, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०५.*
७. *गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०४.*
८. *गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०४—०५.*
९. *गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०५—०६.*
१०. *गंदेवार एस.एन., (२००४), भारतीय समाज: वादातीत विषय आणि समस्या, लातूर, विद्याभारती प्रकाशन, पृ.क्र. १३३.*
११. *खडसे भा. कि., (२००४), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ. क्र. १४४.*
१२. *सांगोलकर दत्ता (२०१४), 'मानवी हक्क', पुणे, जिज्ञासा प्रकाशन. पृ.क्र. १५७.*

भारतीय राज्यघटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

डॉ. के. एस. काळे, कला, वाणिज्य महाविद्यालय कोवाड, ता.चंदगड जि.कोल्हापूर. मो. ०९४८१४०२६४०

प्रस्तावना :— राज्यघटनेत प्रामुख्याने भूमिका बजावणारी जबाबदारी, कर्तव्ये, अधिकार इत्यादी बाबीचा अंतर्भाव होतो. १९४६ मध्ये घटना समितीची निवड झाली. तेव्हा त्या समितीला डॉ. बाबासाहेबांनी आपल्या ''शेडयुल्ड कास्ट फेडरेशन'' च्या वतीने एक निवेदन दिले. त्यामध्ये भारताचे संविधान कसे असावे हे नमुद केले होते. हेच निवेदन आज ''स्टेप्स ऑफ मायनॉरिटीस'' या नावाने ग्रंथरुपात प्रसिध्द आहे. भारतीय संविधान तयार करण्यात प्रमुख भूमिका ही मसुदा समितीची होती. व त्याचे अध्यक्ष या नात्याने ही जबाबदारी डॉ. बाबासाहेबावर आली. समितीने विविध राज्यघटनांचा अभ्यास करुन भारतीय संविधानाचा आराखडा तयार केला आहे. घटना मंजुरीच्या वेळेस विविध चर्चा झाल्या. या चर्चेवर उत्तरे देताना बाबासाहेंबाचा जो दृष्टिकोन स्पष्ट झाला. तो प्रामुख्याने ''घटनावाद'' म्हणून ओळखला जातो. कोणत्याही देशाच्या घटनेमध्ये काळाला, वेळेला व परिस्थितीला अनुसरुन सतत बदल होत राहणे आवश्यक आहे. म्हणून बाबासाहेबांनी घटनादुरुस्ती पध्दतीचे समर्थन करुन घटनावादाचा स्विकार केला. बाबासाहेबांनी घटना मंजुरीच्या वेळी केलेले युक्तिवाद व जगातील घटनांचा त्यांनी केलेला तौलनिक अभ्यास यातून त्यांची बुध्दिमता, दुरदृष्टिकोन सृजनशिलता, समतावादी दृष्टिकोन इ. गुणांची छाप दिसते.

त्रिमंत्री मंडळ योजनेनुसार घटना समिती सदस्यांची निवड प्रांतिक विधीमंडळाच्या आमदाराकडून करण्याचे ठरले. कॉंग्रेसच्या तिकीटावर बरेचसे सदस्य निवडून आले. परंतु बाबासाहेबांना मुस्लिम लिगच्या पाठीब्यांने बंगालमधून निवडून यावे लागले. त्यातही बंगाल फाळणीमुळे ते सदस्यत्व गेले. परंतु मुंबई प्रांतातील प्रतिनिधी जयकर यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे व कॉंग्रेस पक्षाच्या काही नेत्यांच्या आग्रहामुळे बाबासाहेबांना बिनविरोध घटनासमितीवर निवडले गेले. यामागे बाबासाहेबांचा गाढा अभ्यास व त्यांचा राजकारणाचा पिंड हा सनदशिर व घटनात्मक असल्याचे कारण होते. ९ डिसेंबर १९४६ समितीच्या पहिल्या बैठकीत नेहरुंनी राज्यघटनेच्या उद्देश व स्वरुपाबाबत भाषण दिले होते. व त्यात बाबासाहेबांनी संविधानात असणारी धर्मनिरपेक्षता, समता, बंधुता व दलितांच्या हिताचे रक्षण केले जाईल. असे स्वरुप स्पष्ट असावे अशी अपेक्षा केली. व नेहरुच्या उद्देशाला पाठींबा दिला. या घटनासमितीमध्ये भाग घेण्यासाठी मुस्लिम लिगच्या सहभागाविषयी त्यांचे मन वळविण्यासाठी घेण्यात आलेल्या बैठकित बाबासाहेबांना आमत्रिंत करण्यात आले नाही. तेव्हा बाबासाहेबांनी वार्ताहरांशी बोलताना मी घटनासमितीत भाग घेईलच असे नाही, असे सांगितले पण बहुसंख्य सवर्ण हिंदू असलेल्या घटना समितीत दलित हितांचे रक्षण होईल. तेवढे करुन द्यावे या उद्देशानी त्यांनी भाग घेतला. पण हा मार्ग वैधानिक असेल असे ते म्हणत. घटना समितीच्या पहिल्या बैठकीत नेहरु नंतर बोलताना त्यांनी स्पष्ट केले 'सामाजिक, राजकीय, आर्थिक न्याय देण्यासाठी समाजवादी अर्थरचना, भूमी आणि उद्योगाचे राष्ट्रीयकरण इत्यादी गोष्टी कराव्या लागतील. कायदा व सामाजिक निती यांच्या कक्षेत राहून स्वांतत्र्य अधिकार दिले जातील. असे ठरावात जरी म्हटले असले तरी कायदा निती कोणती ठरवणे हे शासनाच्या हाती असणार नाही. आणि शासन बदलले की या संबधिच्या संकल्पनाही बदलणार' या वस्तुस्थितीची जाणीव त्यांनी करुन दिली. तसेच भारतातील गटबाजी त्यांनी मान्य केली. व मी ही एका गटाचा पुरस्कर्ता असेल परंतु यावर मात केली जाऊ शकते व मनात आले तर आपण अखंड राहू शकतो, एकत्र येवू शकतो. यावेळी त्यांना सत्ता देणे सोपे असते पण ती उपभोगणे किंवा चालवणे अवघड असते असे म्हटले. बाबासाहेब व कॉंग्रेस यांच्या विचारात नेहमीच तफावत जाणवते. देशाचे नेतृत्व करणाऱ्या कॉंग्रेंसची घटनासमितीमध्ये चलती होती. तरी एका फुटीरवाद्याप्रमाणे आपले वेगळेपणाच्या आवेशात ते न येता त्यांनी घटनासमितीमध्ये कॉंग्रेससोबतच काम केले व देशाची भावी राजकीय वाटचाल व संविधानाची निर्मिती यात देशाच्या सर्व घटकांनी एकत्र येवून सहकार्य करण्याची गरज व नवभारताची निर्मिती करण्याची आवश्यकता बाबासाहेबांनी जाणली व आपले सहकार्य देशाला दिले. परंतु आजच्या राजकीय पक्षाकडे पाहता स्वता:च्या स्वार्थासाठी अनेक पक्षाची गटबाजी व पक्षांची निर्मिती व त्यामुळे निर्माण झालेली वैचारिक भिन्नता व देशाचे हित न जोपासता राजकारणात झालेले अनेक तुकडे यावरुन आजही बाबासाहेबांची वैचारिकता येथील जनतेला समजली नाही असे वाटते.

भारतीय घटनासमितीने २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना केली. या समितीत के. एम. मुन्शी, गोपाल

स्वामी आय्यगांर, अल्लाडी कृष्ण, स्वामी अय्यर, सैयद सदुल्ला, एन. माधवराव, डी. पी. श्वेतान हे सर्व सदस्य आणि बी. आर. राव हे घटनात्मक सल्लागार होते. भारतीय संविधान तयार करण्यात मसुदा समितीची प्रमुख व महत्वपुर्ण भूमिका असल्याने पर्यायाने ती समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांवर जबाबदारी आली.

मसुदा समितीत बाबासाहेबाव्यतिरिक्त इतर सहा सदस्य असूनही या समितीचे संपूर्ण कार्य एकटया बाबासाहेबांनी कसे पुर्णत्वास नेले याबाद्दल कृतज्ञता व्यक्त करताना श्री टी. टी. कृष्णाम्माचारी घटनासमितीत म्हणाले ''आपण निवडलेल्या लेखण समितीच्या सात सदस्यापैकी एक सभासद मृत्यू पावला, एक अमेरिकेत गेला. एकाने राजीनामा दिला, एक संस्थानिकासंबधीच्या कामांमध्ये गुंतलेला असल्यामुळे असूनही नसल्या सारखा होता. दोन सभासद दिल्लीपासून दूर होते. त्यांची प्रकृती नेहमीच बिघडत असल्यामुळे तेही उपस्थित राहत नव्हते. अशारितीने घटना तयार करण्याचा भार एकटया बाबासाहेबांवर पडला. आणि ते कार्य त्यांनी आपल्या सखोल ज्ञानाने, परिश्रमाने आणि राष्ट्रप्रेमाने दुर्बल शारीरिक अवस्थेतही पार पाडले तसेच घटनासमितीत प्रत्येक कलमाचे स्पष्टीकरण करुन विधेयक समंत होईपर्यंत त्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे.'' यावरुन बाबासाहेब राज्यघटनानिर्मितीमध्ये किती महत्वाचे व्यक्ती होते हे निर्वीवाद सिध्द होते.

अशा प्रकारे मानवतावादाला प्रमुख महत्व देवून सर्व घटकांपर्यंत समान संधी मिळावी या उदारमतवादी धोरणाचे संविधान दिसून येते. देशातील समाजाचे स्वरुप कसे असावे, सामाजिक न्याय, समता इत्यादी सर्व गोष्टी संविधान ठरवू शकते. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसावे त्याचे केवळ जनतेने निमुटपणे पालन करावे असे बाबासाहेबांचे मत नव्हते. तर व्यक्तिचे स्वांतत्र्य व सर्वांना समान संधी मिळावी यासाठी संविधान, अशी त्यांची मतप्रणाली होती. सर्व तळागाळातील दुर्लक्षित व्यक्तिवर अन्याय होऊ नये तर सर्वांना एका दृष्टिने बघितले जावे. मानवतावाद सर्वात महत्वाचा आहे. व तो सर्वात रुजावा असा अर्थ बाबासाहेबांच्या विचारसरणीतून दिसतो. व हे सर्व साध्य करण्यासाठी एक प्रज्वल व प्रभावी साधन, हत्यार म्हणून संविधान आहे. व त्या संविधानातून ही स्थिती आणली जाऊ शकते. असे त्यांचे मत होते. म्हणून समाजातील सर्व बाबींचा समावेश त्यांनी संविधानात करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बाबासाहेबांचा घटनावाद हा भारतीय राजकारण व राज्यशास्त्राला मिळालेले सर्वात मोठे योगदान आहे. तेव्हा त्यांची भारतीय राज्यघटनेबद्दलची मते पुढीलप्रमाणे दिसून येतात.

१. **संविधान समिती —** भारतीय संविधान निर्मितीसाठी जी समिती निर्माण करण्यात आली त्याबाबतीत बॅ. जयकर यांनी घटना समिती सार्वभौम नसल्याचे म्हटले आहे. घटनासमितीतील सभासदांची निवड प्रौढ मताधिकारानुसार झालेली नाही. अप्रत्यक्ष पध्दतीने ती निवडून आली हा आक्षेप घेण्यात आला. यावर बाबासाहेबांनी या घटनेचे मुळ तिचा अधिकार व सार्वभौम सत्ता ही जनतेपासून प्राप्त झालेली असून या समितीचे सभासद सार्वभौम समाजाचे प्रतिनिधी आहेत. त्यामुळे या प्रतिनिधीनी तयार केलेली घटना ही भारतीय लोकांचीच घटना आहे असे नि:संदिग्धपणे उत्तर दिले होते. देशातील आवश्यक ते बदल गरजेनसार घटनेने स्विकारलेले आहेत. त्यामुळे ही राज्यघटना अतिगर्दीत बनविण्यात आली आहे. म्हणून ती अल्पजीवी ठरेल असे म्हणणाऱ्याचे भाकीत आजवर खोटे ठरलेले आहे. भविष्यात देखील घटनेच्या उदात व सर्व समोवशकतेमुळे ती सदैव यशस्वी ठरेल यात शंका नाही.

२. **संविधानाचे विस्तृत स्वरुप —** भारतीय संविधान आकाराने मोठे असल्याबद्दल टिका झाली. त्याला बाबासाहेबांचे उत्तर होते. भविष्यात घटनात्मक वाद प्रंसग निर्माण होऊ नये म्हणून तसेच संविधानातील संदिग्धता कमी व्हावी म्हणून संविधान विस्तृत व व्यापक स्वरुपात तयार करण्यात आले आहे.

३. **समाजवादाचा पुरस्कार —** बाबासाहेबाच्या मते न्यायावर आधारीत कल्याणकारी समाजरचना हे राज्याचे उदिष्टये असावे. सर्व नागरिकांना सर्व संस्थात सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय न्याय मिळावा त्याचप्रमाणे भौतिक साधनाची मालकी आणि नियत्रंण असे ठेवावे की ज्यामुळे जास्तीत जास्त लोकांचे कल्याण होईल. तसेच वृध्दापकाळ बेकारी, अंपगत्व आजारपण इ. प्रंसगी व्यक्तिला सार्वजनिक मदत मिळावी तसेच समाजातील दुर्बल घटकांचे विशेषत: अनुसूचित जाती—जमातीचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबध जपणे त्यांचे पिळवणुकीपासून संरक्षण करणे आवश्यक ठरवले आहे. व त्यासाठी त्यांनी आर्थिक जीवनात राज्य समाजवादाचीही व समाजवादी अर्थव्यस्थेचा पुरस्कार केला होता.

४. **संविधानाचे स्वरुप परिदृढ व परिवर्तनिय —** भारतीय संविधान हे अतिशय ताठर नाही. व अतिशय लवचिकही नाही. बदलत्या परिस्थितीला अनुसरुन घटनादुरुस्ती करता यावी त्याचबरोबर तिच्या दुरुस्तीची प्रक्रिया जर सहज सोपी असेल तर ती कायदेमंडळाच्या हातातील बाहुले बनेल. म्हणून इतर

देशाच्या घटना दुरुस्ती पध्दतीचा अभ्यास करुन ही पध्दत निवडण्यात आली आहे.

५. **मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्व —** प्रा. लॉस्की यांनी मूलभूत हक्काविषयी म्हटले आहे. की, ''राज्य आपल्या नागरीकांना किती हक्क प्रदान करते यावरुन त्या राज्याचा दर्जा ओळखला जातो. जे राज्य आपल्या नागरीकांसाठी हक्काची योग्य व्यवस्था करत नाही त्या राज्याची इमारत वाळूच्या पायावर बांधलेली असते. भारतीय संविधानासंदर्भात बाबासाहेब म्हणतात भारतात लोकशाही परंपरा नाही. बहुसंख्य लोक गरीब निरक्षर, तसेच राजकारण पराड:मुख आहेत अशा परिस्थितीत राज्याकडून त्यांच्या घटकांचा संकोच होऊ नये म्हणून त्याविषयीची घटनात्मक तरतुद करण्यात आली आहे. याशिवाय त्यांच्या हक्कावर आक्रमण झाले तर न्यायालयात त्या विरुध्द दाद मागता येईल. संविधानातील कलम ३२ मधील तरतुद म्हणजे घटनेचा प्राण असून याबाबत भारतातील सामाजिक आर्थिक, राजकीय परिस्थिती तसेच अस्पष्टता इत्यादी घटक लक्षात घेउन मूलभूत हक्कांबाबात भारतीय संविधानात सविस्तर तरतुद करण्यात आली आहे.

६. **संघराज्य व्यवस्था —** भारतासाठी स्विकारण्यात आलेल्या केंद्रप्रधान संघराज्यपध्दतीचे समर्थन बाबासाहेबांनी केले असून त्यांच्या मते भारताच्या राजकीय जीवनातील अंत्यत टोकाचे विचार बाजूला सारुन राष्ट्रीय ऐक्य व भाविनक एकात्मता याच्यांत समन्वय प्रस्थापित करणे तसेच असाधारण परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी आणिबाणीच्या काळात संघराज्याचे एकूण राज्यात रुपातर करणे आवश्यक असल्याने तसेच त्यासाठी लवचिक त्याचप्रमाणे बलिष्ठ संघराज्य आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यासाठी त्यांनी कायदेविषयक, प्रशासकीय न्यायविषयक तसेच आर्थिक अधिकार केंद्राकडे अधिक सोपवले.

७. **राजकीय लोकशाही —** बाबासाहेबांची लोकशाहीची संकल्पनाही पारंपारिक उदारमतवादापेक्षा वेगळी असून ती मुख्यत: व्यक्तिचे काही अधिकार आहेत आणि त्या आधिकाराच्या सुरक्षिततेची हमी संविधानाद्वारे देण्यात यावी. समाजातील जनतेला सुख सोयीची प्राप्ती करुन देताना कोणत्याही व्यक्तिला संविधानाद्वारे मिळालेले अधिकार सोडून देण्याची वेळ येउ नये. राज्याने कोणत्याही खाजगी व्यक्तिला इतरांवर राज्य करण्याचा अधिकार देवू नये. या मुलतत्वावर एक व्यक्ती एक मत च्या बरोबर एक मत एक मूल्य याला ते लोकशाहीचा आत्मा म्हणतात.

८. **संसदीय शासनपध्दती —** भारतात असणारी आर्थिक आणि सामाजिक विषमता, निरक्षरता, जातीय स्वरुपाचे राजकरण, वक्तिपुजेचे महात्म्य, विरोधकांना दडपून टाकण्याची वृती हे दोष भारतीय समाजव्यवस्थेत असल्यामुळे राजकीय लोकशाहीबरोबर आर्थिक व सामाजिक लोकशाही निर्माण केली पाहिजे. म्हणून त्यांनी संसदीय पध्दतीबाबत काहीशी जडजोड करुन ही पध्दत स्विकारली व या व्यवस्थेत त्यांनी राष्ट्रपतीच स्थान नाममात्र ठेवून जबाबदारीने निर्णय घेणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या म्हणजे पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या हाती व्यवस्थेतील सुत्रे सोपवली तर घटक राज्यपातळीवर राज्यपालांना मंत्रीमंडळाचा सल्ला मानणे बंधनकारक ठरवून तो पक्षाचा प्रतिनिधी नसतो तर तो सर्व लोकांचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असतो ही भूमिका उचलून धरली.

९. **स्वतंत्र नि:पक्षपाती न्यायमंडळ —** भारतीय संविधानामध्ये भारतासाठी इंग्लडप्रमाणे संसदीय शासन पध्दती व अमेरिकेप्रमाणे संघराज्य शासन पध्दती स्विकारण्यात आली. संसदीय पध्दतीत संसद श्रेष्ठ तर संघराज्यपध्दतीत न्यायमंडळ श्रेष्ठ असते. भारतासाठी या दोन्ही पध्दतीचे मिश्रण असलेली संसदीय पध्दती स्विकारण्यात आली आहे. पण त्याच बरोबर संसदेने केलेला कायदा संविधानाशी सुसंगत असल्यास तो कायदा रद्द करण्याचा न्यायालयांना न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आला आहे. भारतात संविधानाच्या माध्यमातून स्वतंत्र व निपक्षपातीपणे न्यायमंडळाची निर्मिती करण्यात आली असून बाबासाहेबांनी त्याचे समर्थन केले आहे.

१०. **स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ग्रामपंचायती बद्दलची भूमिका —** भारतीय संविधानाचा मसुदा हा गांधी विचारातील ग्रामपंचायतीच्या तत्वानुसार करावा व भारताचे भावी संविधान भारतातील प्रचीन परंपरेवर आधारीत ठेवनू ग्रामपंचायत हा तिचा पाया असावा असा आग्रह गांधीजीच्या अनुयायांनी धरला होता. बाबासाहेंबांनी मात्र त्यास विरोध करुन विद्यमान ग्रामसभा हा संकुचितपणा, जातियवाद, अज्ञान याचे उगमस्थान असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे हा विषय ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीच्या आधीपर्यत राज्यसरकारकडेच सोपवण्यात आला होता. व त्याचे बाबासाहेबांनी जोरदारपणे समर्थन केले होते.

बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव — भारतीय राज्यघटना बनवण्यासाठी दोन वर्ष अकरा महिने आणि अठरा दिवस लागले. भारतीय राज्यघटनेत ३१५ कलमे व ८ परिशिष्ठ होती. परंतु त्यावर सखोल चर्चा करुन आणि विचारविनिमय होउन ३१५ कलमे आणि १२ परिशिष्टामध्ये विभाजीत करण्यात आली. बाबासाहेबांनी घटना समितीला घटना सादर केल्यानंतर त्यावर संविधान समितीमध्ये कलमवार चर्चा झाली. पण

प्रत्येक सदस्याने बाबासाहेबांनी केलेल्या कार्याचा यथोचित गौरव केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून आदराने गौरवण्यात आले. घटनासमितीमध्ये २५ नोव्हेंबर १९४९ साली संविधान सभेत जे शेवटचे भाषण केले ते आजही सर्व भारतीयानी सुवर्णअक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे. बाबासाहेबांनी हे भाषण अंत्यत भावनाविवश होउन केले. ते यावेळी म्हणाले की, ''२६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतपुर्ण जिवनात प्रवेश करणार आहोत. राजकीय क्षेत्रात एक व्यक्ती एक मत म्हणजेच एक मूल्य तत्व आपण मान्य करु पण सामाजिक व आर्थिक क्षेत्रात सर्व व्यक्तींचे मोल सारखेच आहे. हे आपण नाकारु शकत नाही. परंतु सामाजिक आणि आर्थिक विसंगतपुर्ण जिवन किती काळ जगू शकू ही विसंगती आपण लवकरात लवकर नाहीसी केली पाहीजे. तसे झाले नाही तर ज्यांना या विषमतेचा जाच सहन करावा लागतो ते आपण परिश्रमाने उभी केलेली राजकीय लोकशाहीची इमारत उडवून दिल्या खेरीज राहणार नाहीत.'' याच भाषणात ते पुढे म्हणाले की, ''भारतीय लोक आपल्या तत्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्वप्रणलीला मोठे मानतील हे मला माहित नाही. परंतु एवढे मात्र निश्चित जर राजकीय पक्षानी स्वत:च्या तत्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. आणि कदाचित ते कायमचे घालवले जाईल. आपल्या व देशाच्या स्वातंत्र्य रक्षणासाठी आपण यावेळी निर्धार केलाच पाहिजे.''

याचाच अनुभव आज आपणाला वेळोवेळी येत आहे. विशेषता १९८० नंतरच्या भारतातील राजकारणाला जाती धर्म पंथ प्रदेश आणि रंगातून, प्राण्यातून जात जमातवादाचे स्वरुप प्राप्त होवू लागले. वर्तमान काळात जात जमात वादाच्या या वाढत्या प्रभावातून भारतातील लोकशाही नष्ट होऊन हुकूमशाहीची स्थापना येथे होईल. अशी शक्यता नाकारता येत नाही. म्हणून या देशात धर्मनिरपेक्ष लोकशाही कायम राहावी असे जर वाटत असेल तर दहशतवाद, आंतकवाद, नक्षलवाद, हिसांचार आणि जातजमातवादांच्या आव्हाणाला समर्थपणे तोंड देण्यासाठी आपण सर्वानी कंबर कसली पाहीजे.

संदर्भ ग्रंथ :—

१. *पाटील डी. डी. आणि हांडे एम. बी., (२०१२) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताला महासत्ता बनविण्याचे वैचारिक योगदान', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.*

२. *देशमुख बी. टी., 'भारतीय संविधान', पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर*

३. *पाटील वा. भा, (२००२)'आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत', प्रंशात पब्लीकेशन्स, जळगांव.*

४. *खैरमोडे चांगदेव भवानराव, 'भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. भिमराव रामजी आंबेडकर', चरीत्रग्रंथ खंड. १० सुगावा प्रकाशन, पुणे.*

५. *Baba Saheb Ambedkar (1987) - Writing and speeches, Vol-3 Department of Education Government of Maharashtra.*

'महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण: एक काळाची गरज'

डॉ. सुरेश धनवडे, कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड. मो. ९८९०४१९८५०

प्रस्तावना: महाराष्ट्रातील दुष्काळ ही समस्या दिवसेंदिवस तीव्र बनत चालली आहे. दुष्काळ समस्या ही संकल्पना आंतरविद्याशाखीय आहे, हे जरी खरे असले तरी त्याचा परीणाम हा सबंध समाजावर पडत असतो. दिवसेंदिवस पाण्याचे घटते प्रमाण ही एक चिंताजनक समस्या भेडसावत आहे, व त्यामध्ये वाढणारी भरमसाठ लोकसंख्यावाढ अशा स्थितीमध्ये भारतीय समाज वाटचाल करत आहे. दुष्काळ हा 'ओला' व 'कोरडा' अशा दोन प्रकारात विभागला जातो. शेतकऱ्यांच्या कोणत्याही समस्येवरील एकमेव आणि अंतिम उत्तर म्हणजे 'पॅकेज' जाहीर केले तरी, त्याचे पुढे नेमके काय होते; हे तपासण्याचे काम कधी झालेच नाही. केवळ दिखाऊ उपायांमुळे प्रश्न सुटत नाहीत. त्यासाठी दीर्घकालीन योजना आखण्याची आवश्यकता असते, हे लक्षात घेतले पाहिजे. यापूर्वीच्या सरकारांनी पॅकेजवर पॅकेज देऊन ही सवय लावली आहे. त्यामुळे दुष्काळ असो, की शेतकऱ्यांच्या आत्महत्या. त्यावरील हमखास उत्तर संबंधितांसाठी विशेष आर्थिक तरतूद जाहिर करणे, हेच असू शकते. असे सगळ्यांना वाटत आले आहे.

भारतीय समाजामध्ये ज्या विविध समस्या आहेत, त्यापैकी दुष्काळ ही एक मानव निर्मित समस्या आहे. प्रचलित समस्येवर विविध विचारवंतांनी विविधांगी विचार मांडलेले आहे. यापैकी उपलब्ध व विषयास अधिक समर्पक अशाच आशयाचा आढावा प्रस्तुत निबंधात घेतला आहे. या अनुषंगाने उपर्यूक्त शिर्षकावरुन प्रस्तूत विवेचन पुढील उद्दिष्टांना अनुसरुन केले आहे.

१. 'दुष्काळ' संकल्पनेचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून आकलन करणे.
२. 'जलनियोजन' व 'दुष्काळ' यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.

संशोधनाची उद्दिष्टे समोर ठेवून अध्ययनात गृहितकृत्ये पुढिलप्रमाणे मांडलेली आहेत.

१. 'जलसाक्षरता' व 'जलनियोजनाच्या' अभावामुळे दुष्काळ मानव निर्मित समस्या आहे.
२. मानवाचे पर्यावरणामध्ये अमर्याद हस्तक्षेप होत आहे.
३. 'निसर्ग' हा मानवाचा अविभाज्य घटक आहे.

शोधनिबंधाचे महत्व: प्रस्तुत शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्ट दुष्काळ संकल्पनेचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे. उत्तरआधुनिकतेत दुष्काळाचे परिणाम जाणणे व त्यावरील उपाययोजनांची अमंलबजावणी करणे. निसर्ग आणि मानवी समाजाच्या अभ्यासाव्दारे मानवी समाजाला नैसर्गिक वातावरण किती महत्वाचे आहे? हे आपल्याला अभ्यासाव्दारे लक्षात येते. सदरील अभ्यासाचा उपयोग सामान्य अभ्यासक, शासन यंत्रणा, पर्यावरण चळवळीतील कार्यकर्ते व अभ्यासक इत्यादींना होऊ शकेल म्हणून हा विषय महत्वाचा आहे.

संशोधन पध्दती : प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग, नियतकालीके, शासकीय लेख, वर्तमानपत्रे, वैचारीक लेख, संकेत स्थळे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. या अनुषंगाने दुय्यम सामुग्री पध्दतीव्दारे दुष्काळ संकल्पनेचे समाजशास्त्रीय अध्ययन वैज्ञानिक दृष्टीकोनातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. 'जलनियोजन' व 'दुष्काळ' या संकल्पना विविध शास्त्रामध्ये अभ्यासल्या जात असल्या तरी, ती आंतरविद्याशाखीय संकल्पना आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळाला अनेक कारणे आहेत. पण कारणांबरोबरच उपायही आहेत. उपाय हाताशी असताना इकडे तिकडे धावाधाव करण्याचीही आवश्यकता नाही. 'पाणी' व 'सिंचन' या घटकांचा मागोवा घेण्यासाठी राज्य सरकारनेच तेरा वर्षापूर्वी जल सिंचन आयोगाची स्थापना केली होती. त्यात पाण्याचे 'नियोजन' व 'व्यवस्थापन' कशा पध्दतीनं करायचे याबाबत स्पष्ट शिफारशी आहेत. मात्र आता या उपायांकडे आपण ढुंकूनही पाहिले नाही आणि आताच्या दुष्काळात करायचं काय? असे म्हणत भांबावलेलो आहोत. याचाच अर्थ, आपण दुष्काळाला आवतन दिले होते.[१]

महाराष्ट्राने आतापर्यंत दोन सिंचन आयोग पाहिले. १९६२ साली पहिल्या स. गा. बर्वे आयोगाचा अहवाल आला पुढच्या काळात पाणीवापर बदलाच्या काळात पुढे डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र 'जल' व 'सिंचन' आयोग नेमण्यात आला. त्याचा अहवाल आयोगाने ३० सप्टेंबर १९९९ रोजी सरकारला सादर केला. चितळे आयोगाने विविध क्षेत्रांशी निगडित एकूण ३२९ शिफारशी सादर केल्या. त्यापैकी पाण्याची उपलब्धता, टंचाई प्रदेश, त्यातील जलनियोजन, पिकांची रचना,

उद्योगधंद्यांचे नियोजन आणि एकूणच दुष्काळाला कारणीभूत ठरणाऱ्या ठळक शिफारशींवर तेरा वर्षानंतर नेमकी काय अंमलबजावणी झाली याचा मागोवा घेतला तर पुढे येणारे चित्र अगदीच विदारक आहे. याचबरोबर राज्यातील सहकारी साखर कारखान्यांबाबत माधराव गोडबोले समितीनेही १९९९ साली कोणत्या क्षेत्रात साखर कारखाने काढू नयेत? याच्या सूचना केल्या आहेत. या शिफारशींबाबतही पुढे फार काही घडले नाही.

महाराष्ट्रातील गत पाच–सहा दशकातील पाटबंधारे प्रकल्प, पाणी नियोजन व धरणांचा परामर्श घेतल्यास हे स्पष्ट जाणवते की, राज्यातील पाणी प्रकल्प उभारणीची दिशा पूर्णत: भरकटलेली व भ्रष्टाचारात अडकेलेली आहे. यासाठी आता 'जलनियोजन' व धोरणाच्या प्रचलित प्रभावशाली यांत्रिकी–अभियांत्रिकी दृष्टीकोनाला सोडचिट्ठी देऊन व श्रमशक्तीव्दारे ते अंमलात आणल्यास दुष्काळावर मात करता येईल.[२]

उपरोक्त पार्श्वभूमी व परिप्रेक्ष्य समोर ठेवून महाराष्ट्रातील गत पाच सहा दशकातील पाटबंधारे प्रकल्प, पाणी नियोजन व धोरणांचा परामर्श घेतल्यास, हे स्पष्ट जाणवते की, राज्यातील पाणी प्रकल्प उभारणीची दिशा पूर्ण: भरकटलेली व भ्रष्टाचारात (सिंचन घोटाळा) अडकलेली आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक धरणे बांधणारे राज्य आहे. अब्जावधी रुपये त्यावर खर्ची झाले आहेत. महाराष्ट्राची आजची सिंचन व्यवस्था देशात सर्वाधिक आजारी, अकार्यक्षम व भ्रष्ट असून महाराष्ट्रात पाटपाण्याने ओलित होणारे क्षेत्र एकूण लागवड क्षेत्राच्या जेमतेम सहा टक्के एवढेच आहे. राज्यात सिंचित क्षेत्राची अकडेवारी अठरा टक्के असल्याचे वारंवार सांगितले जाते. त्यातील दोनतृतीयांश भूजलावर आधारित आहे. विहिरी व वीजपंपाव्दारे ओलित केले जाणारे हे क्षेत्र शेतकऱ्यांनी स्वत: प्रयत्न व कर्ज घेऊन निर्माण केले आहे. यंदा पाऊस कमीच होता, तो वेळेवर पडलाच नाही आणि अखेर थोडाफार दिलासा देण्यापुरताच झाला. अवर्षणाशी आपण मानवी–सरकारी प्रयत्नांनी दोन हात करु शकतो, पण प्रयत्नच थिटे पडतात तिथे दुष्काळ सुरु होतो.[३]

निसर्ग अवर्षण देतो–दुष्काळ नाही. दर चार–पाच वर्षांनी आपल्या देशात पाऊस कमी पडतो. त्यामुळे अन्नधान्य उत्पादन कमी होते, पिण्याच्या पाण्याचे संकट येते, माणूस व पशू–पक्ष्यांच्या जगण्यावर संकट येते, शेतीशी निगडित असलेल्या प्रत्येक वर्गात त्यामुळे हाहाकार उडतो, असा याचा भयंकर अर्थ नाही. ही परिस्थिती अवर्षणामुळे नाही तर समाज व सरकार अवर्षणास तोंड देण्यास सुसज्ज नसतात, तेव्हा निर्माण होते. परिणामी अस्मानी व सुलतानी संकटातून भयानक दुष्काळ अनुभवाला येतो. दुष्काळाच्या आधी समाजाच्या पातळीवर विचारांचा, आठवणींचा व भावनांचा दुष्काळ पडतो. त्यामुळे अवर्षण एकटे येत नाही ते दुष्काळाला घेऊन येते, असे म्हटले जाते. परत या गोष्टींची पुन्हा आठवण करुन देण्याची गरज आहे.

प्रत्येक घनमीटर पाण्याच्या उत्पादन मूल्यानूसार शेतीला, उद्योगाला, पिण्यासाठी किती? याचे नियोजन करावे लागेल. हे नियोजन सगळ्या उपखोऱ्यात सारखे राहणार नाही. यामध्ये पाण्याचा फेरवापर करण्यासाठी जर आपल्याला वीस रुपये खर्च येत असेल आणि त्या पाण्याचे मूल्यात रुपांतर हे पन्नास रुपयांपर्यंत होणार असेल, तर या दृष्टीने नियोजन व्हायला हवे. यामध्ये उर्जेचाही विचार करावा लागेल.[४]

पाण्याचे नियोजन करताना प्रत्येक पाणलोट क्षेत्राचे वेगळे गणित बसवावे लागणार आहे. शेती, उद्योग यांच्या पाण्याच्या गरजेची सांगड कशी घालायची? या सर्वंकष विचार करण्यासाठी एका मंचाची गरज आहे. सरासरी पाणी, त्याचे नियोजन, दोलायमानतेमुळे येणारी तूट, अशा दोन्ही पातळ्यांवर विचार करावा लागेल. ही तूट कशी येते? हे आपण अजूनही लोकांना समजावू शकलो नाही. भूजलातील तूट, पावसाची तूट, प्रवाहातील तूट अशा चिकित्सक पध्दतीने आपल्याला यापरिस्थितीचा विचार करावा लागेल. आपल्याकडे ६० ते ८० टक्के पाणी बाष्पीभवनामूळे वाया जाते. मात्र, त्याबाबतही आपल्याकडे अजून पुरेशी जागरुकता नाही. काळानुसार पाण्याचे आणि माणसाचे नाते बदलत आहे. ते लक्षात घेऊन पाण्याचा समन्वित व काटकसरीने विचार करणारा समाज निर्माण करणे आणि त्यांच्यात सहयोग कसा राहिल, हे आपले आव्हान असेल. यावरच आपले भवितव्य अवलंबून आहे. दुष्काळ आपल्यासाठी नविन नाही, पण त्याला तोंड देण्यासाठी आपण आतापर्यंत काय नियोजन केलं? आणि त्यासाठी किती सामाजिक मानसिकता निर्माण केली? हे तपासून पाहण्याची गरज आहे. या संदर्भात १९०० सालच्या मे महिन्यातील केसरी मध्ये लोकमान्य टिळकांनी एका लेखात म्हटले होते, आपल्याकडे दुष्काळी स्थिती नेहमीच येते. पण दुष्काळावर मात करण्यासाठी आपण काय नियोजन केले? यावर आपले भविष्य अवलंबून आहे. याची आज पुन्हा एकदा आठवण करुन द्यावीशी वाटते.

आताचा दुष्काळ हा २०१४ ची राजकीय दिशा ठरवणारा आहे. कारण आपण बारीक बारीक गोष्टींवर कधीच प्रभावीपणे उपाययोजना करु शकलेलो नाही. डोक्याला जखम झाली तर आपण अंगठ्याला चिंधी गुंडाळत बसलो. आता त्याचा स्फोट होईल. मे महिन्यात कदाचित राज्यकर्त्यांना कुठे जायचे ठरले तर विरोधी पक्षाला सोबत घेऊन जावे लागेल. पाण्याचे टॅकर पुढे जाऊ लागले. तर तहानलेला गाव ते पुढे जाऊ देणार नाही. त्यासाठी प्रत्येक टॅकरवर बंदूकधारी आणि गावात एसआरपी आणून ठेवावी लागेल.[५]

दुष्काळ रोखण्यासाठी दोनशे मिलिमीटर पाउस खूप आहे. तुमचे नियोजनाचे गणित काय आहे? हे

महत्वाचे आहे. म्हणून पाण्याचा ताळेबंद येणे भविष्यकाळात गरजेचे आहे.

राज्यभर फिरुन दुष्काळ समजून घेताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली ज्या गावाच्या शिवारात उस होता त्याच गावात टॅंकरही होता. सोलापूर जिल्ह्यात उसाचे क्षेत्र सर्वाधिक आहे. जवळपास ३० कारखाने आहेत. येथेच जास्तीत जास्त विहिरी आहेत. शेतीसाठी विजेचा सर्वाधिक वापर, टॅंकर, जनावरांच्या छावण्याही सोलापूरमध्येच आहेत.[६]

पर्जन्यछायेच्या प्रदेशात पाऊस कमी असल्याने तेथे पाणी जमिनीवरुन वाहत नाही म्हणूनच उजनी, घोड, जायकवाडी, गिरना हे पाणीसाठे रिकामे आहेत. हे पाणीसाठे रिकामे आहेत. अशा परिस्थितीतही जमिनीत मुरलेल्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करता येऊ शकतो. लातूरसारख्या ठिकाणी बाराशे ते चौदाशे फूट खोल बोअर खणून ते पाणी ऊसासाठी ऊपसले जाते. अशा प्रकारे जमिनीची चाळण केली जात असताना त्यावर कोणताही प्रतिबंध घालण्यास मात्र हतबलता दाखवली जाते. भूजलाचा कायदाही राष्टपतींच्या सहीसाठी थांबला आहे. ऊसही गरजेचा आहे. त्यामुळे त्याला विरोध करुन चालणार नाही. मात्र तो जिथे पाण्याची उपलब्धता आहे तिथे वाढवला जावा. साखर कारखाने क्रमाक्रमाने पश्चिम आणि पूर्व भागांत स्थलांतरित करणे शक्य आहे. याच राज्यातील माणसे आफ्रिका खंडात जाऊन तिथे हजारो हेक्टर जमीन ९९ वर्षाच्या लीजने घेऊन तिथे ऊसाचे उत्पादन घेतात. मग कोकण आणि विदर्भात उसाचे उत्पादन घ्यायला लोक का तयार होणार नाहित? दुष्काळ हे मानवनिर्मित संकट आहे. त्याचे मूळ आपण समजून घेतले नाही तर यापुढेही असेच घडत राहिल.

निष्कर्ष: आजघडीला आपल्या देशाची लोकसंख्या १३४ कोटीच्या वर पोहोंचली आहे. हिच मोठी समस्या आहे. जगाच्या एकूण भूभागापैकी २.४ टक्के एवढ्या भूभागावर मोठा जनसागर वास्तव्याला आहे. म्हणूण येत्या काळात नव्हे तर, आजघडीला भारतीय लोकसंख्येवर कायद्याने आळा घालणे अगत्याचे आहे. प्रत्येक समस्येचे मूळ कारण लोकसंख्येत दिसत आहे. बहुतांशी लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्याला आहे. तीथे आजघडीला पाण्याचे स्त्रोत कमी होतांना दिसत आहे. शुध्द तर सोडाच अशुध्द पाणी दूरापास्त होत चाललेलं आहे. एवढं होत असतानाही समाज काही गांभीर्याने या समस्येकडे पाहताना दिसत नाही. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत पाण्याचा अमर्याद वापर झालेला आहे. त्याचेच परिणाम आपण सर्वजण भोगत आहोत. भारतात पाण्याचे योग्य धोरण ठरविण्यासाठी जल आयोग निर्माण केलेला आहे, तसेच काही मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. तरीदेखील पाण्याचे योग्य नियोजन होताना दिसत नाही. पहिल्यांदा पाण्याचा वापर पिण्यासाठी नंतर शेतीसाठी व शिल्लक असणार तेंव्हा औद्योगिकरणासाठी वापर करावा. परंतु आपल्या महाराष्ट्रात असे झाले नाही. म्हणून जलनियोजन ही काळाची गरज आहे. याशिवाय इतरही बाबींचा विचार केला तर पाण्यासंबंधी नियोजन होऊ शकेल.

जगातल्या इतर देशांच्या तुलनेमध्ये आपल्या देशात पावसाचं पाणी मुबलक प्रमाणात मिळविण्यासाठी गावागावांमधून होणारे तंटे, दोन राज्यांमध्ये, विभागांमध्ये विवाद आपल्या परिचयाचेच आहेत. पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे आरोग्यावर होणारे परिणाम या संदर्भात जागरुकता निर्माण करण्याची गरज आहे. पाणीटंचाई समस्येवर मात करण्यासाठी आपण पाण्याचे पुनर्चक्रीकरण करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे आवश्यक आहे. पाणीटंचाईची समस्या ही पाण्याच्या स्त्रोतांचा नियोजनबध्द वापर न केल्यामुळेच निर्माण होते. ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे.

भारतात दरवर्षी सुमारे १०० तास पाऊस पडतो. हे पाणी साठवणे आणि जास्तीतजास्त पाणी जमिनीमध्ये मुरवले तर देशातला पाणीप्रश्न निश्चितपणे सुटू शकतो. त्यासाठी आपण प्रत्येकाने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व ओळखून पाणी वाया जाऊ नये, यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. याचाच एक भाग म्हणून शालेय जीवनापासूनच पाण्याचे महत्व अधोरेखित करणारे प्रयोग, उपक्रम, प्रकल्प करण्यास विद्यार्थ्यांना उद्युक्त करणे गरजेचे आहे. याची सुरुवात स्वत:च्या घरापासून करायला हवी. आपण प्रत्येकजण दररोज वेगवेगळ्या क्रियांसाठी पाण्याचा वापर करीत असतो. एका दिवसात वेगवेगळ्या कारणांसाठी आपण किती पाणी वापरतो? आपल्या घरामध्ये दररोज किती पाण्याचा वापर होतो? हा वापर करीत असताना पाणी वाया जाते का? पाण्याचा अपव्यय टाळणे शक्य आहे का? अशा सगळ्या बाबींचा लेखजोखा आपण प्रकल्पाच्या माध्यतातून घेऊ शकतो. ज्याप्रमाणे आर्थिक व्यवहाराचे ऑडीट (अंकेक्षण) केले जावे, त्याचप्रमाणे हे वॉटर ऑडिट (जल अंकेक्षण) करणे आवश्यक आहे.

संदर्भ:

१. *घोरपडे अभिजित, (२०१३), दुष्काळाला आवतन, दैनिक लोकसत्ता.*
२. *देसरडा एच.एम., (२०१४), दुष्काळ निर्मूलनाची गुरुकिल्ली, दैनिक लोकसत्ता.*
३. *यादव योगेंद्र, (२०१४), अवर्षण : अस्माणी दुष्काळाची सुलतानी, दैनिक लोकसत्ता.*
४. *चितळे माधवराव, (२०१३), पाण्याचे मुल्यानुसारच नियोजन करावे, दैनिक लोकसत्ता.*
५. *पवार पोपटराव, (२०१४) दुष्काळ २०१४ ची राजकीय दिशा ठरवेल, दैनिक लोकसत्ता.*
६. *मोरे दि. मा., (२०१३), जिथे उसच उस तिथेच पिण्यासाठी टॅंकर, दैनिक लोकसत्ता.*

सरोगसी माता

प्रा. विलास सोमाजी पवार, आदर्श महाविद्यालय, हिंगोली. मो. नं. ९४०३२२५२५४

प्रस्तावना:— अलिकडील काळात सरोगसी माता हा विषय जगातील सर्वच राष्ट्रामध्ये बहुसंख्येने चर्चीला जात आहे, मातृत्वाला एक पर्याय आणि विवाह संस्थेचा एक प्रश्न म्हणून समोर आलेला आहे, म्हणून सरोगसी माता ही संकल्पना आज वैद्यकशास्त्र, मासनशास्त्र व समाजशास्त्र यांच्या अभ्यासाचे महत्वपूर्ण विषय ठरत आहे. कांही घटक सरोगसी मातेचा स्विकार करत नसले तरी त्याचे अस्तित्व जवळपास संस्कृती व समाजातील घटकात आढळून येते. परंतू सरोगसी मातांची संख्या किती आहे हे सांगणे कठीण आहे.

गर्भारपण आणि बाळाचा जन्म प्रत्येक स्त्रीसाठी हा एक नितांत सुंदर असा अनुभव असतो पण आपल्याकडे गेली जवळपास दहा वर्ष आणि विकसित देशामध्ये गेली तीस वर्षे सरोगसीच्या माध्यमातून मुल ही संकल्पना रुजली आहे. काही लोकांनी सरोगसीच्या माध्यमातून मुल मिळविल्यानंतर त्याबददल प्रसार माध्यमामधून मोठया प्रमाणावर चर्चा सुरू झाली आहे.

सरोगसी म्हणजे वेगवेगळया कारणामुळे मुल होवू न शकणाऱ्या आणि मुल हवंच ही इच्छा असलेल्या जोडप्यापैकी पुरषाच्या शरीरातले शुक्राणू आणि स्त्रिच्या शरीरातलं बीजांड काढून त्याचे प्रयोगशाळेत फलन घडवून आणले जाते त्यातून निर्माण झालेला गर्भ दुसऱ्या स्त्रिच्या गर्भाशयात सोडला जातो. तो तिच्या शरीरात रुजला की तिच्या माध्यमातून नऊ महिन्याच्या काळानंतर मूल जन्माला येते. म्हणजेच एका जोडप्याच मूल दुसऱ्या स्त्रीच्या गर्भाशयात वाढतं त्याला सरोगसी असे म्हणतात.

सरोगसी या शब्दाचे मुळ 'सरोगेटस' असे लॅटिन शब्द असून त्याचा अर्थ मराठीत पर्यायी शब्द म्हणून त्याला 'उदरदान' असाही शब्द वापरला जात असला तरी आज होत असलेले व्यवहार पाहता दुसऱ्या स्त्रीच गर्भाशय भाडयाने घेणे. त्यात आपलं मूल वाढवणे आणि त्याचा मोबदला देणे हाच रोखठोक व्यवहार आहे.

अध्यायनाची उदिष्टये :—

१. सरोगसी माता ही संकल्पना समजून घेणे.

२. सरोगसीमाता संकल्पनेचे स्वरुप स्पष्ट करणे.

३. भारतातील सरोगसी माता व तिच्या कायदेशिर तरतूदीचे अध्ययन करणे.

४. भारतीय समाजातील सरोगसी मातेच्या समस्या जाणून घेणे.

सरोगसी माता संकल्पनेचे स्वरुप.

अ) सरोगसी मातेचा आश्रय का घेण्यात येते.:— जन्मजात गर्भाशय नसणं, गर्भधारणा होण्यात अडचणी येणं, वारंवार गर्भपात होणं, एखाद्या आजारामुळे गर्भाशय जननक्षम नसणं, एखाद्या आजारामुळे प्रसूतीच्या वेळी स्त्रीच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता, अशा सगळया परिस्थितीत डॉक्टर सरोगसीचा पर्याय सुचवू शकतात. मुळातच संबधीत जोडपं मूल होण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न करतात. त्यांना पारंपारिक पध्दतीने मूल होऊ शकणार नाही असे एकदा स्पष्ट झाले की डॉक्टर सरोगसी मातेचा पर्याय सुचवितात. काहीही झाले तरी मूल हवंच ही भूमिका घेणारे आणि त्यासाठी येणारे आठ ते बारा लाखापर्यंतचा खर्च करणे शक्य असले तर संबधी जोडपं सरोगसी मातेसाठी आपण तयार असल्याचे डॉक्टरांना सांगण्यात येते.

ब) रिप्रॉडक्शन एजन्सीचे कार्ये :— संबधीत जोडप्यांनी सरोगसीसाठी आम्ही तयार आहोत असे सांगितल्यानंतर थर्ड पार्टी रिप्रॉडक्शन एजन्सीचं काम सुरु होत असते. एकटया मुंबईत सध्या २० ते २५ थर्ड पार्टी रिप्रॉडक्शन एजन्सी आहेत. लहानात लहान एजन्सी वर्षभरात साधरणत: १०—१५ सरोगसीची कार्यवाही करीत असते. तर मोठया एजन्सी वर्षभरात २०—२५ सरोगसीची कार्यवाही करतात.

क) दलाल किंवा एंजंटची भूमीका :— रिप्रॉडक्शन एजन्सी म्हणजे सरोगसी पुरवठा करणाऱ्या कंपनी, मंडळ यांचे समाजातील तळागाळात संपर्क असलेले एंजट, दलाल असतात. पैशांची गरज असलेल्या, सरोगसीसाठी तयार असलेल्या स्त्रीयांना थर्ड पार्टी रिप्रॉडक्शन एजन्सीकडे घेऊन येणे हे एजंटच काम असते. अनेक स्त्रिया आत्यंतिक गरीबीतून हे काम करण्यासाठी उपलब्ध होतात. तर एखाद्या स्त्रिला तिचा पती सरोगसी माता बनण्यास लावतो किंवा स्त्रीच स्वत:हून आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी सरोगसीसाठी तयार होतात. मग त्या सरोगसी माता बनण्याचा मार्ग पत्कारतात आणि पुरवठा करणाऱ्या एजंटव्दारे एजन्सीकडे येतात. एकदोनदा सरोगसी माता बनलेली स्त्रिसुध्दा पूढे सरोगसीसाठी स्त्री मिळवून देणारी एजंट बनत असते. अशा एजंटला बऱ्यापैकी पैसे मिळत असतात. गुजरातमध्ये यापूर्वी दुधासाठी प्रसिध्द असलेले आणंद आणि त्याच्या परिवारातील गाव सध्या सरोगसीसाठी प्रसिध्द आहेत.

ड) सरोगसी मातेची निवड :— सरोगसी माता बनण्यासाठी तयार असलेली स्त्री रिप्रॉडक्शन एजन्सीकडे आली असता संबधीत स्त्रीचे वय २५ ते ३५ वर्षे पर्यंत असावे. विवाह झालेला असावा. याआधी तिला एक किंवा दोन स्वत:ची मूले असावी. या कामासाठी तिच्या घरातील व नवऱ्याची संमत्ती आवश्यक असते. याशिवाय त्या स्त्रीची रक्त तपासणी व इतर आजार आहेत का हे सर्व पाहिले जाते तसेच ती सरोगसी मातेसाठी शारीरिक तसेच मानसिक दृष्टया सक्षम आहे का हेही पाहिले जाते तसेच ती सरोगसी मातेसाठी शारीरिक तसेच मानसिकदृष्टया सक्षम आहे का हेही पाहिल जाते. मूल हवं असलेली जोडपं एजन्सीकडे जेंव्हा येतात तेंव्हा त्यांना साधारण तीन स्त्रीयांची नावे सुचविली जातात. त्यांची माहिती घेवून त्यांना भेटून त्यातून एका स्त्री ची निवड केली जाते. अनेकदा आपल बाळ नऊ महिने पोटात वागवणारी स्त्री विषयी संबधीत जोडप्यांचे काही निकष असतात उदा. सरोगसी माता ही सुशिक्षित, स्वच्छता पाळणारी, निरोगी, निर्व्यसनी, शाकाहारी असणं अपेक्षित असते.

ई) संबधित जोडपं आणि सरोगसी स्त्री यांच्यातील करार :— एजन्सी आणि संबधीत जोडपं व संबधीत स्त्री यात वेगवेगळे करार होतात. या करारामध्ये किती पैसे, कोणाची भूमिका काय असेल, कोणत्या स्थितीत काय करायचं इ. बाबी समाविष्ठ होतात. उदा. बाळाला जन्म देण्याच्या वेळी सिझरीन करावं लागल तर काय, जुळे होणार असेल तर काय, बाळात काही व्यंग असेल तर काय, या दरम्यान संबधित जोडप्याचा घटस्फोट झाला की दोंघापैकी एकाचा किंवा दोघांचाही मृत्यू झाला तर काय इ. सर्व बाबींसदर्भात करार केले जातात. या करारानंतर रुग्णालयाचे काम सुरु होते. बीजांड आणि शुक्राणू यांचे फलन करुन त्यापासून प्रयोगशाळेत गर्भ तयार केला जातो आणि तो सरोगेट मातेच्या गर्भाशयात सोडला जातो. गर्भधारणा झाली तर त्या गर्भार स्त्री साठी रिप्रॉडक्शन एंजन्सीने सरोगेट हाऊसमध्ये राहाण्याची व्यवस्था केली जाते. सरोगेट हाऊस म्हणजे भाडयाने घेतलेले प्लॅटस असतात. येथे सरोगसी स्त्रीला नऊ महिने राहावे लागते. इथे त्यांच्या खाण्यापिण्यासाठी इतर कामासाठी माणसे नेमलेली असतात. उत्तम बाळांतपणासाठी आवश्यक ते वातावरण ठेवले जाते. त्यांच्या राहणीमान, खाणेपिणे, कपडे व औषधोपचाराचा सर्व खर्च संबधीत जोडपं करीत असतात.

थोडक्यात सरोगसी मातेला एकुण तीन ते पाच लाख रुपये मिळतात. सिझरींन करावे लागले तर वाढीव पन्नास हजार मिळतात. जुळी मुले झाली तर पैशात वाढ होत असते हे सर्व पैसे त्यांचे बॅक खात्यात जमा असतात. बाळ जन्माला आल्यानंतर तीन ते सात दिवसात ते संबधीत जोडप्याकडे सोपविले जाते.

फ) आय. सी. एम. आर. ची मार्गदर्शक तत्वे :— आय. सी. एम. आर म्हणजे इंडियन कौन्सिल फॉर मेडिकल रिसर्च ने २००५ मध्ये असिस्टिड रिपॉडक्टिव्ह टेक्नॉलॉजी म्हणजेच सरोगसीच्या प्रक्रीयेसाठी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत त्यानुसार सरोगसीसाठी संबधीत घटकांशी आधी करार करणं आवश्यक आहे. सरोगसी माता बनवण्यासाठी संबधीत स्त्रीची, कुटूंबाची, पतीची संमत्ती घेणे गरजेचे आहे. संबधित प्रक्रीयेचा सर्व खर्च सरोगसी मातेला मिळायला हवा, सरोगसी प्रक्रीया सुरु असतांनाच संबधीत जोडप्याचा घटस्फोट झाला किंवा दोघांचा मृत्यू झाला तर मुलांसाठीच्या आर्थिक तरतूदीचा करारात स्पष्ट उल्लेख असायला हवा. सरोगसी मातेच्या करारात संबधीत मातेला विम्याचे संरक्षण मिळणे गरजेचे आहे. सरोगसीतून झालेल्या बाळाचे आईवडिलापैकी एकाशी तरी नैसर्गिक नाते असायला हवेत. म्हणजे संबधीत जोडपं स्त्रीबीज किंवा शुक्राणू यापैकी कोणता तरी एक घटक दुसऱ्यांकडून घेऊ शकतो परंतू दोन्ही घटक दुसऱ्यांकडून घेता येणार नाही. सरोगसी मातेचा खाजगीपणाचा हक्क राखला जावा, सरोगसी करतांना गर्भलिंग परीक्षण करता येणार नाही, गर्भपाताच्या कायद्याच्या तरतूदी या प्रकरणात लागू होतील.

च) गुजरातमधील स्थिती :— सरोगसी माता करायला तयार असलेल्या स्त्रियांमुळे भारतातल्या सरोगसीच्या व्यवसायाची व्याप्ती वर्षाला १३८ कोटी रुपये ऐवढी आहे. सन २०१२ मध्ये एकटया गुजरातमध्ये ४०० सरोगसीतून ४०० मुलं जन्माला आली. त्यांचे पालक भारताबाहेरचे अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इ. देशातून आलेले होते. तरीही गुजरातच्या आरोग्य खात्याला राज्यात नेमकी किती सरोगसी दवाखाने आहे ते माहिती नाही. आपल्या देशात व्यावसायीक सरोगसीला २००२ पासून मान्यता देण्यात आली आहे. पण या व्यवसायावर नियंत्रण ठेवणारे ठोस कायदे अजूनही आलेले नाहीत. इंडियन कौन्सिल फॉर मेडीकल रीसर्चच्या गाईडलाईन नुसार सगळे व्यवहार सुरू आहेत. अहमदाबाद येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ. जागृती संघवी सांगतात बाहेरच्या देशाच्या तुलनेत अत्यंत स्वस्तात सरोगसीसाठी स्त्रिया उपलब्ध होत असल्यामुळे इथे येणाऱ्या परदेशी जोडप्यांची आणि सरोगसी मातांची संख्या वाढत आहे. गुजरातमधील आणंद हे गाव दुधासाठी प्रसिध्द असलेलं आता बाळांची शेती (बेबी फॉर्म) करणारा गाव म्हणून

जगप्रसिध्द झालं आहे. डॉ. नयना पटेल यांचे आंकाक्षा इनफर्टिलिटी सेंटर त्यासाठीच प्रसिध्द आहे.

थोडक्यात सरोगसी माता दुसऱ्याचे मूल आपल्या गर्भात वाढवतात. ते एका शरिरातील दोन जीवन असतात. प्रसूतीनंतर वेगळे होतात आणि सरोगसी मातेला त्या बाळाचा कराराप्रमाणे त्याग करावा लागतो. गरीबी, पैंशासाइी ती हे काम करत असली तरी महाभारतातील देवकी प्रमाणे तिची अवस्था होत नसेल का? ज्या यशोदेकडे ते मूल जाणार ती त्याला तितकेच प्रेम देणार का? यावर एकंदरीत सरोगसी कुणी आणि कोणासाठी करावी यावर विचार करण्याची वेळ आली आहे.

निष्कर्ष :— १. सरोगसी म्हणजे एका विवाहीत जोडप्याचे मूल दुसऱ्या स्त्रिच्या गर्भाशयात वाढविण्याचा प्रकार आहे. २. दुसऱ्या स्त्रीचे गर्भाशय भाडयाने घेणे, त्यात आपलं मूल वाढविणे आणि त्याचा मोबदला देणे हाच रोखठोक व्यवहार आहे. ३. सरोगसी करण्यासाठी प्राचीन काळापासून जगातील कोणत्याही शासन व समाजाने मान्यता दिलेली नाही. ४. अनेक डॉक्टर व मानसोपचार तज्ञ सरोगसी या संकल्पनेला केवळ प्रजोत्पादनाचे साधन मानतात. ५. सरोगसीच्या माध्यमातून मुल यासाठी मोठया प्रमाणावर पैशाची उलाढाल होतांना दिसून येते. ६. भारतात व्यावसायीक सरोगसीला सन २००२ पासून मान्यता देण्यात आलेली आहे. ७. इंडियन कॉन्सिल फॉर मेडीकल रिसर्च ने सन २००५ मध्ये सरोगसीच्या प्रक्रीयेसाठी कांही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. ८. भारतीय समाजातील समलैंगीकता लिव्ह इन रिलेशनशिप, सिंगल पेरेंट याप्रमाणेच सरोगसी ही विवाहसंस्थेतील नवीन पध्दती बहुसंख्य लोकांकडून आज स्विकारली जात आहे.

संदर्भ:—

१. लोकप्रभा, २०१३, जुलै, २६.
२. लोकप्रभा, २०१३, डिसेबंर, ६.
३. दै. सकाळ, २०१३, जुलै, ०७.
४. दै.पुण्यनगरी, २०१३, जुलै, ०८.

महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची गती आणि स्थिती

डॉ. एन. टी. कांबळे, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर (ता.) अहमदपूर जि. लातूर मो. ९९२११५३१५९

प्रस्तावना:— शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. ती समाजातच घडत असल्यामुळे ती एक सामाजिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतूनच व्यक्तीच्या सामाजिक वर्तनात बदल होत असतो. तो बदल समाजाला गतिशील बनवित असतो. म्हणजे समाज हा गतिशील आहे. परिणामी समाजरचनेमध्ये बदल होत असतो. बदलासाठी शिक्षण हा एक प्रभावी घटक आहे. म्हणजे म्हणजे मानवी कल्याणाचा मार्ग होय. शिक्षण हे जीवन आणि जीवनातील इच्छा, आकांक्षा आणि संकल्प जाणून घेण्याचे महत्त्वाचे साधन मानले जाते. उच्च शिक्षणाचा अर्थ असा सांगता येईल की, भावी जीवनात आवश्यक असणारे ज्ञान, आरोग्य, उपजिविकेचे साधन, समायोजन करण्याचे सामर्थ्य, विविध गुण व कौशल्ये या सर्वांची जोपासना करणे म्हणजे 'उच्च शिक्षण' होय.

शिक्षण विषयक दृष्टिकोन:— उच्च शिक्षणविषयक वेगवेगळ्या विचारवंतांचा दृष्टिकोन पुढीलप्रमाणे सांगता येतील. स्वामी विवेकानंदाच्या मते, ''शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा आविष्कार होय. संपूर्ण माणसाचा विकास करणे, इच्छाशक्तीचा विकास करणे, तिचे नियंत्रण करून आत्मविसाकाच्या कामी तिचा विनियोग करण्याचे सामर्थ्य म्हणजे उच्चशिक्षण होय.'' म. गांधीजींच्या मते, ''केवळ साक्षरता म्हणजे उच्च शिक्षण नव्हे, शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे, आत्मा आणि मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती हेच खरे शिक्षणाचे ध्येय होय.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, ''उच्च शिक्षण म्हणजे सामाजिक क्रांतीचे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस किंवा व्यक्ती हीनबल होऊन अल्पायुषी होतो, पण शिक्षणापासून व्यक्ती वंचित राहिल्यास जीवंतपणीच तो दुसऱ्याचा गुलाम बनतो. सामाजिक गतिशीलता, विचाराचे परिवर्तन, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडवून आणण्यासाठी उच्च शिक्षणाची मदत होते. उच्च शिक्षण हे तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणारे महत्त्वाचे साधन आहे.'' म्हणून उच्च शिक्षणाची संधी राज्यातील सर्व घटकाला मिळणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व समस्यांवर उच्च शिक्षण एक प्रभावी औषध आहे. राज्यात एकात्मता, समानता, गुणवत्ता निर्माण होण्यास मदत होत असते. सरकारला राज्यात समाज परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर अगोदर शिक्षणाद्वारे व्यक्ती परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. म्हणजेच उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांकडून आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणणे सोपे जाईल.

महाराष्ट्रातील उच्चशिक्षणाची प्रगती :— महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाच्या प्रगतीविषयीची आकडेवारी सन १९६०—६१ ते २००१—०२ या कालावधीमध्ये तक्ता क्र. १ मध्ये दिलेली आहे. सदरच्या तक्त्यानुसार माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती प्रमाणात वाढत आहे आणि त्याचबरोबर संस्थेची किंवा महाविद्यालयाची स्थिती दर्शविली आहे. तक्ता क्र.१ दर्शवितो की, सन १९६०—६१ ते १९७०—७१ मध्ये विद्यार्थी संख्या वाढीचा दर १२.५६ टक्के होता तर कॉलेज वाढीचा दर ११.६३ टक्के होता. हा दर १९६०—६१ ते २००२ पर्यंत सर्वाधिक असल्याचे दिसून येते. सन १९७०—७१ ते १९८०—८१ या दहा वर्षाच्या कालखंडात संस्था वाढीचा दर अतिशय कमी तर विद्यार्थी वाढीचा दर अधिक होता. सन १९८०—८१ ते १९९०—९१ या कालावधीत संस्थांची संख्या वाढली त्या तुलनेत विद्यार्थी संख्येत आणखीन वाढ झाली. सन १९९०—९१ ते १९९०—२००० या कालखंडात संस्थेच्या वाढीच्या दरात व विद्यार्थी संख्येत घट झालेली दिसून येते. सन २०००—०१ आणि

२००१—०२ या कालावधीत दिसून येते की, संस्था वाढीचा दर मंद तर विद्यार्थी वाढीचा दर अधिक असल्याचे दिसते. पण ही वाढ समाधानकारक नाही. विद्यार्थी संख्येत वाढ करावयाची असेल तर विविध स्वरूपाच्या योजना आखणे काळाची गरज आहे. असे जरी असले तरी सुद्धा शिक्षणाबाबत लोकांच्या दृष्टिकोनात बदल, झालेली जागृती, त्याचबरोबर राज्य शासनाच्या सुनियोजित प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि शैक्षणिक संस्थांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते.

पदवी शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या वाढीचा दर १९६०—६१ ते १९७०—७१ मध्ये १५.९२ टक्के होता तर विद्यार्थी वाढीचा दर १९.८१ टक्के होता. ही बाब राज्याच्या दृष्टिकोनातून समाधानकारक मानली पाहिजे. परंतु हा दर पुढे तसाच राहिलेला नाही. म्हणजेच १९७०—७१ ते १९८०—८१ मध्ये हा दर अनुक्रमे ३.५१ टक्के आणि ७.९५ टक्के दिसतो. याचे मूळ कारण म्हणजे या कालखंडात उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येत घट झालेली दिसते. सन १९८०—८१ ते १९९०—९१ मध्ये पुन्हा वाढ झालेली आहे. कॉलेज संख्येत ३.५१ टक्के वरून ५.३२ टक्के वाढ झाली तर विद्यार्थी संख्येत ७.९५ वरून ८.१८ टक्के वाढ झाली. ही वाढ मात्र विरोधाभास दर्शविते.

सन १९९०—९१ ते १९९९—२००० या कालावधीत कॉलेज व विद्यार्थी संख्येत घट झालेली आहे. ५.३२ टक्के वरून ३.६१ टक्के होणे व विद्यार्थी वाढीचा दर ८.१८ टक्के वरुन १.३८ टक्के झालेली ही वाढ ऋणात्मक वाढ दर्शवित. याचे कारण नवीन धोरणांचा परिणाम आहे असे म्हणण्यास वाव आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चाललेला आहे. कारण शास्त्रीय शिक्षणाऐवजी व्यावसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. सन १९९०—९१ ते २०००—२००२ पर्यंतचा काळ विचारात घेतला तर विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण घटलेले दिसते. याचे मूळ कारण सुशिक्षित बेरोजगारी आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

वरील सर्व बाबी तुलनात्मकरित्या विचारात घेतले तर असे निदर्शनास येते की, माध्यमिक विद्यार्थी संख्येचा वाढीचा दर हा राज्य शासनाच्या व समाजाच्या दृष्टिकोनातून समाधानकारक मानला पाहिजे. परंतु उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी संख्येत घट होत आहे ही बाब विचारात घेणे आवश्यक वाटते. कारण उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी हे बौद्धिकरित्या सक्षम असतात. त्यांच्या राज्याच्या विकासासाठी पर्याप्त वापर होणे काळाची गरज आहे.

तक्ता क्र.१

महाराष्ट्रातील उच्च शिक्षणातील वाढीचा दर

वर्ष	उच्च माध्यमिक				उच्च शिक्षण (पदवी, पदव्युत्तर)			
	संस्था	वाढीचा दर	विद्यार्थी संख्या	वाढीचा दर	संस्था	वाढीचा दर	विद्यार्थी संख्या	वाढीचा दर
१९६०—६१	२४६८	..	८५८	..	२११	..	११०	..
१९७०—७१	५३३९	११.६३	१९६३	१२.५६	५४७	१५.९२	३२८	१९.८१
१९८०—८१	६११९	१.४६	३०९	७.०९	७३९	३.५१	५८९	७.९५
१९९०—९१	१००२६	६.३९	५७४३	७.३६	११३२	५.३२	१०७१	८.१८
१९९९—००	१४९१८	४.८७	८७४३	५.२२	१५४१	३.६१	९२८	—१.३८
२०००—०१	१५३२५	०.२८	९१११	०.४२	१५९९	०.३८	९३९	०.१२
२००१—०२	१६११८	०.५१	९६३६	०.५७	१७३५	०.८५	९४८	०.०९

आधार: १) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी १९९१—९२, पान १३३ २) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००१—०२, पान टी ६४.

महाराष्ट्रातील उच्च शिक्षणातील सुशिक्षित बेरोजगारी :— देशात किंवा राज्यात खरोखरच कोणास बेरोजगार म्हणता येईल हे आधी निश्चित केले पाहिजे. बेरोजगारीचा अर्थ, स्वरूप, तिची निर्मिती कशी होते ते अगोदर आपण अभ्यासू त्यानंतर राज्यातील सुशिक्षित बेरोजगारीचा विचार करूया. सन १९२९—३३ मध्ये जागतिक महामंदी आली होती. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचे चित्र बदललेले होते. अर्थव्यवस्थेत आर्थिक मंदीची लाट आली होती. याचा परिणाम म्हणून उत्पादनात घट, कारखाने बंद, उत्पन्न पातळीवरील बदल, वस्तू व सेवा यांच्या मागणी व किंमत पातळीत घट झाली. उत्पादकांच्या नफा क्षमतेवर परिणाम झाला. त्यामुळे उत्पादकांनी आपल्या उद्योगाचे आकारमान कमी केले. याचा एकूण परिणाम म्हणजे कामगारांच्या श्रमशक्तीवर झाला. उत्पादकांनी कामगारांना उद्योगातून कमी केले आणि त्यातूनच मग अपूर्ण रोजगार आणि पूर्ण रोजगार या दोन समस्या जगापुढे आल्या. अपूर्ण व पूर्ण रोजगाराची अवस्था ही देशातील अर्थव्यवस्थेवर अवलंबून असते. अपूर्ण व पूर्ण रोजगारीची अवस्था ही दीर्घकालीन संकल्पना आहेत. यास्तव कोणताही देश असो किंवा कोणत्याही

प्रकारची अर्थव्यवस्था असो त्यामध्ये अपूर्ण रोजगारीची अवस्था असतेच.

सामान्यत: व्यवहारामध्ये बेकारी, बेरोजगारी, अपूर्ण रोजगार हे शब्द वापरले जातात. साधारणपणे ह्या तीन शब्दांचा अर्थ एकच विचारात घेतला जातो. परंतु अर्थशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून हे शब्द सारखेच समजणे योग्य होणार नाही असे वाटते. कारण बेकारी, बेरोजगार, अपूर्ण रोजगार इत्यादीमध्ये समान अर्थ दडलेला नाही हे पुढील बाबींवरून दिसून येते. जेव्हा उत्पादन प्रक्रियेमध्ये श्रमाला दुय्यम स्थान दिले जाते तेव्हा त्यास अपूर्ण रोजगार असे समजले जाते. देशातील उत्पादनवाढीसाठी उपलब्ध असलेल्या श्रमाचा (श्रमशक्तीचा) पर्याप्त वापर होत नसेल तर अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगार निर्माण होतो. आंतराष्ट्रीय कामगार संघटनेनुसार काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही प्रचलित वेतनावर कामाच्या शोधात असून ज्यांना काम मिळत नाही अशा सर्वांचा समावेश बेरोजगार या संकल्पनेत केला जातो. बेकारी म्हणजे ज्यावेळी अर्थव्यवस्थेत आर्थिक मंदी निर्माण होवून उत्पादनाचा ऱ्हास होतो. अशावेळी श्रमिकाला कामावरुन कमी केले जाते. त्यावेळी त्या व्यक्तीला बेकार समजावे. या बेकारीची तीव्रता अर्थव्यवस्थेवर व समाजावर परिणामकारक असते. सर्वसाधारण व्याख्या पाहिल्यानंतर पुढील व्याख्या विचारात घ्याव्यात. जी व्यक्त शारीरिक, बौद्धिक आणि मानसिकरित्या सक्षम असून आणि प्रचलित वेतनावर काम करण्याची इच्छा व्यक्त करते अशांना काम करण्याची संधी उपलब्ध होत नाही अशा सर्वांचा समावेश बेरोजगारीत केला जातो.

महाराष्ट्र राज्याचे भारतातील स्थान महत्त्वपूर्ण आहे पण तरीदेखील आज राज्यांमध्ये सुशिक्षित बेरोजगारी ही एक मुख्य समस्या बनली आहे. रोजगार संधीमध्ये वाढ होणे राज्यातील विकासात्मक नियोजनाचे उद्दिष्ट आहे. राज्याच्या नियोजन काळात रोजगार संधीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. परंतु आजदेखील बेरोजगारीची तीव्रता कमी झाल्याचे आपणास दिसून येत नाही. सुशिक्षित बेरोजगारी व औद्योगिक बेरोजगारीचे प्रकार आहेत. सुशिक्षित बेरोजगारी म्हणजे ज्या व्यक्तीचे एस.एस.सी. पेक्षा अधिक शिक्षण झालेले आहे आणि प्रचलित वेतनावर काम करण्याची इच्छा असून देखील त्याला कमी दर्जाची (सेवकांची) नोकरी नाईलाजाने पत्करावी लागते, त्याला न्यून बेरोजगारी म्हणतात. उदा.तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून काम करणे, राज्यातील सुशिक्षित बेरोजगारी का वाढत आहे? त्याची प्रमुख कारणे म्हणजे ग्रामीण भागातून शहरी भागापेक्षा स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या अधिक आहे. राज्यामध्ये मानवी साधन सामुग्रीचे चुकीचे नियोजन, औद्योगिक क्षेत्र व शिक्षण क्षेत्र यांच्यात सहकार्याचा अभाव, पुस्तकी शिक्षण, आजारी उद्योगांचे वाढते प्रमाण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर इत्यादी सांगता येतील.

तक्ता क्र.२

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणातील सुशिक्षित बेरोजगारी

वर्ष	सुशिक्षित बेरोजगार	वाढीचा दर
१९६०—६१	१६३	..
१९७०—७१	३६१	१४.५६
१९८०—८१	१२६८	२५.१२
१९९०—९१	२९३८	१३.१७
१९९९—००	४३२२	४.१७
२०००—०१	४४१९	०.२२
२००१—०२	४२०४	—०.४८
आधार: १) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी १९९१—९२, XI पान १३ २) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००१ पान टी ६४		

तक्ता क्र.२ मध्ये सुशिक्षित बेरोजगारीत कशा पद्धतीने वाढ होत आहे हे दर्शविलेले आहे. या तक्त्याच्या आधारे आपणाला काही निष्कर्ष काढता येतील. सन १९६०—६१ ते १९७०—७१ मध्ये सुशिक्षित बेरोजगार वाढीचा दर १४.५६ टक्के असा होता. सन १९७०—७१ ते १९८०—८१ या काळामध्ये सुशिक्षित बेरोजगार वाढीचा दर २५.१२ टक्के झालेला आहे. हा दर सर्वाधिक आहे. याचे मूळ कारण म्हणजे या काळामध्ये लोकसंख्या वाढीचा दर, अधिक विकासाचा दर कमी, दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारीत वाढ झाल्याचे दिसते. सन १९६०—६१ ते २००१—०२ या कालावधीचा सुक्ष्मरित्या निरीक्षण केले असता महाराष्ट्र राज्य सरकारने सुशिक्षित वाढीचा दर कमी करण्यासाठी प्रामाणिकपणे व सदैव प्रयत्न केल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारीचा वाढीचा दर कमी ठेवण्यात यश आले

आहे. उदा. सन १९९०—९१ मध्ये वाढीचा दर १३.१७ टक्के वरून १९९९—२००० मध्ये ४.१७ टक्के पर्यंत आणला. सन २०००—२००१ ते २००१—२००२ मध्ये सुशिक्षित बेरोजगारीचा वाढता दर ०.४८ टक्के आहे. याचा अर्थ महाराष्ट्र सरकारने सुशिक्षित बेरोजगारी कमी करण्यामध्ये यश मिळविले आहे. याचे श्रेय राज्य सरकारला जनतेने देणे आवश्यक आहे. कारण कोणतेही राज्य सरकार असो अर्थव्यवस्थेमध्ये पूर्ण रोजगाराची अवस्था निर्माण करू शकत नाही. परंतु बरोजगार वाढीचा दर नियंत्रणात ठेवून त्याची तीव्रता कमी करता येते. कारण पूर्ण रोजगारीची अवस्था ही अर्थव्यवस्थेत सर्वसाधारण परिस्थितीत आढळून येत नसून विशिष्ट परिस्थितीतच दिसून येते. सामान्यपणे अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगारीची अवस्था आढळून येते.

महाराष्ट्र राज्यातील उद्योग आणि रोजगार संधी :— एखाद्या देशाचा किंवा राज्याचा आर्थिक व सामाजिक कायापालट त्या राज्यातील औद्योगिक क्षेत्रच करू शकते. कारण राज्यातील औद्योगिकीकरणामुळे उद्योग, उत्पादन व रोजगारी यात निरंतर वाढ होवून सुशिक्षित बेरोजगारीचा प्रश्न सुटतो. त्यासाठी नियोजनाची अत्यंत आवश्यकता आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानाचे स्थान प्राप्त करण्याची क्षमता उद्योगामध्येच असते.

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचे अंतिम ध्येय पूर्ण रोजगारी प्रस्थापित करणे होय. औद्योगिकीकरणामुळे कृषी क्षेत्रातील भार कमी होवून त्यातील अनेक लोक शहरी उद्योगाकडे वळतात म्हणून पूर्ण रोजगारीच्या दृष्टिकोनातून औद्योगिकीकरण महत्त्वाचे आहे. आज अमेरिका, जपान, इंग्लंड इत्यादी देशांना जी आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. त्याचे मूळ कारण उद्योग आणि व्यापार यात आहे. ज्या देशाचा आर्थिक विकासाचा दर अधिक असतो. त्या देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढून त्यांच्या राहणीमानात सुधारणा होते. पर्यायाने त्या देशातील दारिद्र्य, आर्थिक विषमता कमी किंवा नष्ट करण्याची क्षमता औद्योगिकीकरणामुळे निर्माण होते.

महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृष्ट्या भारतातील प्रथम क्रमांकाचे राज्य समजले जाते. मुंबई शहर हे भारताच्या व्यापाराची राजधानी मानले जाते. महाराष्ट्र राज्यातील प्रमुख उद्योग पुढीलप्रमाणे आहेत. लोखंड पोलाद, विद्युत, सुतीवस्त्र, रसायन, पेट्रोलियम, औषधी, अभियांत्रिकी, मशिन अवजारे, प्लॅस्टिक, इलेक्ट्रॉनिक्स मशिन, सिमेंट, साखर, कागद, काच इत्यादी उद्योगांचा यात समावेश केला जातो. उदा. एकूण कारखान्यातील ८२.१ टक्के कारखाने या पट्ट्यात आहेत. विभागनिहाय विचार करता या पट्ट्यात ७७.३ टक्के रोजगार या विभागात उपलब्ध झालेला आहे. उद्योगाच्या वाढीमध्ये मराठवाडा विभागाचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. उदा. कारखान्यांची संख्या ४.३ टक्के उत्पादन १.२ टक्के आणि रोजगार ४.४ टक्के आहे. या बाबीचा विचार करता महाराष्ट्र राज्यामध्ये उद्योगाच्या व रोजगारीच्या बाबतीत प्रादेशिक असमतोलपणा निर्माण झालेला दिसतो. जर आपणास पर्यायाने राज्य सरकारला सुशिक्षित बेरोजगारीचा प्रश्न सोडवायाचा असेल आणि रोजगार संधी निर्माण करावयाची असेल तर विदर्भ व मराठवाडा याकडे अधिक लक्ष केंद्रीत करणे राज्याच्या व समाजाच्या दृष्टिकोनातून फायदेशीर आहे. या विभागाकडे लक्ष देणे ही काळाची गरज बनली आहे. महाराष्ट्र राज्यातील सन १९६१ ते २००० या कालखंडात विविध क्षेत्रातील रोजगार वाढीचा दर दर्शविलेला आहे. (तक्ता क्र.३ पहा) राज्यातील अर्थव्यवस्थेतील बदलाचा परिणाम रोजगार वाढीवर झालेला दिसतो. या तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, काही ठराविक उद्योगामध्ये रोजगार वाढलेला आहे. तर काही उद्योगामध्ये रोजगार घट झाल्याचे आपल्या निदर्शनास येईल. उदा. सन १९६१ ते २००० वस्त्रोद्योग (४८.५७ ते १९.४५ टक्के), खते उत्पादन (११.८७ ते १४.५ टक्के) यंत्रसामग्री (७.८१ ते १३.९४ टक्के), परिवहन सामुग्री (६.१७ ते १०.२० टक्के) राज्यातील काही उद्योगाचा रोजगार वाढीचा दर कमी दिसतो. त्यामध्ये पेट्रोलियन ४.२५ टक्के, खनिज उत्पादने २.८१ टक्के, कागदाचे उत्पादन ४.७ टक्के याचा अर्थ असा की, राज्य सरकारने आपल्याकडे उपलब्ध असलेल्या उद्योगाचा पर्याप्त वापर केला तर निश्चितच रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध होईल. राज्यातील पायाभूत संरचनेचा विकास ज्या प्रमाणत झाला पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही असे दिसते. राज्य सरकारला सुशिक्षित बेरोजगारी कमी करावयाची असेल तर पायाभूत संरचनेत अधिक भांडवल गुंतवणूक करून अधिक रोजगार संधी उपलब्ध होईल.

तक्ता क्र.३

महाराष्ट्र राज्यातील विविध व प्रमुख उद्योगातील रोजगार

क्र.	प्रमुख उद्योग अट	१९६१	१९७१	१९८१	१९९९	२०००
१	खाद्य उत्पादने	९०२ (११.८७)	९२१ (९.७६)	९६५ (८.३१)	१३३० (११.८१)	१६५२ (१४.०५)
२	वस्त्रोद्योग	३६९१ (३७.२५)	३५१६ (३०.६०)	३५५४ (२२.४३)	२५२७ (१९.४५)	२२८७ (४८.५७)
३	कागदाची उत्पादने	३९० (५.१३)	४९४ (५.२३)	५४९ (४.७३)	४९१ (४.३६)	५५७ (४.७४)
४	रासायनिक उत्पादने	३४० (४.४७)	७६० (८.०५)	१०५९ (५.१२)	१२१५ (१०.७८)	१२७९ (१०.८८)
५	पेट्रोलियम उत्पादने	१७४ (२.२९)	३४९ (३.७०)	४२१ (३.६३)	४८२ (४.२८)	४९९ (४.२५)
६	खनिज उत्पादने	२८४ (३.८७)	४०२ (४.२५)	४०३ (३.४७)	४२३ (३.७५)	३३० (२.८१)
७	धातूचे उत्पादने	४९९ (६.५६)	९२४ (९.७८)	१३१० (११.२८)	१३०१ (११.५५)	१३६३ (११.५९)
८	यंत्रे व यंत्रसामुग्री	५९४ (७.८१)	१३२२ (१४.००)	१७८६ (१५.३८)	१६१४ (११.३३)	१६३९ (१३.९४)
९	परिवहन सामुग्री	४९६ (६.१७)	६०८ (६.४४)	९०३ (७.७७)	८६७ (७.७०)	१९९९ (१०.२०)
१०	इतर	२५६ (३.३७)	४१२ (४.३७)	६६३ (५.७१)	१०१६ (९.०२)	९५१ (८.०९)
	एकूण	७५९९ (१००.००)	९४३८ (१००.००)	११६१३ (१००.००)	११२६६ (१००.००)	११७५६ (१००.००)
आधार: १) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००१—२००२, पान नं.टी. ५९						

महाराष्ट्रातील राज्य सरकारची भूमिका व रोजगार संधी :— सरकारची काही कार्य प्रेरक (Inducing) तर काही कार्य प्रेरित (प्दकनबमक) असतात. ही दोन्ही कार्ये केली असता सरकारची भूमिका जास्त प्रभावशाली ठरते. सरकारची प्रेरक कार्य ही विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरतात असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. कारण या दोन्ही कार्यातूनच पुढील विकासाची प्रेरणा व शक्यता निर्माण होते. जोपर्यंत व्यवस्थेमध्ये विषमता कायम राहील तोपर्यंत सरकारची भूमिका प्रभावशाली ठरणार नाही. औद्योगिक क्रांतीनंतर राज्य सरकारचे स्वरूप जास्त लोकाभिमुख होत गेले. आणि विविध क्षेत्रातील बदलामुळे राज्य सरकारची भूमिका जास्त व्यापक हात गेली आहे. कारण राज्यातील अर्थव्यवस्थेमध्ये झालेली एक प्रकारची स्थैयतिकता (जंहदंजपवद) केवळ सुनियोजित राज्य सरकारी प्रयत्नाद्वारेच दूर केली जाऊ शकते. त्यानंतरच आर्थिक प्रगती होऊन रोजगार संधी निर्माण होवू शकते.

सुशिक्षित बेरोजगारी कमी करून रोजगार संधी उपलब्ध व्हावी यासाठी राज्य सरकारने नवीन योजना/प्रकल्प आखले आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या १५ ते २२.५ टक्के पर्यंत व जास्तीत जास्त १.५ लाख रुपये मर्यादेपर्यंत बीज भांडवल अर्थसहाय्य देण्यात येते. या कार्यक्रमाखाली २०००—०१ या वर्षात १४९४ लाभार्थ्यांना ६.८५ कोटी रुपयांचे सहाय्य करण्यात आले. तर त्या आधीच्या वर्षी २४२० लाभार्थ्यांना ११.०३ कोटी रुपयांचे सहाय्य देण्यात आले. या योजनेमध्ये लाभार्थ्यांची संख्या विचारात घेतली तर अतिशय कमी दिसते. सुशिक्षित बेरोजगारांना या योजनेचा लाभ झालेला आहे. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार संधी उपलब्ध करून द्यावयाची असेल तर बीज भांडवल अर्थसहाय्य योजनेचा प्रसार होणे आवश्यक आहे.

उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम या कार्यक्रमाचा उद्देश सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करणे व प्रशिक्षण देणे हा आहे. या कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडून पद्धतशीर प्रशिक्षणारे उद्योजकतेचा विकास घडवून आणण्यासाठी १ ते ३ आठवड्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. ह्या कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण दिलेल्या तरुणांची संख्या २०००—०१ मध्ये ९९३७ होती तर १९९९—२००० मध्ये ती १०८७३ होती. सन २००१ ते २००२ अखेरपर्यंत ६७२८ तरुणांना प्रशिक्षण

देण्यात आले. या स्वयंरोजगारांचा लाभ घेणाऱ्यांची संख्या घटत आहे. याचे मूळ कारण तपासणे अत्यंत गरजेचे दिसते. स्वयंरोजगारातून अनेकांना रोजगार उपलब्ध होवू शकतो. याकरिता राज्य सरकारांनी स्वयंरोजगारीची संकल्पना सुशिक्षित बेरोजगारांना अधिक सुक्ष्मरित्या समजावून सांगणे काळाची गरज आहे. उदा. कॉलेजमध्ये या योजनेचा प्रसार करणे आवश्यक दिसते.

पंतप्रधान रोजगार योजना ही पूर्णत: केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेला वित पुरवठा केंद्र शासनाकडून ७५ टक्के राज्य सरकारकडून २५ टक्के दिला जातो. ही योजना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येते. या योजनेत व्यवसायासाठी एक लाख रुपयेपर्यंत आणि उद्योग किंवा सेवासाठी दोन लाख रुपयापर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेखाली २०००—०१ मध्ये ३७०१५ लाभार्थ्यांना २१६.१६ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. तर १९९९—२००० मध्ये ३८४७८ लाभार्थ्यांना २४४.८९ कौटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. सन २००१—०२ मध्ये १५६४४० लाभार्थ्यांना ९१.४० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. या योजनेचा विचार केला असता राज्य सरकार भांडवलाच्या दृष्टिकोनातून सक्षम आहेत. परंतु लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. या योजनेचा महाराष्ट्रभर प्रचार व प्रसार होणे अत्यंत गरजेचे दिसते. कारण केन्सच्या मते, रोजगारी निर्धारणात वास्तविक गुंतवणूकीला महत्त्वपूर्ण स्थान आहे. केवळ अर्थव्यवस्थेत वास्तविक गुंतवणूक वाढवूनच रोजगार वाढविला जाऊ शकतो. म्हणून सुशिक्षित बेरोजगारी कमी करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशीलच आहे असे आपल्याला म्हणता येईल.

थोडक्यात, केन्सच्या मतानुसार देशातील रोजगाराची पातळी त्या राज्यातील किंवा देशातील उत्पन्नाच्या (शेती, उद्योग, सेवा) अवलंबून आहे. जितके जास्त उत्पादन होईल तेवढ्या जास्त रोजगाराच्या संधी निर्माण होतील व उत्पादन कमी झाल्यास रोजगारही कमी राहील. या अर्थाने अर्थव्यवस्थेतील एकूण रोजगार उत्पादनबरोबरच असतो. म्हणून औद्योगिक उत्पादन वाढले तर रोजगार संधी अधिक राहील.

संदर्भ :—

१. *माळी, एम.जी., १९७०. 'शैक्षणिक प्रश्न, पुनर्रचना आणि राष्ट्र विकास'. पुणे :निळकंठ प्रकाशन.*
२. *कोठारी आयोग, 'शिक्षण आयोग अहवाल (१९६४—६६)', शिक्षण आणि राष्ट्रीय विकास शिक्षण मंत्रालय, भारत सरकार*
३. *बापट मा.गो. १९७३. 'शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास'. पुणे : व्हीनस प्रकाशन, प्रथमावृत्ती*
४. *पाटील, लीला. १९७६. 'आजचे अध्यापन'. पुणे : विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती*
५. *कुंडले, म.बा. १९५९. 'अध्यापनशास्त्र आणि पद्धती'. पुणे : मॉडर्न बुक डेपो, पुणे, प्रथमावृत्ती*
६. *महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा १९६१—६२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई*
७. *महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा २०००—०१, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई*
८. *कांबळे, नारायण. २०१३. उच्च शिक्षणातील आव्हाने. औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन.*

आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना भेडसावणाऱ्या समस्या

डॉ. रामेश्वर एम. मोरे, सं. भी. पा. महाविद्यालय, मंद्रुप ता. द. सोलापूर जि. सोलापूर. मो. ९८५०८२८१०४

प्रस्तावना :— भारतात सद्यस्थितीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. महाराष्ट्रात तर या समस्येची तीव्रता अधिकच आहे. शेतकरी आत्महत्यापैकी जवळजवळ २० टक्के शेतकरी आत्महत्या या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केल्या आहेत. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यापैकी बहुतांश शेतकरी हे कुटुंब प्रमुख होते तर काही कुटुंब प्रमुख नसणारे परंतु कुटुंबात प्रमुख भूमिका बजावणारे होते. परंतु त्यांनीच आत्महत्या केल्यामुळे अशा कुटुंबांना अनेक समस्या भेडसावत आहेत म्हणून प्रस्तुत संशोधन लेखात उस्मानाबाद जिल्हयातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांचे अध्ययन करून त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे विश्लेषण केले आहे.

कौटुंबिक समस्या —

मार्गदर्शनाचा अभाव :— कुटुंबातील कर्ता व्यक्तीच गेल्यामुळे कुटुंबातील व्यक्तींनी काय करावे यासंबंधी मार्गदर्शन करणारी व्यक्तीच राहिली नाही. त्यामुळे कुटुंबात विस्कळीतपणा येऊ लागला आहे. कुटुंबात आधार देणारा कोणी नाही अशी भावना कुटुंबातील सदस्यात निर्माण झाली आहे. त्याचबरोबर काही कुटुंबातील मुले नियंत्रणाअभावी वाममार्गाला लागत आहेत.

उदरनिर्वाह चालवणे कठीण : — कमावत्या व्यक्तीनेच आत्महत्या केल्यामुळे अनेक कुटुंबात उदरनिर्वाह कसा चालवायचा? हा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा कुटुंबाचे शेतीचे उत्पन्नही कमीच आहे, त्यामुळे त्याच्या पत्नीला मजूरी करून आपला उदरनिर्वाह चालवावा लागतो. परंतु मिळणारी मजूरी कमी असते ती सातत्याने मिळतेच असे नाही. त्यामुळे अशा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे देखील कठीण झाले आहे.

मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न :— आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील बहुतांश लोकांची मुले शिक्षण घेत आहेत परंतु बहुतांश मुलांच्या वडिलांनीच आत्महत्या केल्यामुळे त्यांच्या शिक्षणावरील खर्चाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक मुलांना इच्छा असूनदेखील पैशांअभावी शिक्षण सोडावे लागत आहे.

मुलींच्या विवाहाचे प्रश्न :— वर्तमानस्थितीत हुंडयाच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. हुंडयाशिवाय विवाह ही आता कल्पनादेखील केली जात नाही. परंतु अशा कुटुंबात उदरनिर्वाह चालवणे कठीण आहे. तेथे हुंडा देऊन विवाह कसा करायचा? हा मोठा प्रश्न आहे. त्याचबरोबर वडिलांनी आत्महत्या केली आहे म्हणून अनेक मंडळी अशा कुटुंबातील मुलींना नापसंती दर्शवतात. त्यामुळे मुलीच्या विवाहाचे प्रश्न निर्माण होत आहेत.

कौटुंबिक तणावात वाढ :— आत्महत्येनंतर कुटुंबाच्या दारिद्रयात आणखीनच भर पडत चालली आहे. तसेच कुटुंबात खंबीर भूमिका घेऊन सर्वांवर नियंत्रण ठेवणारा कोणी राहिलेला नाही. त्यामुळे कौटुंबिक तणावात वाढ होत चालली आहे.

आर्थिक समस्या —

आर्थिक अडचणी :— कुटुंबातील कमावता व्यक्ती गेल्याने या कुटुंबांना सातत्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. लहान.मोठया कामासाठी पैसे कोठून आणायचे? हा प्रश्न या कुटुंबासमोर आहे. त्याचबरोबर या कुटुंबातील कर्त्या व्यक्तीने आत्महत्या केल्यामुळे यांची पूर्वीसारखी पत राहिली नाही. त्यामुळे आर्थिक मदत देखील कोणी सहजासहजी करत नाही.

कर्ज परतफेडची समस्या :— आत्महत्येपूर्वी घेतलेले कर्जच अनेक कुटुंबाकडे आहे. व्याजामुळे ती रक्कम वाढतच चालली आहे. शेतीतील उत्पन्न व मजूरी यातून घर भागवणेच अवघड आहे. त्यात कर्ज कसे फेडायचे हा प्रश्न या लोकांसमोर आहे. काही लोकांची बॅकेची कर्ज माफ झाली आहेत, परंतु सावकार, नातेवाईकांचे कर्ज फेडण्याची समस्या त्यांच्यासमोर असलेली दिसून येते.

कृषी विषयक समस्या —

कर्त्या पुरूषाचा अभाव :— सामान्यपणे शेतीची प्रमुख कामे पुरूषांकडून केली जातात. परंतु आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील कर्त्या व्यक्तीनेच आत्महत्या केली आहे. त्यामुळे शेतीकामात अनेक अडचणी येतात. कर्ता पुरूष कुटुंबात नसल्यामुळे अनेक कामे इतरांकडून करून घ्यावी लागतात. परंतु ती वेळेवर होत नाहीत. त्यामुळे देखील उत्पादनात घट होते.

भांडवलाचा अभाव :— शेती करताना शेतीच्या विविध कामासाठी शेतकऱ्यांना भांडवलाची गरज असते. परंतु आत्महत्या केलेल्या बहुतांश शेतकरी कुटुंबाकडे शेतीसाठी स्वत:चे भांडवल नसते व बॅक, सावकार अथवा इतर कोणाकडूनही वेळेवर भांडवल मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या उत्पादनात घट होते.

बैल बारदाण्याचा अभाव :— शेतीसाठी बैल बारदाणा म्हणजेच बैल व शेतीसाठी लागणारी सर्व

साधने असणे अत्यंत आवश्यक असतात. परंतु आत्महत्या केलेल्या बहुतांश शेतकरी कुटुंबाकडील शेतीचे क्षेत्र कमी असल्यामुळे बैल बारदाणा ठेवणे त्यांना शक्य होत नाही व बाहेरचे वेळेवर मिळत नाही. त्यामुळे देखील उत्पादनात घट होते.

निसर्गाचा लहरीपणा :— निसर्गाने साथ दिली तरच शेतकऱ्यांना शेतीतून चांगले उत्पादन मिळते. परंतु सद्यस्थितीत पर्यावरणाच्या असंतुलनामुळे शेतकऱ्यांना कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडया दुष्काळाला तोंड द्यावे लागत आहे. त्याचबरोबर बऱ्याचदा पिकांच्या काढणीच्या काळातच अतिवृष्टी, गारपीटीने पीकांचे मोठे नुकसान होऊन उत्पादनात घट होते. थोडक्यात, निसर्गाचा लहरीपणा आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना अडचणीत आणतो.

पाण्याची कमतरता :— शेतीसाठी सर्वात महत्वाचा घटक म्हणजे पिकांना योग्य वेळी पाणीपुरवठा करणे होय. परंतु आत्महत्या केलेल्या बहुतांश शेतकरी कुटुंबाकडे जलसिंचनाचा कोणताही स्त्रोत नाही व ज्यांच्याकडे आहे त्यांच्याकडेही पुरेसे पाणी नाही. त्यामुळे पिकांना योग्य पाणीपुरवठा ते करू शकत नाहीत.

वीजेची कमतरता :— आत्महत्या केलेल्या ज्या शेतकरी कुटुंबाकडे जलसिंचनाचे स्त्रोत आहेत अशा लोकांना विद्युतपंपासाठी वीजेची गरज असते. परंतु सद्यस्थितीत ग्रामीण भागात दररोज १२—१२ तास लोडशेडींग असते. त्यामुळे पाणी असून देखील वीजेअभावी हे शेतकरी आपल्या शेतीस पाणीपुरवठा करू शकत नाहीत.

रासायनिक खतांचा तुटवडा :— सद्यस्थितीत बहुतांश शेतकरी शेतीमध्ये रासायनिक खतांचा उपयोग करत आहेत. परंतु व्यापारी प्रामुख्याने पेरणीच्या काळात रासायनिक खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करतात व मधल्या मार्गाने किंमत वाढवून खतांची विक्री करतात. जी किंमत सर्वसामान्य शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पाहिजे तेवढे रासायनिक खत घेणे अशक्य होते.

मजुरांचा तुटवडा :— सर्वसामान्यपणे आत्महत्या केलेल्या ज्या शेतकरी कुटुंबाची शेती ५ एकरपेक्षा जास्त आहे अशा लोकांच्या शेतीतील कामे कुटुंबातील व्यक्तींच्याच साहयाने होऊ शकत नाहीत. त्यामुळे अनेकदा मजूर लावून शेतीची कामे करून घ्यावी लागतात. परंतु सद्यस्थितीत शेतीत काम करण्याची बहुतांश लोकांची मानसिकता नाही. त्यामुळे शेतीकामासाठी सहजासहजी मजूर मिळत नाहीत. मजूर वेळेवर न मिळाल्यामुळे शेतीतील कामे वेळेवर होत नाहीत. परिणामी उत्पादनात घट होते.

अशाप्रकारे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना विविध प्रकारच्या समस्या भेडसावताना दिसुन येतात. या समस्या सोडविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करणे महत्वाचे ठरते.

उपाययोजना :— १) आत्महत्या केलेल्या सर्वच शेतकऱ्याच्या कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत करावी. २) आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावरील संपूर्ण कर्ज माफ करून त्यांचा सातबारा कोरा करावा. ३) आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील लोकांना पूरक व्यवसाय करण्यास प्रोत्साहन द्यावे. ४) शेतकऱ्यांना दारिद्रय व कर्जबाजारीपणापासून मुक्त करण्यासाठी शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य हमी भावा द्यावा. ५) शेतकऱ्यांना सिंचन व विजेची सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यावी. ६) शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणासाठी सोयी, सवलती उपलब्ध करून द्याव्यात.

संदर्भ :—

१. *डरखिम एमिल (१८९७), आत्महत्या समाजशास्त्रीय अध्ययन, अनुवादक.रामकिशन गुप्त (२००८), ग्रंथ शिल्पी (इंडिया) प्राईवेट लिमिटेड, दिल्ली.*

२. *ढोबळे विष्णू (२००९), शेतकऱ्यांच्या आत्महत्या — जागतिकीकरणातील शोकांतिका, सुगावा प्रकाशन, पुणे.*

३. *नाईकवाडे अशोक (संपादक) (२००८), शेतकऱ्यांच्या आत्महत्या, चिंता आणि चिंतन, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद.*

४. *बोकरे दिवाकर (२००८), शेतकऱ्यांच्या आत्महत्या... थांबवायच्या कशा ? डायमंड पब्लिकेशन पुणे.*

५. *लांजेवार नरेंद्र (संपादक) (२००७), शेतकऱ्यांच्या आत्महत्या, चिंतन आणि उपाय, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली (पू.).*

६. *वानखडे चंद्रकांत (२००७), एका साध्या सत्यासाठी, परिसर प्रकाशन, अंबाजोगाई.*

७. *Durkhiem Emile (1897), Suicide A study in Sociology, Translated by John A. S. Paulding and George Simpson (1968) Routledge S. Kegan Paul Ltd., London Ec. 4.*

८. *Gyanmudra (Editor) (2007), Farmers Suicide in India, Dynamics and Strategies of Prevention, Deep & Deep Publication Pvt. Ltd., New Delhi.*

९. *Talule Dnyandev (2012), Poor Farm Economy (Micro Level Dimensions of Farmers Suicides in Maharashtra), Sahitya Manthan, Kanpur.*

१०. *जाधव नरेंद्र (२००८), शेतकरी आत्महत्या आणि कृषिक्षेत्रापुढील आव्हाने : कर्जमाफी आणि समग्र महाराष्ट्र समतोल कृषिविकास कृती योजना अहवाल, जुलै २००८.*

सुशिक्षित बेरोजगारी आणि गुन्हेगारी

डॉ. किशोर राऊत, समाजशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. मो. ९८५०२५१७२५

प्रस्तावना :— वर्तमान समाजजीवन अतिशय जटील व गुंतागुंतीचे झाले आहे. दर दिवशी नवनवीन समस्यांची तीव्रता वाढत आहे. अर्थात काही समस्या पारंपारिक तर काही आधुनिक काळातील आहे. समस्यां कोणत्याही काळातील असो, त्यात सुदृढ व संपन्न समाज स्थापनेसाठी घातक व विघातक असतात. एका बाजुने शेकडो प्रश्न आहेत, तर दुसऱ्या बाजुने ते सोडवितांना सरकारला बरीच कसरत करावी लागते. देशात व राज्यात सरकार कोणत्याही पक्षाचे असो समस्या सोडवितांना बराच वेळ व पैसा खर्ची पडतो. समस्या या मुळातच समाजविघातक व कायदाविरोधी असतात. गुन्हेगारी वर्तन हे समाजातील प्रमाणक व मूल्याविरोधी वर्तन होय. ज्यामुळे सामाजिक विकास व प्रगतीमध्ये अडथळे येतात. समस्यासंबंधी फुलर्स व मेयर्स म्हणतात की, ''अशी स्थिती आहे की, जिथे व्यक्तीची मोठी संख्या आकांक्षित सामाजिक मापदंडाना विचलित मानते.'' (फुलर्स व मेयर्स १९४१:३२०)

शासनाने पंचवार्षिक योजनांद्वारा बऱ्याच समस्या सोडविल्या. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतात हे मान्यच करावे लागते. आज जी प्रगती व विकास दिसत आहे यामागे नियोजनबध्द कृती कार्यक्रम म्हणावा लागेल. अर्थात यामध्ये समाजव्यवस्थेतील विविध घटक चांगले कामे करतात. या अर्थाने एका बाजुने प्रगती तर दुसऱ्या बाजुने स्थिती चिंताजनक म्हणावी लागेल अशा दोन्ही बाबीचे विश्लेषण करतांना समाजातील सुशिक्षित युवक जो कामाविना आहे, व ज्याला काम करण्याची इच्छा आहे त्याला 'बेरोजगार' म्हटल्या जाते. त्याची एकुण परिस्थिती पाहतांना गैरवर्तणुक व गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत असल्याचे दिसून येते. अर्थात सुशिक्षित बेरोजगार आणि गुन्हेगारी हे समीकरण पूर्णत: खरे नसते तर बहुतांशपणे याचा परस्पर संबंध असल्याचे दिसून येते. या शोध निबंधात याचा परस्पर संबंध पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

अध्ययनाची उद्दिष्टे :— या अध्ययनातील उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. १. सुशिक्षित युवकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे. २. सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्यांचे अध्ययन करणे. ३. सुशिक्षित बेरोजगार व गुन्हेगारी यांच्यातील परस्पर संबंधाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे. ४. उपाययोजना सुचविणे.

वरील उद्देशांचा अंतर्भाव करून वर्तमान काळातील सुशिक्षित बेरोजगारांची वाढती संख्या, त्यांच्या समस्या व विशेषत: त्यांच्याकडून होणारे गैरवर्तणूक या बाबींचे विश्लेषण केले आहे.

वर्तमानकाळातील सुशिक्षित बेरोजगार संख्येतील वाढ :— केंद्र व राज्य सरकारांनी शिक्षण सर्वांसाठी खुले केले असून त्या अनुषंगाने गावखेडयांमध्ये शाळा, कॉलेज पहायला मिळतात. शिक्षणाचा प्रचार—प्रसार व्हावा. सर्वसामान्यांना शिक्षण घेता यावे म्हणून समाजातील खालच्या मानसाची जीवनपध्दती त्याची सामाजिक, आर्थिक स्थिती लक्षात घेवून 'सर्वांसाठी शिक्षण' मानून 'शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण' करण्यात आले. देशाने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आणि त्यातून शिक्षणासारख्या मूलभूत आणि महत्त्वाच्या कार्याची मुर्हूतमेढ रोवली. शिक्षणाकरीता येथील सर्वच समाजसुधारकाने व शिक्षणतज्ञांनी पुरस्कार केला. त्यांच्या पुढाकाराचे फलित म्हणजे वर्तमान शिक्षण प्रणाली देशातील सर्वसामान्य लोकांसाठी खुली झाली. यामध्ये प्रामुख्याने महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, कर्मवीर भाउराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासोबतच अनेकांनी शिक्षणाचे पवित्र कार्य केले. त्यावेळी येथील सामान्य कष्टकरी, दलित, शोषीत यांना शिक्षण घेता यावे याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून 'सुरक्षा कवच' निर्माण केले. त्याद्वारा सर्व नागरीकांना समान हक्क, अधिकार मिळाले, त्याचा अनुभव आपण आज घेत आहोत.

आधुनिक काळातील विद्यापीठांची संख्या :— वर्तमान काळात शिक्षणाच्या प्रचार, प्रसारामुळे हजारो शाळा, कॉलेज व विद्यापीठांची निर्मिती झाली. त्यातून कोटयावधी तरूण मुले—मुली शिक्षण घेत आहेत. उदा. देशामध्ये केंद्रीय विद्यापीठे ४५, राज्य स्तरीय विद्यापीठे ३२२, अभिमत विद्यापीठे १२८, तर खाजगी विद्यापीठे १९२ एकुण ६८७ विद्यापीठे भारतात आहेत. राज्याचा विचार करता केंद्रीय विद्यापीठे ०१, राज्य विद्यापीठे २०, अभिमत विद्यापीठे २१ व खाजगी विद्यापीठे ०१ अशा एकुण ४३ विद्यापीठे महाराष्टात आहेत. (wikipedia the free enclycopedia) इंजिनिअरींग महाविद्यालयांची संख्या ३४९८ तर व्यवस्थापन महाविद्यालयांची संख्या २४६७ आहे. (www.dreduction.com)

प्राचीन काळापासून शिक्षणांसंदर्भात भारताची किर्ती जगभर होती. त्या काळी जगातील विद्यार्थी आपल्या

देशातील विद्यापीठात अध्ययन–अध्यापन व संशोधनासाठी येत. यामध्ये खालील विद्यापीठांचा उल्लेख करावा लागेल. उदा. १) तक्षशिला २) नालंदा विहार ३) विक्रमशीला विहार ४) उदन्दपुरी महाविहार ५) जागदल महाविहार ६) काशी विद्यापीठ ७) अयोध्या विद्यापीठ ८) गुगारीला विद्यापीठ ९) कुण्डिनपुर विद्यापीठ १०) मिथीला विद्यापीठ ११) नवद्वीप विद्यापीठ १२) वलभी विद्यापीठ १३) काची विद्यापीठ १४) मथुरा विद्यापीठ १५) सालोटगी विद्यापीठ १६) तिरमुक्कुडल मंदीर १७) एन्नचिरम मंदीर १८) मलकापुरम विद्यापीठ १९) तिरूवोरिपूरपरमदं विद्यापीठ २०) अग्रहार विद्यापीठ (पेंडसे २००५:४०) इत्यादी. जगप्रसिध्द विद्यापीठ भारतात होती. त्यामुळे भारतीय संस्कृती अध्यात्मिकता, धर्म, जाती, तत्वज्ञान, गणित, इतिहास, भूगोल इत्यादी अशा सर्वच विषयाचा अभ्यास केला जात होता.

वर्तमान समाजव्यवस्था व शिक्षण प्रणाली :– शिक्षणासंबंधी प्रारंभापासूनच भारत अग्रेसर राहीला आहे. परंतु काळाच्या ओघात शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आला. अगदी अलिकडच्या २०–२५ वर्षाचा विचार करता समाजव्यवस्था अतिशय जलद गतीने बदलत आहे. नवे आर्थिक धोरणामुळे जगभरातील सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात बदल झाला. त्यामध्ये भारतासारख्या विकसनशील देशावर अधिक परिणाम झाला. त्यामध्ये 'शिक्षण व्यवस्था' हे एक होय. जगाच्या धर्तीवर शिक्षण देण्याकडे कल वाढत असून इंग्रजी शाळांची संख्या गल्ली बोळीत वाढलेली आढळते. विद्यार्थी गाव–खेडयातील व आदिवासी भागातील शिक्षण मात्र इंग्रजधार्जिणे. देशातील संस्कृती व तत्वज्ञान इंग्रजी भाषेतून शिकविले जाणार तेंव्हा त्या मुलांवर त्याचा कसा परिणाम होणार? जगाच्या धर्तीवर आमचा विद्यार्थी टिकाव धरू शकेल की नाही याचा विचार केला जात नाही. ब्रिटीश शासनाने सुरू केलेली शिक्षण प्रणाली बऱ्याचअंशी तशीच सुरू आहे. त्यामुळे कारकून निर्माण करण्यापलिकडे आदर्श नागरीक निर्माण करताना अडचणी येत आहे. त्यातूनच शिक्षणाच्या अनुषंगाने कित्येक समस्या निर्माण झाल्या.

शिक्षण प्रणाली व बेरोजगारी :– एकीकडे मोठमोठया शिक्षणसंस्थां ज्यामधून सर्व विद्या शाखातील शिक्षण दिले जाते. शिक्षक व विद्यार्थी यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली. परंतु त्या प्रमाणात सुशिक्षितांच्या हातांना काम नाही. आज घडीला लाखो विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेवून बाहेर पडत आहेत. त्यांच्या हातात पदव्या असल्या तरी काम मिळत नाही, नोकरी मिळत नाही. त्यामुळे त्यांना कामाविना राहावे लागते. अर्थात काम करण्याची इच्छा व तयारी असतांनाही काम मिळत नाही. याला बेरोजगारी म्हणतात. अशी संख्या वर्तमान काळात मोठया प्रमाणात आपल्याकडे आहे.

शिक्षण घेतांना बाहेर पडणारा तरूण लाखोच्या संख्येत असतांना रोजगार मात्र अतिशय कमी प्रमाणात मिळतो. यंत्र, तंत्रज्ञान, विज्ञान यामुळे मनुष्यबळ कमी लागते आणि यंत्राद्वारेच बरीच कामे करून घेतल्या जातात त्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत आहे.

युवकांमधील वाढती गुन्हेगारी :– सुशिक्षित बेरोजगाराची वाढती संख्या पाहता त्यांना मिळणाऱ्या कामाचे वा नोकरीचे स्वरूप अगदी नगण्य आहे. यातून युवा पिढी कामाअभावी विविध गैरमार्गाने जातांना दिसतात. उदा. दररोजचा लागणारा खर्च आपल्या आई वडीलांना नेहमी मागू शकत नाही. मित्र मंडळी, वाढती महागाई, रिकामा वेळ, हाताला साजेसे काम नाही. युवा पिढी सैरभैर होत आहेत. दुसरे असे की, स्वयं केंद्रीत संस्कृतीत वाढ, जागतिकीकरण, खाजगीकरण, व्यक्तीवादी व स्वार्थी विचारधारेत वाढ, राजकीय नेते, अशा विविध कारणांचा समावेश करावा लागेल. ज्यामुळे तरूणांमधील गुन्हेगारी सातत्याने वाढत आहे.

राजकीय नेते व युवकांतील वाढती गुन्हेगारी याचा परस्पर संबंध :– राजकीय नेते व गुन्हेगारी यांचा अगदीच जवळचा संबंध आहे. नव्हे त्या एकमेकांच्या हातात हात घालून गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक राजकारण करतात व प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रूपाने गुन्हेगारीला खतपाणी घालत असतात. राजकारण व गुन्हेगारी यांचे विश्लेषण करतांना हे लक्षात येते की, खालपासून तर वरपर्यंत सर्वच गुन्हेगारी प्रवृत्तीचे वा प्रत्यक्षात गुन्हे असणारी मंडळीच या क्षेत्रात आढळतात. गंभीर गुन्हे असणारी मंडळी देशाच्या व राज्याच्या उच्च पदावर विराजमान होतांना दिसून येतात. खालच्या स्तरावर राजकारण करणारी मंडळी हे पाहतो. वरच्याच मंडळींना काही होत नाही. मग आपल्याला काय होईल यातून गुन्हेगारी वाढत जाते. आज राजकारण म्हणजे गुन्हेगारांना अभय, पद, प्रतिष्ठा व सत्ता याकरीता वाटेल ते करण्याची तयारी यातूनच गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळत जाते.

देशामध्ये गुन्हयाचा दर एक लाख लोकसंख्येला पाहता सर्वाधिक केरळ ४५५, मध्य प्रदेश २९८, तामिळनाडू २९४, दिल्ली २८३, आसाम २५०, हरियाना २४०, राजस्थान २४६, आंधप्रदेश २२४, कर्नाटक २२२, चंदीगड २२१, महाराष्ट्र ११४, तर सर्वात कमी नागालॅंड ४७ आहे. (www.pincodeindia.net/crime-rate.php) तर महाराष्ट्र

विविध गुन्हेगारी, गुन्हयाची माहिती १९९९—२०१३ पर्यंत आहे. त्यामध्ये २०१३ मध्ये खून २५१२, खुनाचा प्रयत्न २४२८, बलात्कार ३०६३, अपहरण २६४०, चोरी ५२६७०, हुंडा ३२०, लैगिक अत्याचार. तर २०१५ मध्ये खून २५०९, दरोडे ८७४, जबरी चोरी ८५६१, घरफोडी १६५८१, चोरी ६११२८, अन्यायाने विश्वासघात २०४२, ठकबाजी १०४२९, बनावटीकरण १९०, गंभीर दुखापत ७९४५, तर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा द्वारा झालेले गुन्हयाची नोंद १८९७९, स्फोटके व स्फोटक पदार्थ कायदा ८८, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा ४००. (www.crimeinmahrashtra2015)

राज्य व देशात जे गुन्हे होतात त्यात सर्वाधिक युवा वर्गाची संख्या अधिक असते. वर्तमान परिस्थिती तर अतिशय जटील व गुंतागुंतीची असून ज्यामध्ये युवा वर्ग गैरवर्तणूक व गैरमार्गाकडे वळतांना दिसतात. उदा. सायबर गुन्हे, घरफोडी, चैन व मंगळसूत्र चोरी, खिसे कापू, ठकबाजी, अपहरण, विनयभंग, बलात्कार इत्यादीद्वारे सर्वाधिक आहेत.

गुन्हे शाखेच्या अहवालानुसार दर चोवीस मिनिटाला १ खून, पाच मिनिटाला १ बलात्कार, अडीच मिनिटाला १ लैगिंक अत्याचार, चार सेकंदाला १ चोरी, एकोणवीस सेकंदाला १ हिंसात्मक गुन्हे होतात. एकूनच गुन्हेगारीमध्ये सुशिक्षित युवकांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ

1. *Fuller Richard and Myres Richard R. (1941): The Natural History of a Social Problem, Americian Sociological Review P. 320.*
2. *Wikipedia the free encyclopedia.*
3. *AICTE (www.dreduction.com)*
4. *पेंडसे प्रतिभा सुधीर (२००५) भारतीय शिक्षण पध्दतीचा विकास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर पृ.८०*
5. *www.unemployemtrateofindia*
6. *www.pincodeindia.net/crime-rate.php.*
7. *www.crimeinmahrashtra2015.*

'महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे बदलते विविध पैलू'

डॉ. सुधा खडके (कडू), लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय,यवतमाळ. मो. ९८६०७४५९७८

प्रस्तावना :— महाराष्ट्राला पुरोगामी, सामाजिक, राजकीय सुधारणांची एक परंपरा लाभली आहे. महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा महामानवांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी, विवीधांगी प्रयत्न केले. त्यांनी स्त्रिया हया विवीध धोरणांच्या स्फूर्तीस्थान आहे असे म्हटले. भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा मुलभूत पाया आहे. आज भारतातच नव्हे तर जगातील सर्व देशांमध्ये महिलांच्या समस्या आहे.

संपूर्ण जगात एकूण लोकसंख्येत स्त्रियांची लोकसंख्या अर्धी आहे. जगातील कोणतेही प्रश्न फक्त स्त्रियांचेच असू शकत नाही. त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न फक्त स्त्रियांपुरतेच मर्यादीत राहू शकत नाही. कुटुंब, समाज आणि देशाचा विकास घडवून आणावयाचा असेल तर महिलांना त्यांचा सन्मान, त्यांचे अधिकार मिळायलाच पाहिजेत. आज भारतीय स्त्रिने उंच भरारी घेतलेली आहे. तीच्या दर्जा व भूमिकांमध्ये आमुलाग्र बदल झाला आहे. स्त्रियांच्या दर्जाबाबत रामगोपालाचार्य यांचे विधान अत्यंत मार्मिक आहे, ते म्हणतात, 'Women can be everything these days, except becoming a father.' आज भारतीय स्त्रीने दाखवुन दिले की ती सर्व जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडू शकते. समाजात आज नवीन मूल्यव्यवस्था निर्माण होत आहे. या मूल्यव्यवस्थेत ती स्वत:चे नवीन स्थान निर्माण करीत आहे. परंतु ही मूल्यव्यवस्था स्त्रियांना सक्षम बनविण्यास साहायभूत ठरत नाहीत.

शोधनिबंधाचे उद्देश : १. भारतीय समाजातील स्त्रियांचा दर्जा व भूमिकांचा आढावा घेणे. २. महिलांच्या सक्षमीकरणात येणारे अडथळे यांचा अभ्यास करणे. ३. महिलांच्या सक्षमीकरणात बदलत्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

गृहितके : १. स्त्रियांच्या दर्जा व भूमिकेत काळानुसार बदल होत आहे. २. जेव्हा स्त्रिया स्वावलंबी व आर्थिक सक्षम होतात तेव्हा तिच्यावर अत्याचार कमी होतात. ३. आर्थिक स्वावलंबनामुळे स्त्रियांचा स्वाभीमान वाढतो. ४. स्वावलंबन स्त्रीला बंधनातुन मुक्त करण्यास आधार देतो. ५. सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे सक्षमीकरण सातत्यपूर्ण गतीने होतांना दिसून येते.

अध्ययनाची पध्दती :— नवीन ज्ञानाच्या प्राप्तीकरिता संशोधन केले जाते. यामुळेच संशोधन हा बौध्दीक प्रक्रियेचा भाग मानल्या जाते. रॉबर्ट लिंडस्टे यांनी या पध्दतीचा पुरस्कार केला. प्राप्त केलेले ज्ञान मानवी जीवनाच्या कल्याणाकरीता उपयोगी ठरेल हा या पध्दतीचा मुख्य उद्देश आहे. यादृष्टीने हा शोध निबंध लिहिलेला आहे. प्रस्तु शोधनिबंधासाठी तथ्य संकलनाकरिता अनेक ग्रंथ, अहवाल, संकेत स्थळे, शोध निबंध, गॅझेट, दुरदर्शनवरील चर्चासत्र, महिलांच्या समस्यांवर आधारित सेमिनार, कार्यशाळा यातील सहभाग, महिला धोरणांबाबतच्या समस्यांवर समिती सदस्य म्हणून घेतलेला आढावा, विविध महिलांच्या प्रत्यक्षरूपात घेतलेल्या प्रतिक्रीया व मनोगत, महिलांच्या समस्यांबाबत प्रत्यक्षरूपात हाताळलेले प्रकरणे, दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख यांचा आधार घेतलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्याचे आशय विश्लेषण वस्तुनिष्ठपणे केलेले आहे. ज्याद्वारे महिलांच्या सक्षमीकरणातील विविधांगी पैलूंची वास्तविकता स्पष्ट करण्यास मदत झालेली आहे.

स्त्रियांचे बदलते स्थान व दर्जा :— प्राचीन काळापासून तर आजपर्यंतचा स्त्रियांचा बदलत्या दर्जाचा मागोवा घेतल्यास, स्त्रियांचे स्थान जगात मान्यता पावलेल्या मूल्यांच्या आधारे व लोकशाही व्यवस्थेच्या संदर्भात लक्षात घेतल्यास स्त्रियांमध्ये आमुलाग्र बदल घडून आलेले आहे. स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. स्त्रीयांना स्वत:च्या आत्मप्रतिष्ठेची जाणीव झाली. तीला कार्यकर्तृत्वाची नवी दृष्टी मिळाली. संगीत, लेखन, शिक्षण, राजकारण, चित्रपट, नाटक अशा विविध क्षेत्रात स्त्रियांनी पदार्पण केलेले आहे. स्त्री म्हणून कोणतेच क्षेत्र वर्ज्य राहिलेले नाही. स्त्रिने सिध्द करून दाखविले की, ती कोणत्याही क्षेत्रात अत्यंत सक्षमपणे काम करू शकते.

स्त्रियांचे स्थान व दर्जा बदलण्यास उत्तरदायी घटक :— १.शिक्षणाच्या संधी, २. सुधारणावादी चळवळ ३. संविधानात्मक तरतुदी, ४. आर्थिक स्वातंत्र्य ५. राजकारणातील सहभाग ६. स्त्री—पुरूष समानतेचे तत्व ७. औद्योगीकरण व जागतिकीकरण ८.कौटुंबिक अधिकार ९. विविध क्षेत्रात मिळणाऱ्या संधी १०. कायद्याचे पाठबळ ११. स्त्रिमुक्ती आंदोलन १२. स्त्रि भृणहत्या विरोधी आंदोलन इ.

आज भारतीय स्त्रि आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करीत आहे. समाजाने स्त्रियांना प्रदान केलेले अधिकार यावरून

तीचे स्थान व दर्जा निश्चित होतो. रॉबर्ट लोवी यांनी स्त्रियाचा दर्जा ठरविण्यासंबंधीचे चार आधार सांगीतले आहे. १. प्रत्यक्ष वागणूक २. कायदेशीर दर्जा ३. सामाजिक कार्यात भाग घेण्याची संधी ४. कामाचे स्वरूप.

वरील आधारांचा विचार करतांना स्त्रियांना आज विविध क्षेत्रातील दारे मुक्त झालेली आहेत. आज स्त्रियांची स्थिती बदललेली आहे. समाजाच्या विविध बंधनात अडकलेली स्त्री सक्षम होउन तीच्या कामाचा सर्वत्र गौरव होत आहे. स्त्री ही समाज परिवर्तनाचा महत्वाचा घटक आहे. म. गांधीजींनी म्हटले आहे की, 'सर्वांगीण शोषणाविरूध्दच्या लढयास स्त्रियांना तयार करणे म्हणजे 'स्त्री सक्षमीकरण होय.' स्त्री ही कुटुंबाची द्वारपाल आहे. ती कुटुंबाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. आज स्त्रिशिवाय पुरूष किंवा पुरूषांशिवाय स्त्री असे गणीत मांडणे चुकीचे आहे. स्त्री बरोबर पुरूष असे गणित मांडायला पाहिजे. आज तीने तीच्या जीवनाचा दर्जा व गुणवत्ता वाढविला आहे.

स्त्रि सक्षमीकरणाचे बदलते पैलू :— भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रिला पुज्यनीय मानतात. स्त्री आई, प्रेमिका, पत्नी, शिक्षीका अशा विवीध रूपात आपली भूमिका पार पाडीत असते. काही लेखकांनी असे मत मांडले आहे की, स्त्री ही अहिंसक आहे. तीला त्रास देण्यासाठी पुरूष व समाज योजनापूर्वक प्रयत्न करतात. परंतु ही मते आज काळाच्या ओघात मागे पडली आहेत. भारतीय संस्कार स्त्रियांना स्वतंत्रपणे वावरू देत नाही. आमचे संस्कार पाश्चीमात्य संस्कृतीपेक्षा भिन्न आहेत. तेथील स्त्रिया मारपीट, बलात्कार, अपमान, शोषण, कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक अत्याचार अशा समस्यांना रडून उत्तर देत नाहीत तर त्या प्रखर रणनिती वापरून त्याचे चोख उत्तर देतात. आता स्त्री आर्थिक संपन्न झाली आहे. भारतामध्ये महिलांचे शारीरिक शोषण राजकीय नेते, समाजातील लोक, पोलीस अधिकारी करीत आहे. भारतीय महिला स्वत:च्या अब्रुला सुरक्षीत ठेवते. घराच्या बदनामीची जास्त काळजी घेते. खरे म्हणजे भारतीय स्त्रीची शोकांतिका ही आहे की, ना घर स्त्रीचे, ना परिवार तीचा, ना समाज तीचा तरीही ती जपते. प्रत्येकच वेळी हा संवदेनशील मुद्दा बनतो. पतीचे घर, वडिलांचे घर तीचे कोणतेच घर नसते. नारीशक्ती आंदोलनामुळे, कायद्याच्या भक्कम पाठींब्यामुळे तीच्यात एक नवी चेतना आली आहे. परंतु तीच्या समस्या मात्र जशा होत्या तशाच आहेत. कौटुंबिक हिंसाचाराबाबत सरकारने कायदा केला. परंतु महिलांवर होणारे अत्याचार काही कमी झालेले दिसून येत नाही. आज स्त्री घरात व बाहेर सुरक्षीत नाही. तिच्यावर केव्हाही, कुठेही अनुचीत प्रकार घडू शकतो. समाज व कुटुंबाची संवेदना कमी झाली आहे. एकमेकांसाठी काही करायची भावना मरत चालली आहे.

वरील विश्लेषणाच्या विचारातील एक बाजू नकारात्मक असली तरी सुध्दा महिलांच्या सक्षमीकरणात नवनवीन पैलूंची भर पडत आहे. त्या घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडत आहे. ती स्वत: शाळा, कॉलेज, ऑफीस व व्यवसायामध्ये सहभागी होत आहे. स्त्री भृणहत्येबाबत सरकारने कठोर कायदे बनविले आहेत. मुलगी मुलापेक्षा कुठेच कमी नाही. मध्यंतरी राजस्थानमधील एका गावातील सहा मुलींनी आपल्या आईचा अंतीम संस्कार पार पाडला, मुखाग्नी सुध्दा दिला हे धाडसी पाउलच म्हणायला पाहिजे. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. स्त्रियांच्या प्रगतीवरच राष्ट्राच्या प्रगतीचा आलेख अवलंबुन आहे. स्त्री जोपर्यंत पुरूषांच्या पावलावर पाउल टाकून चालत नाही तो पर्यंत ती प्रगतीच्या शिखरावर पोहचू शकत नाही.

स्त्रियांचे समाजातील स्थान सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बाबींवर अवलंबून असते एकोणविसाव्या शतकात परिवर्तनाची एक नवीन लाट आली. आधुनिक जीवनमूल्ये स्विकारण्याची मानसिकता तयार झाली. महिला उत्थानाची नवीन लाट तयार झाली. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना समानतेचा अधिकार दिला. त्यासाठी स्त्री सक्षमीकरणाचे नवीन कायदे करण्यात आले. स्त्रियांना शिक्षणाच्या संधी मिळाल्या. कायद्याच्या भरभक्कम आधारामुळे स्त्रियांना संरक्षण मिळू लागले.

आज भारतीय स्त्री आर्थिक क्षेत्रातही प्रगती करतांना दिसत आहे. काही महिला आर्थिकदृष्टीने संपन्न झाल्यात. परंतु सामाजिक व सांस्कृतिक बंधनातून मुक्त झालेल्या नाहीत. म्हणायला कायद्याने स्त्रियांना स्वतत्रंपणे जगण्याचा अधिकार दिला परंतु प्रत्यक्षात तसे दिसत नाही. समाज बदलत आहे असे म्हणता येणार नाही. स्त्रिचे वर्तमान व भविष्य अन्य व्यक्तीच्या हातात आहे. आज स्त्रीया मुक्त होऊ पाहात आहे. परंतु ती सुरक्षीत नाही. कायदा व पोलीस प्रशासनाच्या भरोशावर स्त्रियांचे होणारे अत्याचार थांबू शकत नाही. जोपर्यंत पुरूष स्त्रियांना मानव समजत नाही तोपर्यंत ती मुक्त होऊ शकत नाही.

स्त्रियांची आर्थिक सक्षमीकरण दर्शक सारणी

अ.क्र.	विवरण	एकूण	होय	नाही	टक्केवारी
१	उत्पन्नाची विल्हेवाट स्वेच्छेने करतात	१०	०४	०६	४०%
२	पतीच्या इच्छेने करतात	१०	०६	०४	६०%
३	भविष्याची बचत स्वत: करतात	१०	०७	०३	७०%
४	आर्थिक सक्षमीकरण झाले	१०	०५	०५	५०%

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, १० पैकी ०४ स्त्रिया उत्पन्नाची स्वेच्छेने विल्हेवाट करतात. ०६ स्त्रिया पतीच्या इच्छेने उत्पन्नाची विल्हेवाट लावतात. बचतीबाबत १०पैकी ०७ स्त्रिया होय म्हणाल्या तर ०३ स्त्रियांनी पुरेशा आर्थिक तरतुदी अभावी बचत करत नाही असे सांगितले. आर्थिक सक्षमीकरणाबाबत ५० टक्के पेक्षा जास्त स्त्रिया समाधानी दिसून आल्या. संदर्भीय सारणीवरून आज स्त्रीयांच्या नावाने संपत्ती, बँकखाते, भविष्य निर्वाह निधी दिसते हा तीचा आर्थिक दर्जा उंचावल्याचेच प्रतिक होय.

महिला सक्षमीकरण व सद्य:स्थिती :— ज्या समाजात स्त्रियांची सामाजिक स्थिती पुरूषांच्या बरोबरीने आहे. ती स्त्री कुठलेही क्षेत्र काबीज करू शकते. आज स्त्रीने दाखवून दिले की, ती घर व नोकरी व्यवस्थीतरित्या सांभाळू शकते. नोकरी करणारी स्त्री जेव्हा घराबाहेर पडते तेव्हा ती स्वत:साठी एक नवीन विश्वाची निर्मीती करते. जोपर्यंत पुरूष स्त्रियांना मानव समजत नाही तोपर्यंत ती मुक्त होऊ शकत नाही. शिक्षण स्त्रियांना समजदार बनविते. स्त्रियांनी पंखाने उडण्यापेक्षा पायाने चालायला शिकले पाहिजे. पाय पंखापेक्षा कमी ताकदवान नाहीत. जीवन एक यात्रा आहे. स्त्रियांनी अस्तित्वाची लढाई स्वत: लढायला शिकले पाहिजे. आपल्या अस्तित्वाचे युध्द तीने घरच्या मैदानात लढायला शिकले पाहिजे. पुर्वीपेक्षा आज महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीत सुधारणा झाली आहे. पुरूष प्रधान संस्कृतीचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. महिलांना सक्षम केले तरच आपला भारत देश बळकट होवू शकतो. स्त्रीयांनी बदलत्या नव्या विचारांना स्विकारले पाहिजे. नव्या मूल्य व्यवस्थेत ती स्वत:चे स्थान निर्माण करत आहे.

निष्कर्ष :— १. शहरातील स्त्रिया पुरूषांबरोबरीचे विभीन्न व्यवसाय करीत आहे. २. जागतिकीकरण, नागरीकरण, शिक्षणाचा प्रसार, कायद्याच्या तरतुदी, व्यक्तीस्वातंत्र्य यामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावत आहे. ३. स्त्री स्वावलंबी बनत असून स्वावलंबनामुळे तीचा दर्जा व भूमीकांमध्ये बदल होत आहे. ४. जागतिकीकरणामुळे स्त्रीयांच्या दर्जात कार्यक्षेत्रात आमुलाग्र बदल झाला आहे. ५. आजची स्त्री पुरूषी मानसिकतेच्या चौकटीतून बाहेर पडून नवीन विश्व निर्माण करीत आहे. ६. आज स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे. ७. भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत हक्क व अधिकार स्त्रियांचा विकासाचा पाया आहे. ८. बदलत्या काळानुसार व सामाजिक परिस्थितीनुसार महिलांसमोरील आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहे. ९. महिलांवर होणारे अत्याचार विचारात घेता महिलांच्या संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करणे गरजेचे आहे. १०. केवळ कठोर कायदे करून महिलांवरील अत्याचार कमी होणार नाही. त्यासाठी महिलांबद्दल स्वाभिमान, सन्मान, आदर निर्माण करणे व त्यापध्दतीची मानसिकता निर्माण करणे काळाची गरज आहे. ११. महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथेपासून त्यांची मुक्तता करण्याची उपाययोजना करणे. १२. समाजाचा एक परिपूर्ण घटक म्हणून महिलांना समान संधी व सन्मान प्राप्त व्हावा यासाठी समाजातील सर्वच घटकांनी कटिबध्द असावे. १३. समाजात स्त्रि जन्माचे स्वागत होउन भविष्यात मुलींची संख्या वाढेल, ही बाब निश्चितच महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरेल.

संदर्भ सुची :

1. *वैद्य अनिल (२०१४), भारतीय महिला व कायदा, महाराष्ट्र लॉ एजन्सी, नाशिक.*
2. *डॉ. चावला गीता (२०११), नारीवाद के विवीध परिक्षेत्र, शांती प्रकाशन, हरियाणा.*
3. *डॉ. सक्सेना दिपाली (२०१६), महिला सशक्तीकरण, रोशन पब्लीकेशन, कानपूर.*
4. *डॉ. शर्मा पुर्णिमा (२०१५), नारी सशक्तीकरण का व्यावहारीक स्वरूप, विकास प्रकाशन, कानपूर.*
5. *पेंडले शरयू शांताराम (१९१९), भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पाप्युलर प्रकाशन, मुंबई.*
6. *डॉ. साखरे सिमा (१९९५), स्त्रीवाद, सीमा प्रकाशन, नागपूर*
7. *साने गीता (१९९७), भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन, मुंबई,*
8. *Khanna Girija Vorghse (1978), Indian Women Today, Vikas Publishing House, Kanpur.*
9. *गोटे—गुल्हाणे शुभांगी (२००३) स्त्री परवितर्नाची आव्हाने, साउथ एशीयन सोशल रिसर्च पब्लिकेशन*
10. *महिला बाल विकास विभाग (२०१४), महिला व बालविकास विभाग, मंत्रालय मुंबई.*
11. *डॉ. लांजेवार साधना (२०१५), विवीध धर्मातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा दर्जा व भूमिका, सर साहित्य केंद्र, नागपूर.*
12. *महिला व बालविकास विभाग (२००६), कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे.*

प्रसार माध्यमे आणि ग्रामीण युवकांचे वर्तन

प्रा. एस के राठोड, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर जि, औरंगाबाद. मो. ९९२१५९७९५३

प्रस्तावना :— मुलभुत नैसर्गीक हालचालीचा अपवाद वगळता मानवांचे बहुतांशी वर्तन हे प्रत्यक्ष अनुभवातुन वा इतरांचे निरीक्षणातुन आकारास येते. हे निरीक्षण मग घरातील इतर सभासद, मीत्र, शेजारी किंवा प्रसार माध्यमाव्दारे संपर्कात येणाऱ्या लोकांचे असू शकते. कारण आज प्रसारमाध्यमांच्या प्रचार व प्रसारामुळे ग्रामीण लोकांना देश विदेशातील चिरपरिचित लोकांना पडद्यावर पाहणे शक्य झाले आहे. माध्यमाच्या उपलब्धतेमुळे त्यांचे विचारविश्व विस्तारले आहे. त्यामुळे वर्तनात परीवर्तन घडुन येत आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार आपल्या देशातील एकुण लोकसंख्येच्या '६८.८५ टक्के लोकसंख्या'[१] ग्रामीण भागात राहते. या दुरवर पसरलेल्या लोकांमध्ये वैज्ञानीक दृष्टीकोण रूजवणे वेगवेगळया विषयाबदल माहिती देणे, शिक्षण प्रसार करणे व लोकांचे मनोरंजन करणे हे उद्देश डोळयासमोर ठेवून १५ सप्टें. १९५९ रोजी आपल्या देशात टीव्हीचे प्रसारण सुरू झाले. आज टीव्ही वर विशेषत: दुरदर्शन चॅनल्सवर कृषी, रोजगार, स्वयंरोजगार, पर्यावरण, सहकार व उद्योजकता इत्यादी विषयक, कार्यक्रम प्रसारीत केले जातात. कारण लोकांनी नवनवीन कौशल्य, रोजगाराचे नवीन मार्ग आत्मसात करावीत ज्यामुळे त्यांच्या उत्पादनात वाढ होईल व जीवनमान उंचावेल हा शासनाचा त्यामागे प्रमुख उद्देश आहे. टीव्ही बरोबरच जोडीला वर्तमानपत्र, रेडीओ, व मोबाईल फोनच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासास पुरक माहिती प्रसारीत केली जाते. या माहितीचा ग्रामीण तरूण वर्ग कसा उपयोग करतो. या कार्यक्रमाचा, त्यांवर होणारे अनुकुल व प्रतिकुल परिणाम तसेच त्यांच्या वर्तनावर (ज्ञान, कौशल्य व विचार) काय परीणाम होतो याचा वेध घेण्यांचा प्रयत्न केला आहे. कारण आज घडीला टीव्ही व मोबाईल फोन ऐवढे परिणामकारक दुसरे माध्यम कदाचित नसेल जो लोकांचे मतपरिवर्तन करील. जसपालसिंग व संधुच्यामते, 'टीव्ही हे केवळ दृष्टीकोनाला आकार देण्याचे महत्वाचे साधन नाही तर त्यामुळे मानवी वर्तन सुध्दा प्रभावित होते'[२]. म्हणुन सदरील शोधनिबंधात माध्यमाचा ग्रामीण तरूणांच्या वर्तनावरील प्रभाव व परीणामाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. कारण तोच ग्रामीण सामाजिक आर्थिक बदलास दिशा देणारा प्रमुख घटक आहे.

साहित्य आणि पध्दत :— प्रस्तुत शोधनिबंध हा क्षेत्र अभ्यासावर आधारित आहे. यासाठी लागणारी माहिती मराठवाडयाच्या सहा जिल्हायातील (जालना, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातुर) प्रत्येकी दोन अशा बारा गावातील १२० तरूणांकडुन प्रश्नावलीच्या मदतीने संकलित केली आहे. त्यात ९७ तरूण व २३ तरूणीचा समावेश आहे. व्यक्ती हा संशोधनविषयक माहिती संकलनाचा एकक आहे. उत्तरदात्याची निवड ज्यांच्या घरी टीव्ही आहे आणि जे नियमित टीव्ही पाहतात अशा तरूण लोकसंख्येतुन सहेतुक नमुनानिवड पध्दतीच्या मदतीने केली आहे.

सदरील शाधनिंबध हा टीव्ही कार्यक्रम आणि ग्रामीण युवकांचे वर्तन यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास आहे. यात टीव्ही कार्यक्रमाच्या संदर्भात ग्रामीण युवकाचे ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोन (विचार करण्याचा मार्ग) यावर काय आणि कसा परीणाम होतो याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांच्या वर्तनाचे मूल्यमापण करणे, त्यांचा टीव्ही बदद्लचा अनुभव, मते आणि श्रध्दा जाणुन घेणे, टीव्ही मुळे तरूणांच्या वर्तनात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे हे प्रस्तुत शोधनिबंधाचे प्रमुख ध्येय आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :— सदरील शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत. १. टीव्हीचे ग्रामीण तरूणावरील परिणाम व प्रभावाचा अभ्यास करणे. २. तरूणांचे टीव्ही वरील आवडते व नाआवडते कार्यक्रम कोणते याचा आढावा घेणे. ३. टीव्ही मुळे ग्रामीण तरूण वर्गात उदयास येणाऱ्या संस्कृतीचा शोध घेणे. ४. टीव्ही कार्यक्रमाचा तरूणांच्या वर्तनावर होणाऱ्या परीणामाचा अभ्यास करणे.

प्रस्तुत शोधनिबंध हा अल्बर्ट बांडूरा या मानसशास्त्रज्ञाच्या Social Learning Theory वर आधारीत आहे. बांडूरच्यामते, 'मानवाचे आधिकांश वर्तन हे मॉडेलिंगचे निरीक्षण करून निश्चित होत असते. प्रत्येक व्यक्ती इतरांच्या निरक्षणावरूनच आपणही कोणकोणत्या प्रसंगी कसे वर्तन करावयाचे हे शिकतो आणि नंतर प्रत्यक्ष व्यवहारात त्याची अमल बजावणी करण्याचा प्रयत्न करतो'.[३] टीव्हीच्या आगमनापुर्वी ग्रामीण तरूणांचे निरीक्षणविश्व आपले कुंटूबीय, शेजारी व संवगडयापुरतेच मार्यादित होते पण ते आज विस्तारले असुन टीव्ही मुळे ग्रामीण तरूणाला दररोज नवनवे देशी—विदेशी मॉडेल्स, नट, नटया, खेळाडु उद्योगपती, व्यावसायिक, राजकीय पुढारी, प्रशासकीय अधिकारी इत्यादीचे निरीक्षण करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

संबधित साहित्याचा अभ्यास :— १) कांग (१९९५)[४] व त्यांच्या सहकार्यांनी दिल्ली पब्लिक स्कुल आणि दिल्ली विद्यापीठातील ४३० विद्यार्थ्यांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, अत्याधिक प्रमाणात टीव्ही पाहण्यामुळे तरूणांची सृजनक्षमता, स्वाभिमान आणि ध्येय निश्चिती इत्यादी वर विपरीत परीणाम होत आहे. तसेच त्यांच्यामध्ये अनुचलन, सभ्यता, स्वंयशीस्त आणि आज्ञाधारकपणा इत्यादी विषयी उदासिनता निर्माण झाली आहे. विशेषत: टीव्हीमुळे तरूणीपेक्षा तरूणाकंडुन सभ्यपणा आणि आज्ञाधारकतेची अवहेलना मोठयाप्रमाणावर होत आहे.

२) आर्चिता वर्मा (२०००)[५] यांच्यामते बहुराष्ट्रीय वाहिन्यामुळे भारतीय तरूणामध्ये पारंपरिक भारतीय अभिजात नृत्य ऐवजी पाश्चात्य नृत्यप्रकाराची लोकप्रियता अधिक वाढली आहे. त्यांच्यामध्ये चित्रपटातील नट व नटयाप्रमाणे पोषाख, केस वाढवणे व समस्येपासुन सुटका हवी म्हणून मद्यपान करण्याचे प्रमाण वाढले आहे. पाश्चात्य वाहिन्यांच्या प्रभावामुळे तरूणामध्ये पारंपरिक भारतीय मुल्यपालनाबाबत उदासिनता वाढली आहे.

३) पी. विजयालक्ष्मी (२००५)[६] यांच्यामते पाश्चात्य टीव्ही कार्यक्रमामुळे भारतीय तरूणांमध्ये कौटुंबिक मूल्ये, महिलांची सामाजिक भूमिका, लैंगिकता, रूढी, जीवनशैली इत्यादीमध्ये बदल घडुन आला आहे. तसेच देशी वाहिण्यापेक्षा परकीय वाहिण्यांचे आकर्षण, जोडीदाराची निवड करताना स्वपसंतीला प्राधान्य, पाश्चात्य संगीताची लोकप्रियता व डिस्को क्लबमध्ये जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

४) पहाड व जैन (२००९)[७] च्यामते माध्यमांच्या जागतिकीकरणामुळे तरूणांच्या खानपान सवयी, पोषाख आणि जीवनप्रतिमानात बदल झाला आहे. थोडक्यात परकीय वाहिन्यामुळे भारतीय तरूणांच्या उपभोगात बदल झाला आहे.

अभ्यासाचे चल :— सदरील अभ्यास हा कारण परीणाम या नियमावर आधारीत असून यात दोन चल आहेत. टीव्ही आणि मोबाईलफोन हे स्वतंत्र चल तर युवकांचे वर्तन हे परतंत्र चल आहे. यात टीव्ही व मोबाईल फोन चा युवकाचे ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोण व (विचार करण्याचा मार्ग) मनोवृत्तीवर काय परीणाम होतो याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

विश्लेषण :—

लिंग व वयोगटानुसार उत्तरदात्याचे वर्गीकरण

तक्ता क्र.१

वय	पुरूष (युवक)	स्त्री (युवती)	एकुण प्रतिसाद (शे. प्रमाण)
१५—१९	३१	१८	४९ (४१.००)
२०—२४	३४	०४	३८ (३२.००)
२५—२९	२१	०१	२२(१८.००)
३०—३४	११	००	११ (९.००)
एकूण	९७ (८१.००)	२३(१९.००)	१२०(१००.००)

सारणी क्र. १ च्या निरिक्षणावरूण असे निदर्शनास येते की, १२० उत्तरदात्यापैकी १५—१९ वयोगटातील सर्वाधिक ४९ (४१.००%) असुन त्यानंतर २०—२४ (३२.०० %) वयोगटाचा क्रमांक येतो. २५—२९ वयोगटातील (१८.०० %) तर ३०—३४ वयोगटातील केवळ (९.०० %) उत्तरदाते असल्याचे दिसुन येते. उत्तरदात्याचे लिंगानुसार वर्गीकरण पाहिले असता (८१.०० %) युवक तर (१९.०० %) युवतीचा त्यात समावेश होता.

उपलब्ध माध्यम सुविधा :—

तक्ता क्र.२

खालील तक्ता उत्तरदात्याच्या घरी उपलब्ध असलेल्या माध्यम सुविधा दर्शवितो.

वैशिष्टये	टीव्ही	रेडीओ	वर्तमानपत्र	मोबाईल फोन	वॉटसॲप/ फेसबुक
स्त्री	९७	२२(२२.६८%)	२९(२९.८९%)	८९(९१.७५%)	६५(७३.०३%)
पुरूष	२३	०९(३९.१३%)	०५(२१.७३%)	१८(७८.२६%)	१२(५२.१७%)
एकुण	१२० (१००%)	३१(२५.८३%)	३४(२८.३३%)	१०७(८९.१६%)	७७(६४.१६%)
सरासरी वेळ	२.१२ तास				१.४५ तास

सारणी क्र. २ असे दर्शविते की, प्रत्येक उत्तरदात्याच्या घरी किमान एक टीव्ही संच आहे. १२० पैकी ३१(२५.८३) उत्तरदाते रेडीओ ऐकणारे तर ३४ (२८.३३) उत्तरदाते नियमित वर्तमानपत्र वाचणारे आहेत. १२० पैकी १०७ हे मोबाईलफोनधारक (९१.७५ मुले व ७८.२६ मुली) असून एकत्रीत ६४.१६ टक्के तरूण हे फेसबुक व वॉटसॲपचा वापर करतात. उत्तरदात्यांचा दिवसभरातील टीव्ही व मोबाईलवर होणारा वेळेचा खर्च पाहिला तर असे दिसुन येते की, सरासरी २.१२ तास टीव्ही साठी तर १.४५ तास वेळ फेसबुक व वॉटसॲप साठी खर्च होतो. थोडक्यात

उत्तरदात्यांचा दररोज सरासरी ४ तास वेळ टीव्ही व मोबाईल वापरावर खर्च होतो असे दिसून येते.

तक्ता क्र.३ टीव्ही पाहण्याचा उद्देश्य

उद्देश्य	प्रतिसाद	शे.प्रमाण
माहिती प्राप्त करणे	७५	६२.५०
शिक्षण	१०	८.३३
मनोरंजन	४३	३५.८३
रिकामा वेळ घालवणे	९	७.५
एकुण	१२०	१००

वरील तक्ता क्र.३ असे दर्शवतो की, (६२.५०) उत्तरदाते हे माहिती प्राप्त करण्याच्या उद्देश्याने टीव्ही पाहतात.तर (३५.८३) च्यामते मनोरंजन करणे हा टीव्ही पाहण्याचा प्रमुख उद्देश्य आहे. तर ८.३३ टक्के उत्तरदाते म्हणतात नवनवीन कौशल्य व इतर बाबीचे शिक्षण घेणे हा टीव्ही पाहण्याचा उद्देश्य आहे. (७.५ टक्के) उत्तरदात्यांच्यामते रिकामा वेळ घालण्यासाठी ते टीव्ही पाहतात. थोडक्यात सर्वाधिक उत्तरदाते माहिती मिळवणे हा टीव्ही पाहण्याचा प्रमुख उद्देश्य आहे हे नमुद करतात असे दिसून येते.

तरूणांचे ज्ञान व कौशल्याधारीत आवडते टीव्ही कार्यक्रम :— या विषयाबद्ल तरूणांकडुन माहिती संकलित केली असता असे निदर्शनास येते की, १२० पैकी (९०.८३ टक्के) तरूण ज्ञान व कौशल्य विकासाशी निगडीत कार्यक्रमच पाहत नाहीत. उर्वरीत ११ उत्तरदात्यापैकी चौघे फोटोग्राफी, शेळीपालन, मासेमारी, कुकुटपालन विषयक कार्यक्रम पाहतात. हॅलो डॉक्टर ०२, करीअर मंत्र ३ व दोन कृषी आधारीत कौशल्य विकास कार्यक्रम पाहतात.

तरूणांचे आवडते रेडीओ कार्यक्रम :— १२० उत्तरदात्यापैकी केवळ ३१ तरूण रेडीओ ऐकतात आणि त्यांचे आवडते कार्यक्रम पुढील प्रमाणे आहेत. चित्रपट संगीत, विविध भारती, आजके फन्कार, हॅलो सखी, किसान वाणी, गितमाला, सखी सहेली, रेडीओ मीर्ची, लव्हगुरू, फोनफर्माइश, हवामहल, पिटारा छायागीत, सुगमगीत तर केवळ नउ उत्तरदाते किसानवाणी, हॅलो डॉक्टर आणि आरोग्य साधना हे कार्यक्रम पाहतात.

तरूणांचे आवडते टीव्ही चॅनल्स :— सोनी—२२, स्टार—१४, झी—४७, क्रिडा—१४, लाईफओके—७, बातम्या (आयबीन—०८, आजतक—०५, एबीपी—२४, झी२४तास—१७, इतर—०४) सहयाद्री—१५, डिडी १—११, डिस्कव्हरी—०६, इतर—१४ इत्यादीचा समावेश होतो.

तक्ता ४. तरूणांना टीव्ही कडुन अपेक्षित असणारी विषयावर माहिती दर्शविणारा तक्ता

अ. क्र.	वैशिष्टये	प्रतिसाद	शेकडा प्रमाण
१	व्यक्तीमत्वविकास व सामान्यज्ञान	१३	१५.६ टक्के
२	स्वयंरोजगार	१२	१४.४ टक्के
३	समाजिक सुधारणा	०६	७.२ टक्के
४	कृषीतंत्रज्ञान	०८	८.४१ टक्के
५	मनोरंजन	६२	७३.२ टक्के
६	आरोग्य	०५	६.०० टक्के
७	तटस्थ	१४	१६.८ टक्के
	एकूण	१२०	१००.०० टक्के

वरील सारणीच्या निरीक्षणावरून असे दिसून येते की, ७३.२ टक्के तरूणांना टीव्ही कडुन मनोरंजन विषयक कार्यक्रमाची अपेक्षा आहे. तर १५.६ टक्के तरूणांना स्पर्धापरीक्षा सामन्यज्ञान व व्यक्तीमत्व विकासाबदल माहिती हवी आहे. १४.४ टक्के तरूण उत्तरदात्यांना स्वयं रोजगाराबदल माहिती हवी. ८.४१ टक्के तरूणांना कृषीविषयक तंत्रज्ञानाबदल माहिती पाहिजे. ७.२ टक्के तरूणांना समाजसुधारणा तर ६.०० टक्के उत्तरदात्यांना आरोग्यविषयक माहिती मिळावी असी अपेक्षा आहे. १६.८ टक्के उत्तरदात्यांनी आपणास कोणती माहिती हवी यांची नोंद केली नाही थोडक्यात १६.८ टक्के उत्तरदात्यांनी या प्रश्नाबदल उदासिनता दर्शवली असल्याचे निदर्शनास येते.

निष्कर्ष :— १) संकलित माहितीच्या निरीक्षणावरूण असे दिसुन येते की, ग्रामीण तरूण मुलांमध्ये हिंदी वाहिन्यांची लोकप्रियता अधिक असुन याविपरीत तरूणीमध्ये मराठी चॅनलअधिक लोकप्रिय आहेत. २) ग्रामीण तरूणांमध्ये धार्मिक कार्यक्रम व धार्मिक चॅनल्स पाहण्याचे प्रमाण कमी झाले आहे. ३) टीव्ही व मोबाईलफोनच्या वापरामुळे ग्रामीण तरूणांचा भजन, किर्तन वा धार्मीक कार्यक्रमातील सहभाग कमी झाला आहे. ४) उत्तरदात्यांचा दररोज २.१२ तास वेळ टीव्ही पाहण्यासाठी तर १.४५ तास वेळ फेसबुक वाटसअॅप वापरासाठी खर्च होतो. थोडक्यात ग्रामीण तरूणांचा दिवसातील सरासरी चार तास वेळ टीव्ही व मोबाईलच्या वापरावर खर्च होतो. ५) ७५ टक्के उत्तरदात्यांच्यामते टीव्ही कार्यक्रम त्यांना रोजगार विषयक व नविन कौशल्य शिकण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात अपयशी ठरले आहे. त्यांच्या मते त्यांना नवीन रोजगार वा व्यवसाय सुरूकरण्यासाठी टीव्ही कार्यक्रमासोबतच अन्य मार्गदर्शनाची गरज आहे. ६) ८७.५० टक्के उत्तरदात्याच्यामते मोबाईलफोनच्या वापरामुळे तरूणांमध्ये टीव्ही पाहण्याच्या प्रमाणात घट झाली आहे. ६६.०७ टक्के उत्तरदात्याच्या मते

मोबाईलफोनमुळे फेसबुक व वॉटसॲपचा वापर वाढला आहे. ५० टक्के उत्तरदात्यांच्या मते मोबाईलमुळे तरूणांमध्ये व्हिडीओ डाउनलोडचे प्रमाण वाढले आहे. तसेच उत्तरदात्यांचा मोबाईलवर होणारा सरासरी मासीक खर्च १६० रू एवढा आहे. ७) ८८.३३ टक्के उत्तरदात्यांच्या मते टीव्ही मुळे ग्रामीण तरूणांमध्ये अधुनिकता, सौंदर्य आणि लैगिंकता इत्यादी बाबतचे आकर्षण वाढले आहे. परिणामी ग्रामीण तरूणांचे व्यक्तीमत्व अधिक बोल्ड होत आहे. ८) १२० पैकी फक्त २४.१६ टक्के उत्तरदाते ज्ञान कौशल्य व स्वयंरोगारविषयक कार्यक्रम पाहतात. तर ७५.८३ टक्के उत्तरदात्यांचा कल मनोरंजनपर कार्यक्रमाकडे असल्याचे दिसुन येते. ९) १२० पैकी केवळ ११ (९.१६) उत्तरदाते. डिडी नॅशनल चॅनल्स तर केवळ ६ उत्तरदाते नॅशनल जिओग्राफी व डिस्कव्हरी चॅनल्स पाहतात. १०) ७१.६६ टक्के उत्तरदात्यांच्यामते टीव्ही मुळे ग्रामीण तरूणांची वेशभुषा व केशभुषात बदल झाला आहे. ६४.१६ टक्के तरूणांच्यामते टीव्ही मुळे ग्रामीण भागात मोबाईलफोनच्या मागणीत वाढ झाली आहे. तर ६७.५ टक्के च्यामते टीव्हीमुळे मनोरंजनाची सोय झाली. ६५.४ टक्के म्हणतात टीव्ही मुळे सौंदर्यप्रसाधनांच्या उपभोगात वाढ झाली आहे. ४९.१६ टक्के उत्तरदात्यांच्या मते टीव्ही मुळे ग्रामीण तरूणांमध्ये चित्रपटातील नट व नटयाप्रमाणे फॅशनचे अनुकरण करण्यात वाढ झाली आहे. तर ४३.३३ टक्के उत्तरदाते म्हणतात टीव्ही मुळे ग्रामीण तरूणांमध्ये चित्रपट व क्रिकेट खेळाचे आकर्षण वाढले आहे. २३.३३ टक्के उत्तरदाते म्हणतात टीव्ही व मोबाईलमुळे तरूणांमध्ये ऑनलाईन खरेदीस चालना मिळाली आहे.

अभ्यासाच्या मर्यादा :— १) सदरील अभ्यास हा टीव्ही पाहणाऱ्या १५ ते २५ वयोगटातील साक्षर तरूणांकडुण सर्वे प्रश्नावलीच्या साह्याने संकलीत केलेल्या तथ्य सामुग्रीवर आधारित आहे. २) टीव्ही, रेडीओ व मोबाईल फोनचा ग्रामीण तरूणांच्या ज्ञान, कौशल्य, दृष्टीकोन (विचार करण्याची पध्दत) यावर होणाऱ्या परीणामापुरताच मर्यादित आहे.

समारोप :— टीव्ही आणि मोबाईल फोनचा ग्रामीण तरूणांच्या वर्तनावर होणाऱ्या परिणामांचा विचार केला असता असे दिसुन येते की, ६२.५० तरूण म्हणतात नवनविन घटकाबदल माहिती प्राप्त करणे हा टीव्ही पाहण्याचा प्रमुख उद्देश्य आहे. परंतु त्यांचे टीव्ही व रेडीओवरील आवडते कार्यक्रम आणि टीव्ही कडुन त्यांना हवी असणारी विषयावर माहिती यावर दृष्टीक्षेप टाकला तर त्यांच्या बोलण्यात विरोधाभास असल्याचे दिसुन येते. कारण ते एकीकडे माहिती मिळवणे हा प्रमुख उद्देश्य नमुद करतात तर दुसरीकडे टीव्हीवर मनोरंजनपर कार्यक्रम अधिक असावेत अशी अपेक्षा बागळतात. तसेच तरूणांच्या आवडत्या रेडीओ कार्यक्रम व आवडते टीव्ही चॅनल्स यावर प्रकाश टाकला तर असे दिसुन येते की, ते फक्त मनोरंजनपर कार्यक्रम ऐकण्यास व पाहण्यास अधिक प्राधान्य देतात याउलट तरूणांचे टीव्ही वरील आवडते ज्ञान व कौशल्याधारीत कार्यक्रम व ते कार्यक्रम पाहणाऱ्यांची संख्या यावरून असे सुचित होते की असे कार्यक्रम पाहणाऱ्या तरूणांचे प्रमाण अत्यल्प आहे. १२० पैकी केवळ ११ तरूण हे कार्यक्रम पाहतात. तर दुसरिकडे ९०.८३ टक्के तरूण त्याकडे दुर्लक्ष करतात असे निर्दशनास येते. जोपर्यंत ग्रामीण तरूण नविन ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करणार नाहीत तोपर्यंत त्यांचा टीव्ही कार्यक्रम, स्वत:ची ध्येय निश्चिती स्वंयशिस्त इत्यादीबदल विचार करण्याच्या दृष्टीकोणात बदल होणार नाही. कारण ज्ञान आणि कौशल्य आत्मसात केल्यामुळेच व्यक्तीचा दृष्टीकोण व्यापक व प्रगल्भ होतो. म्हणून ग्रामीण तरूणांनी माध्यमांचा उपयोग जर कृषी व कृषीव्यवसायाशी निगडीत नविन ज्ञान, नवीन कौशल्याधारीत व्यवसायाबदलचे ज्ञान, स्वयंरोजगार विषयक माहिती प्राप्त करण्यासाठी केला तर त्यांना आपल्या उत्पादनात भर घालणे, बेरोजगारीवर मात करणे व चांगल्यापध्दतीने जीवन जगणे शक्य होईल. पण वरील निष्कर्षाचा विचार करता टीव्ही, रेडीओ, मोबाईल फोनमुळे तरूणामध्ये आधुनिकता (पाश्चात्यमूल्य) सौंदर्य आणि लैगिंकता इत्यादीचे आकर्षण मोठयाप्रमाण वाढले आहे. आजचा तरूण पाश्चात्य संगीत, मद्यपान, वेशभुषा, केसभुषा, इ. बाबीचे अनुकरण टीव्हीवर दिसणाऱ्या पात्रांवरून करीत आहेत. तर दुसरीकडे व्यवसाय मार्गदर्शन, कौशल्याधारीत कार्यक्रम पर्यावरण जागरूकता, व्यक्तीमत्व विकास व स्वयरोजगार विषयक कार्यक्रम पाहण्याकडे दुर्लक्ष करत आहे. टीव्ही व मोबाईलमुळे तरूणांमध्ये सौंदर्यप्रसाधनाची मागणी वाढली आहे. तसेच व्हिडीओ डाउनलोड करणे, इतरांनी पाठवलेला संदेश कसलाही विचार न करता दुसऱ्यांना पाठविणे, ऑनलाईन खरेदी, चित्रपटातील नट नटयाचे अनुकरणाबरोबरच चित्रपट संगीत व क्रिकेट खेळाची प्रचंड आकर्षण वाढले आहे. 'टीव्हीमुळे भारतीय युवकांमध्ये नविन संस्कृती उदयास येत आहे. जी त्याची बदलती वेशभुषा, केशभुषा, भाषा, सवयी, आणि जिवनशैली इ. स्पष्ट होते.'[८] म्हणुन ग्रामीण भारतीय तरूणांमध्ये माध्यम साक्षरता रूजवणे गरजेचे आहे. माध्यम साक्षरता म्हणजे माध्यमे कशी कार्य करीत आहेत, संदेशाचा अर्थ काय, माध्यम संघटकाचा संदेश पाठवण्यामागचा निखळ उद्देश्य कोणता आणि

त्यातुन आपण कशाची आणि का निवड करावयाची इत्यादी बद्लचे शहाणपण वा सदसदविवेक बुध्दी चा वापर करण्यास शिकवणे होय. त्यात विवेकपुर्ण आणि परीणामकारक माध्यमांचा वापर कसा करावयाचा हे शिकवणे, माध्यम संदेशाचे चिकित्सक परीक्षण करणे, माध्यमातुन प्राप्त होणाऱ्या माहितीची विश्वसनियता इतर स्त्रोताच्या सहाय्याने तपासणे, माध्यमांचे श्रध्दा, दृष्टीकोन व वर्तनावर होणारे परीणाम ओळखणे आणि माध्यमविश्व आणि वास्तव परिस्थिती यातील फरक ओळखणे इत्यादीचा समावेश होतो. थोडक्यात ग्रामीण तरूणांमध्ये माध्यम साक्षरता रूजवल्या शिवाय त्यांना माध्यांमाचा वापर कसा करावयाचा हे समजणार नाही. तरूणांनी माध्यंमाचा उपयोग जर विधायक कार्यासाठी केला तर ग्रामीण तरूणांच्या ज्ञान, कौशल्य व दृष्टीकोनात बदल होईल आणि ग्रामीण विकासाला चालना मिळेल. बांडुराच्या सिध्दांताचा आधार घेतला असता असे दिसुन येते की, ग्रामीण तरूण टिव्ही कडुन उपभोगाबदलची माहिती अधिक उपयोगात आणतो. तर उत्पादन कौशल्य शिकण्याकडे दुर्लक्ष करताना दिसुन येतो. आजचा ग्रामीण तरूण दिवसभरातील चार तास वेळ केवळ मनोरंजनासाठी खर्च करीत आहे. जे स्वविकास व ग्रामीण परीवर्तनास मारक आहे. तरूणांनी माध्यमाचा वापर ज्ञान व कौशल्य शिकण्यासाठी केल्यास बेरोजगारी व स्थलांतरास आळा बसेल आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळेल. यातच तरूण व देशाचे कल्याण आहे.

Referances :-

1. India(2017) A Referance Annual,Publications division minsitory of Information and Broadcastiong Government of India PP25
2. Dr.Jaspal Singh,Namrata Sandhu(2011) impact of television commercials on the social and moral behaviour of Indian viewers-emperical evidance,International journal of humanities and social science vol.1.no.7.june.2011PP 178-187
3. Albert Bandura(1977) social Learning theroy prentice hall,Englewood cliffs,New Jersey pp22
4. Jong G.Kang, Suraj Kapoor and arnold S. Wolf,(1995) the Howard journal of Comminacations, Vol.6,No.3(November 1995) pp 188-205
5. Archita Varma (2000) Impact of Watching International Television Programs on Adolescent in India: A Research Note, Journal of Comparative family studies.Vol.31 no.1.pp 117-126
6. P.Vijayalakshmi (2005) Foregin Television and Indian youth Changing Attitude, concept publishing companey new Delhi,
7. Anjali Pahad, Anju Jain(2009) Media and Youth Serial Publication New Delhi
8. M.N. Srinivas (1993) Changing Values in India Today, Economic and Political Weekly Vol.28,No.19,May8,1993 pp936

महिला सबलीकरण

प्रा. हर्षला दौलत सुर्यवंशी, कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे महाविद्यालय, सिडको, नाशिक मो.८७६६९९७४८१

स्त्री शिक्षण, स्त्रीने अर्थार्जनासाठी घराबाहेर पडणे यास हे युग आता सरावले आहे. ''प्रसिध्द फ्रेंच समाजवादी शास्त्रज्ञ चार्ल्स फेरीअर याने म्हटले आहे की, ''एखाद्या राष्ट्राकडून स्त्रिला दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्वावरून त्या राष्ट्रांची सांस्कृतिक उंची मोजता येते. आपल्या घटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यानुसार सर्व नागरिकांना समान लेखले आहे. अर्थात ही तत्व सहजा सहजी प्रत्यक्षात येतांना दिसत नाही. मात्र सावकाश का होईना त्या दिशेने जाण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. अशा स्थितीत समाजातल्या सुस्थिर वर्गाला सुरक्षितता समाधान कारक आहे असे ही म्हणता येणार नाही.

साहजिकच दुर्बल घटकांच्या बाबतीत ही सुरक्षितता फारच दूर आहे. दलित, आदिवासी स्त्रियां, मुले यांच्या संदर्भात अनेक समस्या निर्माण होतात. खेड्यांमधील राजवाडे अजूनही गावा बाहेर आहे. आदिवासींचे विस्थापन थांबलेले नाही, बाल कामगारांचा प्रश्न भेडसावत आहे व अनेक कल्याणकारी कायदे होऊन सुध्दा स्त्रीयांची अगतिकता संपलेली नाही. भारतात स्त्रीया घरात, घराबाहेर दुय्यम नागरिक म्हणूनच वावरत आहे. असे असले तरी आज सगळीकडे महिला सबलीकरण हा शब्द किती तरी लोकप्रिय असल्याचे आढळून येते.

''सन १९७५ मध्ये युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषीत केले व त्याच वर्षी बिजींग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत, कुटूंब संस्था वाचवायची असेल तर कुटूंबात लोकशाही आणा'' ही घोषणा केली गेली. त्यामुळे कुटूंबाची निगा राखण्यात महत्वाचे योगदान देणारे स्त्रियाची स्थिती सुधारण्यासाठी विविध बाजूंनी विचार सुरू झाला. त्यातूनच महिला सबलीकरण ही संकल्पना उदयाला आली. आज कोणताही पक्ष (स्थानिक किंवा केंद्रीय पातळीवरचा) असेल तरी त्या पक्षात महिला आघाडी असते. ही महिला आघाडी जेवढी भक्कम असेल तेवढा तो पक्ष बळकट मानला जातो.

वरवर पाहता महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीयांना आत्मनिर्भर बनवणे असा आहे मात्र हा अर्थ पुरेसा नाही, कारण महिला आर्थीकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या तरी त्या आत्मनिर्भर होतातच असे नाही. मिळवत्या स्त्रीयांमध्ये देखील अनेक प्रकारच्या समस्यांना व अगतिकतेला सामोरे जावे लागते. म्हणूनच महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ महिलांचे संरक्षण नव्हे तर एक स्त्री म्हणून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचार रोखण्यासाठी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याबरोबरच त्यांना सर्व स्तरातील सत्तेमध्ये सहभाग मिळाला पाहिजे हे अर्थातच सोपे काम नाही. मात्र भारतात या संदर्भात थोडे आशादायक चित्र निर्माण झाले. विशेषत: ग्रामीण भागातील गरीब कुटूंबातील स्त्रीयांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावण्यात 'बचत गट चळवळ' महत्वाची ठरत आहे. 'बचत गटालाच' स्वयंसहाय्यता गट (Self Help Group) असेही म्हटले जाते. १० स्त्रियांनी एकत्र येवून दर महिन्याला ठराविक रक्कमेची बचत करून भांडवल उभे करणे व या भांडवलाचा उपयोग स्वत:ची स्थिती सुधारण्यासाठी करणे हा हेतु होता आज भारतातल्या प्रत्येक शहरात प्रत्येक गावात असंख्य बचत गट तयार झालेले आहे. सुक्ष्म बचतीची एक मोठी चळवळ त्यातून उभी राहिली आहे.

''महात्मा गांधींनी असे म्हटले होते की, एका व्यक्तीकडून अधिक मदत घेण्याऐवजी अनेक व्यक्तींकडून थोडया थोड्या प्रमाणात मदत घेतली तर ती जास्त उपयुक्त ठरते.'' आणि बचत गट चळवळीत हेच तत्व मुख्य आहे.

बचत गट चळवळीचे मूळ बांगला देशात आहे. बांगला देशात डॉ महमंद युनुस यांनी 'जोबारा' खेड्यात ग्रामिण बॅक उभी केली ह्या बॅकेचे ग्राहक (खाते धारक) हे रस्त्यावरचे भिकारी, हमाल, किरकोळ विक्रेते, घर काम करणाऱ्या मोलकरणी, इत्यादी दुर्बल व्यक्ती होत्या, त्यामुळे या बॅकेस भिकाऱ्यांची बॅक म्हटले जात असे. या बॅकेत पाच ते दहा रूपयांपासून कर्ज मिळते व विशेष म्हणजे हे कर्ज घेण्यासाठी कोणतीही अट नसते. काहीही तारण द्यावे लागत नाही. त्यामुळे ही बॅक अल्पावधीतच लोकप्रिय झाली. डॉ. महंमद युनूस यांनी दुर्बल स्तरातील महिलांना कर्ज तर दिलेच पण स्त्रीयांना संघटीत करून त्यांचे बचत गट उभे केले. त्यांना आर्थीक व्यवहाराची ओळख करून दिली. छोटे –छोटे व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त केले. त्यातून या स्त्रीयांची गरिबी पुर्णपणे हटली नसली तरी त्यांच्यात आत्मविश्वास मात्र भरपूर प्रमाणात निर्माण केला व ही चळवळ अधिक जोमाने हळूहळू बांगला देशात पसरली तसेच पुढे श्रीलंका, आफ्रिका, अमेरिका व भारतात देखील या चळवळीला मोठे यश मिळाले.

आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, केरळ येथील बचत गट चळवळीचा नामोल्लेख सतत केला

जात आहे. आज नाशिक शहरात महापालिकेच्या सहा प्रभागांमध्ये १० हजारांपेक्षा अधिक बचत गट कार्यरत आहे. विशेष म्हणजे या बचत गटांपासून प्रेरणा घेवून मध्यम व सधन स्तरातील स्त्रियांनी सुध्दा बचत गट निर्माण केले आहे व स्त्रीयांमधील उद्योजकतेला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले आहे.

'निलम शर्मा', 'अश्विनी बोरस्ते' ही काही नावे बचत गट चळवळीत अत्यंत आदराने घेतली जातात कारण यांच्या बचत गटाची उत्पादने सातासमुद्रापलीकडे पोहोचली आहेत.

स्त्री—पुरूष समानता येईल तेव्हा येईल, पण स्त्री एक व्यक्ती आहे. तिच्यात कल्पकता, उद्योजकता, निर्णय क्षमता, पुरेपुर ठासून भरलेली आहे. हे बचत गट चळवळीने नक्कीच दर्शविले आहे. प्रसिध्द लेखिका 'अमृता प्रितम' यांनी असे म्हटले होते की, स्त्री म्हणजे भिजलेली कणिक, घरात ठेवली तर उंदीर कुरडतात व बाहेर पडली तर कावळे झडप घालतात, मात्र स्त्री जर आर्थिक, राजकीय, सामाजिक दृष्ट्या सक्षम झाली तर उंदीर बीळात दडतात आणि कावळे उडून जातात.

सारांश :— उच्चशिक्षणामुळे स्त्रीयांच्या कार्यक्षेत्रात व्यापकता प्राप्त झाली आहे. पुर्वी स्त्रीयांना घरकाम व बाहेरील काम पुरूषांना अशी अलिखित व्यवस्था होती. मात्र उच्च शिक्षणांमुळे स्त्रियांनी आपले सामर्थ्य सिध्द केल्याने त्यांच्यावरील विशिष्ट क्षेत्राच्या मर्यादा आपोआपच शिथील होत गेल्या, अभिव्यक्तीच्या, कर्तृत्वाच्या नवीन असंख्य वाटा त्यांच्यासाठी खुल्या झाल्याने स्त्रियांचे कार्यक्षेत्राचे अवकाश कितीतरी व्यापक झाले. केवळ शिक्षण, नर्सिंग, कारकुनी एवढेच नव्हे तर अपारंपारिक क्षेत्रात ही क्रियाशिल सदस्य म्हणून स्त्रीयांचा प्रवेश सुलभ झाला आहे.

संदर्भ सूची

१. *मृणालिनी शहा, २००७, स्त्रीचा आत्मशोध, स्नेहवर्धन पब्लीशिंग हाउस.*
२. *भागवत विद्युत, २००८, स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे.*
३. *प्रा. सौ. माधवी कवी, १९९९, महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर.*
४. *आगलावे प्रदिप, २००७, सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.*

लिंगभाव विषमता : माता, बाल कुपोषण

भगवान सुरेश मनाळ, श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद. मो. ९७३०४२४५७९

प्रास्ताविक : भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ५० टक्के लोकसंख्या ही स्त्रियांची आहे, परंतु तरीही भारतीय समाजव्यवस्थेत आजही स्त्री उपेक्षित आहे, हे एक कटु वास्तव आहे, म्हणूनच भारतीय स्त्री दुर्लक्षित आहे. पर्यायाने त्यांच्या समस्यादेखील या दुर्लक्षितच आहे. शहरी व ग्रामीण क्षेत्र असा विचार केल्यास शहरातील सुशिक्षित स्त्रियां आपल्या समस्यांप्रती बऱ्याच प्रमाणात जागरूक झाल्या आहेत. परंतु ग्रामीण क्षेत्रांतील स्त्रियांची परिस्थिती याउलट आहे. अनेकदा खेड्यात अनेक साधने व सोयी सुविधा उपलब्ध असूनही केवळ कुटुंब आणि समाजाचा स्त्रियांकडे बघण्याचा दुय्यम दृष्टिकोन व त्यामुळे स्त्रियांचे दुय्यम स्थान यामुळे स्त्रियांच्या आरोग्यविषयक व अन्य समस्यांमध्ये वाढ होत आहे. ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्य आणि आहार याबाबत स्वत: स्त्रियांचा आणि कुटुंबियांचा दुर्लक्षितपणा यामुळे स्त्रियांचे आरोग्य धोक्यात येते. परिणामी कुपोषणाची सुरूवात ही या स्त्रियांमध्ये दिसून येते. ग्रामीण भागातील गरीब आणि सामान्य कुटुंबातील स्त्रियांबरोबरच अनेक सधन अशा कुटुंबातील स्त्रियांचे कार्यक्षेत्र पाहता स्त्रियांना अतिकामाचा व्याप, घरकाम, शेती व व्यवसायाची कामे, मजुरी, बालकांचे संगोपन, कुटुंबियांच्या विविध गरजांची पूर्तता या सर्व गोष्टी पार पाडताना स्वत:च्या आरोग्याकडे झालेले दुर्लक्ष तसेच कुटुंबातील अनेक रूढी, परंपरा आणि औपचारिकता पूर्ण करतांना स्त्रियांना स्वत:च्या आरोग्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे कुपोषणाला बळी पडावे लागते. समाजातील पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे आणि स्त्रियांच्या जन्मजात काम करण्याच्या पध्दती व नेमलेल्या कामामुळे स्त्रियांचे आरोग्य आणि कुपोषण यावर अजूनपर्यंत फारसा गांभीर्याने विचार केला जात नाही. त्यामुळे अजूनही हा प्रश्न समस्येच्या स्वरूपात समोर आलेला नाही, त्यामुळे स्त्रियांच्या आरोग्य समस्येतील पर्यायाने मातेचे कुपोषण हे बालकुपोषणासाठी कारणीभूत ठरते, या सर्व गोष्टींवर चर्चा, अभ्यास व संशोधन होणे गरजेचे आहे, त्यासाठी प्रस्तुत लेखाद्वारे समाजाचा कुटुंबाचा बघण्याचा दृष्टिकोन, लिंगभेद विषमता आणि मातेच्या आरोग्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे माता कुपोषण व माता कुपोषणाचा परिणाम बालकुपोषणावर होतो त्यामुळे ही समस्या प्रवाहात येणे गरजेचे आहे.

संशोधन पध्दती : प्रस्तुत संशोधन लेखातील समस्येबाबत सामाजिक वास्तविकतेचे निरीक्षण आणि प्रस्तुत समस्येचे विविध क्षेत्रांतून झालेल्या अध्ययनावर आधारित असून कुपोषित बालकांच्या विविध घटकांतील अध्ययनाशी संबंधित संशोधनाचा तसेच लिंगभेद विषमतेवर आधारित संशोधन, अभ्यास आणि विविध संदर्भ साहित्याचा वापर प्रस्तुत लेख लिखाणासाठी केलेला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेतील आधुनिक दृष्टिकोनाचा विचार करता सद्य:स्थितीत स्त्री—पुरुष समानतेचे महत्व आणि त्यावरील कार्याचे वास्तविक परिणाम हे सकारात्मक दिसून येत आहे. असे असले तरीही महिला आणि बाल अध्ययनाच्या आणि संशोधन क्षेत्रातील काही समस्यांचा शोध घेतला असता प्रत्यक्षपणे दिसून येते की, अजूनही महिला आरोग्य, बाल आरोग्य बऱ्याच अंशी दुर्लक्षित दिसून येते. याचा परिणाम यांच्या कुपोषणावर झालेला दिसून येतो. या वेगवेगळ्या आरोग्यविषयक समस्यांची उकल होणे गरजेचे आहे, खालील काही मुद्दे भारतीय समाजव्यवस्थेतील समाज सातत्य टिकवून ठेवणाऱ्या गर्भवती महिला, माता यांच्या स्थितीसंदर्भात महत्वाचे आहेत.

भारतातील गर्भवती महिलांची स्थिती : भारतात महिलांची गर्भावस्था सुरू होत असताना ४० टक्के भारतीय महिला कमी वजनाच्या असतात, असे अमेरिकेतील प्रिस्टन विद्यापीठातील वुड्रो विल्सन स्कुल ऑफ पब्लिक ॲण्ड इंटरनॅशनल अफेअर्सच्या संशोधकांनी केलेल्या अध्ययनात म्हटले आहे. त्यांच्या मते, 'भारतीय महिलांच्या तुलनेत अफ्रिकेच्या सहारा उपखंडातील लोक भारतातील लोकांपेक्षा गरीब आणि दारिद्री असून तेथील जन्मदर हा भारतापेक्षा जास्त आहे, असे असताना देखील तेथील केवळ १६.५ टक्के गर्भवती महिला या कमी वजनाच्या आढळतात. भारताची परिस्थिती ही आफ्रिकेतील या भागापेक्षा निश्चितच चांगली आहे. तरीही त्यांच्या अध्ययनानुसार भारत आणि आफ्रिका उपखंड या दोन्हीही भागातील सर्वसाधारण महिलांचे वजन गर्भावस्थेच्या ९ महिन्यांच्या काळात ७ किलोने वाढते, या अवस्थेत गर्भवतींचे वजन हे १४ किलोने वाढणे अपेक्षित असते, असे यातील संशोधकांचे आणि तज्ज्ञांचे मत आहे. यातील प्रमुख संशोधक डायना कॉफे यांनी २०१२ मध्ये तीन भारतीय खेड्यांतील महिला आणि नवजात मुलांच्या आरोग्याचा अभ्यास केला, त्यावेळी गर्भवती महिलांचे

वजन अपेक्षित दरानुसार वाढत नसल्याचे त्यांना आढळले.'[१]

वरील अभ्यास हा केवळ भारतीय महिलांच्या आरोग्य, गर्भवती मातांची इतर देशातील मातांच्या स्थितीशी तुलना करण्याकरिता घेतलेले उदाहरण आहे. यावर संशोधन करणाऱ्या संशोधकांच्या मते, इतर देशातील महिलांचे व मातांचे आरोग्य, गर्भवतीचे आरोग्य यावर देखरेख ठेवणाऱ्या विशिष्ट अशा यंत्रणा आहे, भारतात यासाठीच्या यंत्रणा असल्या तरी राष्ट्रीय पातळीवर विशिष्ट यंत्रणा या प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याचे चित्र एकूणच महिलांच्या आरोग्यविषयक स्थितीवरुन दिसून येते.

भारतातील मातांच्या आरोग्य आणि पोषण याबाबतची ही स्थिती म्हणजे एकूणच स्त्रियांच्या आरोग्यासाठी ही धोक्याची घंटा आहे. मुलांच्या आरोग्याचे उपाय व आरोग्य व्यवस्थापन हे मातांच्या आरोग्य व्यवस्थापनावर आधारित असते. त्यामुळे बालकांचे आरोग्य व्यवस्थापन हे मातेच्या गर्भावस्थेपासूनच झाले पाहिजेत, मातेच्या शरीराचे वस्तुमान व गर्भावस्थेत वाढणारे वजन हे मातेच्या आरोग्याचे निदर्शक आहेत. माताच जर कुपोषित असेल तर मुलेही कुपोषितच होऊ शकतात, त्यामुळे येथे संशोधकांच्या संशोधनावरुन आढळून येते की, भारतातील महिलांची स्थिती आफ्रिकेतील महिलांपेक्षाही वाईट आहे. यासाठी वेगवेगळ्या परिस्थितीचे विवेचन करताना दिसून येते की, भारतातील नवविवाहित महिलांचे स्थान हे कुटुंबात सर्वात खालचे असते. कुटुंबातील इतर ज्येष्ठ महिलांच्या तुलनेत या महिलांचा दर्जा दुय्यम स्वरूपाचा असतो. तसेच नवीन लग्न झाल्यामुळे घरातील सर्व अपरिचित, अनोळखी वातावरण यामुळे घरातील नवविवाहित महिलांची वागणूक ही जरा दबक्या स्वरूपाचीच असते. इतरांसमोर कसे खावे, कसे प्यावे, लाजरी वृत्ती, या सर्वांचा परिणाम तिच्या जेवणावर होतो. परिणामी आरोग्य ढासळते. विशेष बाब म्हणजे भारतातील बहुसंख्य नवविवाहित महिला लग्नानंतर पहिल्याच वर्षी गर्भवती राहतात आणि याच काळात वरील परिस्थितीला सामोरे जाताना या महिलांचे पूर्ण पोषण होण्यासाठी कौटुंबिक पातळीवरील दुय्यम दर्जा, नवीन वातावरण यामुळे या महिलांना आरोग्याप्रती अडसर निर्माण होतो.

स्त्रियांची गर्भावस्था ही एक नैसर्गिक अवस्था आहे, भारतात या अवस्थेला महत्वही दिले जाते. सर्वसाधारणपणे, महिलांच्या गर्भावस्थेच्या काळात आणि प्रसुतीनंतरच्या अवस्थेतील काळातच महिलांच्या आरोग्य व आहार याकडे गांभीर्याने पाहिले जाते. परंतु त्यापूर्वी आणि त्यानंतरच्या अवस्थेत या बाबींकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, तेथेच लिंगभेदाची चुणुक दिसून येते. ''मुळातच गर्भावस्था हा काळ मातेच्या आयुष्यातील शारीरिक व मानसिक तणावाचा काळ असतो, म्हणून तिला स्वत:साठी व जन्मणाऱ्या बालकांसाठी कायमस्वरूपी संतुलित आहार घेणे गरजेचे असते. पूर्ण आराम व विश्रांती घेणे गरजेचे असते. असे असले तरी अनेक गर्भवती व नुकत्याच बाळंत झालेल्या अनेक माता या आपल्या दैनंदिन कामकाजापासून मुक्त होऊन विश्रांती करतील अशी स्थिती क्वचितच दिसते. यासाठी या महिलांची अथवा कुटुंबाची सामाजिक, आर्थिक परिस्थिती यासोबतच कौटुंबिक दृष्टिकोनही जबाबदार आणि कारणीभूत ठरू शकतो आणि यांचा परिणाम हा त्या स्त्रीच्या आणि तुलनेने तिच्या बाळाच्या आरोग्य आणि आहारावर मात्र याचा नक्की परिणाम होतो.''[२]

माता कुपोषणाची समस्या : ''भारतात जन्मलेली ४३ टक्के मुले ही जन्मत:च अल्पवयीन (अंडरवेट) असतात. तसेच भारतात जन्मलेल्या ४८ टक्के मुलांची वाढ खुंटलेली असते. या कमकुवत, अल्पवजनी व गरीबीने पछाडलेल्या बालकांच्या आईची अवस्था अधिकच चिंतनीय आहे. देशातील ५६ टक्के विवाहित महिलांची रक्तातील हिमोग्लोबीन पातळी सर्वसाधारण पातळीपेक्षा कमी आहे. सोप्या भाषेत त्यांच्या घटकातील हिमोग्लोबीन या घटकाचे प्रमाण घसरल्याने रक्त सदोष आहे. भारतातील ४७ टक्के महिलांचा 'बॉडी मास इंडेक्स' (यास शरीराची सुदृढता म्हणता येईल) हा किमान जेवढा हवा तेवढा नाही, तो प्रमाण व आवश्यकतेपेक्षा कमी आहे. त्यामुळे येथे बालकांच्या मातेचे आरोग्य निरोगी व निकोप नसेल तर याचा परिणाम बाल आरोग्यावर होतो, बालकांचे आरोग्य ढासळते आणि पिढ्यानपिढ्या हे दृष्टचक्र चालूच राहतं. सहाजिकच बालकांची शारीरिक, मानसिक अवस्था दुर्बल होऊन त्यांचा बालकांच्या सर्वांगीण जीवनावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.''[३]

प्रसिध्द विचारवंत आणि ज्येष्ठ सामाजिक आणि राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांनी आपल्या एक अभ्यास लेखातून आपले विचार व्यक्त केले. त्यांच्या मते, भारतीय महिलांची दयनीय स्थिती जोपर्यंत संपुष्टात येत नाही, तोपर्यंत भारतीय बालक सुदृढ होणार नाही, त्यामुळे या कमकुवत मानवी पिढ्या घडवणारी ही दृष्ट व अमानवी अशी व्यवस्था जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत भारतीय महिला आणि बालके यांचे भवितव्य हे अंधारातच असल्याचे त्यांनी नमुद केले आहे.

''कोवळ्या वयात होणारे कुपोषण मुलांचा शारीरिक तथा मानसिक विकास खुंटवते, उदाहरणादाखल विकसनशील देशातील १४७० लाख पूर्वप्राथमिक शाळकरी मुलांना याचा फटका बसला आहे. 'भारतीय आरोग्य अहवाल २०१५' च्या आकडेवारीनुसार ६०००० गरोदर स्त्रिया एका वर्षात मरण पावतात, ज्याचे कारण रक्तातील लोहाची कमतरता, ॲनिमिया हे आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांमध्ये जाणवणारी फोलिक ॲसिडची कमतरता ही २,५०,००० अर्भकांमध्ये जन्मत:च दोष निर्माण करते, तर अयोडिनच्या कमतरतेमुळे निव्वळ ०—१५ बुध्यांक असलेली जवळपास १,८०,००० अर्भके असल्याचे आढळून आले. यावरून सिद्दीक ओसमानी आणि अमर्त्य सेन यांनी म्हटल्याप्रमाणे पोषण आणि आरोग्य सेवा या दृष्टीने स्त्रियांची हानी ही एकंदर समाजासाठी घातक ठरते, त्यामुळे बालकांतील अनारोग्य आणि कुपोषण वाढते मग ती संतती स्त्री असो वा पुरूष.''[४]

जागतिक आरोग्य संघटनेच्या सन २००० च्या अहवालानुसार, मातेच्या शरिरातील लोहाची कमतरता गर्भाशयात वाढणाऱ्या भ्रुणाची वाढ रोखते आणि आई आणि बाळाच्या शरिरात विकृती वाढण्याचा तसेच मृत्यूचा धोका प्रबळ करते. याचा परिणाम मातेच्या शरीरावर होतो. मातेची श्रम आणि इतर कामे करण्याची क्षमता मंदावते आणि सहाजिकच त्याचे पडसाद आर्थिक व सामाजिक क्षमतेवरही पडतात.

आरोग्य आणि पोषणविषयक बाबींचा माता आणि बालक या दोन पिढींमधील संबंधाचा अभ्यास : समाजातील एका घटकांतील समस्यांचा प्रभाव दुसऱ्या घटकांवर होणे म्हणजे संपूर्ण सामाजिक व्यवस्थेतील समस्येत वाढ होणे, म्हणजे हे एक प्रकारचे वैद्यकीय क्षेत्रातील आजारासंबंधीचा शब्द म्हणजे 'इन्फेक्शन' होणे असा होतो. माता व बालक यांच्यातील आरोग्य संबंधीच्या १९९२ सालच्या एका अभ्यासानुसार आईकडून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे निकोप वाढीतील त्रुटी कशा पुढे जातात हे स्पष्ट झाल्याने स्त्रियांचे आरोग्य आणि हित यांचे महत्व अधोरेखित झाले आणि कुपोषणग्रस्त स्थिती बदलण्याची गरज पुढे लक्षात येऊ लागली.

लिंगभेदविषयक विषमतेचा परिणाम पाहता कुपोषित मुलींच्या बाबतीत होणारा प्रकार असा की, या मुलींची वाढ नीट झाली नसल्याने त्यांच्या पौंगडावस्थेतही त्यांचे पोषण भरून निघत नाही, याचे गंभीर परिणाम मुलींच्या संपूर्ण आरोग्यावर होतात, मुख्यत्वे जेव्हा त्या अल्प वयात गरोदरपणाला सामोऱ्या जातात. अशा अल्पपोषित आणि वाढ खुंटलेल्या मुलींना किंवा मातांना, बालकांना जन्म देताना किंवा त्यानंतरच्या काळात अनेक गुंतागुंतीला सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे अशा माता नियोजित वेळेपूर्वी आणि कमी वजनांच्या बाळांना जन्म देतात. ''गरोदरपणातील कमी अंतर, वारंवार गर्भधारणा यासोबतच घरातील सर्वच प्रकारची कामे, बाहेरील व शेती व्यवसायातील कष्टांची कामे, अपुरा आणि निकृष्ट आहार, अपुरी आरोग्याची निगा आणि सुविधांचा अभाव, भेदाभेद या सर्वांमुळे स्त्रियांच्या पोषणावर दुष्परिणाम संभवतात, ज्याचे परिणाम मातेच्या आणि परिणामी मुलांच्याही आरोग्यावर व पोषणावर होतात.''[५]

लिंगभेद विषमता आणि स्त्रियांमधील कुपोषणाची कारणे : कुपोषणाच्या मुद्यावर विचार करताना नवजात बालकांच्या कुपोषणापासून ते महिलांच्या कुपोषणापर्यंतचा टप्पा पाहता, स्त्री—कुपोषणाचा विचार जास्त महत्त्वाचा वाटत नसल्याचे समोरे येते. समाजातील विविध समजुती, रूढी, परंपरा, संस्कार, कुटुंबातील स्त्रियांचे स्थान, आर्थिक, परिस्थिती स्त्रियांबद्दलची जागृती व दृष्टिकोन यावर स्त्रियांच्या कुपोषणाचे प्रमाण अवलंबून असते. अनेक कुटुंबात कुपोषणाचे प्रमाण कमी—अधिक प्रमाणात आढळून येते. त्यात ग्रामीण आणि आदिवासी समुदायातील स्त्रियांमधील कुपोषणाचे प्रमाण तुलनेने अधिक आढळते. यासाठी अनेकदा काही प्रमाणात स्त्री स्वत: देखील जबाबदार असल्याचे दाखले बहुसंख्य घरांमधून बघायला मिळतात. स्त्री कुपोषणासाठी अनेक कारणे जरी असली तरी काही महत्वाच्या कारणांचा उल्लेख येथे करण्यात आला आहे.

१. स्त्रियांकडे बघण्याचा उपेक्षित दृष्टिकोन : ''समाजातील अनेक उच्चभ्रू आणि नावाजलेल्या कुटुंबातील सदस्यांकडून स्त्रियांच्या बाबतीत उपेक्षित अशी वागणूक मिळते. स्त्रियांना समतोल व सकस आहार यासोबतच विश्रांती मिळणे गरजेचे आहे असा विचार सर्वच स्तरांतून होत नाही, स्त्रीने पुरुषांनंतर जेवायचे, आहे त्या जेवणातच भागवायचे ही सामाजिकता कुपोषणाचे मुळ कारण ठरते.''[६]

२. गरिबी : ग्रामीण भागातील कुटुंबाचा कुटुंबाच्या दैनंदिन आहारातील पोषक तत्व आणि संतुलित आहारासाठी कराव्या लागणाऱ्या एकूण खर्च आणि तरतूद याबाबत आढळते की, यावरील खर्च अत्यंत कमी स्वरूपात असल्याचे दिसते. यासाठी त्या कुटुंबाची आर्थिक स्थिती आणि मानसिकताच जबाबदार आहे असे म्हणता येईल. बहुसंख्य कुटुंबात गरिबीमुळे कुपोषणाचे प्रमाण स्त्रियांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येते. आधी पुरुष मंडळी, मुले, घरातील ज्येष्ठ व्यक्ती, शेवटी उरलेले स्त्रीने खायचे ही प्रवृत्ती आपल्या भारतीय ग्रामीण संस्कृतीत आहे. परंतु गरिबीमुळे तिच्या

वाट्याला येणारे अन्न फारच थोडे व निकृष्ट असते त्यामुळे ती कुपोषित होते.

३. स्त्रियांची आर्थिक परिस्थिती : ''समाजातील एकूण स्त्रियांपैकी, सर्वाधिक स्त्रिया या कोणत्याही मोबदला व आर्थिक मिळकतीशिवाय स्वत:च्या कुटुंब आणि कुटुंबियांच्या शेती व व्यवसायाच्या कामात विनामोबदला राबत असते. अनेक ठिकाणी स्त्रियांना केवळ गृहित धरले जाते, अशावेळी अनेक स्त्रियांचे त्यांचे कुटुंबातील स्थान दुय्यम असते. त्या तुलनेत कमावत्या स्त्रिया अधिक आत्मविश्वासाने वावरतात. पैसा हातात असल्याने नोकरी व काम करणाऱ्या स्त्रिया स्वेच्छेने आपल्या गरजा स्वत: भागवु शकतात. कुटुंबातील समान दर्जामुळे त्यांचे आरोग्य, आहार याबाबत समान स्थान आहे. त्या तुलनेत ग्रामीण गरीब स्त्रियांच्या आर्थिक दुर्बलता व दुय्यम दर्जामुळे स्त्रिया अधिक कुपोषित असल्याचे दिसून येते.''[७]

४. रूढी, परंपरा आणि गैरसमजुती : अनेक कुटुंबात रूढी, परंपरांचा पगडा अजूनही आहे. स्त्रियांनी सणांना, उपवास व्रत वैकल्ये करावीत, काही व्रते अगदी अन्नपाण्यशिवाय करावीत, अशा प्रथा परंपरांचे पालन करताना स्त्रीने उपाशी राहिले पाहिजे ही प्रथा अजूनही आहे. त्यामुळे स्त्रीया आणि अल्पवयीन मुलींवरही या धार्मिक रूढी, परंपरांचा पगडा वाढत आहे, त्यामुळे त्यांच्या कुपोषणात भर पडते.

५. स्त्रियांचे आरोग्याकडे दुर्लक्ष : स्वत:च्या आरोग्याबाबत बहुसंख्य स्त्रिया अजूनही उदासीन असलेल्या दिसून येतात. कुटुंबाचे आरोग्य सुदृढ राखता राखता, मुलांचे पालन पोषण करता करता स्वत: मात्र कुपोषित होते. सकस व पुरेसा आहार याबाबत ती कुटुंबासाठी जेवढी जागरूक आहे तेवढी स्वत:साठी नाही हे तेवढेच सत्य आहे.

६. अतिव्यस्तता : आधुनिक स्त्री घरकाम, शेती व्यवसायातील काम, मुलांचे, पतीचे, कुटुंबियांचे सर्व कामे करताना, तसेच घरातील धुणी, भांडी, फरशी, स्वच्छता या सर्व गोष्टी करता करता नाष्टा, जेवण या बाबी तिच्यासाठी गौण ठरतात. साध्या चहावर भागवून कामे आटोपण्याच्या नादात स्त्री स्वत:चे आरोग्य धोक्याच टाकते.

वरील सर्व बाह्य कारणांचा स्त्री कुपोषणाशी संबंध असला तरी मुळातच ''सर्वसाधारण शारीरिक कष्टाची कामे करणाऱ्यांना सरासरी २४०० कॅलरिज, तर मानसिक कामे करणाऱ्यांना सरासरी २२०० कॅलरिज उर्जेची आवश्यकता असते असे आहार तज्ज्ञांद्वारे सुचविले गेले आहे. सामान्यत: स्त्रियांना कमीत कमी १९०० ते २२०० कॅलरिज उर्जा रोजच्या आहारातून मिळणे गरजेचे आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र स्त्रियांना केवळ ९०० ते १२०० एवढीच उर्जा रोजच्या आहारातून मिळते, अशा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे हे स्त्रियांच्या कुपोषणाचे एक ठळक कारण किंवा वैशिष्ट्ये म्हणता येईल.''[८] या सर्व बाबींचा प्रभाव स्त्रियांच्या आरोग्यावर, कार्य क्षमतेवर व जगण्याच्या आयुर्मर्यादेवर देखील पडतो.

समारोप : बालकांच्या कुपोषणासंदर्भात संशोधन असो की, महिलांच्या कुपोषणाशी संबंधित अभ्यास असो, या दोन्ही ठिकाणी महत्वाचा पहिला मुद्दा ठरतो तो म्हणजे स्त्री किंवा मातेचे पोषण आणि आरोग्य होय. येथे मातेच्या या स्थितीबाबत समाजातील स्त्री–पुरुष समानतेच्या घटकांचा संबंध हा सुध्दा तेवढाच महत्वाचा ठरतो. शहरी भागाच्या तुलनेत भारताची सर्वाधिक जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागात असल्याने भारतातील सर्वाधिक ग्रामीण मुली आणि महिलांच्या बाबतीत लिंगभेदाचे प्रमाण सर्वाधिक दिसून येते. अनेक बाबतीतून पुरुष आणि मुलांपेक्षा स्त्रिया आणि मुली या असमानतेच्या, लिंगभेदाच्या जोखंडातून अजूनही पूर्णपणे सुटलेल्या दिसत नाही, त्यांचे संभाव्य परिणाम आणि झालेले परिणाम अनेक आणि वेगवेगळे असले तरी, सर्वात भयंकर प्रभाव व परिणाम हा त्यांच्या आरोग्यावर होतो, शारीरिक दुर्बलतेत, मानसिक दुर्बलतेत, परिणामी कुपोषणात होतो, या बाबींवर संशोधक, शासन, स्वयंसेवी संस्था, कुटुंब आणि संपूर्ण समाजानेच गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. *कॉफे डायना (दि. ०४.०३.२०१५), दैनिक दिव्य मराठी, (वॉशिंग्टन वृत्तसंस्था), औरंगाबाद, पृ. १.*
२. *पाटील रेखा बालाजीराव (ऑक्टोबर २०१२), 'योजना', 'आरोग्य आणि आहार', प्रकाशन माहिती आणि प्रसारण मंत्रलया, केंद्र शासन, मुंबई, पृ. ३२.*
३. *गव्हाणे सुधीर (१९ मार्च २०१७). प्रवाह, दैनिक पुण्यनगरी, बालकांच्या आईची चिंतनीय स्थिती, औरंगाबाद, पृ. ३*
४. *कुलकर्णी पी. के. (ऑगस्ट २००८), 'आरोग्य आणि समाज', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ. ३३.*
५. *मीश्रा मीरा (फेब्रुवारी २०१६), 'योजना, 'आरोग्य', माहिती व प्रसारण मंत्रालय, केंद्र शासन, मुंबई, पृ. ३३.*
६. *महिला धोरण (२०१४), महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, पृ. २१.*
७. *मंगळूरकर मीना (२००६), भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ३४.*
८. *भसिन कमला (ऑक्टोबर २०१६), 'मुलगा म्हणजे? मुलगी म्हणजे?, प्रकाशक जोशी अलका, आर. एस. प्रिंटर्स, पुणे, पृ. ०१.*

लोकसंख्या विस्फोट: एक सामाजिक समस्या

डॉ. अशोक सालोटकर, गोविंदराव वारजूकर कला, वाणिज्य महाविद्यालय, नागभीड. मो.नं. ९४२३४१७७९५

प्रस्तावना :— लोकसंख्या विस्फोट ही जगातील अनेक विकसनशील देशांना भेडसावणारी सामाजिक समस्या आहे. नव्याने स्वतंत्र झालेले अनेक देश विकासाकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, परंतु झपाटयाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे त्यांचे फारसे प्रयत्न फलद्रूप होत नाहीत. प्राचीन काळातील लोकसंख्येविषयीचे अंदाज तज्ञांनी पुरातत्व शास्त्राच्या आधारे वर्तविले आहेत. तज्ञांच्या अंदाजानुसार पृथ्वीवर सुमारे पाच लक्ष वर्षापासुन मानवजात अस्तित्वात असावी. जगाच्या लोकसंख्येत इतक्या वर्षाच्या काळात खूप मोठया प्रमाणात चढउतार झालेले आढळतात. काही कालखंडात लोकसंख्येची घटही झालेली आहे. नव अश्वयुगापासुन ते इ. स. १६५० पर्यंत लोकसंख्या साधारणत: स्थिर होती असे म्हणता येईल. याच काळात लोकसंख्यावाढीच्या दरात अनेक वेळा चढउतार झालेले आहेत. शांततेच्या काळात व चांगल्या पीकपाण्यामुळे आलेल्या सुबत्तेच्या काळात लोकसंख्येत काही प्रमाणात वाढ होत असे. तर रोगराई, दुष्काळ, युध्दामुळे लोकसंख्येत घट होत असे.

इ.स. १६५० मध्ये संपुर्ण जगाची लोकसंख्या साधारणत: ५० कोटी होती. लोकसंख्येतील एवढी वाढ होण्यास लाखो वर्षे लागली. परंतु १६५० नंतर पुढे २०० वर्षातच जगाची लोकसंख्या दुप्पट म्हणजे १०० कोटी झाली. त्यानंतर अवघ्या १० वर्षात म्हणजेच इ. स. १९३० मध्ये जगाची लोकसंख्या १८५० च्या दुप्पट म्हणजे २०० कोटी झाली. १९३० ते १९६० या ३० वर्षाच्या काळात जगाच्या लोकसंख्येत आणखी १०० कोटीची भर पडुन ती ३०० कोटी पोहचली. १९६० ते १९७५ या १५ वर्षाच्या कालावधीत जगाच्या लोकसंख्येत भर पडुन ती १०० कोटीची भर पडुन ती ४०० कोटी झाली. १९७५ ते १९८७ या १२ वर्षाच्या कालावधीत जगाच्या लोकसंख्येत भर पडुन ती ५०० कोटी झाली. त्यानंतर १९८७ ते १९९९ या १२ वर्षात जगाच्या लोकसंख्येत आणखी १०० कोटीची वाढ होवून ती ६०० कोटी झाली. सयुक्त राष्ट्राच्या तज्ञांच्या अंदाजानुसार इ. स. २०२५ मध्ये जगाची लोकसंख्या ८५० कोटीचा उंच्चाक गाठेल. जगाच्या लोकसंख्येत एका वर्षात साधारणत: ९० दशलक्ष व्यक्तीची भर पडते. म्हणजेच दररोज जवळजवळ २,४६,५०० दर ताशी १०,२२४ व दर मिनिटाला १५४ व्यक्तीची भर पडते. जगाच्या ४०० कोटी लोकसंख्येपैकी एकटया आशिया खंडाची लोकसंख्या २३० कोटी होती. म्हणजेच जगाच्या लोकसंख्येपैकी ५७ टक्के लोकसंख्या या खंडात होती. १८ व्या शतकापासुन जगाच्या लोकसंख्येत झपाटयाने वाढ होवु लागली. परंतु १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत या वाढीचा वेग तितका तिव्र नव्हता. २० व्या शतकात सुरूवातीपासुनच जगाच्या आणि प्रामुख्याने आशिया खंडात लोकसंख्येची वाढ फारच तीव्र स्वरूपाची झाली.

युनायटेड नेशन्सने सन १९७४ हे वर्ष जागतिक लोकसंख्या वर्ष म्हणुन जाहीर केले होते. त्यानिमित्त बुखारेस्ट येथे जागतीक परिषद झाली. या चर्चेतुन एक मुद्दा ठळकपणे मांडला गेला. लोकसंख्या या घटकांचा विचार आर्थिक व सामाजिक विकासप्रक्रियेचा एक अंगभुत घटक म्हणुन झाला पाहीजे. या भुमिकेतुन जागतिक कृतियोजना आखण्यात आली. त्याला मुख्यत: मृत्यूदरात घट, आरोग्य सुविधा, शिक्षणात प्रगती, अन्न उत्पादनात वाढ, तसेच कुटंब नियोजनाचे ज्ञान व सेवा उपलब्ध करून देणे, या गोष्टीची शिफारस करण्यात आली. त्यांनंतर जागतिक आरोग्य संख्येने 'अल्माटा' येथे सप्टेंबर १९७८ मध्ये 'सर्वासांठी आरोग्य' या विषयावर जागतिक परिषद घडवुन आणली व त्यातही आरोग्य शिक्षणावर भर देण्यात आला. हेतु हा की, त्यामुळे लोकसेख्येची गुणवत्ता वाढेल. लोकसंख्येच्या सन १९७४ च्या परिषदेनंतर ऑगस्ट १९८४ ला ' मेक्सीको' शहरात दुसरी जागतिक लोकसंख्या परिषद झाली. त्यात मुख्यत: 'लोकसंख्या नियत्रणाचे व्यवस्थापन व कृती' प्रत्येक देशाने जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून ठरवावी, यावर भर देण्यात आला. जगातील सर्व देशात लोकसंख्या वाढ सारखीच झालेली नाही. दरडोई उत्पन्न, साक्षरता प्रमाण व शिक्षणाची पातळी, औद्योगीकरण नागरीकरण, इत्यादी सामाजिक व आर्थिक निर्देशांकानुसार जगातील राष्ट्राची विकसित व विकसनशिल अशा दोन गटात विभागणी केली जाते. अमेरिका, इंग्लंड, जपान, इस्त्रायल हे आर्थिक दृष्टया प्रगत भाग आहेत, तर आशिया व आफ्रिका खंडातील देश हे आर्थिक दृष्टया मागासलेले म्हणजेच विकसनशील भाग आहेत. औद्योगीकरणाच्या काळात विकसीत देशातील लोकसंख्या खुपच वाढली. १८५०—१९२० या काळात विकसीत देशांचा लोकसंख्यावाढीचा वेग विकसनशील देशांतील लोकसंख्यावाढीच्या वेगापेक्षा जास्त होता. १९३०

पासुन विकसीत देशांतील लोकसंख्यावाढीचा वेग कमी झाला तर विकसनशील देशातील लोकसंख्यावाढीचा वेग अधिकाधिक वाढु लागला. आज विकसीनशील देशात लोकसंख्येची भरमसाठ वाढ होत आहे. जागतिक लोकसंख्येच्या ७० टक्के लोकसंख्या विकसनसिल देशात असलेली दिसते. सध्या भारत, पाकिस्तान, बांगलादेश, इंडोनिशिया, अफगाणिस्तान व चीन या राष्ट्राची लोकसंख्या फार मोठी आहे. हे सर्व राष्ट्रे दक्षिण आशियात आहेत.

एक सामाजिक समस्या म्हणुन लोकसंख्येकडे १८ व्या शतकापासुन अभ्यासकांचे लक्ष वेधले. तसे पाहता प्राचीन काळापासुनच लोकसंख्येचे अध्ययन केले जात आहें प्लेटो, ॲरिस्टॉटेल यांनी सुध्दा लोकसंख्याविषयक विचार मांडलेला दिसुन येतो. कौटिल्य, अकबर यांच्या ग्रंथात लोकसंख्याविषयक विवेचन आढळते. 'अर्थशास्त्र' या ग्रंथात कौटिल्याने कृषी व आर्थिक समस्यांमध्ये वाढ होते, राजकीय व प्रशासकीय परिणाम होतात. लोकसंख्येच्या समस्येच्या विचार करतांना दोन बाबी लक्षात घ्याव्या लागतात. पहिली म्हणजे अतिरिक्त लोकसंख्या व दुसरी कमी अथवा ऋण लोकसंख्या.

अतिरिक्त लोकसंख्या म्हणजे देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती पेक्षा लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्याने ती संख्या अतिरिक्त लोकसंख्या ठरते. भारत, चीन या देशातील लोकसंख्या अतिरिक्त आहे. जन्मदर व मृत्यूदर यामध्ये अत्याधिक अंतर पडल्यामुळे जेव्हा देशातील लोकसंख्या अतिशय वेगाने वाढते. तेव्हा त्या स्थितीला 'लोकसंख्येचा विस्फोट किंवा 'अतिरिक्त लोकसंख्या' म्हणतात. म्हणुनच सन १९६२ च्या चिनी आक्रमणाचे वेळी तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की, 'चीनने भारतावर केलेले आक्रमण हा तर धोका खराच पण त्यापेक्षाही मोठा व भयानक धोका लोकसंख्येत होणाऱ्या भयानक वाढीमुळे संभवतो.' राष्ट्रसंत आपल्या ग्रामगितेतील तिसऱ्या अध्यायातील ५७ व्या ओळीत म्हणतात की,

''पुत्र शिकुनी मोठा झाला।
एक होता दुसराही झाला ।
तिसरा होताची संसार संपला पित्याचा ।।

समर्थ रामदास स्वामींनी अधिक मुले झाली तर काय दैनावस्था होते हे सांगीतले आहे.

एक हाती एक कटी।
एक पाठी एक पोटी।
संसारामध्ये झाली दाटी।
काय करावे सुचेना ।।
लेकुरे उदंड जाहली।
तो ते लक्ष्मी निघुन गेली।
पुढे भिकेस लागली।
अन्न खायला मिळेना।।''

भारताचे क्षेत्रफळ जगाच्या क्षेत्रफळाच्या २.४ टक्के आहे. लोकसंख्येच्या संदर्भात भारत दुसऱ्या क्रंमाकावर आहे. तर क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातव्या क्रंमाकावर आहे. लोकसंख्या तज्ञांच्या अंदाजानुसार देशाची लोकसंख्या अशीच वाढत राहिल्यास २०२५–२०३० मध्ये भारत चीनला मागे टाकुन लोकसंख्येत प्रथम क्रंमाकावर असेल. २०२५ मध्ये भारताची लोकसंख्या १३८ कोटी तर चीनची लोकसंख्या १२३ कोटी राहील. म्हणजेच चीनची लोकसंख्या दुप्पट होण्यास ६० वर्षाचा कालावधी लागेल तर चीनची लोकसंख्या १२३ कोटी राहील. म्हणजेच चीनची लोकसंख्या दुप्पट होण्यास ६० वर्षाचा कालावधी लागेल तर भारताची लोकसंख्या दुप्पट होण्यास फक्त ३४ वर्षाचा कालावधी लागेल. माल्थसने लोकसंख्याविषयी आपला सिध्दांत मांडला. त्यांनी असे म्हटले की, देशाची लोकसंख्या ही भुमिती श्रेणीत २,४,८, तर अन्यधान्याची वाढ ही कमी असेल तर ती ऋण लोकसंख्या ठरते. उदा. ऑस्ट्रेलिया, न्यझिलंड. विसाव्या शतकाला प्रारंभ होईपर्यंत कोणत्याही देशात लोकसंख्या ही समस्या नव्हती त्यानंतर मात्र लोकसंख्या वृध्दी ही अनेक देशांची समस्या बनली. १२ ऑक्टोंबर १९९९ हा दिवस संयुक्त राष्ट्र लोकसंख्या कोष यांनी ६०० कोटी लोकसंख्येच्या दिवसाच्या रूपात घोषीत केले. कारण त्या दिवशी जगाची लोकसंख्या वाढुन ६०० कोटी झाली. या वास्तविकतेचा आपण डोळसपणे विचार केला पाहिजे. जगाची लोकसंख्या जर अशाच वेगाने वाढत राहिली तर त्यातून असंख्य समस्या निर्माण होतील.

संदर्भ ग्रंथ सुची :

१. *पाटील, व्ही. जे., ढाके, एस. व्ही. (२००४), 'लोकसंख्या भूगोल' पुणे, प्रशांत पब्लिकेशन्स.*
२. *कऱ्हाडे, बी. एम. (२०१३), 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या भाग :२' नागपूर, पिंपळापुरे पब्लिशर्स.*
३. *कुलकर्णी, एस. एन., श्रीवास्तव सतीश, (१९९८) 'लोकसंख्या शास्त्र आणि लोकसंख्या शिक्षण' नागपूर,विद्या प्रकाशन.*
४. *बसंत, सूरजदेव (२००९), 'जनसंख्या भूगोल' नई दिल्ली, अर्जुन पब्लिशिंग हाऊस.*
५. *पाटील, रा. त्र्यं., चितानंद राजश्री, चौधरी नारायण, (२००३) 'लोकसंख्या शिक्षण' नाशिक, य. च. मु. विद्यापीठ.*
६. *शर्मा, प्रज्ञा (२०००) 'भारत मे सामाजिक समस्याएँ' जयपूर नाटाणी प्रकाशन नारायण, अविष्कार पब्लिशर्स डिस्ट्रीबुटर.*
७. *शर्मा, ऋचा (२०११), 'भारत मे सामाजिक समस्याएँ' जयपुर, सागर पब्लिशर्स*
८. *प्रसाद गोविन्द्र, सिंह नन्दकुमार, गीतांजली, (२००७), 'जनसंख्या अध्ययन के आयाम' दिल्ली, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस*
९. *वर्मा, ओ. पी. (२००४) 'भारतीय सामाजिक समस्याएँ' कानपूर, विकास प्रकाशन*
१०. *www.indiapopulation*
११. *www.worldpopulationstatistics*

जेष्ठांच्या समस्या व जेष्ठ नागरिक चळवळीची भूमीका

डॉ. रविंद्र विखार, श्री. गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय, कुरखेडा जि. गडचिरोली, मो. नं. ९४२०३०४२६१

प्रस्तावना :— जागतिकीकरणाच्या प्रवाहात वाहवत असतांना संपूर्ण जग सामाजिक समस्यांच्या विळख्यात सापडले आहे. समाजाचा प्रत्येक घटक आधुनिकीकरणाच्या वाटेत स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नात असतांना अनेक समस्यांना तोंड देत समोर जात आहे. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत वृध्दांचा वर्गही सुटलेला नाही. वृध्दावस्था ही एक नैसर्गिक व जैविक प्रक्रिया आहे. वृध्द हा समाजाचा एक घटक आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत वृध्दांकडे बघण्याचा दृष्टीकोणही बदललेला आहे. समजापुढे वृध्दांचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक कौटूंबिक परावलंबन, समायोजन इ. अनेक प्रश्न आहेत. बदलत्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत वयोवृध्दांना जीवन समायोजनात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. वृध्दापकाळात यापूर्वी नियमितपणे मिळणाऱ्या उत्पादनातील संभाव्य घट हा चिंतेचा विषय असतो. तसेच वयोवर्धनानुसार व्यक्तीकडे पाहण्याचा कुटूंबाचा व समाजाचा दृष्टीकोण बदलत जातो. त्यामुळे आर्थिक तसेच मानसिक पातळीवर काही प्रश्न निर्माण होतात. शारीरिक बदलांनी निर्माण होणाऱ्या प्रश्ना इतकेच हेही प्रश्न महत्वाचे असतात. त्यांच्या विषयी ज्ञानात्मक जाणीव प्रगल्भ नसल्याने कुटूंब संस्थेत प्रश्न निर्माण होत आहेत. जगात व भारतात वृध्दांची संख्या वाढत आहे आणि वृध्दांच्या वाढीचे प्रमाण सर्वसाधारण लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. वृध्दांच्या वाढत्या संख्येमुळे या शतकात अनेक समस्या निर्माण होत आहेत. या शतकात अनेक वृध्द वयाची शंभरी गाठलेले असणार आहेत. आजचे राहणीमान लक्षात घेता एकूण वृध्दांमध्ये साठ ते पंचाहत्तर वर्षा पर्यंतचे तरुण वृध्द, छहात्तर ते नव्वद वर्षापर्यंतचे जेष्ठ वृध्द आणि नव्वद वर्षापुढील दुर्बल वृध्द असे वर्गीकरण करता येऊ शकते. अशा वाढत्या वृध्दांच्या संख्येची वृध्दापकाळात जबाबदारी घेण्यासाठी वेळीच समायोजन होणार आहे. या शतकातील वृध्दांचे प्रश्न सुकर होणारे असून वृध्दांच्या वाढत्या संख्यचे व्यवस्थापन केवळ कुटूंब, शासन किंवा एखादी स्वयंसेवी संस्था अशा एखाद्या घटकाने करुन भागणार नाही. तरी सुध्दा जेष्ठोपयोगी सांमाजिक संस्थांचे समाजातील स्थान लक्षात घेता वृध्दांच्या वाढत्या समस्या त्या योग्य रितीने सोडवू शकतील.

समाजाचा एकंदर व्यवहार सुरळीत चालावा म्हणून व्यवसायावर आधारीत जरी निरनिराळया जाती पाडण्यात आल्या तरी कुटूंब संस्था हा सर्व समाजाचा घटक बनला. माणसाचे अस्तित्वच मुळी कुटूंब या मुलभूत सामाजिक घटकाशी निगडीत असते. मुल जन्माला आल्यानंतर जसे त्याचे पालन पोषण कुटूंबात होते तसेच वृध्दावस्थेत सुध्दा माणसाची सर्वसाधारण काळजी कुटूंबातच घेतली जाते. त्या अर्थाने कुटुंब ही एक अत्यंत महत्वाची जेष्ठोपयोगी संस्था आहे.

भारतात संयुक्त कुटूंब पध्दती टिकून आहे असे आपल्याला दिसते. बदलत्या परिस्थितीनुसार जरी मुले आपल्या आई—वडिलांपासून काही कारणांनी त्याच गावात, देशात किंवा परदेशात राहत असली तरी सणावाराला, सुख—दु:खाच्या प्रसंगी, आजारपणात एकमेकांच्या मदतीला धावून येतांना आपण पाहतो. हे सर्व पाहिल्यानंतर खऱ्या अर्थाने भारतातील संयुक्त कुटूंब संस्था ही एक महत्वाची मुलभूत जेष्ठोपयोगी संस्था आहे असे म्हटले पाहिजे.

जेष्ठ नागरिक संघ :— अनादी काळापासुन वृध्द स्त्री पुरुष आपला वेळ मंदिरात जाऊन कथा, किर्तने, पुराणे इत्यादी ऐकण्यात घालवित असत. अजूनही मोठया शहरात व ग्रामीण भागात ही प्रथा दिसुन येते. त्या निमित्याने वृध्दांच्या समवयस्कांमध्ये स्नेह राहत असे. परंतु असे प्रयत्न अनौपचारिक स्वरुपाचे असतात. गेल्या शतकाच्या शेवटच्या पंचेविस वर्षात निवृत्तांच्या व विशेषत: शिक्षित निवृत्तांच्या संख्येत जसजसी वाढ होऊ लागली तसतशी वृध्दांना औपचारिकरीत्या ऐकत्र येण्याची गरज भासु लागली. अशा प्रकारची गरज भरुन काढायला रोटरी इंटरनॅशनल या संस्थेने पुढाकार घेतला व त्या प्रयत्नातुनच आजच्या ज्येष्ठ नागरिक चळवळीचे बीज पेरले गेले.

१९८२ मध्ये एकुण जगातच वृध्दांची संख्या वाढत आहे. याची दखल संयुक्त राष्ट्र संघाने प्रथम घेतली व त्या संबंधी काहीतरी कृती योजना तयार करावी अशी सुचना केली. त्याला अनुसरुन ऑगष्ट १९८२ मध्ये व्हिएतनाम मध्ये पहिली जागतिक परिषद झाली व या संबंधी एक कृती योजना तयार करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघाने ती योजना स्विकारुन ती सर्व राष्ट्रांकडे वृध्दांसबंधी धोरण आखावे, कार्यक्रम हाती घ्यावे, इत्यादी सुचना पाठविण्यात आल्या. त्यातील एका सुचनेप्रमाणे वृध्दांनीसुध्दा स्वत: प्रयत्न करुन जेष्ठ नागरिक संस्था सुरु कराव्यात व जेष्ठ नागरिक चळवळ हाती घ्यावी अशीही सुचना केली होती.

महाराष्ट्र राज्यात मात्र संयुक्त राष्ट्राने केलेल्या सुचनांची दखल १९८२ पुर्वीच घेतली गेली आणि ठाणे जिल्हयात डोंबिवली येथे रोटरी इंटरनॅशनल या संस्थेच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील पहिला जेष्ठ नागरिक संघ १९७८ मध्ये स्थापन केला. त्यानंतर महाराष्ट्रात ठिकठिकाणी जेष्ठ नागरिक संघ स्थापन झाले आणि १९८० पर्यंत अशा संघाची संख्या २० वर गेली. हया २० जेष्ठ नागरिक संघाचा १२ डिसेंबर १९८० रोजी महाराष्ट्र जेष्ठ नागरिक संघाचा महासंघ या नावाचा महासंघही स्थापन झाला.

उद्दिष्ट्ये व ध्येये :— फक्त सामाजिक जाणिवेने सुरु केलेले जेष्ठ नागरिक संघ राजकारणापासून

अलिप्त असतात. बहुतेक संघाचे कार्यक्षेत्र काही ठराविक भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित असते. राज्य स्तरावर आणि अखिल भारतिय स्तरावर स्थापन झालेल्या संघटनांशी संलग्न होण्याची त्या त्या जेष्ठ नागरिक संघांना मुभा असते.

जेष्ठ नागरिक संघाची उद्दिष्ट्ये :—

१)समाजातील एकाकी राहणाऱ्या वृध्दांच्या समस्या समजावून घेणे व त्या सोडविण्यास मदत करणे. २) संस्थेच्या सभासदांना एकत्र आणणे. त्यांच्याशी विचार विनिमय करणे, त्यांचे जीवन सुखा समाधानाने व्यतीत करण्यास मदत करणे, तब्येती संबंधी विचारपुस करणे, शक्य झाल्यास वैद्यकीय सल्ला व मदत देणे इत्यादी. ३) सभासदांच्या नित्याच्या व्यवहारातील समस्या समजावून घेणे व त्या सोडविण्यास मदत करणे. ४) सांस्कृतिक करमणूकीचे कार्यक्रम आयोजित करणे व मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करणे. ५) संस्थेच्या सभासदांना यथाशक्ती समाजसेवेसाठी उद्युक्त करणे व समाजसेवा प्रकल्प आखुन ते यशस्वी करणे. ६) संस्थेच्या ध्येयपुर्तीसाठी शासनाकडे मध्यवर्ती संघटनेकडे अगर अन्य संस्थेकडे आर्थिक मदत मागणे तसेच अशा संस्थाकडून मागणी झाल्यास त्यांचे कार्यक्रम राबविण्यास मदत करणे.

संस्थांची नोंदणी :— सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार आणि मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार बऱ्याच नागरिक संस्था नोंदणी करुन घेतात त्यासाठी संस्थेची स्वत:ची घटना आवश्यक असते. घटनेतील तरतुदीनुसार संस्थेचे नाव, कार्यालयाचा पत्ता, कार्यक्षेत्रे, उद्दिष्ट व ध्येय, नियम, सभासदांची यादी, सभासदांचे हक्क, संस्थेच्या वार्षिक सभा आणि मासिक, पाक्षिक अथवा आठवडी सभा, संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारी मंडळ, संस्थेचा निधी आणि त्याचा विनीयोग, इत्यादीचा रितसर तरतुद करणे आवश्यक असते. तसेच संस्थेचे वार्षिक हिशेब तपासणीसांकडून तपासुन घेणे आवश्यक असते.

संस्थेचे उपक्रम :— जेष्ठ नागरिक संघाच्या ज्या आठवडी, पाक्षिक अथवा मासिक सभा होतात. त्या सभासदांना वेगळयाच प्रकारचा विरंगुळा देऊन जातात. विविध क्षेत्रातील अनुभवी, जेष्ठ मंडळी आपआपली निवृत्तीपूर्वीची पदे विसरुन जात—पात, लिंग भेद विसरुन किमान दोन तास तरी आनंदात घालवितात. नवीन स्नेह संपादन करतात, वाढदिवसाच्या एकमेकांना शुभेच्छा देतात आणि मुख्य म्हणजे आपल्या संस्थेमार्फत विविध कार्यक्रम आयोजित करतात. त्यात मोठया उत्साहाने सहभागी होतात. वाढत्या वयात आरोग्य रक्षणासाठी अशा कार्यक्रमात आरोग्य विषयावर व्याख्याने अधुन—मधुन आरोग्य चाचण्या, योग, श्वसनक्रिया, मुद्रा विज्ञान इत्यादी विषयावर प्रबोधनपर व्याख्याने व प्रात्यक्षिके, संगीत, कथाकथन इत्यादी सारखे करमणुकीसारखे कार्यक्रम सहली, स्नेहभोजन, कोजागीरी, संक्रांत इत्यादी सारखे कार्यक्रम आखले जातात आणि त्यात सर्व सभासदांना समान पातळीवर सहभागी होता येते. काही संस्था सभासदांसाठी पुस्तकपेढया चालवितात तर काही दरवर्षी साजरा होत असलेल्या १ ऑक्टोबर या जागतिक वृध्द दिनाचे महत्व ओळखून विशेषांक प्रसिध्द करीत असतात. याशिवाय काही संस्था अपंगासाठी टेलीबुथ चालु करुन देणे, अंध शाळेत विविध प्रकारची मदत करणे, वृक्षारोपन, झोपडपट्टी दत्तक घेऊन तेथे विविध प्रकारचे कार्य हाती घेणे, रुग्णोपायोगी साधने वितरण केंद्र चालविणे, दोन पिढयात सुसंवाद साधण्यासाठी वक्तृत्व व निबंध स्पर्धा आयोजित करणे, नेत्रदान व देहदान चळवळ पसरावी म्हणून जेष्ठ नागरिकांकडून फार्म भरुन घेणे, वृध्दांसाठी वृध्द सेवा केंद्र चालविणे, वृध्दांसाठी सल्ला सेवा केंद्र चालविणे इत्यादी सारख्या सामाजिक कार्यात आपल्या जेष्ठ सभासदांना सहभागी करुन घेतात. त्याच प्रमाणे काही संस्था जेष्ठ नागरिक प्रबोधनी सारख्या संस्थेत वृध्दत्व विज्ञान शास्त्रासंबधी संशोधन प्रकल्प राबविण्यासंबंधी सर्वेक्षण इत्यादी कार्यात मदत करतात.

अशारितीने जेष्ठ नागरिकांच्या कार्याकडे कटाक्ष टाकल्यास असे दिसते की, सांघीक पध्दतीने हया संस्था फार मोठे सामाजिक कार्य करीत आहेत.

आपल्या सभासदांशी नियमितपणे चांगला संपर्क साधता यावा, त्यांना वृध्दत्वाविषयी, आरोग्याविषयी माहिती आणि सभासदांच्या हितासंबधी अन्य माहिती नियमितपणे पुरविता यावी आणि आगामी महिन्याचे कार्यक्रम सभासदांना कळावे यासाठी काही जेष्ठ नागरिक संस्था दरमहा वार्तापत्र प्रसिध्द करतात. काही संस्था अशा वार्तापत्रात मागील महिन्यात झालेल्या कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा घेतात. त्यामुळे एक तर संस्थेत झालेल्या सभासदांचे कार्यवृत्तांत आपोआप तयार होतात आणि दुसरे म्हणजे जे सभासद त्या कार्यक्रमात हजर राहू शकले नव्हते त्या सभासदांना त्या कार्यक्रमाविषयी दरमहा किमान एका सभासदाचा परिचयही छापतात. त्यामुळे अशा सभासदांची अन्य सभासदांना ओळख होऊ शकते व एकमेकांत स्नेह वाढण्यात मदत होते.

संदर्भ :—

१. *कन्हाडे, बी. एम., (२०१०), 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या' नागपूर, पिंपळापुरे ॲंड पब्लिशर्स.*

२. *लोटे, रा. ज., (१९८९) 'सामाजिक समस्या' नागपूर, पिंपळापुरे ॲंड पब्लिशर्स.*

३. *संपादक, (२००४) 'वयोवर्धन प्रक्रिया' नाशिक : य.च.मु. विद्यापीठ.*

४. *www.oldage*

काव्यसृष्टीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचे योगदान

डॉ. संतोष मेंढेकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर मो. न. ९८६००१५०२५

आद्य स्त्री शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्रीमुक्तीच्या उद्‌गात्या, स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या, दीन—दुबळयांच्या कैवारी, पहिल्या महिला शिक्षक तज्ञ, लेखिका व प्रतिभावंत कवयित्री, खादीच्या आद्य पुरस्कर्त्या, खऱ्या लोकमान्य महिला नेत्या अशा विविध रूपांची व पैलुंची माहिती मुळ भारतीय लोकांना असेल, मात्र त्या प्रतिभावंत कवयित्रीही होत्या, हे अनेकांना बांधवांना माहित नसावे. सावित्रीबाई सर्जनशिल काव्य प्रतिभेच्या अधिकारी होत्या. त्यांचा 'काव्यफुले' हा पहिला कवितासंग्रह १८५४ साली प्रकाशित झाला. हा काव्यसंग्रह शिला प्रेसवर छापून प्रसिध्द झाला आहे. या स्फूट रचनांचा त्यात समावेश आहे. आपल्या काव्यसंग्रहात सावित्रीबाईंनी शिक्षण, जातिभेद, सुंदर फुल, बळीस्त्रोत, आदी समकालीन विषयांना धरून कविता केल्या. काही आत्मकथन रचनामध्ये 'माझी जन्मभूमी' 'आमची आऊ', संसाराची वाट', 'ज्योतीबांचा बोध व सावित्री—ज्योतीबा संवाद' या रचना समाविष्ट आहे.

इतर रचनांमध्ये तत्कालीन परंपरागत धार्मिक विषयांना धरून काही कविता आहे. त्याचबरोबर 'छत्रपती शिवाजी', 'राणी छत्रपती ताराबाई' या रचना महान ऐतिहासिक अब्राम्हणी विभूतिबदद्‌लचा आदर व्यक्त करण्यासाठी तर 'सामुदायिक संवाद पद्य' व 'स्वागतपर पद्य' या रचना त्यांनी स्वत: शाळेतील मुलांसाठी मुल्य संस्काराच्या हेतुने तयार केलेल्या आहेत.

प्रबोधनात्मक व चिंतनात्मक काव्यरचना त्यांनी केल्या. त्यात त्यांनी स्त्री—शूद्रांना, शिक्षणाचे आवाहन केले आहे. तर चिंतनात्मक काव्यांमध्ये 'शिकण्यासाठी जागे व्हा', 'तयास मानव म्हणावे काय?, इंग्रजी माउली, शुद्र शब्दाचा अर्थ, श्रेष्ठदान, गुलाबाचे फुल, बोलकी बाहुली, तेच लग्न, नवस, बाळाचा उपदेश, इत्यादी कवितांचा समावेष आहे.

सावित्रीबाईची काव्यसृष्टी :— सावित्रीबाईंनी शुद्रांना सांगण्यासारखा एकच मार्ग सांगीतला व तो म्हणजे शिक्षण. स्त्री—शुद्रांना त्यामुळे काय प्राप्त होणार आहे हे आपल्या कवितेत 'शुद्रांचे दुखणे' यात म्हणतात.

शुद्रांना सांगण्याजोगा ! आहे शिक्षण मार्ग हा!!
शिक्षणाने मनुष्यत्व ! पशुत्व हाटते पहा !!
इंग्रजी शिकुनी! जातीभेद मोडा !!
भटजी भारूडा ! फेकुनिया !! [१]

या एकाच कवितेने सावित्रीबाई १९ व्या शतकातल्या साहित्यीकांच्या अग्रणी ठरतात.

'शिक्षणासाठी जागे व्हा' या कवितेत त्या म्हणतात,

उठा बंधुंनो, अति शुद्रांनो, जागे होऊन उठा !
परंपरेची गुलामगीरी ही तोडण्यासाठी उठा!!
बंधुंनो, शिकण्यासाठी उठा !!ध्रु!!
गेले—मेले, मनु पेशवे, आंग्लाई आली!!
बंदी—मनुची विद्या घेण्या, होती ती उठली!! [२]

आज आपल्याला शिक्षण सहज मिळते. म्हणून त्या शिक्षणाचे महत्व कळत नाही. आपल्याला सहज शिक्षण मिळत राहावे म्हणून फुले दाम्पत्याला प्राणांतिक संघर्ष करावा लागला. याची जाणीव मात्र आजच्या पीढीला नाही. आज शिक्षण सहज मिळते. पण त्या शिक्षणात आम्हाला काय मिळते? याचा विचार आम्ही करत नाही. शिक्षणामागचा क्रांतीकारक आशय, उद्देश, आपण हरवून बसलो आहोत. सावित्रीबाई पुढे म्हणतात,

''नसानसात इर्शा खेळवून विद्या मी घेईन!
शूद्रत्वाचा डाग हों माझा निपटून काढीन!'' [३]

विद्या धन' या कवितेत त्या म्हणतात,

'विद्या धन आहे रे !
श्रेष्ठ साऱ्या धनाहून !
तिचा साठा जयापाशी !
ज्ञानी तो मानती जन !!'' [४]

आपल्या 'संसाराची वाट' या कवितेत त्या म्हणतात

'शांतता आपली! ठेवावी प्रपंची
हीच वाट साची ! संसारात !!' [५]

'मानव सृष्टी या आपल्या काव्यात त्या मानवाचे निसर्गाशी असलेले अतुट नाते स्पष्ट करतांना म्हणतात,

''मानवप्राणी निसर्ग सृष्टी व्दय शिक्क्यांचे नाणे!
एक असते म्हणूनही सृष्टीला शोभवू मानवे लेणे![६]

सामाजिक जाणीव असलेल्या कविता आणि बोधाने ओथंबलेले विचार अनुभवाच्या कसोटीवर घासलेलं हे काव्य आहे. शुद्रांच्या अत्यंत दयनिय अवस्थेच चित्रण सावित्रीबाईच्या कवितेत आहे. त्यांच्या स्थितीविषयी त्या रक्ताच्या शाईनं लिहीतात—

शुद्र आणि अतिशुद्र अज्ञानाने पछाडले !
देवधर्म रूढी अर्ची दारिद्रयाने गळाठले !!
सुखाचे नसते हाव दु:खास सुख मानली !

विधाते निर्मिले जैसे राहावे बोध सांगती!!
विषम रचती समाजाची रिती !
धूर्तांची ही निती अमानव ! [७]

बोधपर कवितेत सावित्रीबाई अतिशय कळवळून म्हणतात की,

विद्येविण गेले वाया पशु
स्वस्थ नका बसू! विद्या घेणे

नव्या युगाची वाट दाखवित असतांना 'जुने जावू द्या मरूणालागूनी' या केशवसुतांच्या ओळीची आम्हाला आठवण होते. केशवसुतांच्याही अगदोर दोन शतकं सावित्रीबाई म्हणाल्या होत्या,

दूर फेकूनि रूढी द्या रे
परंपरेची मोडूनी दारे !!,

तयास मानव म्हणावे की? ही प्रदीर्घ कविता आहे. या कवितेत त्या म्हणतात

ओळेखे दु:खीत जणू जनगीत
जाणे परहित—तो मानव [८]

सावित्रीबाईचा दुसरा प्रसिध्द काव्यसंग्रह म्हणजे 'बावन्नकशी सुबोध रत्नाकार' हा ग्रंथ १८९२ साली वऱ्हाडातील अमरावती जिल्यातील करंजगाव या गावी सत्य शोधक समाजाचे स्वामी लक्ष्मणशास्त्री सोनार यांच्याकडे प्रकाशित झालेला आहे. या काव्यात पेशवाईच्या रावबाजीचे आणि किडल्यासडल्या समाजाचे विदारक चित्रण केले आहे. त्यातील काही ओळी अशा आहेत.

स्वथुंकी थूंकाया गळी गाडघे ते
खुणा नाशया ढुंगणी झाप होते!!
अशी माजली पेशवाई विचित्र!! [९]

अशा काव्यातून त्यांनी अस्पृशांचे दु:ख आपल्या काव्यातून व्यक्त केले आहे. असे काव्य आजच्या कवितेत क्वचितच बघायला मिळेल.

'सुंदर सृष्टी, सुंदर मानव,
सुंदर जिवन सारे !!'

सृष्टी सुंदर व जिवंत राहीली तर सारा मानव समाजसुखी होईल हा संदेश त्यांनी त्याच वेळी दिला होता.

'कधी कल्पी मी विश्वमित्र आहे!
काव्य माझे हे प्रतिसृष्टी आहे!!

निसर्ग रक्षणाबरोबरच त्या अंधश्रध्देवरही हल्ला चढवतात

''गोटयाला शेंदूर फासून तेलात
बसवी देवात! दगड तो!!
धोंडे मुले देती! नवसां पावती!
लग्न का करीती!नारी—नर !!

अंधश्रध्देबरोबरच सावित्रीबाईंनी कर्मसिध्दांतावरही प्रहार करतात 'मनू म्हणे' या प्रबोधनपर कवितेमधून सावित्रीबाई म्हणतात,

नांगर धरती! शेती करती! मठठ ते असती!!
मनू म्हणे, शुद्र जन्म घेती! पुर्वीची पापे ती !
धुर्तांचीही निती ! अमानव ! [१०]

सावित्रीबाईची ही कविता कर्मसिध्दांतावर हल्ला करणारी आहे मनूने शेतकऱ्यांना मठठ् म्हणजे अडाणी म्हटले आहे. त्याचा आजचा जन्म हा पुर्वजन्माच्या संचितावरून प्राप्त झाला असून शेतकऱ्यांनी त्याविरूध्द कुरकूर न करता ती स्थिती मान्य कारवी. या विषमतावादी मनू विचाराविरूध्द सावित्रीबाईंनी शेरा मारला. ही धुर्त, कावेबाज भटांची अमानुष निती व कृती आहे त्यापासून सावध राहीले पाहीजे असा इशारा सावित्रीबाईनी दिला आहे.

वरील सावित्रीबाईंच्या काव्याचे चिकीत्सक विश्लेषण केले तर असे लक्षात येते की, आजच्या मराठी कवितेमध्ये व्यक्त होणारे विचार सावित्रीबाईंनी कितीतरी अगोदर स्पष्ट केलेले होते. यावरून त्यांची आधुनिक विचारसरणी आपल्याला दिसून येते. त्याचबरोबर समाजाची असलेली कळकळ व येथिल दृष्ट लोकांच्या कारवाया व अंधश्रध्दा यावरही त्यांनी जोरदार प्रहार केलेले आहे आणि म्हणूनच सावित्रीबाई फुले हया आधुनिक मराठी कवितेच्या जननी आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

सावित्रीबाईंनी स्त्री शिकावी म्हणून अपार कष्ट उपसले याचे आपण सर्वच साक्षीदार आहोत. तसेच अनाथांना आश्रय मिळावा याकरीता सुध्दा त्यांनी शेवटपर्यंत कार्य केले. १८७६—७७ चा दुष्काळ असो की, १८९७ ची प्लेगची साथ यामध्ये सुध्दा सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया, बापडयांना दृष्टांच्या तावडीतून सोडवून सत्यशोधक कुटुंबात आश्रय दिला. तसेच समाज कार्याकरीता स्वत:ला झोकून दिले. आज महिला सक्षमीकरण जे दिसते त्यात सावित्रीबाईंचे मोलाचे योगदान आहे, हे कोणीही अमान्य करू शकत नाही.

संदर्भ ग्रंथ सूची

१. *माळी मा. गो., क्रांतिज्योती सावित्रीबाई, आशा प्रकाशन गारगोटी जिल्हा कोल्हापूर, ३० नोव्हे. १९८१, पृष्ठ क्र. ३८*
२. *नराळ सतिश, लोकमाता सावित्रीबाई फुले, बजाज पब्लिकेशन अमरावती—२०००, पृष्ठ क्र. ७६*
३. *मढीकर दिलीप आर., सावित्रीबाई फुले (जिवन व कार्य), ललितराज प्रकाशन, पुणे जाने. २०००, पृष्ठ क्र. ११२*
४. *पांढरे निळा, ज्योती सावित्री, पॉपिलॉन पब्लिकेशिन हॉऊस पुणे—२००१, पृष्ठ क्र. ८९*
५. *कडवे प्रा. रघुनाथ, सामाजिक क्रांतिची अग्रदूत: सावित्रीबाई फुले, मिलींद प्रकाशन वर्धा. जाने. २००७, पृष्ठ क्र. ६९*
६. *मनोहर डॉ. यशवंत, मी सावित्री ! युगसाक्षी प्रकाशन, नागपूर एप्रिल २००७, पृष्ठ क्र. ४६*
७. *वृत्तपत्र — सम्राट, (४ जाने. २००५)*
८. *दैनिक लोकमत (३ जाने. २००७)*
९. *दैनिक देशोन्नती (३ जाने. २००८)*
१०. *दैनिक लोकसत्ता (३ जाने. २०१६)*

शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमाती वरील प्रभाव

डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, समाजशास्त्र विभागप्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर ९८५०३८७२७६

प्रस्तावना:— स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारताच्या पूनर्निमितीसाठी राष्ट्रातील तत्कालीन राज्यकर्त्यांने विविध क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरू केले. अशा प्रयत्नांमध्ये सर्वाधीक लक्ष केंद्रित केले गेले ते शिक्षणवस्थेवर, शिक्षणाच्या सर्व स्तरावर अगदी प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षण व व्यावसायीक शिक्षणात सुधारणा करून शिक्षणाचे पूर्नजीवन किंवा पूर्नगठण करणे आवश्यक आहे, हे सर्व सत्ताधाऱ्यांच्या लक्षात आले. सुमारे अर्धशतकापूर्वीच भारतात शिक्षण हे व्यक्तीमत्व विकासाचे, व्यक्तीच्या जडणघडणीचे प्रमुख साधन आहे असे मानले जात असे. हे विधान आजही तितकेच कालसुसंगत आहे. १९६२—६४ या काळात डॉ. डी. एच. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग नेमला गेला होता. त्या आयोगाच्या अहवालात शिक्षण हे राष्ट्राच्या विकासाचे प्रभावी माध्यम आहे ही भुमिका घेतल्या गेली होती. यामुळे शिक्षणाच्या उदिष्टांची आकृतीबंधाची आणि कार्यपध्दतीची पूर्नमांडणी केली गेली. कालांतराने २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात शिक्षणाचे मुख्य प्रयोजन ज्ञान निर्मिती आणि ज्ञानाधिष्ठीत समाज निर्माण करणे याला अग्रक्रम देण्यात येऊ लागला आहे. परंतु शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाधिष्ठीत समाज निर्माण करणारी व्यवस्था कुठेतरी आदिवासी समाजाच्या संदर्भात विचार करण्यात कमी पडत आहे. ही बाब आपल्या निदर्शनास येत आहे.

''शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या सुधारणेचा मुख्य पाया आहे. मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक किंवा सामाजिक प्रगतीसाठी कितीही प्रयत्न केले तरी ते फोल ठरतात. महाराष्ट्रात जे समाज ५० वर्षापूर्वी मागासलेले होते, त्यांच्यामध्ये सामाजिक व शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यात शिक्षण मुख्यत: कारणीभूत झालेले आहे.''[१] शिक्षणामुळे नियोजित सामाजिक बदलाच्या प्रक्रियेबरोबर विकासासाठी गती मिळते. शैक्षणिक गुणवत्ता असणाऱ्या व्यक्तीस व त्यांच्या कुटुंबीयास होणाऱ्या फायद्याबरोबर समाजासही निश्चितच फायदा होऊ शकतो. कारण शिक्षणामुळे अधिक कसदार व अधिक कार्यक्षम असे मानवी भांडवल निर्माण होते. आदिवासी समाज हा आज अज्ञानाच्या आणि दारिद्रयाच्या अंधारात चाचपडत आहे. खऱ्या अर्थाने या समाजाच्या प्रगतीस गती मिळवून देण्याची कुवत केवळ शिक्षणाच्या प्रक्रियेस आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे निश्चितच होणार नाही. आदिवासी भागात शिक्षणाची पहाट होऊन काही फार काळ लोटलेला नाही. समोर डोंगरासारख्या अडचणी असून सुध्दा त्या अडचणींकडे कधी पाठ फिरवून तर कधी त्या अडचणींना सामोरे जाऊन आज आदिवासी मध्ये साक्षरतेची जी वाटचाल होत आहे ती स्फुर्तीदायक व आशादायक असली तरीसुध्दा शिक्षणाच्या या शर्यतीमध्ये खाजगीकरणाचा अडथळा हा दुर्लक्ष करण्यासारखा निश्चितच नाही.

संशोधन विषयातील संकल्पना :— १) शिक्षण :— शिक्षण हा शब्द इंग्रजीतील Education या शब्दाचे मराठीतील रूपांतर होय. ज्याची उत्पत्ती लॅटीन भाषेतील Educare या शब्दापासून झाली असे मानले जाते. ज्याचा शाब्दीक अर्थ पालन पोषन करणे असा मानला जातो. शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्याच्या माध्यमातून व्यक्तीचे शारीरीक, मानसिक, पालनपोषन केले जाते. शिक्षण हे व्यक्तीचे व्यक्तीमत्व विकसीत करण्यास विशेष सहाय्यता प्रदान करते. शिक्षणाच्या संदर्भात काही विचारवंतानी आपली मते पूढीलप्रमाणे मांडली आहेत. रविंद्रनाथ टागोर यांच्या मते ''आपल्या जीवनात आणि संपूर्ण सृष्टीत समरसता निर्माण करणे शिक्षणाचे कार्य आहे''. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, ''शिक्षण ज्ञान ग्रहण करण्याची प्रक्रिया असून शिक्षणाने व्यक्ती शीलवान व सौजन्यशील बनतो''.

२) खाजगीकरण :— भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी १९९१ मध्ये जे नवीन आर्थिक धोरण जाहीर केले त्या धोरणातील एक महत्वाची संकल्पना म्हणजे "खाजगीकरण" होय. सार्वजनिक क्षेत्रातील किंवा सरकारची मालकी असणाऱ्या उद्योगाकरिता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रामधील उद्योगांना खूले करण्याच्या प्रक्रियेला खाजगीकरण म्हणता येईल. भारतात २००५ नंतर शिक्षणाच्या खाजगीकरणाला सुरूवात झाली. खाजगीकरणाच्या संदर्भात काही विचारवंतानी आपली मते मांडली आहेत ते पूढीलप्रमाणे. पीटर ड्रकर यांच्या मते, "खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातील शासकीय भांडवल काढून घेण्याची प्रक्रिया होय". डि. आर. पेंडसे यांच्या मते, "खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय"

३) भिल्ल जमात:— "भिल्ल जमातीच्या लोकांची वस्ती प्रामुख्याने महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान मध्यभारत इ. भागात आढळतात. दूष्काळामध्ये काही भिल्ल सिंध मध्येही जाऊन राहिले आहेत. भिल्ल जमातीचे लोक निरनिराळ्या राज्यात राहत असले तरी त्यांचे आचार, विचार, धर्म यामध्ये फारसा फरक आढळत नाही. मध्य पूर्वेतून आलेल्या प्रोटो—ऑस्ट्रेलॉईड लोकांचे भिल्ल, कोळी व शबर हे वंशज होत असे मानवशास्त्रज्ञाचे मत आहे."[२] "भिल्ल ही महाराष्ट्रातील ऐतिहासीक महत्वाची व संख्येने अधिक असणारी प्रमुख जमात आहे. महाराष्ट्रात "सातपूडा प्रदेश" हा प्रामुख्याने भिल्लांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. सातपूडा पर्वतांच्या रांगामध्ये हा प्रदेश विखूरलेला आहे. गुजरात आणि मध्यप्रदेशातील पर्वत रांगाचा भाग सोडला तर सातपूडा पर्वताच्या रांगा महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगाव आणि औरंगाबाद जिल्ह्यात पसरलेल्या आहेत. भारतातील सर्वाधीक लोकसंख्या असलेली जमात म्हणून भिल्ल जमातीला ओळखले जाते. महाराष्ट्रात भिल्लांची लोकसंख्या १०००००० च्या जवळपास आहे."[३]

''भिल्ल हा शब्द संस्कृत भाषेतील 'भिल्ल' या शब्दाचे तद्भव रूप आहे. जे स्वंय संस्कृतमधील 'भिल—बिल—भेदने' या धातूपासून मुलबध्द झाला आहे. संस्कृतमध्ये भिल्ल हा शब्द 'म्लेच्छ' देश आणि जाती म्हणजेच शुद्र प्रदेश आणि शुद्र जाती यासाठी वापरला जातो 'म्लेच्छ' हा संस्कृत शब्द आर्येत्तर लोकांसाठी अनेक शतकांपासून उपयोगात आणला जात असे. कालांतराने हा शब्द समाजातील निम्न जाती आणि जमातीसाठी अवहेलना आणि तिरस्कार व्यक्त करण्यासाठी उपयोगात आणण्यात आला.''[४]

अध्ययनाचे उद्देश :— १) जागतिकीकरणामुळे शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे का? ते अभ्यासणे. २) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीवर काय परिणाम होत आहे? ते अभ्यासणे. ३) शिक्षणाच्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलवादाचा उदय होत आहे का? ते अभ्यासणे.

गृहीत कृत्ये:— १) जागतीकीकरण हेच शिक्षणाच्या खाजगीकरणास प्रमुख जबाबदार घटक आहे. २) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीच्या लोकांवर नकारात्मक परिणाम होत आहे. ३) भारतात अलिकडील काळात शैक्षणिक भांडवलदार उदयास आले आहे. त्यास शिक्षणाचे खाजगीकरण व सरकारचे धोरण जबाबदार आहे.

अध्ययन पध्दती :— प्रस्तूत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाच्या तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलनाच्या तंत्रापैकी प्रश्नावली, अनुसुची, निरिक्षण इ. तंत्राचा उपयोग तथ्यांच्या संकलनासाठी करण्यात आला आहे. तर व्दितीयक तथ्य संकलनाच्या तंत्रापैकी, शासनाचे वार्षिक अहवाल, ऐतिहासीक कागदपत्रे, अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित, अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिक, वर्तमानपत्रे इ. चा आधार घेण्यात आला आहे. तसेच प्रस्तूत शोध निबंधाचा सैंध्दातिक दृष्टीकोण मार्क्सवादी असून, मार्क्सवादी दृष्टीकोणातूनच अध्ययन समस्येचा अभ्यास करण्यात आला आहे. त्या आधारावरच निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

अध्ययन क्षेत्र :— प्रस्तूत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या लोकांचा अभ्यास करण्यात आला आहे. नांदेड जिल्हा हे अध्ययनाचे कार्यक्षेत्र असून जिल्हयातील १६ तालूक्यांपैकी ४ तालूक्यांची (भोकर, हिमायतनगर, हदगाव, किनवट) निवड अध्ययनासाठी करण्यात आली आहे. या तालूक्यांतील ४ गावातील (थेरबन, पवना, आनंदवाडी, परोटी) भिल्ल जमातीच्या २०० कुटुंबांचा सहेतूक नमूना निवड पध्दतीचा उपयोग करून अध्ययनासाठी निवड करण्यात आली आहे.

साहित्याचे परिक्षण :— शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या इतिहासाच्या अध्ययनावरून हे ज्ञात होते की, सर्वप्रथम १८८३ मध्ये लेस्टर वार्ड यांनी Dynamic Sociology नावाच्या ग्रंथात मानवाच्या प्रगतीचा प्रमुख घटक हा शिक्षण आहे असे ठासून नमूद केले आहे. परंतू सन १९१५—१६ पर्यंत शिक्षणाच्या समाजशास्त्राला स्वतंत्र अध्ययन शाखेचा दर्जा प्राप्त झाला नाही. १९३२ मध्ये डब्लू. वॉलर यांनी The Sociology of Teaching नावाचा ग्रंथ प्रकाशित केला आणि त्या ग्रंथात शिक्षणाच्या समाजशास्त्राला प्रबळ सैध्दांतीक आधार प्रस्तूत केला. जे.जि. जोगळेकर (१९२८)[५] यांनी पदव्यूत्तर पदवीच्या अध्ययनासाठी केलेल्या संशोधनात १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण व सामाजिक कल्पना हा विषय घेतला. शिक्षणाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जोगळेकरांनी आपल्या अध्ययनात तत्कालीन मुंबई प्रांतातील शिक्षणाच्या वास्तव स्थितीचा आढावा घेतला आहे. सी. प्रवथम्मा (१९७४)[६] यांनी कर्नाटक राज्यातील अनूसूचीत जाती व जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक व शैक्षणिक समस्यांचा अभ्यास केला आहे. २६० विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणाऱ्या ११३ प्राधापकांच्या अध्ययनातून प्रवथम्मा यांनी काही निष्कर्ष मांडले आहेत. एस.एम. दुबे (१९७४)[७] — यांनी आसाम मधील अनूसूचीत जाती व जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा

अभ्यास केला आहे. दुबे यांनी आपल्या अध्ययनात हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे की, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी कशी आहे. शिक्षणाचा प्रभाव त्यांच्या जीवनावर किती आणि कसा पडत आहे याचे अध्ययन दुबे यांनी केले आहे.

तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन :— जागतिकीकरण ही एक बृहद सामाजिक परंपरा असून जी संपूर्ण मानवी जीवनाला आज प्रभावीत करीत आहे. ज्यात शिक्षण हा एक महत्वाचा घटक आहे. शिक्षण व्यवस्थेतील जागतीकीकरणाच्या प्रवेशाने सर्व स्तरातील शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे. याचा परिणाम आदिवासी समाजातील शिक्षण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांवर होत आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे दलित, मागासवर्गीय व आदिवासींच्या शिक्षणाचे अनेक प्रश्न अलीकडील काळात निर्माण झाले आहेत. यांच्या शैक्षणिक प्रश्नांसाठी जागतिकीकरणाचे अपत्य म्हणून जन्मास आलेले खाजगीकरण हे आदिवासींच्या सर्वांगीन जीवनास प्रभावीत करित आहे.

जागतिकीकरण, वैश्वीकरण हे वस्तूत: एक दुसऱ्याचे पर्यायवाची शब्द आहेत. परंतू दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. जागतिकीकरण ही संकल्पना १९८० नंतर अध्ययनाचा मुख्य विषय बनून जगाच्या समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय समाजशास्त्राच्या मुखपत्राने जागतिकीकरणाला समजून घेण्यासाठी स्टॉकहोम येथे स्वीडनच्या विदेश मंत्रालयाच्या सहयोगाने १९९८ मध्ये एका संम्मेलनाचे आयोजन केले होते. या संम्मेलनात समाजशास्त्राच्या एका गटाकडून जागतिकीकरणाला परभाषीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जागतिकीकरणाच्या संदर्भात आपले मत व्यक्त करतांना समाजशास्त्रज्ञ म्हणतात जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा अविष्कार १९९० च्या दशकाच्या प्रारंभिक वर्षात झाला आहे. १९९२ मध्ये 'ऐनी' आणि 'रॉबर्टस्टन' यांनी प्रथम जागतिकीकरण या संकल्पनेचा उपयोग आपल्या अध्ययनात केला आहे. रॉबर्टस्टन यांच्यामते, ''जागतिकीकरण अशी प्रक्रिया आहे जिचा मुख्य उद्देश भांडवलवादाचा विस्तार आणि समृध्दी करणे हा आह''.भारतात जागतिकीकरणाची सुरुवात २० व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली आहे. जेव्हा भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केला त्यावेळेस भारताचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव व वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंग होते.

२१ मे १९९१ नंतर भारतात जागतिकरणाचा स्वीकार करण्यात आला आहे. १९९४ मध्ये जागतिक स्तरावर गॅट ची स्थापना झाली. म्हणजेच व्यापार आणि शुल्क आकारणी संबंधी सामान्य करार करण्यात आला. १ जानेवारी २००५ ला गॅट मध्ये सेवा क्षेत्राचा समावेश करून गॅट लागू करण्यात आला गॅट मुळे भारतातील शिक्षण व्यवस्था ही विदेशी विद्यापीठांना खुली करण्यात आली. शिक्षणाच्या खाजगीकरणाचा बडगा आदिवासी दलीत व बहुजन समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुळावर आला आहे.

''जागतिकीकरण हे खाजगीकरणाचे वैश्वीक रूप आहे. स्पर्धा हे त्याचे अविभाज्य अंग आहे. गुणवत्ता वाढविण्याशिवाय स्पर्धेत उतरण्याची क्षमता प्राप्त करता येत नाही. स्पर्धेत उतरल्याशिवाय गुणवत्ता सिध्द करता येत नाही. जागतिकीकरण हे सामाजिक न्यायाच्या तत्वाला आपल्या जवळ सहसा फटकू देत नाही. अशा अवस्थेत बहुजन व आदिवासींच्या शिक्षणाचे भविष्य अंधकारमय होण्याची भीती खाजगीकरणातून निर्माण होत आहे.''[८] जागतिकीकरण हे भांडवलशाहीला पोषक आहे ही गोष्ट उघड आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणाचा सर्वात वाईट परिणाम हा आदिवासींच्या शिक्षणावर पडत आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणातून निर्माण झालेल्या गुणवत्तेच्या स्पर्धेत भिल्ल जमातीतील शैक्षणिकदृष्टया मागास विद्यार्थ्याचा निभाव लागणे शक्य नाही.

क्षेत्रीय अध्ययनाव्दारे प्राप्त तथ्यांच्या विश्लेषणातून भिल्ल जमातीच्या २०० कुटुंब प्रमुखांकडून तथ्य संकलीत करण्यात आली आहेत. भिल्ल जमातीतील २०० कुटुंब प्रमुखांना जागतिकीकरणामुळे शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे का? असे विचारले असता १५३ (७६.५०%) उत्तरदात्यांनी शिक्षणाच्या खाजगीकरणास जागतिकीकरण हेच जबाबदार आहे असे म्हटले. त्यामुळे आमच्या पाल्यांचे शैक्षणिक भविष्य हे अंधारकारमय होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे भिल्ल जमातीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आरक्षण आणि विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न पालकांनी व्यक्त केला आहे. तर ४७ (२३.५०%) पालकांनी जागतिकीकरण हे शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहित करित नाही असे मत नोंदविले. यांच्या मते सरकार आणि प्रशासन शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहन देऊन आपल्या घटनात्मक कर्तव्यांकडे कानाडोळा करु शकत नाही असे या उत्तरदात्यांना वाटते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने लोकशाही समाजव्यवस्थेचा पूरस्कार केला. जेव्हा देश स्वतंत्र झाला त्यावेळेस देशासमोर अनेक सामाजिक समस्यांची आव्हाने होती. त्यातील सर्वात मोठी समस्या म्हणजे आदिवासी व दलितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणने, त्यांना त्यांच्या मागासलेपणापासून दूर करणे. हे करण्यासाठी उत्तम मार्ग म्हणून आदिवासी व

दलितांच्या विकासात शिक्षणाची भूमिका ही महत्वपूर्ण ठरु शेकते हे शासनकर्त्यांच्या लक्षात आल्यानंतर आदिवासी व दलितांच्या उध्दारासाठी शासनाने वेगवेगळ्या योजना सुरु केल्या. परंतू अलीकडिल काळात शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे आदिवासींवर वाईट परिणाम होत आहे का? हे जाणून घेणे प्रस्तूत संशोधनाचा उद्देश आहे. शिक्षणाचे खाजगीकरण जर सर्वच स्तरातील शिक्षण व्यवस्थेत निर्माण झाले, तर भिल्ल आदिवासींच्या शिक्षणावर याचा काय परिणाम होईल? हे जाणून घेण्याचा प्रयत्न उत्तरदात्यांकडून करण्यात आला आहे.

नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या २०० कुटुंबातील पालकांना विचारण्यात आले की, शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणाचा काही परिणाम तुमच्या पाल्यांच्या शिक्षणावर होत आहे का? असा प्रश्न असुसूचीच्या माध्यमातून पालकांना विचारण्यात आल्यानंतर १४८ (७४%) पालकांनी शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणाचा वाईट परिणाम आमच्या मुलांच्या शिक्षणावर होत आहे, या मताचा स्वीकार केला. सरकारने पूढच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यांप्रमाणे निर्गुतंवणूकीचे धोरण सरकारी शाळांच्या संदर्भात राबविले तर याचा परिणाम भिल्ल जमातीतील आदिवासींच्या मुलांच्या शिक्षणावर अधिक होईल अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे. तर ५२ (२६%) पालकांनी शिक्षणाचे खाजगीकरण कीतीही मोठ्या प्रमाणात झाले तरी शासन आदिवासींच्या न्याय हक्कांवर गदा आणणार नाही असे मत नोंदविले परंतू असे मत नोंदविणाऱ्यांची संख्या अत्यल्प आढळून आली आहे.

"व्यापारीकरणातून, खाजगीकरणातून शासनाचा शिक्षण क्षेत्रात सकारात्मक हस्तक्षेप वाढण्याऐवजी नकारात्मक हस्तक्षेप नको तेवढा अधिक वाढला आहे. वास्तविकपणे देशात आर्थिक उदारीकरणाचे युग १९९१ साली सुरू झाले. लायसन्स, परमिट, परवानाराज बंद झाले. एका खिडकीसमोर उभे राहून नागरिक तिथे सर्व कामे करू शकतील ही नुसती जाहिरातबाजी आहे. प्रत्येक शासनाने नको तिथे हस्तक्षेप करून शिक्षण व्यवस्थेशी संबंधीत अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. उदा :— व्यवसाय शिक्षणातील सर्व प्रवेश परिक्षा, शुल्क रचना यासर्व प्रक्रियेतून खाजगी शिक्षण संस्था चालकाव्दारे विद्यापीठ यंत्रणा, विद्यार्थी व पालक यांना दुर ठेवले जात आहे."[९] संस्थाचालक भांडवलदाराप्रमाणे दरवर्षी आपली आकडेवारी, विवरण पत्रे, शुल्क निर्धारण समितीला सादर करतात. आहे त्या शुल्कात आम्हाला खर्च करणे जमत नाही. आम्हाला शुल्क वाढीची परवानगी द्या, यासाठी शुल्क निर्धारण समितीला विनंती करून किंवा प्रसंगी संघटनात्मक पातळीवर राजकीय दबाव आणून त्यांच्या कडून दरवर्षी वाढीव दर मंजूर करून घेतला जातो. शासन अशा वेळी मुग गिळून गप्प बसत आहे. यामुळे समाजात शैक्षणिक भांडवलदार अधिक मोठ्या संख्येत निर्माण होत आहेत. राजकीय सत्ताधारी व भांडवलदारी मानसिकतेचे संस्थाचालक यांच्या संगनमताने देशातील शिक्षणाच्या खाजगीकरणाला समाजात प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सूरू आहेत. त्यात त्यांना बरेचसे यशही प्राप्त झाले आहे. कार्ल मार्क्स यांनी सांगीतल्या प्रमाणे राजकीय सत्ताधारी हे भांडवलादारांच्या (संस्थाचालकांच्या) हातचे बाहूले बनून शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहन देत आहेत. यामुळे 'नाही रे' वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आदिवासीच्या शिक्षणाची समस्या निर्माण होत आहे.

"जेष्ठ उद्योगपती श्री. राहूल बजाज यांनी ३० जूलै २००९ च्या Times of India या वर्तमान पत्राच्या अंकात 'Education Unbound' शिर्षकाचा लेख लिहीला आहे. 'Free college and from sarkari shackles universities' असे म्हणून त्यांनी सर्व निर्बंध हटवा शासकीय दास्यत्वातून उच्च शिक्षणाला म्हणजेच महाविद्यालये व विद्यापीठे यांना मुक्त करा. असे आवर्जून म्हटले आहे. त्यांचे थोडक्यात सुत्र असे आहे. शिक्षणाची मुक्त बाजारपेठ होऊ द्या. तोटा सहन करून काही कोणी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ चालऊ शकणार नाही".[१०] एकदा का संस्थाचालकांना असे निर्णय घेण्यासाठी वाव दिला की मग ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात वाढ करायला मोकळे होतात. अलीकडिल काळात खाजगी शाळा महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क व इतर शुल्क मिळून ही रक्कम अभ्यासक्रमानुसार लाख व कोटीतही आहे. इयत्ता पहिलीतील प्रवेशासाठी लाखो रूपये शुल्क पालकाकडून घेणाऱ्या खाजगी शिक्षण संस्था भारतात कार्यरत आहेत. उदा. दिल्ली पब्लिक स्कुल मध्ये जर पहिल्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा असेल तर पालकांना १ लाख ५० हजार रूपये मोजावे लागतात. व्यावसायीक शिक्षणाची अवस्था तर भयावह आहे. वैद्यकिय पदवीच्या शिक्षणासाठी खाजगी वैद्यकिय महाविद्यालयात ६० लाख ते ८० लाख रूपये देणगी व नियमानूसारचे इतर शैक्षणिक शूल्क वेगळे भरावे लागते. वैद्यकीय अभ्यासक्रमातील पदव्यूत्तर पदवीसाठी २ कोटी ते ३ कोटी एवढी रक्कम प्रवेशसाठी देणगी म्हणून द्यावी लागते. हे सर्व शिक्षणाच्या खाजगी करणामूळे होत आहे. अशा स्थितीत भिल्ल आदिवासी विद्यार्थ्यांना एवढे महागडे शिक्षण पैसे खर्च करूनं घेणे शक्यं होईल का? आदिवासी समाजातील विद्यार्थी डॉक्टर, अभियंता इ. होण्याचे स्वप्न शिक्षणाच्या

खाजगीकरणाच्या युगात पाहू शकतील का? हा प्रश्न आदिवासी समाजाच्या अभ्यास करणाऱ्या संशोधकासमोर आहे. शिक्षणाचे वाढते खाजगीकरण हे आदिवासी समाजासमोर अनेक शैक्षणिक समस्या निर्माण करीत आहे. आर्थिकदृष्ट्या अतिशय विवंचनेत आयूष्यभर जीवन जगणाऱ्या आदिवासी लोकांना शिक्षण विकत घेऊन शिकणे शक्य होणार नाही. त्यासाठी सरकारने आदिवासींच्या सर्व स्तरातील शिक्षणाचे ओझे आपल्या खांद्यावर घेऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. परंतू मार्क्सच्या भाषेत राजकीय सत्ताधारी हे भांडवालदारांचे हस्तक असल्यामुळे त्यांचा कडून 'नाहीरे' वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आदिवासींना न्याय मिळेल अशी आशा बाळगणे बालीशपणा ठरण्याची शक्यता अधिक आहे.

शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणाशी संबंधीत समस्याबाबत पालकांना त्यांना समजेल अशा भाषेत विचारण्यात आले की, शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शैक्षणिक भांडवलदारांना प्रोत्साहन मिळत आहे का? असे विचारल्यानंतर १७३ (८६.५०%) पालकांनी होय असे म्हटले आहे. त्यांच्या मते सद्यस्थितीत शिक्षण क्षेत्रात मोठ—मोठे उद्योगपती पदार्पण करित आहेत. शिक्षणाच्या व्यापारिकरणाला चालना देण्यात भांडवालदारांची भूमिका महत्वपूर्ण आहे. २००५ नंतर भारतातही शिक्षण संस्थांना शिक्षणाचा व्यापार करण्याची संधी मिळाली आहे. या व्यवस्थेत शिक्षण संस्थांना कारखाना समजण्यात येत आहे. संस्थाचालक हे शैक्षणिक भांडवलदार बनले आहेत. शिक्षक, प्राध्यापक हे उत्पादन करणारे कामगार झाले आहेत. तर विद्यार्थी उत्पादीत वस्तू बनले आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रात कारखानदारांचा शिरकाव होण्यामागे महत्वाचे कारण म्हणजे समाजसेवा नसून शिक्षणाच्या व्यवसायातून अधिकाधिक आर्थिक नफा प्राप्त करणे हे आहे. यामूळे भिल्ल जमातीतील बहुतांश उत्तरदात्यांना असे वाटते की, शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलदार आणि पर्यायाने शैक्षणिक भांडवलवादाचा उदय होत आहे. २७ (१३.५०%) भिल्ल जमातीच्या पालकांना असे वाटते की शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणामुळे भांडवलदारांना प्रोत्साहन मिळत नाही. कारण सरकार आजही आपल्या धोरणांच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्थेवर नियंत्रण ठेऊन आहे. त्यामूळे सरकार शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहन देत असले तरी भांडवलदारांना प्रोत्साहन मिळेल असे आम्हाला वाटत नाही असे मत उत्तरदाते मांडतात. असे जरी असले तरी वरील निर्वचनावरून असा निष्कर्ष काढता येतो की, बहुतांश उत्तरदात्यांचे मत आहे की शिक्षणाच्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलवादांला प्रोत्साहन मिळत आहे.

अध्ययनाचे निष्कर्षः—

१) आदिवासींच्या शैक्षणिक विकासाशिवाय ज्ञानधिष्ठीत समाज निर्माण होणे अशक्य आहे.

२) समाजाच्या प्रगतीस गती मिळवून देण्याची क्षमता शिक्षणात आहे. ती गती शिक्षणच्या खाजगीकरणामुळे भिल्ल जमातीच्या लोकांच्या प्रगतीत अडथळा निर्माण करीत आहे.

३) सार्वजनिक क्षेत्रातील कारखाण्यांच्या निर्गुतंवणुकीकरणासारखे शैक्षणिक संस्थाचे खाजगीकरण होत आहे ते भिल्ल व इतर आदिवासींच्या विकासात अडथळा आहे

४) गॅट या कायद्यामूळे शिक्षणाच्या खाजगीकरणाला अधिक बळकटी प्राप्त झाली आहे.

५) जागतिकीकरण हेच शिक्षणाच्या खाजगीकरणास जबाबदार आहे.

६) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा सर्वात वाईट परिणाम महाराष्ट्रातील भिल्ल जमातीवर पडत आहे. कारण भिल्ल ही महाराष्ट्रातील सर्वाधीक लोकसंख्या असणारी जमात आहे.

७) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा बडगा आदिवासी, दलित व बहूजन समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुळावर आला आहे.

८) बहुजन व भिल्ल आदिवासींचे शैक्षणिक भविष्य अंधकारमय होण्याची भीती खाजगीकरणातून निर्माण होत आहे.

९) शिक्षणाच्या खाजगीकरणामूळे शैक्षणिक आरक्षण व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण होण्याची भीती भिल्ल जमातीतील पालकांनी व्यक्त केली आहे.

१०) खाजगीकरणाचा परिणाम म्हणून शासन शिक्षण क्षेत्रातील आपली जबाबदारी हळू—हळू कमी करत आहे.

११) राजकीय सत्ताधारी व भांडवलदारी मानसिकतेचे संस्थाचालक यांच्या संगनमताने शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रस्थापीत करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

१२) शैक्षणिक भांडवलदारांना प्रस्थापित करण्यासाठी 'Education Unbound' ची संकल्पना समाजात रूजविण्याचा प्रयत्न सरकारच्या माध्यमातून भांडवलदार करित आहेत.

१३) शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलदार आणि पर्यायाने शैक्षणिक भांडवलवादाचा उदय होत आहे.

शिफारशी:—

१) आदिवासीवरील अन्याय दूर करण्यासाठी शिक्षणाचे खाजगीकरण थांबविणे आवश्यक आहे.

२) शिक्षणासारख्या क्षेत्राकडे अनुत्पादक घटक म्हणून पाहण्याची सरकारची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे.

३) शिक्षणाचे होणारे खाजगीकरण आदिवासींच्या विकासात अडथळा बनत असल्यामूळे त्यावर शासनाने आधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

४) सत्ताधारी हे भांडवलदारांचे बटीक बनले आहेत. त्यांनी तसे न करता आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडण्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

५) गॅट कायद्यातून शिक्षण, आरोग्य इ. जीवन आवश्यक घटकांना बाहेर काढणे आवश्यक आहे. ज्यामूळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना आदिवासीचे शोषण करण्याची संधी मिळणार नाही.

६) महाराष्ट्रातील सर्वाधीक लोकसंख्या असणाऱ्या भिल्ल जमातीच्या लोकांवर खाजगीकरणाचा परिणाम होणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी.

७) शैक्षणिक संस्थांचे निर्गुतंवणूकीकरण देशहीतासाठी घातक आहे. ते वेळीच थांबविणे आदिवासी व देशाच्या हिताचे आहे.

संदर्भ :—

१. *गारे,गो. (१९९४).आदिवासींचे प्रश्न आणि परिवर्तन. औरंगाबाद, अमृत प्रकाशन.*

२. *जाधव,सु. (१९६९). भिल्ल जीवन आणि अविष्कार. पूणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.*

३. *गारे,गो. (२००१). महाराष्ट्रातील आदिवासी जमाती. पूणे, कॉन्टीनेंटल प्रकाशन*

४. *शर्मा,र. (२०००). वैदीक संपत्ती. पूणे, भारतीय संस्कृती कोश मंडळ.*

५. *Jogalekar, J.(1928). Education and social Ideas in Maharashtra during 19th century Bombay. Bombay university.*

६. *Parvathamma,c.(1974).The study of scheduled cast of scheduled tribe college student in Karnataka. Mysore, Mysore University.*

७. *Dubey,s. (1974). The study of scheduled caste and scheduled tribe college students in Assam. Delhi I.C.S.S.R.*

८. *वाघमारे, ज.(२००९). बदलते शिक्षण स्वरूप आणि समस्या. पूणे, पदमगंधा प्रकाशन.*

९. *धनागरे, द. (२०१०). उच्च शिक्षण ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे. मुंबई, लोकवाङ्.मय गृह.*

१०. *उपरोक्त.*

११. *दोषी, एस. (२००१). द. भिल्ल. जयपूर, रावत पब्लीकेशन्स.*

१२. *लोकडे, एस (१९८६).आदिवासी समाज जीवन. नांदेड, नांदेड जिल्हा ग्रंथ निर्मिती समिती*

१३. *बिहारी, पं. आणि लता मोरे (२०१०). भारतातील शिक्षण व्यवस्थेचा विकास.नागपूर, पिंपळापूरे ॲन्ड पब्लिशर्स,*

१४. *आगलावे,प्र. (२०००). संशोधन पध्दतीशास्त्रे व तंत्रे. नागपूर, विद्या प्रकाशन.*

१५. *कऱ्हाडे, बी. (२०११). शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपूर, पिंपळापूरे ॲन्ड पब्लिशर्स.*

जातीभेदाचे मूलगामी चिंतन

(पुस्तक परिचय)

प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय
जालना. मो. ९४०५९१३२९७

'कास्ट डिस्क्रिमिनेशन' पृष्ठे २४८, किंमत ७९५ रु.
'कास्ट बेस्ड एक्स्क्लूजन' पृष्ठे २३२, किंमत ७५० रु.
दोन्ही पुस्तकांचे संपादक : प्रा. डॉ. जगन कराडे,
दोहोंचे प्रकाशक: रावत प्रकाशन, जयपुर/दिल्ली.

भारतीय समाजाला शतकानुशतके जातीव्यवस्थेने विकलांग बनविण्याचे कार्य केले आहे. परिणामी उपेक्षिताना प्रगती व विकासाच्या संधी जातिव्यवस्थेने नाकारल्या आहेत. पारंपरिक समाजव्यवस्था मात्र अजूनही बदलायला तयार नाही. जे काही बदल होत आहेत ते अत्यल्प असे आहे. समाजात घडणाऱ्या विविध घटनांवरून जातीव्यवस्था अजूनही समाजमनात कशी घट्ट रुतून बसली आहे याची प्रचिती येते. सार्वजनिक जीवनातील प्रत्येक क्षेत्र हे जातिव्यवस्थेने आकंठ बुडालेले आहे. समाजव्यवस्थेतील दलितांचा समुह हा सातत्याने या जातीभेदाचा बळी ठरताना दिसतो आहे. भारतीय संविधानामध्ये अनुसूचित जाती—जमाती मागासवर्गाच्या विरोधात होणाऱ्या जातीभेदाच्या विरोधात संरक्षण दिलेले आहे; त्यासाठी कायदे, नियम बनवले आहे.

वर्तमान परिस्थितीचे आपण डोळसपणे निरीक्षण केले तर आपल्याला या कायद्यामधील पळवाटा वा कमतरता दिसून येतात. मागासलेल्या जातीचे लोक जातीभेदामुळे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात पीडित आहे. आधुनिक भारतामध्ये विविध सामाजिक संस्थांमध्ये स्थित्यंतरे होत आहे. असे असले तरी मोठ्या प्रमाणात भारतीयांमध्ये त्यांच्या पूर्वग्रहांमुळे जातीव्यवस्थेमध्ये अपेक्षित असे सामाजिक परिवर्तन होताना दिसून येत नाही. या पार्श्वभूमीवर जगन कराडे यांचे ***कास्ट डिस्क्रिमिनेशन*** हे इंग्रजी भाषेतील पुस्तक भारतातील प्रचलित जातीभेदभावाच्या विभिन्न स्वरूपांला तथ्याच्या आधारे समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण असे आहे. वास्तवात जातीयता ही केवळ हिंदू धर्मामध्ये आहे असे नाही तर मुस्लिम ख्रिश्चन आदीमध्ये सुद्धा दिसून येते. या पुस्तकामध्ये बारा विद्वानांनी अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेल्या लेखांचे संपादन केलेले आहे. उत्तरप्रदेश, गुजरात, कर्नाटक तथा महाराष्ट्रातील संशोधनावर आधारीत व अनुभवजन्य तथ्यांवर आधारलेले आहे. या राज्यात विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला असून ही जातीयता भारतामध्ये कशी संस्थिकृत झाली आहे याचे संशोधनात्मक परिशीलन केलेले आहे.

आधुनिक विचार आणि परंपरांच्या पारस्परिक प्रभावाने जातीय गतिशीलता मध्ये कशाप्रकारे परिवर्तन झाले आहे याचे स्पष्टीकरण जगन कराडे यांच्या पुस्तकात दिसून येते. आधुनिक काळात धर्मनिरपेक्ष जातीसंघटनांनी मागास जातीच्या अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. प्राचीन काळापासून जाती ह्या प्रदत्त प्रस्थितीवर आधारलेल्या आहेत जी व्यक्तीला मात्र जन्माच्या आधारावर प्राप्त होते. ज्यात कोणत्याही प्रकारच्या योग्यता, नैपुण्य आणि कष्ट करण्याची गरज पडत नाही. आधुनिकता आणि लोकशाही मूल्यनीतिच्याद्वारे जाती आणि धर्माच्या प्रचलित आदिकालीन भावना व विचार हे आपोआप नष्ट होतील असा भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विश्वास होता. डिस्कव्हरी ऑफ इंडिया या ग्रंथात याचे सविस्तर असे विवेचन केले असून जातीयता ही भारतीय समाजाच्या प्रगती व विकासाला अडथळा आणणारी आहे. सरदार वल्लभभाई पटेल, डॉ बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांनी आधुनिक राज्य , लोकशाही स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाचा पुरस्कार केला होता. आपल्या संविधानात जाती, वर्ग आणि लिंग आदीच्याव्दारे होणाऱ्या भेदभावाला दूर करण्यासाठी कायदे, नियम बनविले आहे. त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला न्यायाचा मौलिक अधिकार प्राप्त झालेला आहे.

हे पुस्तक वर्तमान साहित्यामध्ये जातिभेदाच्या महत्त्वपूर्ण प्रश्नावर समाधानपूर्वक चर्चा व तोडगा काढण्यासाठी विचाराचे संकलन आहे. हे पुस्तक भारतीय संस्कृतीच्या बहुविध पैलूचे दर्शन घडविते. जातीच्या संदर्भातील सखोल अभ्यास करण्यासाठी हे पुस्तक महत्त्वपूर्ण आहे. चार्वाक, बुद्धापासून ते महात्मा

फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून आजपर्यंत अनेकांनी जातीभेदाच्या रुढी परंपरेच्या विरोधात अनेकांनी बंड केले. चळवळी उभ्या केल्या. अनेक वर्षापासून भारतीय विद्वानांनी भारतीय सामाजिक व्यवस्थेतील जाती आणि अस्पृश्यतेच्या समस्यांवर संशोधन केले. सैद्धांतिक स्वरूपात जातीभेदाची समस्या हा वैश्विक मुद्दा ठरला. एक आधुनिक आणि प्रभावशाली सुसंवाद जातीयतेला संपविण्यासाठी सुरू झाला. या पार्श्वभूमीवर जातिभेदाच्या विविध मुद्द्यांवर या पुस्तकात चर्चा केली आहे. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना व जिज्ञासूंना हा ग्रंथ म्हणजे एक वैचारिक पर्वणीच होय.

जे. एन. यु. चे प्रोफेसर विवेक कुमार म्हणतात की, दलित शब्दाचा उल्लेख सर्वप्रथम १८३१ च्या मोल्सवर्थ शब्दकोशामध्ये दिसून येतो. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ह्या शब्दाचा उपयोग आपल्या भाषणामध्ये करावयास सुरुवात केली. काही जाणकार असे म्हणतात की, १९२१ ते १९२४ च्या दरम्यान दलित शब्दाचा वापर स्वामी श्रद्धानंद यांनी सुद्धा केला होता. दिल्लीमध्ये दलितोद्धारक सभेची स्थापना करून त्यांनी दलितांच्या सामाजिक स्वीकृतीला पाठिंबा दिला होता १९७२ मध्ये महाराष्ट्रातील दलित पॅथरने एक सामाजीक राजकीय संघटन बनवले तेच नंतर एका आंदोलनात परिवर्तीत झाले. नामदेव ढसाळ, राजा ढाले, अरुण कांबळे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. आफ्रिकी—अमेरिकी ब्लॅक पॅथर आंदोलनापासून प्रेरणा घेऊन त्यांनी दलित पॅथरची चळवळ उभी केली. येथूनच दलित शब्दाला सामाजिक स्वीकृती मिळाली तोपर्यंत दलित हा शब्द उत्तर भारतात प्रचलित नव्हता नंतर मा. कांशीराम यांनी डी. एस. फोर अर्थात दलित समाज संघर्ष समितीद्वारे दलित आंदोलन चालविले दलित शब्दाला खरी लोकमान्यता मात्र दलित पॅथरने मिळवून दिली. डॉ. आंबेडकर हे डिप्रेस्ड क्लास या शब्दाचा अधिक वापर करायचे. ब्रिटिश सुद्धा याच शब्दाचा वापर करायचे त्यानंतर दलित शब्द लोकप्रिय झाला. दलित हा शब्द कोण्या एका जातीशी निगडीत नाही. त्यामुळे त्याची स्वीकृती समाजातून मोठ्या प्रमाणावर झाली.

दलित ही एक सामाजिक संकल्पना आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनानुसार जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीचे विविध सिद्धांत समाजशास्त्रज्ञांनी वेळोवेळी मांडले आहे. जसे की मुजुमदार यांचा जाती सिद्धांत, घुर्ये यांचा राजकीय सिद्धांत, नेसफिल्ड यांचा व्यावसायिक सिद्धांत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी *कास्ट इन इंडिया* या ग्रंथात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून जातिव्यवस्थेची चिकित्सा केली. ते म्हणतात, काही जातींनी स्वत:ला श्रेष्ठ सिद्ध करण्यासाठी वर्णव्यवस्थेचा आधार घेतला तर काही लोकांना ह्या वर्णव्यवस्थेच्या स्तरीकरणामध्ये सर्वात खालच्या स्तरावर ठेवले अथवा या काहीनां पूर्णत: बाहेर ठेवले. अशा प्रकारे एका बाजूला समाजातून निर्वासित अथवा बहिष्कृत लोकांमधून दलित जाती उत्पन्न झाल्या. सामाजिक विषमता, अत्याचार आणि अस्पृश्यतेच्या प्रथांनी या वर्गाच्या स्थितीला अधिकच दयनीय बनविले आणि या दयनियतेपासून दलन हा शब्द निर्माण झाला. आणि हाच शब्द काळानुसार प्रचलित झाला. शोषित समाजाचे दु:ख आणि वेदनेला हा शब्द पर्यायवाचक बनला आहे. दलित शब्दाच्या व्यवहाराच्या बाबतची वर्तमान परिस्थिती ही आहे की २००८ मध्ये राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने 'दलित' या शब्दाच्या व्यवहारातील वापराबाबत निर्बंध आणले आणि त्याला दंडनीय मानले. असे असले तरी त्या शब्दाचे व्यावहारिक प्रचलन कमी झाले नाही. दलित शब्द हा अस्पृश्यता, उपेक्षित समाजाची सामूहिक ओळख व अस्मितेचे प्रतिक बनला आहे. हा शब्द सर्वात खालच्या आणि मागासलेल्या जातींना एका धाग्यात बांधू शकतो.

'कास्ट बेस्ड एक्स्क्लूजन' या संशोधनावर आधारित या पुस्तकामध्ये वर्तमान भारतामध्ये दलितांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनातील गुंतागुंतीचे विविध लेखकांनी विश्लेषण केले आहे. भारतातील जातीव्यवस्थेवर आधारित बहिष्काराशी संबंधित विविध मुद्दे आणि त्या मुद्द्याचे मूळ शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकाने केला आहे. या इंग्रजी भाषेतील पुस्तकाने भारतीय समाजातील व्यापक गुंतागुंतीच्या जातीय मानसिकतेला उजागर करण्याचा प्रयत्न या पुस्तकामध्ये केला आहे. जातीव्यवस्थेवर आधारित बहिष्काराशी संबंधित एकूण अकरा लेखात हे पुस्तक विभागले आहे. पहिला लेख प्रविण जाधव यांनी दलितांचे अर्थशास्त्र आणि शैक्षणिक भेदभाव यावर लिहिला आहे. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा संदर्भ घेत त्यांनी आपली मांडणी केली आहे. आर्थिक असमानता ही जातिव्यवस्थेचे मूळ कारणं आहे याचा त्यांनी उल्लेख केला आहे तसेच गरिबी आणि वंचितता तिची जननी आहे. शासनाला यावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. अर्थशास्त्राच्या एका विशिष्ट शैक्षणिक शाखेचा विस्तार व्हावा जेणेकरून ती शाखा दलितांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून ती परिस्थिती सुधारण्यासाठी व त्याला एक नवी दिशा देण्यासाठी मार्गदर्शन व सूचना करेल ही अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

रमेश कांबळे यांनी दलित आंदोलनाचे स्वरूप समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या लेखात त्यांनी दलित आंदोलनाचे सिद्धांत व राजकारण आदी बाबींचा परामर्श घेत दलित चळवळीचं नेमकं स्वरूप त्यांनी मांडले आहे. दलितांवर होणारी जातीय हिंसा व त्याचे मूळ हे राजकीय व सामाजिक बहिष्कारात असून त्यांना समाजाच्या बरोबरीचा दर्जा दिल्या जात नाही हे त्यांनी मांडले आहे. तसेच आजच्या काळात दलितांची शैक्षणिक व आर्थिक गतिशीलता आहे ती पुढारलेल्या जातीच्या जातसत्तेला आव्हान देते हे वास्तव सांगतानाच दलितकेंद्री राजकारणाचाही परामर्ष त्यांनी घेतला असतांनाच दलित चळवळी वर्तमानात कशा निष्प्रभ ठरताहेत हे वास्तवही त्यांनी मांडले आहे.

डॉ. शंकर गायकवाड यांनी महाराष्ट्रातील अनुसूचित जातीवर होणाऱ्या अत्याचाराचे सखोल चिंतन केले आहे. त्यांच्यामते, समकालीन भारतामध्ये दलित वर्ग हा केवळ सामाजिक भेदाभेद आणि अन्यायाचा बळी तर आहेच पण त्याचबरोबर आपल्या मौलिक अधिकारापासून सुद्धा तो खूप दूर आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रकार व त्याची कारणे याचाही परामर्श त्यांनी घेतला आहे. पुण्यातील 'माणुसकी' आणि 'मानवी हक्क अभियान' या स्वंयसेवी संस्थांच्या अहवालाचा आधार महाराष्ट्रातील अनुसूचित जातीवरील अत्याचाराबाबत त्यांनी नोंदविलेल्या काही निरीक्षणांना आहे. दलित वर्ग जेव्हा जातीच्या आधारे संघटित होऊन उच्चवर्णीयांच्याद्वारे होणाऱ्या अत्याचाराचा, भेदभावाचा विरोध करतो तेव्हा परिस्थिती अधिकच हिंसक आणि गुंतागुंतीची होते हेही त्यांनी प्रकर्षाने मांडले आहे.

चौथ्या लेखात विभूतिभूषण मलिक यांनी पूर्व उत्तर प्रदेशातील बनारसपल्याडच्या जिल्ह्यावर आधारित असून सामाजिक बहिष्कार व सामीलीकरण यावर त्यांनी भाष्य केले आहे. आपल्या अनुभवजन्य आकडेवारीच्या आधारे त्यांनी स्पष्ट केले की, जातीवर आधारित भेदभाव व बहिष्कार जो अनेक शतकापासून दलितांवर उच्चवर्णीयांकडून केला जात आहे तो खालावलेल्या मानसिक विकासामुळे. दलिताचे समावेशीकरण करण्यासाठी शासकीय स्तरावर केले गेलेले प्रयत्न आणि शासकीय धोरणातील बदल मात्र अत्यंत संथ गतीने आहे त्यासाठी नव्या धोरणाची आवश्यकता आहे जी वंचित वर्गातला समान हक्क व सामाजिक सामीलीकरणांमध्ये मदत होईल. अशी मांडणी केली आहे.

पाचव्या लेखामध्ये डॉ. विलास जाधव यांनी महाराष्ट्रातील दलित व कमजोर वर्गाच्या शेती उत्पादन व त्याच्या विपणनाबाबतच्या प्रश्नांचा आढावा घेतला आहे. सूक्ष्म पातळीवरील आपल्या संशोधन लेखात त्यांनी महाराष्ट्रातील कमजोर वर्गाची कृषी विपणानासंबंधीच्या असणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सहाव्या लेखात मेहर ज्योती सांगळे यांनी महाराष्ट्राच्या अनुसूचित जाती—जमातीकरिता शासनाद्वारे तयार केलेल्या प्रमुख शासकीय योजनांचे मूल्यमापन केले असून विकासाच्या संदर्भात शैक्षणिक व आर्थिक तसेच शासकीय विलंब व सामाजिक उत्तरदायित्व पासून हा समाज कोसो दूर आहे. असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अनुसूचित जातीजमातीचा हा समूह कल्याणकारी योजनाचा अपेक्षित फायदा घेवू शकत नाही असे त्यांनी मांडले आहे.

सातव्या लेखात बी. एस. वाघमारे यांनी मराठवाड्यातील दलितांवर मागील पन्नास वर्षामध्ये झालेल्या अत्याचाराचे सविस्तर व सखोल चिंतन केले आहे. त्यांनी मराठवाड्याच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. दलित अत्याचाराला जबाबदार असलेल्या कारणांचे सखोल विश्लेषण त्यांनी केले आहे. आठव्या लेखामध्ये वाई. एस. अलोने यांनी दलितांविरोधात होत असलेल्या दमण, शोषण आणि हिंसेच्या विरुद्ध सामाजिक कायदे आणि संविधानिक नीतीमुळे जी भूमिका घेतली त्याचाही उल्लेख केलेला आहे. या लेखात आलोने यांनी लिहिताना गांधीं आंबेडकरांच्या विचारांचा परामर्श घेत विषयाची मांडणी केली आहे. कोणत्या एखाद्या बाबीसाठी जी कल्पना शतकानुशतके सामान्य लोकांच्या मनात असते तीच बाब नंतर त्यांचा दृष्टिकोन बनतो. सामान्यांचा दृष्टिकोन हा ब्राम्हणवादाच्या आकृतिबंधानुसार तयार होतो. भारतातील शिक्षण हे जातीवर आधारलेले आहे तथा सामान्य लोकांची दृष्टी सुद्धा ब्राह्मण्यग्रस्त झाली आहे. लोकांचे व्यवहार व त्यांचा दृष्टिकोन त्याच्या जातीय स्थानाला बळकटी देतो. या अनुषंगाने त्यांनी विचारांची मांडणी केली आहे.

जगन कराडे यांनी आंतरजातीय विवाहाच्या आधारे होणाऱ्या बहिष्काराच्या संदर्भातले विश्लेषण केले आहे. आंतरजातीय विवाहाचे प्रमाण हे आजही कमी असून खालच्या जाती शिक्षण व आर्थिक आधारावर उन्नत होत असताना सुद्धा भारतीय समाजात प्रथा, परंपरा व संस्कृती या गोष्टी आजही महत्वाच्या मानल्या जातात हे स्पष्ट केले आहे, विशाल जाधव यांनी मणिपूर येथील अनुसूचित जातीवरील लेखाची मांडणी केली आहे. वर्गीकरणाने संपूर्ण देशाला प्रगत आणि मागास, अल्पसंख्यांक, नागरी व ग्रामीण क्षेत्रांमध्ये विभागले आहे. ज्यामुळे त्यांचे नागरिकत्व निर्धारित होते व अशा

प्रकारावर आधारित आपली ओळख आहे. हे त्यांनी मांडले आहे. जाधव यांनी सामाजिक स्थिती पुढे आणण्याचा प्रयत्न करून त्यांना सर्वसामान्य भारतीय नागरिक तिच्या अधिकारापासून व सामाजिक जीवनातून सुद्धा कसे बहिष्कृत केले जाते हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

शेवटच्या लेखात जसराज सभरवाल यांनी हरयाणामध्ये दलितांवर झालेल्या अत्याचाराचा समाजशास्त्रीय अभ्यास केला. त्यांनी असे निष्कर्ष काढले की, जातीय हिंसा, अत्याचार, भेदभाव, अजूनही भारतीय समाजाच्या मानसिकतेमध्ये रुजले आहे. सबरवाल पुढे म्हणतात की, दलित केवळ शारीरिक हिंसाचाराचेच बळी नाही तर सामाजिक, आर्थिक भेदभावाचे सुद्धा बळी आहेत. हरियाणातील जाट व अन्य प्रभुत्वशाली समाजांनी तेथील अनुसूचित जाती जमातीवर केलेल्या अत्याचारांचा लेखाजोगा त्यांनी मांडला आहे

या पुस्तकात जातीवर आधारित बहिष्काराच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकला आहे व त्यामागील कारणांचाही सखोल अभ्यास व मूलगामी चिंतन त्यांनी केले आहे. त्यामुळे आजही समाजात जातिबहिष्कृतता आता हे एक सामाजिक कारण मानले गेले आहे. जातीवर आधारित बहिष्काराची वर्तमान परिस्थिती ही आहे. त्याला वाचकांसमोर ठेवण्यासाठी विविध सामाजिकशास्त्रज्ञानी गंभीरपूर्वक मांडणी केली आहे व या समस्यांची सोडवणूक कशी करावी हे त्यांनी आपल्या लेखाद्वारे स्पष्ट केले आहे.

पुस्तकातील लेख हे तथ्यांवर वा सांख्यिकिय माहीतीवर आधारित असल्यामुळे ते प्रासंगिक आहे. सामाजिक शास्त्राच्या विद्यार्थ्यांना तथा संशोधकांना हे पुस्तक महत्त्वपूर्ण व लाभदायक ठरेल यात शंका नाही असा विश्वास वाटतो. मला खात्री आहे की डॉ. कराडे यांच्या पुस्तकाचे अकॅडेमिक, संशोधक आणि वाचकांकडून निश्चितच स्वागत होईल. शैक्षणिक आणि व्यावसायिक विकासाकरिता उपेक्षित वर्गाच्या भविष्यकालीन वाटचालीसाठी हे पुस्तक निश्चितच दिशा देणारे ठरेल. सामाजिकशास्त्राच्या चिंतनाचा आधार अधिक व्यापक व समृद्ध होण्यास या दोन्ही पुस्तकाच्या योगदानाचा उल्लेख करावा लागेल.

संदर्भ :—

1. *Karade Jagan, Caste Based Exclusion, Published by Rawat Publications Jaipur, Rajasthan. ISBN 10: 8131607062 / ISBN 13: 9788131607060*
2. *Karade Jagan (Editor), Caste Discrimination, Published by Rawat Publication, Jaipur, Rajasthan (2015),ISBN 10: 8131607038 ISBN 13: 97 88131607039*

२८ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल

डॉ. अरूण पौडमल, माजी सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २८ वे राष्ट्रीय अधिवेशन एम. ई. एस. कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, गोवा येथे दिनांक २ व ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी संपन्न झाले. सचिव या नात्याने अधिवेशनाचा अहवाल थोडक्यात देत आहे. या राष्ट्रीय अधिवेशनाचा मुख्य विषय ''भारतातील पर्यटन आणि विकास: समस्या आणि चिंतन'' असा होता.

या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात उद्घाटन कार्यक्रम शुक्रवार दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न झाला. उद्घाटक म्हणून मा. श्री. संतोष काबाल, मंत्री, पर्यटन विकास, गोवा हे लाभले तर बीजभाषक म्हणून मा. डॉ. आर. इंदिरा, अध्यक्ष, इंडियन सोशीऑलॉजीकल सोसायटी, न्यू दिल्ली या होत्या, आणि प्रमुख उपस्थिती मा. एस. एस. कामत, अध्यक्ष, मूरगांव एज्युकेशन सोसायटी, गोवा यांची होती. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान मालिकेत ''पर्यटन व पर्यावरण या वरील जागतिकीकरण आणि विकास याचा परिणाम'' या विषयावर वक्ते म्हणून डॉ. संपत काळे, तुळजापूर व श्री. जयवंत ढवळे, गोवा हे होते तर श्री. डी. श्रीकांत, कोल्हापूर हे अध्यक्षस्थानी होते.

अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रामध्ये ''सामाजिक जीवन आणि पर्यावरणावर पर्यटनाचे परिणाम'' या विषयावरील परिसंवादामध्ये डॉ. रमेश भांगलेकर, अधिव्याख्याता, कर्नाटक विद्यापीठ, धारवाड यांनी अध्यक्षस्थान भुषविले. चवथ्या सत्रामध्ये प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण झाले.

शनिवार दि. ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी पाचव्या सत्रामध्ये ''पर्यावरणाची सद्यस्थिती'' या विषयांवरील परिसंवादामध्ये अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, लातूर हे होते, तर वक्ते म्हणून डॉ. दिलीप खैरनार, औरंगाबाद हे होते. सहाव्या सत्रांमध्ये शोधनिबंधाचे सादरीकरण झाले.

या अधिवेशनाचा समारोप दि. ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी सांयकाळी झाला. या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रसाद कामत, के. एस. ई. सोसायटी, कर्नाटक यांची उपस्थिती होती तर अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. आर. बी. पाटील, एम. ई. एस. कॉलेज, गोवा यांनी भुषविले. या कार्यक्रमातच प्रा. डी. श्रीकांत, निवृत्त प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व प्रा. सुकुमार शेटट्ये, निवृत्त प्राध्यापक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या दोन मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ. शुभांगी गोटे–गव्हाणे, औरंगाबाद यांना उत्कृष्ट महिला प्राध्यापिका या पुरस्काराने गौरविण्यात आले. कै. जय जोशी उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१८ डॉ. नारायण कांबळे, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद यांच्या ''महात्मा फुल्यांची धर्मचिकित्सा'' या ग्रंथास देण्यात आला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार डॉ. माधवी टेवाणीकर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यासाठी डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार कु. स्नेहल पटट्नशेट्टी, संशोधक विद्यार्थीनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हीला देण्यात आला. तसेच प्राचार्य डॉ. आर. बी. पाटील, मा. प्रसाद कामत, डॉ. महेन्द्रकुमार जाधव, डॉ. अरूण पौडमल यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करून समारोप सोहळा संपन्न झाला. डॉ. अरूण पौडमल, माजी सचिव, म. स. प. यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले व परिषदेची सांगता झाली.

समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबीविषयीचे निवेदन

(नियतकालिकांच्या नोंदणीसंबंधी नियम ८ प्रमाणे)

१. प्रकाशन स्थळ : मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा— समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

२. नियतकाल : वार्षिक (ISSN 2230-7745)

३. मुद्रकाचे नांव: : डॉ.राहुल भगत

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : समाजशास्त्र विभाग, एस. एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा — ४४१९१२

४. मुद्रण स्थळ : दर्शन कम्प्यूटर्स, तुमसर जि. भंडारा. ४४१९१२

५. प्रकाशकाचे नांव : डॉ. राहुल भगत

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : स्तंभ क्र. ३ प्रमाणे

६. संपादकाचे नांव : डॉ. सरोज प्रदीप आगलावे

पत्ता : समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

राष्ट्रीयत्व : भारतीय

७. मालकाचे नांव : मराठी समाजशास्त्र परिषद

पत्ता : वरीलप्रमाणे

मी डॉ. राहुल भगत असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. राहुल भगत
प्रकाशक व मुद्रक

या अंकाचे लेखक :

डॉ. जगन कराडे, डॉ. संपत काळे,
डॉ. धनराज पाटील, डॉ. नारायण कांबळे,
प्रा. प्रियदर्शन भवरे, डॉ. हनुमंत मिसाळ,
डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. ज्योती पोटे,
डॉ. प्रविण घोडेस्वार, डॉ. मनोहर येरकलवार,
डॉ. किशोर राउत, डॉ. दिपक पवार, डॉ. रामेश्वर मोरे,
डॉ. रविंद्र ईखार, डॉ. श्रीराम खाडे, डॉ. सुधा खडके,
डॉ. प्रविण मुधोळकर, डॉ. राजेंद्र बगाटे, डॉ. अशोक सालोटकर,
डॉ. संतोष मेंढेंकर, डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, डॉ. जया लाडे
डॉ. एस. के. राठोड, डॉ. विलास पवार, प्रा. हर्षला सुर्यवंशी,
प्रा. भगवान मनाळ, प्रा. बाळकृष्ण रामटेके, डॉ. गणेश बहादे,
डॉ. के. एस. काळे, डॉ. कमलकिशोर इंगोले, डॉ. सुरेश धनवडे.

प्रकाशक : मराठी समाजशास्त्र परिषद. **मूल्य : ५० रू.**